१८९६४.
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ११२८३

# अमेरिकन संगीतकार

लेखिका :
कॅथरिन लिट्ल बेकलेस
अनुवादक :
मंगेश पाडगांवकर

REFBK-0013828
REFBK-0013828

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
मुंबअी ४

मूल्य पांच रुपये

# अमेरिकन संगीतकार

लेखिका :
कॅथरिन लिट्ल बेकलेस
अनुवादक :
मंगेश पाडगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92826

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38803 वि: चरित्र
क्रमांक 9283 नों दि 20/8/64

REFBK-0013828

ग. पा. परचुरे प्रकाशन मन्दिर
मुंबई ४

मूल्य पांच रुपये

प्रकाशक
वि. ग. परचुरे
ग. पां. परचुरे, प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ २
गिरगांव, मुंबअी ४

Copyright, 1941, 1953, 1958 by
J. B. Lippincott Company
'STORY-LIVES OF
AMERICAN COMPOSERS'
by Katherine Little Bakeless
Published by
J. B. Lippincott Company, New York

आवृत्ति पहिली
१ डिसेंबर १९६४

मुखपृष्ठ सजावट
मोहन वाघ

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि: ........................

# दोन शब्द

कॅथरिन बेकलेसच्या 'स्टोरी-लाइवज् ऑफ अमेरिकन कंपोझर्स' या पुस्तकाचा हा अनुवाद आहे. स्टिफन फॉस्टरपासून विल्यम शुमानपर्यंत अमेरिकेंतल्या संगीतकारांचीं चरित्रें सर्वसामान्य माणसाला आकर्षक वाटतील अशा पद्धतीनें लेखिकेनें या पुस्तकांत लिहिलीं आहेत; त्यामुळें संगीताच्या तांत्रिक ज्ञानाचे उल्लेख अगदीं आवश्यक तेथेंच लेखिकेनें केलेले आहेत : चरित्रात्मक निवेदनाचा ओघ सर्वसामान्यांच्या डोक्यावरून जाऊं नये यासाठीं ही खबरदारी घेतलेली असावी. अमेरिकन संगीताचा वसाहतकालापासून आधुनिक कालापर्यंतचा इतिहास सांगणारा "अमेरिकन संगीताची वाटचाल" हा विवेचक निबंधहि लेखिकेनें प्रस्तुत चरित्र-मालेला जोडला आहे. या निबंधामुळें अमेरिकन संगीताची ऐतिहासिक पार्श्वभूमि समजण्यास मदत होईल.

अमेरिकेंत जन्मलेला तो अमेरिकन असाच केवळ 'अमेरिकन' या शब्दाचा अर्थ लेखिकेनें मर्यादित केलेला नाहीं. कारण यांतल्या कांहीं संगीतकारांचा जन्म अमेरिकेच्या बाहेरचा आहे. (उदा०, व्हिक्टर हर्बर्ट आणि अर्व्हिंग बर्लिन). हे सर्व कलावंत अमेरिकेंत स्थायिक झालेले आहेत.

चरित्रनिवेदनाच्या अनुषंगानें येणारे तांत्रिक शब्द मीं अनुवादांत जसेच्या तसे वापरले आहेत. पुस्तकाच्या शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांत या शब्दांची 'रूपरेषा' दिली आहे. ही रूपरेषा मीं आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरचे प्रोडयूसर सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक श्री. अजित मर्चंट यांच्या मदतीनें केली. श्री. वामनराव देशपांडे, श्री. यशवंत देव, श्री. निनू मुझुमदार यांचीहि अधून मधून मदत मीं घेतली आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

मंगेश पाडगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..................
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. 93(2.C.
ग्रंथ शास्त्र (स्थळ प्रत)

# अमेरिकन संगीताची वाटचाल

गोऱ्या लोकांचें पाऊल पडण्याआधीं उत्तर अमेरिका कशी असेल याची आज फक्त कल्पनाच करणें शक्य आहे. ही कल्पना करूं लागलों असतांना प्रचंड जंगलें, हेलावणारा गवताळ प्रदेश, चकाकणारे, खळखळत वाहणारे झरे असें चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें राहतें. या चित्राच्या जगांत कारखाने नाहींत, धूर-चिमण्या नाहींत, चाकांचा खडखडाट नाहीं. बीव्हर या प्राण्यानें झऱ्यांत जे कांहीं मातीचे बांध तयार केले असतील तेवढेच ! पाण्याच्या बाजूला उंच आणि प्राचीन अशा वृक्षांखालीं रेड इंडियनांचे तंबूतळ आपल्याला या चित्रांत दिसूं शकतील. हा सगळा भूप्रदेश प्राण्यांचा, पक्ष्यांचा आणि रेड इंडियनांचा होता. रेड इंडियन माणसांचें तें खरोखरीचें नंदनवन होतें. सगळ्या सुंदर नंदनवनांप्रमाणें अर्थात् हें नंदनवनहि टिकलें नाहीं.

रेड इंडियन लोकांच्या अनेक जमाती होत्या. परंतु त्या सर्वांना पुरून उरेल इतका भूप्रदेश येथें होता. हीं रेड इंडियन माणसें निसर्गाचीं लेंकरें होतीं, रानटी होतीं, मुक्त होतीं. संस्कृतीचा स्पर्श त्यांना झालेला नसल्यामुळें सुसंस्कृत माणसांच्या आकांक्षाहि स्वाभाविकच या रेड इंडियन लोकांच्या ठिकाणीं दिसत नव्हत्या. या रेड इंडियनांचें संगीत कला म्हणून वेगळें असें जोपासलेलें नव्हतें. ते जें जीवन जगत होते त्याचाच संगीत हा एक आनुषंगिक, प्रासंगिक असा भाग होता.

वाढणारें लहान मूल आणि वाढणारा मानवी समाज यांत फारसा फरक नसतो. लहान असतांना मूल हातांत काठी घेऊन ड्रम वाजवल्याप्रमाणें जमिनीवर आपटतें. तालःची सुरवात इथून होते. ताल सर्वत्र भरून राहिला आहे. हृदयाच्या ठोक्यांत तो आहे, डाव्या उजव्या पायांच्या गतींत तो आहे, दिवस आणि रात्रीच्या आवर्तनांत तो आहे, ऋतूंच्या अनंत गतींत तो भरून राहिला आहे. माणसाला जाणवणारी आणि त्याला दुसऱ्याला व्यक्त करून दाखवावीशी वाटणारी ताल ही एक आदिवस्तु आहे. रेड इंडियन लोक आपली तालाची जाणीव काठ्या आणि ढोल यांतून व्यक्त करीत असत. फ्ल्यूट आणि शिटी यांचाहि ते वापर करीत. रेड इंडियन लोकांना त्यांच्या गाण्यांचें फार महत्त्व वाटत असे.

संगीत हा रेड इंडियनांच्या जीवनाचा अपरिहार्य भाग होता. कांहीं विशिष्ट कल्पना व्यक्त करण्यासाठीं ते संगीताचा उपयोग करीत असत. या त्यांच्या भूमिकेमुळें ऊठसूट केव्हांहि गा असा प्रकार त्यांच्या बाबतींत होत नसे. उदाहरणार्थ, पिकें कापण्याचा हंगाम जेव्हां नसेल तेव्हां नसेल तेव्हां कापणीच्या वेळीं म्हणायचीं गाणीं ते म्हणत नसत. तसेंच प्रेमगीतांचें. रेड इंडियनांचा जादूटोण्यावर विश्वास असे. प्रेमगीतांचा उपयोग प्रेमाचा मोहिनीप्रयोग करण्यासाठीं ते करीत असत. रोग बरे करण्याकरितां सुद्धां गाण्यांचा उपयोग होतो अशी त्यांची श्रद्धा होती. रेड इंडियन वैदू या कामासाठीं खास तयार केलेल्या गाण्यांचा उपयोग करीत असत. खेळतांना गावयाचीं गाणीं विजय मिळविण्यासाठीं म्हटलीं जात असत. शिकार, युद्ध अशा विशेष प्रसंगीं पूर्वतयारी करतांना म्हणावयाचीं त्यांचीं कांहीं विशेष गाणीं असत. अशा प्रसंगीं करायचीं त्यांचीं कांहीं विशेष नृत्येंहि असत. आपल्या मुलाला झोपवितांना रेड इंडियन स्त्री अंगाई गीत म्हणत असे. अशी मंत्रशक्ति असलेलीं गाणीं कांहीं रेड इंडियन लोकांना दैवी शक्तीकडून स्वप्नांतच मिळत! अशीं हीं गाणीं तो मनुष्य इतरांना फुकट शिकवीत नसे—लायक माणसाकडून योग्य मोबदला घेतल्यानंतरच तो या गीतविद्येचें दान करीत असे. एखादा रेड इंडियन मनुष्य दूरवरून प्रवास करून आला, इतर जमातींतल्या लोकांना भेटून आला कीं त्याच्या जमातींतले लोक तो येतांक्षणीं "नवीन गाणीं तूं शिकलास काय?" हा पहिला प्रश्न त्याला विचारीत.

संगीतकारांचीं चरित्रें वाचीत असतांना आपल्याला एक गोष्ट जाणवते ती ही कीं, एखादा कलावंत आपल्या बालपणीं जें संगीत ऐकतो त्याचा मोठेपणीं त्यानें केलेल्या रचनेवर खोल संस्कार उमटतो. रेड इंडियन लोक रानांत राहात, पशुपक्ष्यांचे आवाज त्यांच्या कानांवर पडत. आजूबाजूच्या निसर्गाचा रेड इंडियन लोकांच्या संगीतावर परिणाम झाला किंवा नाहीं हा प्रश्न बाजूला सारला तरी एक गोष्ट मात्र निश्चित कीं, त्यांच्या संगीताला अस्सल रानचा वास होता, मोकळेपणा होता. रेड इंडियन संगीताचा अभ्यास करणाऱ्या एका लेखकाचें असें मत आहे कीं, निसर्गातल्या त्यांच्या कानावर पडणाऱ्या या आवाजांचा त्यांच्या संगीतावर परिणाम झालेला नाहीं. आज रेड इंडियनांचें संगीत म्हणून आपण जें ऐकतों तें गौरवर्णीय लोकांच्या संगीताच्या नियमांच्या चौकटींत बसविलेलें आहे. आपल्या नियमांच्या चौकटींत बसवलेलें हें संगीत ऐकून रेड इंडियनांच्या मूळ संगीताची खरी कल्पना आज कितपत येऊं शकेल याची मला शंका आहे. कांहीं अमेरिकन संगीतकारांनीं रेड इंडियन सुरावटींचा उपयोग आपल्या रचनांत करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा रचना ऐकतांना गोऱ्या लोकांना रेड इंडियन लोकांचें संगीत कसें असेल याची साधारण कल्पना येत असेल. पण हेंच संगीत जर का एखाद्या रेड इंडियन माणसाला ऐकवलें तर तें आपलें आहे असें त्याला मुळींच ओळखतां येणार नाहीं. रेड इंडियन मनुष्य संगीत या गोष्टीकडे अतिशय गंभीरपणें पाहात असे. तो एक जिव्हाळ्याचा वैयक्तिक अनुभव त्याच्या बाबतींत होता. रेड इंडियन माणसाप्रमाणेंच त्याचें संगीतहि हाताला न लागणारें, पकडायला जावें तर निसटणारें होतें. तें असें मुक्त असणें स्वाभाविक होतें. रेड इंडियन माणसाला कोंडून ठेवणें जसें शक्य नव्हतें तसें त्याचें संगीतहि प्रेक्षागृहांत बंदिस्त होऊन राहाणें शक्य नव्हतें.

ज्या वेळीं रेड इंडियन लोक शिकारीसाठीं गव्यांच्या कळपांचा पाठलाग करीत होते त्या वेळीं महासागरापलीकडच्या गोऱ्या माणसांच्या जगांत एक नवी कथा घडत होती. ही कथा माणसाच्या संस्कृतीची कथा आहे. नवनव्या असमाधानांच्या तालांनीं ही कथा भरलेली आहे. इंग्लंडमध्यें असा एक दिवस उजाडला कीं, तिथल्या कांहीं लोकांना हवें असलेलें स्वातंत्र्य त्यांच्या मायभूमींत मिळेना म्हणून ते मायभूमीचा त्याग करून न्यू इंग्लंडच्या किनाऱ्यावर आले.

मेफ्लॉवर हें त्यांचें छोटेंसें जहाज झुडुपांचा आडोसा असलेल्या पाण्याच्या

किनाऱ्याला लागलें. जवळजवळ तीन महिन्यांचा समुद्रप्रवास केल्यानंतर हीं माणसें प्रथम एका खडकावर उतरलीं आणि नंतर त्यांनीं जमिनीवर पाऊल टाकलें. त्या क्षणीं त्यांना किती बरें वाटलें असेल! ज्या खडकावर त्यांनीं पहिलें पाऊल टाकलें तो खडक स्मृतिचिन्ह म्हणून अजूनहि प्लायमाउथ, मॅसच्युसेट्स् येथें काळजीपूर्वक जतन करून ठेवलेला आहे.

ज्या भूमीवर त्यांनीं पाऊल टाकलें ती भूमि किती विचित्र होती—निःशब्द, गूढ, दाट जंगलांनीं वेढलेली. झाडांचीं सळसळणारीं पानें आणि वाहत्या पाण्याची मंद खळखळ यांखेरीज दुसरा आवाज ऐकूं येत नव्हता. काय होतें त्या जंगलांत?

या नव्या भूमीची त्यांना कांहींहि माहिती नव्हती. आपली मायभूमि इंग्लंड सोडून हीं माणसें हॉलंडला गेलीं होतीं. तिथून अज्ञात अशा महासागरांतला खडतर प्रवास करून तीं न्यू इंग्लंडच्या किनाऱ्याला लागलीं होतीं. हें सगळें त्यांनीं कशासाठीं केलें होतें?

त्यांचा जीवनविषयक स्वतंत्र दृष्टिकोन होता आणि हीच त्यांची अडचण होती. आपण जें जीवन जगतों, जीं कामें करतों त्यामागें आपली एक वैचारिक भूमिका असते. इंग्लंड सोडून आलेल्या या यात्रिकांच्या धार्मिक स्वातंत्र्याविषयींच्या कांहीं कल्पना होत्या. इंग्लंडच्या चर्चशीं या स्वतंत्र कल्पनांमुळें त्यांचें पटेना. केवळ इंग्लंडमध्येंच नव्हे, तर सर्व युरोपभर धार्मिक क्षेत्रांत एक उलथापालथ होऊं पाहात होती. अशा गोष्टींचा संगीतावर नेहमींच परिणाम होत असतो. या धार्मिक उलथापालथीचा संगीताशीं जो संबंध आहे त्याचाच इथें आपल्याला विचार प्रस्तुत आहे—या धार्मिक चळवळीची बाकीची हकीगत आपण इतिहासांत वाचूं शकतों.

आपली मायभूमि जी इंग्लंड तिचा त्याग करून न्यू इंग्लंडच्या भूमीवर पदार्पण करणारे हे लोक प्यूरिटन संप्रदायाचे होते. जिथें धार्मिक स्वातंत्र्य मिळत नव्हतें ती भूमि आतां या प्यूरिटन संप्रदायाच्या लोकांनीं सोडली होती. त्यांनीं ईश्वराची उपासना कशी करावी याविषयींची कुणाचीहि कल्पना त्यांच्यावर या नव्या जगांत लादली जाणार नव्हती. ज्याच्यासाठीं त्यांची धडपड चालली होती तें धर्माचरणाचें स्वातंत्र्य अखेर त्यांनीं मिळवलें. नव्या भूमीवर जेव्हां त्यांनीं पाऊल टाकलें तेव्हां स्वाभाविकच खडतर जीवन त्यांच्या वांट्याला आलें. कारण या नव्या प्रदेशांत सगळ्या गोष्टींनाच मुळीं पहिल्यापासून सुरवात करणें भाग होतें.

जंगलें साफ करून आधीं जमीन तयार करायची. राहाण्यासाठीं घरें बांधायचीं म्हणजे झाडें तोडण्यापासून सुरवात. रोटी तयार करायची म्हणजे शेतीसाठीं जमीन तयार करण्यापासून प्रारंभ करायला हवा. इतकें सगळें केल्यानंतर त्याला रोटी मिळणार होती. अशा खडतर परिस्थितींत संगीताची निर्मिति करणें या पहिल्या यात्रिकांना जमलें नाहीं हें आपण सहज समजूं शकतों—तशी त्यांना संधीच मिळणें शक्य नव्हतें. जंगलांतून त्यांच्यावर जीवघेणे हल्ले होऊं लागले—संरक्षणासाठीं त्यांना घाबरून एकत्र व्हावें लागलें.

रेड इंडियन! लालसर तपकिरी रंगाचीं हीं माणसें कातड्याचा पोषाख करीत. पिसांचे आणि फरचे अलंकार वापरीत. या गोऱ्या लोकांशीं कांहीं रेड इंडियन जमाती सलोख्यानें वागत. परंतु त्यांच्यापैकीं कुणालाहि इंग्रजी भाषेचा गंध नव्हता. कांहीं रेड इंडियन जमाती शत्रुत्वानें वागत, त्यामुळें या गोऱ्या लोकांचा जीव सदैव धोक्यांत असे. पण याबद्दल या रेड इंडियन लोकांना दोष कसा देणार? पांढऱ्या चेहऱ्याचीं, प्रचंड समुद्र पार करून आलेलीं, आपण वापरतों त्यापेक्षां कितीतरी पटींनीं मोठी होडी जवळ असलेलीं हीं गोरीं माणसें पाहून हे रेड इंडियन घाबरले तर नवल नाहीं. गोऱ्या माणसांना जशी यांची भीति वाटली तशी यांना गोऱ्यांची. आजूबाजूचा सगळा जंगलप्रदेश आपला आहे असेंच हे रेड इंडियन लोक आजवर समजत आले होते. परंतु आतां मात्र या पांढऱ्या चेहऱ्याच्या विचित्र माणसांनीं त्यांच्या हक्कावर गदा आणली होती.

कांहीं लेखकांचें असें मत आहे कीं, या प्यूरिटन यात्रिकांना संगीत कशाशीं खातात हें ठाऊक नव्हतें, संगीताचें त्यांना महत्त्वच वाटत नव्हतें. पण ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं पुरावा नाहीं. कुणीहि पुराव्यासहित हें विधान करूं शकणार नाहीं. आणि कुणाविषयींहि असें विधान करणें हें निर्दयपणाचें होईल. आपल्या धार्मिक कल्पनांना जिथवर संगीताची साथ मिळेल अशा मर्यादेंत या प्यूरिटन लोकांना संगीताचें महत्त्व वाटत असण्याची फार शक्यता आहे. केवळ मनोरंजनासाठीं संगीत अनुभवायला या प्यूरिटन लोकांना सवडच नव्हती—त्याकडे त्यांचा कल असला तरी देखील त्यांना तें परवडणारें नव्हतें. एका समाजाची घडी आरंभापासून त्यांना बसवायची होती. त्यासाठीं कितीहि परिश्रम घेतले तरी ते थोडेच होते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट होती. या प्यूरिटन रहिवाशांनीं जर गाण्याबजावण्याला सुरवात केली असती, तर तो आवाज रेड

इंडियनांच्या कानीं गेला असता आणि त्यामुळें जिवावर बेतण्याची शक्यता होती. ही गोष्ट टाळणें त्यांना भाग होतें. संस्कृतीपासून दूर, एखाद्या प्रचंड अरण्यांत तुम्ही जर एकटे असाल तर तुमचें संगीतावर कितीहि प्रेम असलें तरीहि तुमच्या तोंडून स्वर उमटणार नाहींत. तुम्ही शांतच राहाल. इतर कुठून आवाज येतो आहे किंवा काय याविषयींच तुम्ही जागरूक राहाल आणि ज्यापासून आपल्या जिवाला धोका आहे अशा कुठल्याहि अज्ञात प्राण्याच्या किंवा व्यक्तीच्या कानावर आपला आवाज पडूं नये यासाठीं तुम्ही काळजी घ्याल.

हे प्यूरिटन लोक अशा परिस्थितींत धोका पत्करूनहि फक्त एकाच प्रसंगीं गात असत आणि तो म्हणजे चर्चमध्यें उपासनेसाठीं जमले असतांना. आपल्या उपासना संगीताच्या बाबतींत ते अतिशय सोवळे होते. इंग्लंडच्या चर्चमधल्या सुंदर संगीतापासून ते तुटले होते. आपल्या उपासनेंत क्वायर वृंद संगीताला स्थान द्यायला हे प्यूरिटन तयार नव्हते. क्वायर संगीत ही गोष्ट त्यांना नाटकी, करमणुकीची वाटे. अशा संगीताला त्यांच्या मतें चर्चमध्यें जागा नव्हती. या प्यूरिटनांच्या दृष्टीनें एकाच प्रकारच्या संगीताला चर्चमध्यें स्थान होतें आणि तें म्हणजे समूहानें गायलेलें स्तोत्र. चर्चमधल्या गाण्यांत जमलेल्या सर्व समूहानें भाग घ्यावा, प्रत्येक माणसाला समूहाबरोबर गातां येईल इतकें तें सोपें असावें असें त्यांना वाटत होतें (यांतून संगीतांतल्या कांहीं अडचणी निर्माण झाल्या. अर्थात प्यूरिटनांना त्या वेळीं त्याची कल्पना हि नव्हती). जवळजवळ शंभर वर्षेंपर्यंत समूहानें गायिलेलें स्तोत्र एवढेंच संगीत न्यू इंग्लंडच्या परिचयाचें होतें. या प्यूरिटनांनीं हीं स्तोत्रें (Psalms) गायला सोपीं जावीं यासाठीं छंदोबद्ध केलीं होतीं. न्यू इंग्लंडला येण्यापूर्वीं या स्तोत्रांचें पुस्तक त्यांनीं हॉलंडला छापून घेतलें होतें.

या प्यूरिटनांच्या स्तोत्रांच्या ज्या चाली होत्या त्यांच्यापैकीं ओल्ड हंड्रेड्थ या स्तोत्राची चाल तेवढी आज आपल्याला ठाऊक आहे आणि अजून ती गायिलीहि जाते. ही चाल मूळ मध्ययुगीन होती. ही चाल गातांना तिला लय नाहीं या गोष्टीची आज आपल्याला जाणीव होते. या प्यूरिटन लोकांना लयबद्धता पसंत नव्हती याचें एक कारण होतें. लयबद्ध संगीत ऐकतांना माणसाला नाचावेंसें वाटूं लागतें. तो नकळत पायानें ताल धरूं लागतो, त्याचे खांदे हलूं लागतात. (प्यूरिटन धर्मोपदेशक अशा तऱ्हेनें पायानें ताल धरून खांदे हलवतो आहे अशी जरी नुसती कल्पना केली तरी हंसूं येईल.)

हीं स्तोत्रें गाणाऱ्या कांहीं प्यूरिटनांना संगीत आवडत होतें याचा एक पुरावा आपल्याला सांपडतो. मेफ्लॉवर या जहाजांत बसून हीं प्यूरिटन सम्प्रदायाचीं माणसें जेव्हां अज्ञात भू-प्रदेशाकडे निघालीं तेव्हां इथें काय आहे हें त्यांना माहीत नव्हतें, आपण परत येऊं अशी त्यांची मुळींच अपेक्षा नव्हती. अशा प्रवासाला जेव्हां माणसें निघतात तेव्हां त्यांचे सगळे इष्टमित्र निरोप घेण्याच्या वेळीं एकत्र येतात. एकत्र आलेल्या या यात्रिकांपैकीं एकानें या प्रसंगाचें वर्णन लिहून ठेवलें आहे : "जहाज तयार होतें. लौकरच आम्ही निघणार होतों. आमच्या मित्रांनीं धर्मोपदेशकाच्याघरीं आम्हांला मेजवानी दिली. धर्मोपदेशकाचें घर मोठें होतें. आम्ही अश्रूभरल्या डोळ्यांनीं एकमेकांचे निरोप घेत होतों. आम्ही सगळ्यांनीं मिळून स्तोत्रें गायिलीं. आमच्या हृदयांतल्या आनंदभरल्या सुरावटी आम्हीं उधळल्या. आमच्यापैकीं कांहींजण संगीतांतले जाणकार होते. इतकं मधुर संगीत मीं कधींहि ऐकलं नाहीं."

गाणारे हे यात्रिक आतां प्रवासाला निघणार होते, भीति आणि शंकांनीं त्यांच्या मनांत काहूर उसळवलें होतें, मनाला दिलासा देण्यासाठींच ते या क्षणीं गात होते. संगीत ही मानवी हृदयाची अत्यंत जिव्हाळ्याची आणि वैयक्तिक अशी भाषा आहे. शब्दार्थांच्या पलीकडे स्वरांची ही भाषा पोंचते.

मूर्तिपूजा करणारे लोक आपल्या देवदेवतांसमोर जेव्हां गात गात नृत्य करतात तेव्हां संगीत ही फक्त त्यांच्या प्रेरणांची भाषा असते. ख्रिश्चनांच्या चर्चमध्यें नृत्य हें धार्मिक भावना व्यक्त करण्याचें साधन समजत नसल्यामुळेंच या जुन्या धर्मोपासकांचा लयबद्ध संगीतावर विश्वास नव्हता. न्यू इंग्लंडच्या भूमीवर या प्यूरिटनांनीं पदार्पण केल्यानंतर जेव्हां रेड इंडियन लोकांनीं वाजवलेला तालबद्ध ड्रम ऐकला असेल तेव्हां एखादी पापमय, अशुद्ध गोष्ट ऐकल्यासारखें त्यांना वाटलें असेल. संगीतांतलें योग्य कोणतें आणि अयोग्य कोणतें याचा या पद्धतीनेंच विचार करण्याची त्यांना संवय असल्यामुळें तालबद्ध संगीत ही लहान मुलांप्रमाणेंच आदिवासी जमातींच्या बाबतींतहि अत्यंत नैसर्गिक अशी गोष्ट आहे याची जाणीव प्यूरिटनांना होऊंच शकली नाहीं.

चर्चमध्यें उपासनासंगीत गाण्यासाठीं जो समूह जमे, त्यांना पुरतील इतकीं पुस्तकें नव्हतीं. त्यामुळें धर्मोपदेशक एक ओळ म्हणून दाखवी आणि त्याच्या मागून समूह ती ओळ गाई. ज्या मुलांना नोटेशन अजून वाचतां येत नाहीं त्यांना

शाळेंतला संगीतशिक्षक याच पद्धतीनें गाणें शिकवतो. या मुलांना त्यामुळें नोटेशन वाचतां येण्यापूर्वींच गाणें पाठ म्हणतां येतें.

इतकें खडतर, धोक्याचें आयुष्य वांट्याला येऊनसुद्धां या प्यूरिटनांनीं केवळ पंधरा वर्षांच्या आंतच मॅसॅच्युसेट्स् येथें उत्तर अमेरिकेंतलें पहिलें कॉलेज काढलें. इतकेंच नव्हे, तर पहिला छापखाना सुरू केला याचें कौतुक वाटतें. तीस वर्षांच्या आंत त्यांनीं आपल्या स्तोत्रांचें पुस्तक छापलें. या पुस्तकांत फक्त स्तोत्रांचे शब्द होते. पन्नास वर्षांच्या आंत त्यांनीं या पुस्तकांत शब्दांबरोबर चालींचें नोटेशनसुद्धां छापलें. स्तोत्रांच्या या पुस्तकाचें नांव 'बे साम बुक' असें होतें. केवळ न्यू इंग्लंडच्या चर्चमध्येंच नव्हे तर इंग्लंड आणि स्कॉटलंड इथल्या चर्चमध्येंहि या पुस्तकाचा वापर होऊं लागला.

पहिलीं शंभर वर्षें न्यू इंग्लंडमध्यें संगीत या स्तोत्रांपुरतेंच मर्यादित होतें. नंतर जीं माणसें इंग्लंडमध्यें आलीं त्यांनीं आपल्याबरोबर वाद्यें आणलीं. समाजाची घडी जसजशी बसूं लागली तसतसा या लोकांना संगीतासाठीं वेळ खर्च करणें शक्य होऊं लागलें. इतिहासाचा विचार न करतां पोकळ विधान करणारे कांहीं लेखक अमेरिकेला संगीताचें अंगच नव्हतें असें प्रतिपादन करतात. हें विधान करीत असतांना ते बहुधा अमेरिकेंतील नव्यानें वसाहत करूं पाहणाऱ्या या लोकांची युरोपशीं तुलना करीत असावेत. अमेरिका आणि युरोप यांच्या इतिहासाचा ज्यांनीं थोडा अभ्यास केला आहे, या दोन्ही खंडांतल्या इतिहासाची, जीवनाविषयींची ज्यांना थोडी माहिती आहे त्यांना अमेरिकेला संगीताचें अंगच नव्हतें हें विधान मूर्खपणाचें आहे हें चटकन् कळेल.

आजहि खेड्यांतून राहाणाऱ्या लोकांना कलानिर्मितीची फारशी संधि मिळत नाहीं असें दिसतें. शेतकरी सकाळपासून रात्रीपर्यंत आजहि शेतावर खपतांना दिसतो. मग अमेरिकेच्या भूमीवर पहिल्याप्रथम ज्यांनीं पाऊल टाकलें; ज्यांना प्रत्येक गोष्टीचा मूलारंभ करावा लागला त्यांना किती मेहनत करावी लागली असेल याची कल्पनाच केलेली बरी. आपलें कलाप्रेम व्यक्त करण्यासाठीं त्या बिचाऱ्यांना कुठें वेळ होता, कुठें संधि होती ? कलेला बहर येण्यासाठीं, किंबहुना कलेच्या अस्तित्वासाठीं रियाज ही अत्यंत आवश्यक गोष्ट असते. अमेरिकेंत पहिलें पाऊल टाकणाऱ्या या रहिवाशांना तेवढा वेळ नव्हता. त्यांच्या डोळ्यांसमोर एवढ्या मोठ्या खंडांतल्या समाजाची प्रारंभींची घडी बसवायची एवढेंच होतें.

कुठलेंहि राष्ट्र जेव्हां नव्यानें घडत असतें तेव्हां तिथलें संगीत एकदम परिपक्व अवस्थेला पोंचलेलें थोडेंच असतें? अशा नव्यानें घडणाऱ्या राष्ट्राला आपली संगीत-संस्कृति सुरवातीला प्रगत अशा इतर राष्ट्रांकडूनच घ्यावी लागते. फ्रान्स सोडून इतर युरोपियन राष्ट्रांना हेंच करावें लागलें आहे. फ्रान्समध्यें सुरवातीच्या काळांत जे शाहीर होते त्यांनीं तिथल्या चर्चमधल्या संगीतावरच आपली बैठक उभारलेली होती. बाकसारख्या श्रेष्ठ संगीतकाराच्या काळांत देखील जर्मनीच्या दरबारांत जें संगीत ऐकूं येत असे त्याची आयात फ्रान्स आणि इटली येथून झालेली असे. धार्मिक सुधारणा होऊन चर्चमधलें संगीत बदलेपर्यंत जर्मनीमधल्या संगीताचा विकास होऊं शकला नव्हता. हेन्री पर्सेलच्या आधीं इंग्लंडमधल्या संगीताला विलक्षण मागणी असलेला युरोपच्या आयुष्यांत एक काल होता.

इंग्लंड सोडून अमेरिकेंत पहिलें पाऊल टाकणाऱ्या या धर्मोपदेशक यात्रिकांनंतरच्या जवळजवळ दीडशें वर्षांच्या काळांत अमेरिकन समाज हा खेड्यांचाच बनलेला होता. यानंतरचीं शंभर वर्षे घडी बसविण्यांतच गेलीं. अगदीं अलीकडच्या काळांत संगीताला घर करण्याची संधि मिळाली आहे.

अशा परिस्थितींत अमेरिकेंत येणाऱ्या लोकांनीं येतांना आपल्याबरोबर युरोपमधून संगीत आणावें हें अगदीं स्वाभाविक होतें. या काळांत संगीत आणि संस्कृति या दोन्ही बाबतींत न्यू इंग्लंड हा जुन्या इंग्लंडचाच एक भाग होता. न्यू इंग्लंडमध्येंच संघटित स्वरूपाच्या संगीताला सुरवात झाली आणि तिथूनच तें इतरत्र पसरलें. न्यू इंग्लंडमध्यें ही अशी सुरवात होत असतांना युरोपमधल्या कला–संस्कृतीची केवढी तरी प्रगति झालेली होती. या काळांत युरोपमध्यें एकाहून अधिक संस्कृति होत्या. युरोपमधले लोक मोटमोठ्या शहरांतून राहात होते आणि पिढ्यानुपिढ्या कलांची उपासना करीत होते. युरोपमधल्या या कलोपासनेला चर्च आणि राजदरबार यांची फार मोठी मदत झाली होती. नव्यानें घडणाऱ्या अमेरिकेंत या दोन्ही गोष्टींची शक्यता नव्हती.

अमेरिकेंत आलेल्या प्यूरिटनांनीं इंग्लंडच्या चर्चमधील सुंदर संगीताकडे आपल्या सोवळेपणामुळें पाठ फिरवली होती. दुसरें असें कीं, अमेरिका हें लोकसत्ताक असल्यामुळें इथल्या संगीतकारांना राजे, राण्या, दरबार यांचा आश्रय मिळण्याचा प्रश्नच येत नव्हता. प्यूरिटनांनीं राजे आणि राजपुत्र यांच्याकडेहि पाठ फिरवली होती.

अमेरिका आणि इतर राष्ट्रें यांच्यांत आणखी एक फरक आहे. या फरकाचा संगीतावर निश्चितच परिणाम होत असला पाहिजे. इंग्लंडमध्यें इंग्रज राहातात, जर्मनींत जर्मन आहेत, फ्रान्स हें फ्रेंच लोकांचें आहे आणि इटलींत अर्थातच इटालियन लोक राहातात. या दृष्टीनें विचार करतां अमेरिकन लोक हे कोण होते ? अमेरिकेचा भूप्रदेश सर्वांसाठीं खुला होता. कुणीहि आणि कुठूनहि इथें येत होते. अमेरिका हें असें राष्ट्र आहे कीं, जिथें वेगवेगळ्या राष्ट्रांतले लोक एकत्र राहायला शिकले आहेत. अमेरिका ही एक अनेक संस्कृतींची भट्टी आहे असें म्हटलें जातें तें यामुळेंच. वेगवेगळ्या राष्ट्रांतून अमेरिकेंत आलेल्या या लोकांनीं आपापलें संगीत सोबत आणलें, आणि मग हे लोक एकमेकांत मिसळले. अमेरिकेची मिश्र संस्कृति अशी तयार झाली. अमेरिकेंतलें संगीतहि या मिश्रणांतूनच निर्माण झालें. एका संगीतकारानें म्हटलें आहे कीं, अमेरिकेंत या प्रचंड सांस्कृतिक भट्टींतून संगीताचे अनेक ढंग बाहेर पडतील.

अमेरिकन समाजाची घडी बसत होती. वेल्श, जर्मन, स्विड्स इत्यादि संगीतप्रेमी लोक आपापलें संगीत घेऊन पेन् सिल्व्हानिआ इथें स्थायिक झाले होते. युरोपमधल्या संगीतासाठीं प्रसिद्ध असलेल्या बोहेमियांतून आलेले मोरव्हियन संप्रदायाचे लोक बेथलहेम, पेन्सिल्व्हानिआ इथें स्थायिक झाले. त्यांच्या संगीताची धाटणी तिथून आजच्या काळापर्यंत पोंचली. 'बेथलहेम बाक क्वायर' ऐकण्यासाठीं दरवर्षी लोक अजूनहि तिथें जमतात.

उत्तर अमेरिकेंत स्थायिक झालेल्या या पहिल्या रहिवाशांनीं स्तोत्रांच्या गायनापासून सुरवात केली. त्यांच्या या संगीतांत सर्वांगीण अशी विशालता नव्हती, विविधता नव्हती, परंतु त्यांत एक प्रकारची प्रामाणिक तळमळ होती. यांतूनच हळूहळू संगीताच्या शाळा, गायनसमाज अस्तित्वांत आले. संगीताची उपासना सुरू होऊन तिथून ती सर्व राष्ट्रभर पसरत गेली. प्यूरिटनांचें सुरवातीचें संगीत सामूहिक स्तोत्रगायन एवढेंच होतें, संगीताचें शिक्षण त्यांना मिळालेलें नव्हतें, त्यांच्याकडे वाद्यें नव्हतीं—या सगळ्यांची मोठीच मर्यादा या संगीताला पडली होती. हळूहळू वाद्यें आलीं, गाण्यांचीं नवीं पुस्तकें आलीं. याच्यांतून एक नवी समस्याहि निर्माण झाली. पुस्तकें आल्यानंतर आतां प्रत्येकाला गाण्याचें नोटेशन वाचायला शिकणें भाग होतें. सुरवातीला 'बे साम बुक' या पुस्तकांत गाण्याचे फक्त शब्दच छापलेले होते. नोटेशन वाचतां येत नसल्यानें छापलें

नव्हतें. हळूहळू या गाण्यांचें नोटेशन आणि तें कसें वाचावें याचे नियम यांचाहि अंतर्भाव या पुस्तकांत होऊं लागला. ही जी नवी गोष्ट आली, त्यामुळें हे प्यूरिटन लोक प्रथम गडबडून गेले. याचें एक कारण होतें. तें म्हणूं लागले, "समोर पुस्तकांत जसं नोटेशन आहे तसंच आम्हीं गायिलं पाहिजे अशी आज अपेक्षा आहे. उद्यां नवीन कांहींतरी नियम तयार होतील आणि त्या नियमां-प्रमाणेंच आम्हीं प्रार्थना केली पाहिजे, धर्मोपदेश केला पाहिजे असं आम्हांला सांगण्यांत येईल." याचाच अर्थ असा कीं, जें धार्मिक स्वातंत्र्य जोपासण्यासाठीं बंडखोरी पत्करून आपण इंग्लंडचा त्याग केला तें स्वातंत्र्य पुन्हा नियमांचा नवा कचाटा निर्माण होऊन त्यामुळें हातून निसटेल. या काळजींत कांहीं वर्षें गेलीं. आतां त्यांना अधिक चांगलें गाण्याची इच्छा होत होती. परंतु त्याची माहिती तर नव्हती. हळूहळू त्यांनीं या गोष्टीचा काळजीपूर्वक अभ्यास करायला सुरवात केली आणि आपल्या धार्मिक उपासनेंत स्वातंत्र्याला धाक घालणारा कसलाहि व्यत्यय न आणतां ते गायला आणि वाजवायला शिकूं लागले.

१७७० सालीं जर्मनींत बीथोवनचा जन्म झाला. त्याच वर्षीं न्यू इंग्लंडमध्यें संगीत शिकवणाऱ्या पहिल्या शाळांची स्थापना झाली. या शाळांतून कित्येक वर्षें चर्चमधलीं गाणींच उपयोगांत आणलीं जात. म्हणजे संगीताच्या शाळेंत शिकलेलीं गाणीं पुन्हा धार्मिकतेचा भंग न करतां चर्चमध्यें गातां येत. त्याच वर्षीं बोस्टनमध्यें 'न्यू इंग्लंड साम-सिंगर' हें पुस्तक छापलें गेलें. विल्यम बिलिंग्ज या अमेरिकेंतल्या आद्य संगीतकारांपैकीं एकानें हें पुस्तक संपादित केलें होतें. आज सर्वांना ठाऊक असलेल्या पॉल रिव्हिअर या गृहस्थानें या पुस्तकाचें मुखपृष्ठ रेखाटलें होतें. या पॉल रिव्हिअरचें नांव आज आपल्याला ठाऊक आहे तें त्यानें रेखाटलेल्या या मुखपृष्ठामुळें नव्हे. यानंतर पांच वर्षांनीं एका रात्रीं त्यानें जी घोडदौड केली त्यामुळें त्याला आपण आज ओळखतों. आतां अमेरिका हें एक स्वतंत्र राष्ट्र झालें होतें, तिथें एक संगीतकारहि उदयाला येत होता. अमेरिकेच्या या पहिल्या संगीतकाराचें नांव फ्रान्सिस हॉप्किन्सन्. फिलाडेल्फिया येथें त्याचा जन्म झाला. पॉल रिव्हिअरनें 'न्यू इंग्लंड सामसिंगर' या पुस्तकाचें मुखपृष्ठ रेखाटण्याच्या आधीं कांहीं वर्षें फ्रान्सिस हॉफकिन्सन्नें 'ओड टु म्यूझिक' आणि 'माय डेज हॅव बीन सो वंडूस फ्री' या गीतांची रचना केली होती. अमेरिकेचा हा पहिला संगीतकार जॉर्ज वॉशिंग्टनचा मित्र होता. आणि स्वातंत्र्याच्या

जाहीरनाम्याखालीं ज्यांनीं सह्या केल्या होत्या त्यांच्यापैकीं तो एक होता ही गोष्ट अगदीं उचित अशीच वाटते. अमेरिकेचा दुसरा अध्यक्ष जॉन ॲडॅम्स यानें बायकोला लिहिलेल्या एका पत्रांत फ्रान्सिस हॉफकिन्सन कसा दिसतो याचें वर्णन केलें होतें.

"...छोटासा, गोजिरवाणा, विचित्र, हुशार माणूस. त्याचं डोकं एखाद्या मोठ्या सफरचंदाहून कांहीं मोठं नाहीं. निसर्गशास्त्राच्या माझ्या अभ्यासांत इतका गंमतीदार दिसणारा प्राणी मला कांहीं आढळला नाहीं. पण तो अतिशय सभ्य, घरंदाज, मनमिळावू आहे."

अमेरिकेंतल्या आद्य संगीतकारांपैकीं बोस्टनचा विल्यम बिलिंग्ज हा एक होय. त्याचा धंदा चामडें कमावण्याचा होता. ही एक वल्ली होती. संगीताविषयीं त्याला इतका उत्साह वाटत होता कीं, त्यानें चामडें कमावण्याचा आपला धंदा सोडून दिला आणि संगीताचा व्यवसाय म्हणून स्वीकार केला. त्या काळीं या देशांत संगीतावर जगणें शक्य नव्हतें. त्यामुळें बिलिंग्ज दारिद्र्यांतच मरण पावला. परंतु न्यू इंग्लंडमध्यें त्याला खूप कीर्ति मिळाली आणि फिलाडेल्फियापर्यंत त्याचीं गाणीं गायिलीं जाऊं लागलीं. गाणें किंवा वाजवणें यांतल्या कौशल्यापेक्षांहि त्याचा उत्साहच अधिक होता. एका डोळ्यानें त्याला दिसत नव्हतें, त्याचा एक हात मोडका होता, दोन पायांची लांबी कमीअधिक होती, आवाज कर्कश होता! त्याचे कान मात्र चांगले असावेत असें वाटतें. पॉल रिव्हिअरनें ज्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर चित्र काढलें त्या स्तोत्रांच्या पुस्तकाच्या संगीताखेरीज बिलिंग्जनें आणखी कांहीं रचना केल्या होत्या. या रचनांना तो फ्यूजिंग पीसेस म्हणत असे. जुन्या संथ सुरांपेक्षां आपल्या या रचना वीस पटीनें चांगल्या आहेत असें त्याचें मत होतें. बोस्टनला झालेल्या एका कार्यक्रमांत त्याचीं दोन गीतें म्हटलीं गेलीं होतीं. हँडेलच्या 'द मेसाय' मधील 'हॅलेलुजाह् कोरस'नें हा कार्यक्रम संपवण्यांत आला होता.

अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या नंतर कांहीं वर्षांनीं पहिला ऑर्केस्ट्रल स्कोअर प्रसिद्ध झाला. या स्कोअरचें शीर्षक होतें 'द डेथ सॉंग ऑफ अन इंडियन चीफ.'

आपलें स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठीं जीं माणसें इंग्लंड सोडून या नव्या भूमीवर स्थायिक झालीं होतीं त्यांच्या वंशजांचें स्वातंत्र्य जेव्हां धोक्यांत आलें तेव्हां त्यांनीं युद्धाची तयारी केली. भावना जेव्हां उत्कट होतात तेव्हां त्या व्यक्त व्हायला संगीतामुळें अतिशय चांगला वाव मिळतो. अशा या काळांत

अमेरिकेंत राष्ट्रीय भावना व्यक्त करणारीं गीतें निर्माण व्हावीं हें अगदीं स्वाभाविक आहे. अशा गाण्यांपैकीं अमेरिकेंत अत्यंत लोकप्रिय झालेली पहिली चाल ही मूळ अमेरिकेंतली नव्हती, ती बाहेरची होती. ही चाल म्हणजे 'यांकी डूडल' या गाण्याची असल्यामुळें इतर राष्ट्रीय गाण्यांच्या आधीं तिचा उल्लेख केला पाहिजे. यांकी डूडलची चाल अतिशय जुनी आहे, हेंहि या लोकप्रियतेचें एक कारण असूं शकेल.

ब्रिटिश सैनिकांनीं न्यू इंग्लंडच्या शेतकऱ्यांची टिंगल करण्यासाठीं प्रथम जेव्हां 'यांकी डूडल' हें गाणें ज्या चालींत म्हटलें तीच साधी चाल आपल्या परिचयाची आहे. ही चाल जवळजवळ एक हजार वर्षांपूर्वीं इटलीमधल्या चर्चमध्यें म्हटली जात असे, असें मानलें जातें. इटलीमधल्या चर्चमधून हें गाणें पुढें दक्षिण युरोपमध्यें द्राक्षांच्या मळ्यांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोंचलें. गाणें पोंचलें म्हणजे चाल पोंचली. त्या चालीला आपल्याला हवे असलेले शब्द त्या शेतकऱ्यांनीं लावले असणार. हळूहळू तिथून ही चाल हॉलंड येथें पोंचली. जुन्या डच भाषेंत यांकर हा शब्द जानी याचा समानार्थक म्हणून वापरला जाई. डूडल हा एक जुना शब्द होता. त्याचा अर्थ होता मठ्ठोबा. कांहीं शतकांनंतर ही चाल हॉलंडमधून इंग्लंडला पोंचली. इंग्लंडमध्यें मुलांना सांभाळणाऱ्या दाया मुलांसाठीं एक गाणें म्हणत. 'लकी लॉकेट लॉस्ट हर पॉकेट' अशी या गाण्याची सुरवात होती. या गाण्याला त्या दाया हॉलंडमधून आलेली ही चाल लावीत असत. लहानपणीं आपण ज्या चाली ऐकलेल्या असतात तशा दुसऱ्या चाली आपल्या मनावर ठसत नाहींत. इंग्लंडमध्यें जेव्हां लोकसत्ताकाचे दिवस आले, कांहीं काळ राजाला त्याच्या सिंहासनावरून हटवण्यांत आलें तेव्हां ऑलिव्हर क्रॉमवेल हा कँटरबरीहून एका केंटिश तट्टावर बसून राज्य चालवण्यासाठीं लंडनला निघाला होता. त्यानें एक वाटोळी हॅट घातली होती. या हॅटला एकच पीस लावलें होतें. क्रॉमवेल रस्त्यावरून जातांना राजाचे शिलेदार त्याची थट्टा करूं लागले. ही टिंगल करतांना या शिलेदारांनीं जें गाणें म्हटलें तें असें :

*यांकी डूडल केम टु टाउन*
*अपॉन अ केंटिश पॉनी*
*स्टूक ए फेदर इन हिज हॅट*
*अँड कॉल्ड हिम मॅकॅरॉनी*

मॅक्रॉनी या शब्दाचा अर्थ इटलीमध्यें तरुण माणसें वापरीत असलेले तंग कपडे असा होतो. इटालीमधलीं तरुण माणसें मॅक्रॉनी फॅशनचे कपडे वापरीत असत.

यानंतर शंभर वर्षांची गोष्ट. ब्रिटिश सैनिक अमेरिकेंत आले आणि त्यांनीं न्यू इंग्लंडमधल्या अशिक्षित शेतकऱ्यांची थट्टा करायला सुरवात केली. हे बिचारे गांवढळ शेतकरी शहरांत आलेल्या या ब्रिटिश सैनिकांना पाहायला म्हणून येत. उत्तम गणवेष घातलेल्या या सैनिकांकडे आणि त्यांच्या तोफांकडे हे शेतकरी आश्चर्यानें टकटका पाहूं लागले. त्या ब्रिटिश सैनिकांना हे शेतकरी अगदींच गांवढे वाटले असतील! अशा वेळीं करण्याजोगी एकच सोपी गोष्ट असते—ती असभ्य असते—आणि ती म्हणजे अशा गरीब लोकांची टर उडविणें. हे ब्रिटिश सैनिक रविवारीं चर्चभोंवतीं जमत. न्यू इंग्लंडमधले लोक चर्चमध्यें जमून आपलीं स्तोत्रें गाऊं लागले कीं हे सैनिक बाहेरून टर उडविण्यासाठीं त्यांच्याहून मोठा आवाज काढून यांकी डूडल गाणें म्हणूं लागत.

१७७५ सालच्या एप्रिल महिन्यांतील रात्र. ब्रिटिश सैन्य बोस्टनहून लेक्झिंग्टनला चाललें होतें. जातांना तें यांकी डूडल हें गाणें म्हणत होतें. त्यांच्यापुढें त्या वेळीं खरोखरीच एक उत्तर अमेरिकन–यांकी–पॉल रिव्हिअर हा तट्टावर बसून जात होता. ब्रिटिश सैनिकांना अर्थात् याची कल्पना नव्हती. शेवटीं ब्रिटिश सैन्यावर बाजू उलटली. ब्रिटिश सेनापति कॉर्नवॉलिस यानें यॉर्क टाउन येथें शरणागति पत्करली. त्या वेळीं ब्रिटिशांच्या सैन्यांतल्या बँड पथकानें 'द वर्ल्ड टर्नड् अपसाइड डाउन्' हें गीत वाजवायला सुरवात केली. पराभवाच्या क्षणीं "जग सगळें उलटें झालें" या भावनेचें हें गीत अगदीं उचित असेंच होतें. त्याच वेळीं अमेरिकन सैन्याच्या बँडनें ब्रिटिशांच्या बँडला (अगदीं तितकेंच उचित असें) उत्तर 'यांकी डूडल' हें गीत वाजवून दिलें.

पहिला अमेरिकन संगीतलेखक फ्रान्सिस हॉपकिन्सन् याच्या मुलाचें नांव होतें जोसेफ. तो त्या काळीं उत्तम हार्प वाजवणारा म्हणून प्रसिद्ध होता. 'हेल कोलंबिया' हें प्रसिद्ध गीत त्यानेंच लिहिलें. हें गीत आपण कसें लिहिलें याविषयींची त्यानें सांगितलेली हकिगत मोठी गंमतीची आहे. त्या दिवसांत अमेरिका आणि फ्रान्स यांच्यांत कुरबुर चालू होती. जॉन ॲडम्स अमेरिकेचा अध्यक्ष होता. लोकांच्या भावना पुन्हा उत्कट झाल्या होत्या. दोन राजकीय पक्ष वेगवेगळ्या बाजू घेत होते. १७९८ सालच्या उन्हाळ्यांतल्या एका शनिवारची गोष्ट. दुपारची

वेळ होती. फिलाडेल्फिया येथें राजकीय समस्येची चर्चा करण्यासाठीं कॉंग्रेसची बैठक भरली होती. त्या दिवशीं गिल्बर्ट फॉक्स हा गायक जोसेफ हॉपकिन्सन्‌ला भेटायला आला. जोसेफची आणि त्याची शाळेंतली ओळख होती.

गिल्बर्ट फॉक्स अडचणींत होता. कारण मंगळवारीं रात्रीं थिएटरमध्यें मदत फंडासाठीं होणाऱ्या एका जलशांत अध्यक्षांचें स्वागत करण्यासाठीं त्याला राष्ट्रीय भावनेचें एक गाणें म्हणायचें होतें. या गाण्याचे शब्द तयार नव्हते. दोन्ही राजकीय पक्ष एकाच वेळीं खूष होतील असें गाणें लिहिणें कठीण होतें. हॉपकिन्सन्‌नें या बाबतींत आपल्याला मदत करावी असें फॉक्सनें सुचविलें. जमलें तर पाहतों असें उत्तर हॉपकिन्सन्‌नें दिलें.

रविवारीं दुपारीं फॉक्स भेटायला आला तेव्हां हॉपकिन्सन्‌नें गाणें लिहून तयार ठेवलें होतें. या गाण्यांत राष्ट्रभक्तीची भावना होती. परंतु दोन्ही राजकीय पक्ष गाऊं शकतील अशा खुबीनें हें गाणें लिहिलेलें होतें. सोमवारीं रात्रीं फॉक्सनें तें गाणें जलशांत म्हटलें आणि टाळ्या मिळवल्या. यानंतर दोन दिवसांनीं बेञ्जामिन कार या अमेरिकेंतल्या संगीताच्या पहिल्या स्टोअरच्या मालकानें 'हेल कोलंबिया' ह्या गाण्याच्या प्रती विकत मिळतील अशी जाहिरात केली.

'द स्टार स्पॅंगल्ड बॅनर' हें राष्ट्रगीतहि भावनेच्या एका उत्कट क्षणीं लिहिलें गेलें. १८१२ सालचें युद्ध सुरू झालें होतें. यानंतर दोन वर्षांनीं ती घटना घडली. १८१४ सालच्या १३ सप्टेंबरची ती रात्र होती.

ब्रिटिशांनीं एका अमेरिकन डॉक्टरला पकडून बाल्टीमोरच्या किनाऱ्याजवळ नांगरून ठेवलेल्या आपल्या बोटींत कैदेंत ठेवलें होतें. फ्रॅन्सिस स्कॉट की या तरुण वकिलानें डॉक्टरच्या सुटकेसाठीं आपण प्रयत्न करायचा असें ठरविलें. तहनिदर्शक झेंडा हातीं घेऊन फ्रान्सिससशीं बोलणीं करण्यासाठीं त्या जहाजावर गेला. १३ सप्टेंबरची ती रात्र होती. ब्रिटिश सैन्य या वेळीं फोर्ट मॅकहेन्री या किल्ल्यावर हल्ला करण्याच्या बेतांत होतें. बाल्टिमोर सर करण्याच्या आधींचें हें पाऊल असें ब्रिटिश सैन्यानें योजिलें होतें. फ्रान्सिस की जहाजावर जातांच ब्रिटिशांनीं त्यालाहि कैद करून ठेवलें. ज्या जहाजावर तो कैदी होता तें जहाज अशा ठिकाणीं नांगरून ठेवलेलें होतें कीं, तिथून सुरू असलेली लढाई फ्रान्सिस कीला अपरिहार्यपणें दिसत होती. आदल्याच आठवड्यांत अमेरिकन सैन्यानें कांहीं पराभव स्वीकारलेले होते. वॉशिंग्टन या अमेरिकेच्या राजधानीच्या शहरांतहि

शत्रूंनीं आग लावली होती. आपण जिंकूं आणि फ्रान्सिस कीला त्याच्या देशाचा झालेला अपमान पाहायला लावूं याविषयीं ब्रिटिशांना पूर्ण खात्री होती. फ्रान्सिस कीच्या आयुष्यांतली ती भयानक रात्र होती. डेकवरच्या अंधारांत तो येरझारा घालीत होता. त्याला झोप येत नव्हती. अंधारांतून मॅकहेन्रीच्या किल्ल्यावर होणारा ब्रिटिश तोफांचा वर्षाव तो पाहात होता. संध्याकाळच्या धूसर प्रकाशांत किल्ल्यावर फडकणारा तारे आणि पट्टे असलेला अमेरिकेचा ध्वज त्यानें पाहिला होता. उद्यां सकाळीं आपल्या राष्ट्राचा तो ध्वज त्या जागीं दिसेल का? असे विचार फ्रान्सिसच्या मनांत आले.

हळूहळू अंधार ओसरूं लागला. पूर्वेकडे प्रकाशाच्या कांहीं रेषा दिसूं लागल्या. पाण्यावर दाट धुकें असल्यामुळें पलीकडचा किल्ला त्याला दिसेना. रात्रींच तोफांचा धडाका अचानक थांबला होता. असें कां झालें याचें फ्रान्सिसला आश्चर्य वाटलें होतें. कांहीं कळत नव्हतें. किल्ल्यावर कुणाचा झेंडा फडकतो आहे, हें दिसलें तर बरें होईल असें त्याला वाटत होतें.

इतक्यांत वाऱ्याची एक झुळूक आली. धुकें दूर झालें. डोळे विस्फारून फ्रान्सिस पाहूं लागला. फ्रान्सिसला जें दिसलें त्याच्यावर त्याचा क्षणभर विश्वास बसेना. किल्ल्यावर अमेरिकेचा ध्वज फडकत होता. तोफांच्या गोळ्यांमुळें ध्वजाचा एक कोपरा फाटला होता आणि वरच्या ताऱ्यांपैकीं एक तारा लुप्त झाला होता. तो ध्वज पाहतांच फ्रान्सिसचें हृदय उचंबळून आलें आणि तो मनांतल्या मनांत गाऊं लागला.—हेंच तें 'स्टार—स्पँगल्ड बॅनर' हें गीत.

हें गीत सुचतांच फ्रान्सिस थरारून गेला. खिशांतला एक लखोटा काढून त्यानें त्यच्यावर या गीताचे शब्द सुचतील तसे लिहायला सुरवात केली. बाल्टिमोरला पोंचल्यानंतर त्यानें हें गीत छापायला दिलें. त्याच रात्रीं छोट्या पत्रकासारखें छापलेलें हें गीत बाल्टिमोरमधल्या एका विश्रांतिगृहांत गायिलें गेलें. त्या काळच्या लोकप्रिय अशा एका इंग्लिश गाण्याचीच चाल या गीताला लावली गेली होती. त्या क्षणापासून हें अमेरिकन गीत झालें. कां होऊं नये? अमेरिकन हे एके काळीं इंग्लंडमधलेच होते. या गीताचे शब्द, सूर, तो काळ या सगळ्याच गोष्टी थरारून टाकणाऱ्या होत्या. पुन्हां पुन्हां गायिलें गेल्यामुळें हें गीत अमेरिकेचें राष्ट्रीय गीत झालें.

'अमेरिका' हें असेंच एक दुसरें गीत. या गीताचा मात्र युद्धाशीं कसलाहि

संबंध नव्हता. तें खरेंखुरें राष्ट्रीय गीत आहे. शंभर वर्षांपूर्वी या गीताचे शब्द सॅम्युएल फ्रान्सिस स्मिथ यानें लिहिलें. हें गीत आपण कसें लिहिलें याची हकीकत सॅम्युएल स्मिथनें सांगितली आहे ती अशी :

युरोपमधून आलेल्या एका माणसानें आपल्याबरोबर जर्मन संगीताचीं कांहीं पुस्तकें आणलीं होतीं. हीं पुस्तकें त्यानें लोवेल मॅसन या गीतलेखकाला दिलीं. लोवेल मॅसनला नोटेशन वाचतां येत असे. पण त्याला जर्मन भाषा वाचतां येत नव्हती. मॅसननें हीं पुस्तकें सम्युएल स्मिथ या धर्मोपदेशाकाकडे दिलीं. 'आपल्याला ज्याचा उपयोग करतां येईल असें यांत जें असेल तें शोधून काढ' अशी विनंति मॅसननें स्मिथला केली. स्मिथ लिहितो, "मीं तीं पुस्तकें घेतलीं. एके दिवशीं दुपारीं मी सहज तीं चाळत होतों. पण चाळतां चाळतां 'गॉड सेव्ह द किंग' या गीताची चाल मला फारच आवडली. मीं लेखणी घेतली आणि तो चालीचा तुकडा उतरून घेतला. बसल्या बैठकींत मीं तें गीत लिहून काढलें. पुढें तें इतकें लोकप्रिय होईल याची कल्पनाहि मला नव्हती. अमेरिकन स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं मुलांच्या एका समारंभांत प्रथम तें गाणें गायिलें गेलें."

इतिहासाचा प्रवाह वाहत असतो आणि नव्या नव्या घटना उलगडत असतात. अमेरिकन राष्ट्रीय गीताला 'गॉड सेव्ह द किंग' या गाण्याची चाल असणें ही गोष्ट आज या इतिहासाच्या ओघांत औचित्यपूर्ण वाटते. 'स्टार स्पँगल्ड बॅनर' हें गीतहि एका लोकप्रिय इंग्लिश गाण्याच्या चालीवर म्हटलें जातें ही गोष्टहि अशीच महत्त्वाची आहे. यांतून जणुं कांहीं 'झालं गेलं विसरून जा, आतां आपण सलोख्यानें वागूं' हीच गोष्ट सुचवली जाते. जिथें बंदुका पोंचूं शकत नाहींत, तिथें संगीत जाऊन पोंचतें.

'गॉड सेव्ह द किंग' या गाण्याची चाल केवळ 'अमेरिका' या गीतालाच लावली आहे असें नव्हे. इतर राष्ट्रांतल्याहि गीतांना ती चाल लागलेली आहे. संगीताची भाषा राष्ट्राराष्ट्रांतले भेद जुमानीत नाहीं. कधीं कधीं असें वाटतें कीं, गाणीं हेच जर कायदे असते, तर सगळ्या राष्ट्रांत स्नेहाचे संबंध नांदले असते.

पहिल्या रहिवाशांनीं अमेरिकेच्या भूमीवर पाऊल टाकल्यापासून सर्व क्षेत्रांत हें राष्ट्र सतत उद्योगशील राहिलेलें आहे. चामडें कमावण्याचा धंदा सोडून संगीत हाच व्यवसाय स्वीकारणाऱ्या विल्यम बिलिंग्ज या संगीतकाराचाहि उद्योग चालूच होता. आपलें संगीतलेखन करीत असतांनाच बिलिंग्जनें सेक्रेड सिंगिंग स्कूल ही

२

गाणें शिकवणारी पहिली शाळा काढली. ही संस्था अजूनहि अस्तिवांत आहे—'स्टाउटन म्यूझिकल सोसायटी' या नांवानें ती ओळखली जाते. हळूहळू गायन-शाळा अधिकाधिक स्थापल्या जाऊं लागल्या. अमेरिकेच्या नव्या जगांतल्या संगीताच्या क्षेत्रांतल्या या शाळा "आद्ययात्रिक" होत्या असें म्हणायला हरकत नाहीं.

सामाजिक दृष्ट्या या शाळांचें एक वेगळें महत्त्व होतें. या शाळांमुळें चर्चच्या अधिकारकक्षेंतून संगीताची सुटका होऊन तें सर्वसामान्य माणसाच्या मनोरंजनाचें साधन होऊं लागलें होतें. या शाळांमुळें अमेरिकेंत एक नवा व्यवसायहि जन्माला आला.—हा व्यवसाय संगीतशिक्षकाचा होय. या शिक्षकांमुळें संगीताचीं पुस्तकें बाजारांत खपूं लागलीं. पहिले संगीतशिक्षक स्तोत्रांचें नोटेशन असलेलीं पुस्तकें विकण्यासंबंधींच्या जाहिराती देत असत. गाणें शिकवणाऱ्या शिक्षकांच्या आणि गाण्यांच्या संग्रहांच्या अनेक जाहिराती आतां दिसूं लागल्या होत्या. अमेरिकेंत एव्हांना वाद्येंहि आलीं होतीं. परंतु वादनाच्या क्षेत्रांतलें कौशल्य समाजांत निर्माण व्हायला आणखी शंभर वर्षें लागलीं. रेल्वे सुरू झाल्या आणि दळणवळण अधिक सुलभ बनलें तेव्हां वाद्यवादनाच्या क्षेत्रांत अमेरिकेंत प्रगति होऊं लागली. रॅग्टाइम् संगीत लोकप्रिय होईपर्यंत अमेरिकन लोकांना वाद्यांविषयीं फारशी उत्सुकता वाटत नव्हती. सर्वसामान्य लोकांत वाद्यांचा षौक या रॅग्टाइम् संगीतामुळें निर्माण झाला.

गाणें शिकूं इच्छिणाऱ्या लोकांना नोटेशन वाचायला शिकवणें हें या गायन-शाळांचें एक महत्त्वाचें काम होतें. समोर नोटेशन नसतांना, एकहि वाद्य नसतांना आणि गाण्याचें नेतृत्व करायला जाणकार गायक नसतांना चर्चमध्यें जमून गाणीं म्हणणाऱ्या लोकांना किती त्रास झाला असेल याची आपण कल्पना करूं शकतों. कवाईत करतांना आपलीं पावलें तेवढीं बरोबर पडताहेत, इतरांचीं चुकीचीं आहेत असें मानून चालणाऱ्या सैनिकासारखी चर्चमध्यें या गाणाऱ्या लोकांची भूमिका असणार. कसेंहि असलें तरी या गाण्याच्या मागें एक प्रामाणिक तळमळ होती. आणि तिच्यामुळेंच या समूहगायनाला महत्त्व होतें.

युरोपमध्यें शेंकडों वर्षांपूर्वीं चालीची सरगम लिहिण्याची एक विशिष्ट पद्धत विकसित झाली होती. आजहि शाळांतून ही पद्धत वापरली जाते. या पद्धतीनुसार प्रत्येक स्वराला अक्षरचिन्ह योजलेलें होतें, डो-रे-मी पद्धत म्हणून ही

ओळखली जाते. इंग्लंडच्या एका विभागांत मात्र याऐवजीं फा सॉल ला (यांत मी देखील असे.) या अक्षरचिन्हांची पद्धत रूढ होती. एलिझाबेथ इंग्लंडची राणी असतांना शेक्सपिअरच्या काळांत इंग्लंडच्या कांहीं विभागांत या पद्धतीनें सरगम म्हटली जाई.

गायनशाळा स्थापल्या गेल्या तेव्हां नोटेशनच्या छापील पुस्तकांची, गायनाच्या नियमांच्या पुस्तकांची जरुरी भासूं लागली. "सर्वसामान्य माणसाच्या आनंदासाठीं त्याच्या हातीं गाण्याच्या नोटेशनचीं हीं पुस्तकें पडणें आवश्यक होतें. हें नोटेशन वाचणें सोपें जावें म्हणून स्वराच्या अक्षरचिन्हाला कांहीं खुणा ठरवून देण्यांत आल्या होत्या. अमुक खूण म्हणजे सॉल, अमुक खूण म्हणजे फा असें ठरलेलें असे. या खुणांचें नोटेशन असलेलें सगळ्यांत जुनें पुस्तक म्हणजे 'दी ईझी इन्स्ट्रक्टर' हें होय.

या शाळा म्हणजे संगीताच्या क्षेत्रांतील स्वातंत्र्याचे जाहीरनामेच होते असें म्हणायला हरकत नाहीं. त्यामुळें चर्चच्या कक्षेबाहेर विश्रांतिगृहांत हे वर्ग भरत असत. संगीत आतां चर्चच्या बाहेर पडून समाजांत पसरत होतें. संगीताच्या या वर्गांत शिकणारे लोक आपल्याबरोबर स्वतःच्या मेणबत्त्या आणीत. बाकावर नोटेशनच्या पुस्तकाशेजारीं मेणबत्त्या पेटवून ठेवीत. अर्धवर्तुळाकार दोन किंवा तीन रांगा करून ते संगीताच्या अभ्यासाला बसत. प्रत्येक वर्ग तीन तासांचा असे. असे चोवीस वेळां वर्ग भरत. अभ्यासक्रम संपल्यानंतर वेगवेगळ्या शाळांची आपली तयारी दाखवणारे कार्यक्रम होत. चोवीस धड्यांचा एके ठिकाणचा अभ्यासक्रम पुरा झाला कीं हे फिरते गायनशिक्षक एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जात. तिथें ते पुन्हां चोवीस धड्यांचा वर्ग घेत. आणि नोटेशनचीं पुस्तकें विकीत. चर्चमधल्या गायिल्या जाणाऱ्या साध्या सोप्या चालींच्या ऐवजीं या शाळांत अधिक कठीण चाली गायला शिकवल्या जात.

पूर्वेकडच्या शहरांत जेव्हां ऑर्गन हें वाद्य आलें तेव्हां या गायनशिक्षकांची जरुरी भासेनाशी झाली. या ऑर्गनबरोबरच अधिक चांगलें संगीत आणि संगीतकार युरोपमधून अमेरिकेंत येऊं लागले. अमेरिकेंतहि आतां वाद्यांचे कारखाने निघाले. खुणांच्या नोटेशननीं शिकवणारे गायनशिक्षक हळूहळू दूर पश्चिमेकडच्या आणि दक्षिणेकडच्या मागासलेल्या विभागांत फेकले जाऊं लागले. डो–रे–मी या सरगम–पद्धतीबरोबरच संगीत शिकवण्याच्या अधिक चांगल्या पद्धती युरोपमधून

अमेरिकेंत आल्या. शहरांमधल्या कला म्हणून जोपासलेल्या संगीताची डो-रे-मी नोटेशन पद्धत आणि मागासलेल्या संगीत विभागांतल्या लोकसंगीताची खुणांच्या नोटेशनची पद्धत असे हे दोन गट झाले. दक्षिणेकडच्या समुद्रकिनाऱ्याजवळच्या शहरांत संगीत अधिक प्रगत होतें. युरोपमधून अमेरिकेंत येऊन जाणाऱ्या कलावंतांचे इथें कार्यक्रम होत असत. हा विभाग पदरीं अनेक गुलाम ठेवणाऱ्या मोठमोठ्या मळेमालकांचा होता. मागासलेल्या डोंगराळ विभागांत जिथें हे युरोपियन संस्कार पोंचूं शकत नव्हते तिथें खुणांचें जुन्या पद्धतीचें नोटेशनच चिकटून राहिलें.

रेडिओ आणि ग्रामोफोन यांच्या प्रसाराबरोबर आतां नव्या संगीताचा प्रसार होऊं लागला आहे. खेडेंगांवांतलें हें जुनें संगीत आतां हळूहळू नाहींसें होणार अशी शक्यता दिसूं लागली.

ज्या काळांत खुणांचें नोटेशन खेड्यांतून जीव धरून होतें त्याच काळांत पूर्वेकडच्या शहरांत संगीताचें शिक्षण कॉलेजांत मिळत होतें आणि अमेरिकेंतले नवे संगीतकार उदयाला येत होते. अमेरिकेच्या वसाहतीच्या प्रारंभीं प्यूरिटनां-बरोबर आलेल्या संगीताचा विचार करतां अमेरिकेंतल्या पहिल्या संगीतकारांनीं भक्तिगीतें लिहिण्यापासून सुरवात करावी हें अगदीं स्वाभाविक वाटतें. 'निअरर माय गॉड टु दी' आणि 'माय फेथ् लुक्स अप टु दी' हीं लोवेल मॅसन यानें लिहिलेलीं भक्तिगीतें आपण अजूनहि गातों.

याच काळांत अमेरिकेंत निर्माण होणाऱ्या या भक्तिगीतांचे दोन प्रकार दिसूं लागले होते. एक प्रकार मॅसनच्या वर उल्लेखिलेल्या गीतांचा—या गीतांत भावनेची शान होती. दुसरा प्रकार प्रचारकी भक्तिगीतांचा. हीं प्रचारकी भक्तिगीतें मैदानी धर्मसभा, धार्मिक पुनरुज्जीवनाच्या मोहिमा आणि संडे स्कूल्स या ठिकाणीं वापरलीं जात. श्रोत्यांची भावना होतां होईल तितकी ताणणें हाच या भक्तिगीतांचा हेतु असल्यामुळें तीं अतिशय भावनाविवश असत. याच काळांत संगीतांतली तालबद्धता लोकांना रुचूं लागली होती, तिचें स्वतःचें म्हणून सौंदर्य आहे याची लोकांना जाणीव होऊं लागली होती. अमेरिका झपाट्यानें वाढत होती. नवे शोध लागत होते. रेल्वेचें जाळें सर्वत्र पसरलें होतें. संगीताकडे सुखाचें, आनंदाचें साधन म्हणून लोक आतां पाहूं लागले होते. गीतांवर भावनाविवशतेचा पगडा याच काळांत बसूं लागला. संध्याकाळचीं जेवणें झाल्यानंतर कुटुंबांतलीं माणसें पिॲनोभोंवतीं गोळा

होऊन भावविवश गाणीं गात. भावनाविवश धार्मिक गीतांना समांतर असा हा प्रवाह होता. पुष्कळ वेळां धार्मिक गीतांना जो संगीतकार चाली लावीत असे त्याला त्या गीतांतल्या शब्दांना अनुरूप मेलडी कशी रचावी हेंहि ठाऊक नसे. परंतु या गाण्यांपैकीं कांहीं भावनाविवश गाणीं अजूनहि उरलीं आहेत. गोऱ्या धर्मोपदेशकांकडून दक्षिणेकडच्या निग्रोंना हींच गाणीं शिकवलीं गेलीं. अशा गीतांपैकीं 'शॅल वी गॅदर ॲट धी रिव्हर ?' 'विल देअर बी एनी स्टार्स इन् माय क्राऊन ?' 'व्हेन द रोल इज कॉल्ड अप यॉंडर आय्‌ल् बी देअर' हीं कांहीं होत.

मेफ्लॉवर या जहाजांतून न्यू इंग्लंडच्या खडकाळ किनाऱ्यावर प्यूरिटनांनीं पाऊल टाकलें त्याच्या आदल्याच वर्षीं गुलामांनीं भरलेलें पहिलें जहाज आफ्रिकेहून दक्षिणेच्या किनाऱ्याकडे निघालें. अमेरिकेंतल्या गोऱ्या लोकांनीं आफ्रिकेंतल्या निग्रोंची गुलाम म्हणून आयात करायला सुरवात केली. जे लोक आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं अमेरिकेंत आले त्यांनीं या काळ्या निग्रोंना गुलाम करावें ही गोष्ट किती विपरीत होती ! हे निग्रो लोक अशिक्षित, जंगलांतून नुकतेच आलेले आदिवासी होते. त्यांना संस्कृति अंगीं बाणवण्यासाठीं बराच काळ जाण्याची आवश्यकता होती. हे निग्रो प्रथम गोऱ्यांची भाषा शिकले. मग त्यांचीं कामें करायला शिकले. रेड इंडियनांप्रमाणें या निग्रोंनीं गोऱ्या लोकांशीं शत्रुत्व पुकारलें नाहीं. हे स्वभावानें शांत होते. त्यांच्या आवाजांत आणि वृत्तींत गोडवा होता. गोऱ्यांच्याबरोबर ते राहूं शकले. निग्रोंप्रमाणें रेड इंडियन लोक गोऱ्या लोकांत मिसळले नाहींत. ते अलिप्त राहिले. गुलामी त्यांनीं स्वीकारली नाहीं. स्वातंत्र्य असतांनाच मरण पत्करणें त्यांना योग्य वाटलें.

निग्रो लोकांना संगीताची उपजतच जाणीव आहे, हें त्यांच्या रक्तांतच भिनलेलें आहे. या निग्रोंनीं अमेरिकेंत येतांना बरोबर आपलें संगीत आणलें. त्यांना लिहितांवाचतां येत नव्हतें. त्यांनीं आपलें संगीत आणलें तें स्मरणांतून. त्यांचें हें संगीत आदिवासींचें प्राथमिक स्वरूपाचें संगीत होतें. या निग्रोंच्या संगीताची अभिव्यक्ति कसल्याहि बंधनांनीं अडत नाहीं. आनंदी असो किंवा दुःखी असो, निग्रो मनुष्य आपला आत्मा संगीतांत ओतूं शकतो—वेगळ्या शब्दांत सांगायचें तर 'तो देऊं शकतो'.

गोऱ्या धर्मोपदेशकांकडून भावनाविवश गाणीं असा ज्यांचा उल्लेख केला तीं धार्मिक गीतें हे निग्रो शिकले. हीं गीतें निग्रोंना आवडलीं आणि त्यांतून त्यांनीं

आपलें एक वेगळें संगीत निर्माण केलें. गोऱ्या लोकांचीं हीं गाणीं भावनाविवश होतीं. निग्रो लोक अशिक्षित असल्यामुळें त्यांना अशा तऱ्हेनें गाणीं लिहितां येत नसत, परंतु त्यांच्या भावना तीव्र होत्या—त्यामुळें त्यांना गाणीं 'करावीं' लागत नसत, तीं आपोआप 'होत' असत. साधेपणा आणि तळमळ हे या निग्रोंच्या गाण्यांचें वैशिष्टय होतें. गोऱ्यांनीं शिकवलेल्या गाण्यांच्या आधारें ते आपलीं गाणीं रचीत. त्यांच्या हृदयांतल्या उत्कट भावना, त्यांचीं तीव्र सुखदुःखें त्यांच्या या गाण्यांतून व्यक्त होत. निग्रोंच्या या गाण्यांत कृत्रिम भावनाविवशता नसे. त्यांच्यांत एक प्रकारची नैसर्गिक सहजता होती.

गोऱ्या लोकांकडून धार्मिक दीक्षा घेतल्यानंतर निग्रो लोक आतां स्वतःच्या धार्मिक सभा घेऊं लागले होते. निग्रो समाजांतून धर्मोपदेशकहि निर्माण झाले होते. दक्षिणेंतली एक गौरवर्णीय स्त्री एकदां या निग्रोंच्या धार्मिक सभेला उपस्थित राहिली. एका जुनाट सभागृहांत धार्मिक उपासनेसाठीं हे निग्रो जमलेले होते. या गौरवर्णीय स्त्रीनें तिला आलेला अनुभव लिहून ठेवला आहे तो असा :

"सभागृहांत आम्हीं प्रवेश करण्याअगोदरच निग्रोंच्या उपासनेला सुरवात झाली होती. सगळे लोक शांतपणें, उत्कट भक्तिभावनेनें पाठटेकणी नसलेल्या बाकांवर रांगेंत बसले होते. धर्मोपदेशकानें त्यांना प्रार्थना करण्याची विनंति केली. त्याबरोबर सगळे निग्रो लोक आपापल्या बाकांसमोर गुडघे टेकून जमिनीवर बसले. उत्कट भक्तिभावनेनें त्यांनीं आपलीं मस्तकें वांकवलीं होतीं. धर्मोपदेशकानें थरथरत्या आवाजांत ईश्वराकडे एक प्रदीर्घ याचना केली. क्वचित् एखादा मनुष्य खोकल्याचा आवाज येत होता; मध्येंच एखादें मूल रडे; मध्येंच एखाद्याच्या तोंडून 'हे परमेश्वरा!' असे शब्द बाहेर पडत. बाकी सारें शांत होतें, निःशब्दपणें सगळा जमाव प्रार्थना करीत होता.

उत्कटतेनें भारलेलीं मिनिटें एकामागून एक पुढें सरकत होतीं. हे परमेश्वरा! आमेन इत्यादि अधूनमधून येणारे उद्गार आतां अधिक मोठ्यानें ऐकूं येऊं लागले होते, अधिक नाट्यमय वाटत होते. इतक्यांत विजेचा प्रवाह थरारत जावा त्याप्रमाणें निग्रोंच्या त्या जमावांतून सर्जनशीलतेची लाट थरारत गेल्याचा भास मला झाला. ढग जमून यावेत तसें भावनेचें वातावरण जमून येत होतें. अर्धवट हुंकार ऐकूं येत होते. मध्येंच एखाद्याच्या पापाची जाणीव झालेल्या मनांतून पश्चात्तापाचें कण्हणें ऐकूं येत होतें. हळूहळू या उद्गारांना, या कण्हण्याला अचानक

संगीताची लयबद्धता प्राप्त झाली. एकाच्या तोंडून आर्त उद्गार बाहेर पडला कीं त्याला जमावांतल्या दुसऱ्या कोणत्या तरी माणसाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळूं लागला. भावनेनें भारलेल्या या सादप्रतिसादांचीं लयबद्ध आवर्तनें तयार होऊं लागलीं, वाढूं लागलीं. यांतूनच एक नवीन गाणें तयार होऊं लागलें—उत्स्फूर्त, तिथल्या तिथें तयार होणारें. हें गाणें कुठल्याहि एकानें लिहिलेलें नव्हतें आणि तरीहि त्यांच्यापैकीं प्रत्येकानें तें लिहिलेलें होतें.''

'स्पिरिच्युअल्स' या नांवानें ओळखलीं जाणारीं निग्रोंचीं भक्तिगीतें अस्तित्वांत आलीं तीं अशीं. भाबड्या मनाच्या निग्रोनें बायबलमधल्या कथा आपल्या अनुभवांत मुरवल्या आणि त्या व्यक्त केल्या.

आफ्रिकेंतले निग्रो ढोल वाजूं लागले, नाच होऊं लागला कीं गात गात एक प्रकारच्या तारेंत जात. ही तार धार्मिक भावनेची असे तशी युद्धपिपासेचीहि असे. अमेरिकेंत आल्यानंतर या निग्रो लोकांची चर्चमधल्या या सभांत आत्यंतिक भक्तीची तार लागूं लागली. या एका प्रकारच्या समाधिवजा तारेंत त्यांनीं प्रवेश केला कीं ते बाक मागें ढकलीत आणि रांगेंत, तालांत गात गात सभागृहांत फेर धरून फिरूं लागत. भक्तीच्या या धुंदींत फेर धरतां धरतां ते जशीं सुचतील तशीं तिथल्या तिथें तयार करून गाणीं म्हणत. धर्मोपदेशक वाचीत असलेल्या बायबलमधली एखादी ओळ ते पकडत आणि तिचा आधार घेऊन आपलें गाणें पुढें सुरू करीत. एक मनुष्य एखादी ओळ म्हणे. त्याला दुसरा मनुष्य आणखी एक ओळ करून प्रतिसाद देई. अशा तऱ्हेनें या सामूहिक रांध्यांतून भक्तिगीत जन्मत असे. या त्यांच्या सभांना 'शाउटिंग मीटिंग्ज' असें म्हणत असत. स्टिफन फॉस्टर लहान असतांना निग्रोंच्या चर्चमध्यें या शाउटिंग मीटिंग्जना अधूनमधून जाण्याची परवानगी त्याला घरून मिळत असे.

या धार्मिक गीतांप्रमाणेंच या निग्रोंची इतर प्रकारचींहि गाणीं होतीं. कापसाचीं बोंडें वेचतांना, धान्याचीं टरफलें काढतांना, बोटीवर, आगगाड्यांत जथ्याजथ्यांनीं कामें करतांना ते गाणीं म्हणत असत. हे संगीतप्रेमी निग्रो कुठल्याहि प्रसंगाचें किंवा अनुभवाचें गाणें करीत असत. केवळ करमणुकीसाठीं म्हटलीं जाणारीं गाणींहि त्यांत असत.

अमेरिकन शहरें जसजशीं वाढूं लागलीं तसतसें संगीताला हळूहळू व्यवसायाचें स्वरूप येऊं लागलें. अमेरिकेनें आर्थिक समृद्धि प्राप्त करून घेतल्यानंतर परदेशांतले

संगीतकार अर्थक्रुते अमेरिकेंत येऊं लागले. गायनाचे आणि आर्केस्ट्रांचे जलसे ते अमेरिकेंत करूं लागले. त्यामुळें शहरांमधल्या लोकांच्या संगीताच्या अभिरुचीचा दर्जा उंचावूं लागला.

जर्मनीमध्यें बीथोवनचा मृत्यु झाल्यानंतरची गोष्ट. युरोपमधलें उत्कृष्ट संगीत अजूनहि मध्ययुरोपांतूनच निर्माण होत होतें. राजकारणाच्या क्षेत्रांत या काळांत उलथापालथी सुरू झाल्या. आणि या धामधुमींत बऱ्याच जर्मन लोकांना आपला देश सोडून अमेरिकेचा आश्रय घ्यावा लागला. यामुळें कांहीं काळ अमेरिकन संस्कृतीवर जर्मन संस्कृतीचा दाट प्रभाव पडला. अमेरिकेंत असा एक काळ होता कीं, संगीताचें उत्कृष्ट शिक्षण मिळविण्यासाठीं जर्मनीला गेलें पाहिजे असें अमेरिकन संगीतकारांना वाटत असे. जर्मन संस्कृतीच्या प्रभावाचाच हा परिणाम होता. अनेक जर्मन संगीतशिक्षक अमेरिकेंत आले होते. त्यांनीं देखील आपल्या अमेरिकन विद्यार्थ्यांच्या मनांत जर्मनीविषयीं आदराची भावना निर्माण केली होती. या काळांत अमेरिकन संगीकारांनीं निर्माण केलेल्या संगीतावर युरोपिअन संगीताच्या परंपरेचा खोल परिणाम झालेला दिसतो तो यामुळेंच.

हलक्याफुलक्या संगीताच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत गोरे कलावंत निग्रो लोकांचीं गाणीं, त्यांचीं नृत्यें, त्यांचे विनोद यांचें गंमत म्हणून अनुकरण करीत असत. निग्रो संगीताचें अनुकरण करून गोरे लोक जे हे कार्यक्रम करीत ते निग्रो मिन्स्ट्रेल या नांवानें ओळखले जात. करमणुकीच्या कार्यक्रमांची ही खास अमेरिकन शैली होती—पुढें ती इंग्लंडमध्येंहि रूढ झाली. निग्रो आणि गोरे लोक एकमेकांचें संगीत उचलीत आणि आपल्या सोईप्रमाणें त्यांत बदल करून एक तिसरेंच नवीन संगीत निर्माण करीत. गोऱ्या लोकांच्या कथात्मक गीतांच्या निग्रो आवृत्त्या निघत. गोष्टी असलेलीं गाणीं निग्रोंना आवडत असत. 'केसी जोन्स' हें अशा प्रकारच्या गीताचें एक उदाहरण आहे.

निग्रो मिन्स्ट्रेल्स या करमणुकीच्या कार्यक्रमांत गोरे लोक तोंडाला काळा रंग फासून निग्रो बनत. अशा कार्यक्रमांतलें 'डिक्सी' हें अत्यंत लोकप्रिय झालेलें गीत एका उत्तरेकडच्या गोऱ्या गायकानें लिहिलेलें होतें. त्याचें नांव होतें डॅन एमेट. डॅन एमेटचें मिन्स्ट्रेल कार्यक्रम करणारें चार जणांचें पथक होतें. आणि म्हणून त्याच्या या खेळाला 'दि बिग फोर' असें म्हणत असत. मिन्स्ट्रेल खेळ करणारें हें पहिलें पथक चार जणांचें होतें—तें वाढतां वाढतां स्टिफन फॉस्टरनें त्याच्या लहानपणीं

पाहिलेल्या मिन्स्ट्रेल कार्यक्रमांत चाळिसांवर जाऊन पोंचलें होतें. अशा प्रकारच्या खेळाची जाहिरात होत असे ती देखील अशी : चाळीस! मोजून घ्या ! चाळीस! प्रचंड ! महान्! अद्भुत!...

या कार्यक्रमाच्या वेळीं तोंडाला काळा रंग फासलेले गोरे कलावंत स्टेजवर अर्धवर्तुळाकार दोन रांगा करून बसत असत. त्यांच्यापैकीं कांहींजण वाद्यें वाजवीत. बँजो हें वाद्य विशेष दिसत असे. रांगेच्या टोकाला बसलेल्या दोघांकडे खळखळणारीं कडीं लावलेले डफ असत. काठ्यांसारखीं हाडें घेऊन त्यांनीं हे डफ वाजवले जात.

गोऱ्या लोकांनीं निग्रो होऊन करायच्या या खेळांना कशी सुरुवात झाली हें कळून घेण्यासाठीं आपल्याला शंभर वर्षें मागें गेलें पाहिजे. शंभर वर्षांपूर्वीं थॉमस डी. राइस या नांवाचा एक कलावंत होऊन गेला. तो गंमतीदार गोष्टी सांगे, नाच करी, गाणीं म्हणे, विनोदी कामें करी—त्याचा हा करमणुकीचा कार्यक्रम फार रंगत असे. लोक त्याला डॅडी राइस या नांवानेंच ओळखत असत. त्याचें वागणें कांहींसें विक्षिप्त होतें. कुठलीहि नवीन गोष्ट पाहिली कीं तिचा उपयोग आपल्या कार्यक्रमांत करमणुकीसाठीं कसा करून घेतां येईल हें तो चटकन् हेरत असे—या बाबतींत त्याची नजर विलक्षण तल्लख होती.

एके दिवशीं तो रस्त्यानें रमतगमत चालला होता. वाटेंत त्याला एक लंगडा निग्रो ड्रायव्हर दिसला. तो निग्रो ड्रायव्हर गाणें म्हणत होता आणि त्या तालावर पुढें पुढें लंगडत जात होता. 'जंप जिम क्रो' असें त्या गाण्याचें धृवपद होतें. डॅडी राइसनें तें गाणें ऐकलें आणि त्याला मोठी गंमत वाटली. या गाण्याचें अनुकरण जर आपण स्टेजवर केलें तर मोठी गंमत येईल असें त्याला वाटलें. आपण निग्रोचा वेष करायचा, तोंडाला काळा रंग फासायचा आणि जिम क्रो हें गाणें म्हणायचें,—तें प्रेक्षकांना आवडेल असें डॅडी राइसच्या मनानें घेतलें. सिनसिनाटी या ठिकाणीं होत असलेले त्याचे कार्यक्रम संपत आले होते. त्यामुळें उन्हाळ्यांत पुढचे कार्यक्रम सुरू होईपर्यंत कांहीं त्याला हा प्रयोग करणें शक्य नव्हतें.

यानंतर पिट्स्बर्ग येथील ओल्ड ड्रूरी थिएटरमध्यें जेव्हां त्यानें कार्यक्रम केला तेव्हां जंप जिम क्रो हें गाणें प्रथम त्यानें म्हटलें.

कफ नांवाचा एक निग्रो मुलगा होता. ओल्ड ड्रूरी थिएटरच्या जवळच ग्रिफिथ्स हॉटेल होतें. या हॉटेलांत बोटीवरून येणाऱ्या प्रवाशांच्या सामानाची नेआण

करण्याचें हमाली काम तो करीत असे. या त्याच्या धंद्यांत जिंजर नांवाचा दुसरा एक मुलगा त्याचा प्रतिस्पर्धी होता. कफ फाटकेतुटके कपडे घालीत असे. नेमक्या त्याच कपड्यांची जंप जिम क्रो या गाण्यासाठीं डॅडी राइसला जरूर होती. डॅडी राइसनें कफशीं त्या बाबतींत करार केला. संध्याकाळीं कफ थिएटरवर गेला आणि त्यानें आपले फाटके मळके कपडे या कार्यक्रमांत वापरण्यासाठीं राइसला उसने दिले.

घंटा वाजली. पडदा बाजूला गेला. तोंडाला काळा रंग फासलेला, फाटलेले जोडे घातलेला, डोक्यावर एक चेपलेली गवती हॅट ठेवलेला असा डॅडी राइस स्टेजवर उभा राहिला आणि त्यानें जंप जिम क्रो हें गाणें गायला सुरवात केली. त्याच्या अंगावरचे विचित्र कपडे पाहून लोकांना एकदम हंसूं आलें. गाण्याचें पहिलें कडवें ऐकतांच टाळ्यांचा कडकडाट झाला. लोक इतके खूष होऊन टाळ्या वाजवीत होते कीं, एका कडव्यामागून दुसरें कडवें रचून म्हणणें डॅडी राइसला आतां भाग होतें. तेव्हां त्यानें तिथल्या तिथें स्थानिक घटना आणि व्यक्ति यांच्यावर कडवीं रचून 'जंप जिम क्रो' हें गाणें पुढें चालू केलें. प्रचंड टाळ्या पडत होत्या. असा कार्यक्रम पूर्वीं कधींच तिथें झाला नव्हता. 'जंप जिम क्रो' हें गाणें रात्रभर चालत राहील कीं काय असें वाटत होतें.

डॅडी राइसचें हें गाणें चालू असतांना कफ पडद्याच्या मागच्या बाजूला उभा राहून तें ऐकत होता. इतक्यांत बोटीची शिटी वाजलेली कफला ऐकूं आली. म्हणजे आतां पॅसेंजर उतरणार आणि आपण जर वेळेवर पोंचलों नाहीं तर हमालीचा सगळा धंदा जिंजरच्या खिशांत जाणार या विचारासरशीं कफ अस्वस्थ झाला. गाणें आतां संपेल, मग संपेल म्हणून बिचारा कफ अस्वस्थ होऊन वाट पहात होता. गाणें संपलें कीं डॅडी राइसच्या अंगावरचे आपले कपडे घेऊन बोटीच्या धक्क्यावर तो हमाली करायला जाणार होता. परंतु लोक टाळ्यांचा कडकडाट करीत होते. आणि डॅडी राइस एकामागून एक नवीं कडवीं जोडत गात होता. शेवटीं पडद्याच्या मागच्या बाजूनें हळूच तोंड बाहेर काढून कफ म्हणाला, "मास्टर राइस, बोट येते आहे. मला माझे कपडे परत हवेत!"

पण कफच्या या विनवणीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण राइसनें त्याचें वाक्य ऐकलेंच नाहीं. त्या क्षणीं राइस जें कडवें म्हणत होता त्यांत त्यानें शहरांतल्या लोकांचा रोष असलेल्या एका अधिकाऱ्याला टोला हाणला होता. तो

टोला ऐकतांच, लोक खदखदून हंसले आणि त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. कफनें मागच्या पडद्यांतून डोकें आणखी जरा पुढें केलें आणि तो ओरडला, "मास्टर राइस, मला माझे कपडे हवेत. बोट येते आहे."

राइसनें त्याचे शब्द कांहीं ऐकलेच नाहींत. परंतु प्रेक्षकांना मात्र, मागच्या पडद्यांतून चाललेलें हें नाटक दिसूं लागलें. राइसला कांहीं याची कल्पना नव्हती. लोक मोठमोठ्यानें हंसूं लागले, टाळ्यांचा पाऊस पाडूं लागले. शेवटीं बिचारा कफ अर्धनग्न अवस्थेंत स्टेजवर आणि डॅडी राइसच्या खांद्यावर हात ठेवून ओरडला, "मास्टर राइस, माझा निग्रो पोषाख परत द्या. बोट आली." हा प्रकार घडतांच थिएटर खालीं कोसळलें. लोकांनीं थिएटरच्या बाहेर पडावें यासाठीं दिवे विझवावे लागले. अस्सल अमेरिकन शैली असलेल्या निग्रो मिन्स्ट्रेल या कार्यक्रमाची सुरवात अशी झाली.

यानंतर डॅडी राइसनें इंग्लंडमध्येंहि आपले खेळ यशस्वी केले. पैसा मिळाल्यामुळें डॅडी राइसच्या विक्षिप्तपणांत आतां भर पडली होती. दहा दहा डॉलर्सचे सोन्याचे तुकडे आपल्या कोटावरील बटणांसाठीं तो वापरूं लागला होता. मध्येंच लहर लागली कीं तो हे तुकडे ओढून काढी आणि आठवण म्हणून कोणाला तरी देऊन टाकी.

शंभर वर्षांपूर्वीं स्टिफन फॉस्टर या अमेरिकन संगीतकारानें लहान असतांना पिट्सबर्ग येथें जो निग्रो मिन्स्ट्रेल हा खेळ पाहिला होता तो या प्रकारचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि: ..................

## स्टिफन कॉलिन्स फॉस्टर

### अमेरिकेचा लोकप्रिय गीतकार

शंभर वर्षांपूर्वींची ही गोष्ट आहे. तेव्हां तरुण मुलें आणि मुली व्यवसायांत पडून आपली भाकरी आपण कमावण्यासाठीं आजच्या मुलांमुलींइतका वेळ लावीत नसत. अशा त्या काळांत विल्यम फॉस्टर या सोळा वर्षांच्या मुलानें पिट्सबर्ग येथील एका व्यापारी दुकानांत नोकरी धरली. त्याचा आणि त्याच्या वडिलांचाहि जन्म अमेरिकेंतच झाला होता. परंतु एडवर्ड मॅक्डुवेल या अमेरिकन संगीतकाराप्रमाणेंच विल्यम फॉस्टरचा वंश स्कॉटिश–आयरिश होता. विल्यम फॉस्टरच्या आईकडच्या आणि वडिलांकडच्याहि नातेवाइकांनीं अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत विशेष भाग घेतला होता.

त्या वेळीं पिट्सबर्ग या शहरांत गोऱ्या लोकांची वस्ती झालेली होती. किंवा वेगळ्या शब्दांत सांगायचें तर गोऱ्या लोकांची वस्ती होत होत पुढें सरकणाऱ्या सरहद्दीवर पिट्सबर्ग शहर होतें. पिट्स्बर्गच्या पलीकडे गवताळ प्रदेशांत गव्यांची शिकार करणाऱ्या रेड इंडियनांची वस्ती होती. पूर्वेच्या किनाऱ्यावर दोनशें वर्षांपूर्वीं गोऱ्या माणसानें पहिलें पाऊल टाकलें होतें. हळूहळू गोऱ्या लोकांची ही वस्ती पुढें सरकत होती आणि रेड इंडियनांना त्यांच्या प्रदेशांत गर्दी करून हुसकीत होती.

ज्या दुकानांत विल्यम फॉस्टरनें नोकरी धरली होती त्या दुकानाचें स्वरूप सर्ववस्तुभांडार असेंच होतें. नव्यानें वस्ती झालेल्या या शहरांत लोकांना

लागणाऱ्या सर्व तऱ्हेच्या वस्तू दुकानांत विकल्या जात असत. प्रत्येक वस्तूकरतां वेगळें दुकान अशी पद्धत त्या वेळीं नव्हती. आज पादत्राणें विकत घ्यायचीं असल्यास मेनस्ट्रीटवर आपण एका दुकानांत शिरतों. त्यानंतर, हॅट घ्यायची असल्यास रस्त्याच्या पलीकडच्या दुसऱ्या दुकानांत; साखरेसाठीं तिसऱ्या, परंतु ज्या काळांतली ही गोष्ट आहे त्या काळांत मेनस्ट्रीटवर एकच दुकान होतें. कोळशापासून कॉफीपर्यंत गिऱ्हाइकांना लागणाऱ्या अनेक वस्तू या दुकानांत ठेवलेल्या असत. अशा दुकानांत या सगळ्या वेगवेगळ्या वस्तू ठिकठिकाणाहून आणण्यासाठीं नोकरांना पाठवलें जाई. कॉफी आणि साखर खरीदण्यासाठीं दक्षिणेकडे जावें लागे. भांडीं आणि कपडे यांची खरेदी करण्यासाठीं न्यू यॉर्क आणि फिलाडेल्फिया येथें माणूस पाठविला जाई. तवे, जोडे, हॅट यांचे छोटेछोटे बरेचसे कारखाने त्या वेळीं न्यू इंग्लंडमध्यें होते.

पिट्स्बर्ग हें शहर एका मोठ्या नदीच्या कांठीं होतें. फर, कातडीं, पीठ इत्यादि माल पिट्स्बर्ग येथें पडावांत भरून ओहियो व मिसिसिपीवरून न्यू ऑर्लिन्स येथें नेला जाई. दक्षिणेकडे हा माल पैशांच्या मोबदल्यांत विकला जात असे किंवा हा माल देऊन उत्तरेकडच्या लोकांना लागणाऱ्या कापूस, साखर इत्यादि वस्तू त्याऐवजीं घेतल्या जात असत. विल्यम फॉस्टर हा उद्योगी मुलगा होता. ज्या दुकानांत त्यानें नोकरी धरली होती त्याच दुकानांत त्याला कांहीं दिवसांनीं भागीदार म्हणून घेण्यांत आलें. वर्षांतून एकदोनदां मालाची खरेदीविक्री करण्यासाठीं तोहि प्रवासाला जात असे.

पडावांत माल भरून नदी पार करून जाण्यासाठीं बराच वेळ लागत असे. पिट्स्बर्गला परत येण्याच्या दोन वाटा होत्या. या दोहोंपैकीं कुठल्याहि वाटेनें आलें तरी खूप वेळ लागत असे. कांहीं वेळां फॉस्टर नॉर्थ कॅरोलिना, केंटकी आणि वेस्ट व्हर्जिनिया या वाटेनें परत येत असे. या प्रदेशांत रेड इंडियनांची वस्ती होती. त्या काळांत आगगाड्या नव्हत्या. घोड्यावरूनच प्रवास करावा लागे. बरोबर बरेच लोक असले, तरच विल्यम फॉस्टर या वाटेनें परत येत असे. या प्रदेशांत रेड इंडियनांचा धोका असल्यामुळें एकट्यादुकट्यानें जाण्याची सोय नव्हती. केव्हां हल्ला होईल याचा नेम नसल्यामुळें हीं माणसें सशस्त्र असत आणि प्रवास करतांना अतिशय सावध राहात. कांहीं वेळां फॉस्टर जलमार्गानेंहि परत येत असे. अटलांटिकच्या किनाऱ्याला वळसा

वाली आणि तिथून न्यू यॉर्कला जाई. या मार्गांतसुद्धां धोके होते. एकदां ज्या पडावांतून तो येत होता त्याच्यावर चांच्यांनीं हल्ला केला. ऐनवेळीं एक स्पॅनिश युद्धनौका मदतीला आली तेव्हां ते चांचे पळून गेले. विल्यम फॉस्टरच्या जिवावर बेतलें होतें, पण थोडक्यांत वांचलें. पुढें मोठेपणीं तो आपल्या या अनुभवाची कहाणी सांगत असे. नव्या वस्त्या होत असलेल्या त्या काळांत सर्व तरुण मुलांमुलींचीं आयुष्यें साहसानें भरलेलीं असत. ही मंडळी मोठी झाली कीं त्यांचीं मुलेंबाळें या जुन्या साहसाच्या कथा ऐकण्यासाठीं त्यांच्याभोंवतीं जमत. आपले आईबाप तरुण असतांना त्यांना आलेले हे साहसाचे अनुभव विस्फारलेल्या डोळ्यांनीं हीं पोरें ऐकत असत.

परत येतांना न्यू यॉर्क आणि फिलाडेल्फिया येथें विल्यम फॉस्टर पिट्सबर्ग येथील आपल्या दुकानासाठीं लागणारा माल विकत घेत असे. सुरवातीला हा माल घोड्यांच्या पाठीवर लादूनच आणला जाई. नंतरच्या दिवसांत वर आच्छादन असलेल्या घोड्यांच्या गाड्या वापरांत येऊं लागल्या. आतां या गाड्या म्यूझियममध्यें किंवा एखाद्या सिनेमांत दिसतात. माल भरलेल्या या गाड्या ओढण्यासाठीं अनेक घोडे जोडले जात. या घोड्यांच्या गळ्यांत घुंगरांची माळ बांधलेली असे. डोंगराळ वाटेनें येतांना या घुंगरांची खुळखुळ प्रसन्न आणि सुखकारक वाटे. घुंगरांचा हा आवाज विल्यम फॉस्टर आपल्या आयुष्यांत कधींच विसरला नाहीं.

अशाच एका प्रवासांत विल्यमला एलिझा टॉम्लिन्सन या नांवाची मुलगी भेटली. एलिझा आपल्या मावशीला भेटण्यासाठीं फिलाडेल्फियाला गेली होती. विल्यम अर्थातच मालाच्या खरेदीविक्रीसाठीं म्हणून आला होता. परंतु तेवढ्यांतल्या तेवढ्यांत वेळ काढून तो एक पुष्पगुच्छ घेऊन एलिझाला भेटायला गेला होता. बोलतां बोलतां त्याला एलिझाची बरीचशी माहिती कळली. डिलावेअर राज्यांत विल्मिंग्टन या शहरांत तिचें घर होतें. तिचे पूर्वज इंग्लंडहून आले होते. विल्यम आणि एलिझा यांनीं खूप गप्पा केल्या. तीं दोघें जितकीं अधिक बोलत तितके त्यांना बोलायला अधिक विषय सांपडत. मग विल्यमनें एलिझाला मागणी घातली. ती होय म्हणाली. चेंबर्सबर्ग येथें एलिझाचे नातेवाईक होते. कांहीं दिवसांनीं इथेंच या नातेवाइकांच्या घरीं विल्यम आणि एलिझा यांचें लग्न झालें.

त्या काळांतल्या मुली चांगल्या काटक असत. चेंबर्सबर्ग येथून डोंगराळ प्रदेशांतून पिट्स्बर्ग येथें येण्यासाठीं तीनशें मैलांचा प्रवास घोड्यावरून करावा लागे. एलिझा पिट्स्बर्गला यापूर्वी कधींहि गेलेली नव्हती. मधुचंद्राचा हा चौदा दिवसांचा प्रवास संपवून हें जोडपें पिट्स्बर्गला येऊन पोंचलें. या खडतर प्रवासामुळें एलिझा पार थकून गेली होती. पिट्स्बर्गमध्यें तिनें पहिलें पाऊल टाकलें तेव्हां तिला तें शहर अगदींच मळकट वाटलें. परंतु आपल्याला पहिल्यापासून हें शहर आवडलें असें ती म्हणत असे. याचाच अर्थ असा कीं, विल्यमवर तिचें फार प्रेम होतें.

अशींच कांहीं वर्षें गेलीं. विल्यम फॉस्टरची आतां चांगली भरभराट झाली होती. शहरांतल्या एका उंच टेकडीजवळ त्यानें जमीन विकत घेतली. तिथें त्यानें घर बांधलें. आपल्या या घराला विल्यम फॉस्टरनें 'व्हाइट कॉटेज' असें नांव दिलें. ज्या टेकडीवर हें घर होतें तिथून नदीच्या उगमाकडची आणि मुखाकडची अशा दोन्ही बाजूंचा देखावा दिसत असे. विल्यम फॉस्टरनें एका शहराची आखणी केली आणि लॉरेन्सव्हिल असें या शहराचें नामकरणहि केलें. आपल्या मालकीची कांहीं जागाहि त्यानें या शहरासाठीं देऊन टाकली. विल्यम आणि एलिझा यांना दहा मुलें झालीं. ज्याचें चरित्र इथें लिहायचें आहे तो विल्यमचा नववा मुलगा. चार जुलै या दिवशीं त्याचा जन्म झाला. तो दिवस राष्ट्रीय उत्सवाचा होता. कारण चार जुलै हा अमेरिकन संघराज्याचा वाढदिवस. या वेळीं तर हा उत्सव विशेष मोठा होता. कारण तो होता संघराज्याचा पन्नासावा वाढदिवस.

विल्यम फॉस्टर हा अतिशय मनमिळाऊ गृहस्थ होता. लोकांत तो खूप मिसळत असे. आपल्या घरामागच्या झाडांच्या राईत त्यानें चार जुलैचा उत्सव मोठ्या उत्साहानें साजरा केला होता. खूप माणसें जमलीं होतीं. 'यांकी डूडल' आणि 'हेल कोलंबिआ' हीं गीतें बँडवर वाजवलीं जात होतीं. लोक मस्तींत गात होते. भाषणें, जेवण व गाणीं असा सर्व प्रकारचा या उत्सवांत कार्यक्रम होता. फटाक्यांच्या ऐवजीं कांहीं लोकांनीं बंदुकींचे बार उडवले. दुपारीं झेंडावंदन झालें. तोफांची सलामी दिली गेली आणि जमलेल्या सर्व लोकांनीं 'द स्टार स्पँगल्ड बॅनर' हें गीत म्हटलें. व्हाइट कॉटेज या घराच्या बाहेर हा प्रसंग एवढ्या उत्साहानें साजरा होत असतांना घरांतहि एका

महत्त्वाच्या प्रसंगाला सुरवात झाली होती. फॉस्टर कुटुंबांतलें नवें मूल जन्माला येत होतें. विल्यम फॉस्टरला मुलगा झाला. आपल्या या नवव्या मुलाचें नांव त्यानें स्टिफन्स कॉलीन्स फॉस्टर असें ठेवलें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं थॉमस जेफर्सन आणि जॉन ॲडॅम्स या दोन अमेरिकन नेत्यांचा मृत्यु झाला. हे दोघेहि अमेरिकन संघराज्याचे अध्यक्ष झालेले होते. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर या दोघांच्याहि सह्या होत्या.

विल्यम फॉस्टरच्या घरांत एक निग्रो कुटुंब चाकरीला होतें. या कुटुंबांतहि दोन मुलांची भर पडली. नवीन जन्माला आलेल्या या मुलीचें नांव होतें ऑलिव्हिया आणि मुलाचें नांव होतें टॉम. ऑलिव्हियाला लिव्हि म्हणूनच हांक मारीत. ऑलिव्हिया आणि टॉम हीं मुलें निग्रो असलीं तरी गुलाम नव्हतीं. पेन् सिल्व्हानियाच्या आजूबाजूच्या राज्यांत गुलामीची प्रथा चालू होती. परंतु खुद्द पेन् सिल्व्हानियांत मात्र गुलामीची प्रथा नव्हती. लिव्हि आणि टॉम फॉस्टरच्या कुटुंबांत रहात होतीं. घरांत राहाण्याचा मोबदला म्हणून, मोठे होऊन उद्योगधंद्याला लागेपर्यंत, त्यांनीं घरकाम करायचें असें ठरलेलें होतें.

लिव्हि धार्मिक वृत्तीची मुलगी होती. निग्रो लोकांच्या चर्चमध्यें ती जात असे. छोटा स्टिव्हि आपल्या आईवडलांबरोबर जर चर्चमध्यें गेला नाहीं तर त्याला लिव्हिबरोबर तिच्या चर्चमध्यें जाण्याची परवानगी असे. स्टिव्हिच्या चर्चमध्यें येणारीं माणसें पुस्तकांत बघून धार्मिक गीतें म्हणत. परंतु लिव्हिच्या चर्चमध्यें येणारीं निग्रो माणसें गातां गातां गाणें जसें त्या वेळीं सुचेल तसें म्हणत असत. छोट्या स्टिव्हिच्या मनावर निग्रोंच्या या उत्स्फूर्त गाण्यांचा खोल संस्कार झाला. उत्स्फूर्त गाण्यांच्या या उपासनासभांना 'शाउटिंग मीटिंग्ज' म्हणत.

लहानपणापासून स्टिफन फॉस्टरला संगीताचें विशेष आकर्षण वाटत असे. दोन वर्षांचा असतांना तो आपल्या बहिणीचे गिटार हातांत घेई आणि आपल्या बोबड्या भाषेंत तें माझें आहे म्हणून सांगे. सात वर्षांचा असतांना तो एकदां घरच्या लोकांबरोबर वाद्यांच्या दुकानांत गेला होता. त्या दुकानांतले फ्रेंजोलेट त्यानें उचलून घेतलें आणि तो 'हेल कोलंबिआ' हें गीत वाजवूं लागला. दुकानांत जमलेल्या लोकांचें लक्ष त्याच्याकडे गेलें. त्या सगळ्यांना या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. यानंतर स्टिफन फॉस्टर फ्ल्यूट, पिआनो आणि व्हायोलिन वाजवायला शिकला. लिव्हिच्या चर्चमध्यें स्टिफननें निग्रोंच्या संगीतामागची

भावना टिपून घेतली. घरांतलीं कामें करीत असतांना टॉम आणि लिव्हि डोंगराळ प्रदेशांतलीं निग्रो–लोकगीतें म्हणत असत. तींहि स्टिफननें ऐकलीं असावींत. 'फ्रॉग वेंट अ-कोर्टिंग' हें गीत स्टिफनच्या कानावरून गेलेलें असावें. बोटीवरचा माल चढवण्या-उतरवण्याचें काम करणारे निग्रो मजूर काम करतां करतां गात असत. त्यांना काम करतांना पाहाणें, आणि त्यांचीं तीं गाणीं ऐकणें हा छोट्या स्टिफनचा एक आवडता उद्योग होता. यांतलीं कांहीं गाणीं खलाशांचीं गीतें असणार. निग्रोंचीं 'स्पिरिच्युअल्स' आणि 'शाउटिंग मीटिंग्ज' मधलीं गाणीं त्यानें ऐकलीं होतींच. या सगळ्या श्रवणांतून या मुलाची संगीतविषयक मनोभूमिका तयार झाली. थोडा मोठा झाल्यानंतर तो 'निग्रो मिन्स्ट्रेल्स' या कार्यक्रमांना जाऊं लागला. या कार्यक्रमांत निग्रोंचें सोंग घेऊन गोरे लोक निग्रो संगीत गात असत. पिट्स्बर्ग शहरांत नव्यानेंच वस्ती झाली होती. अशा ठिकाणीं स्वाभाविकच समाजाचें लक्ष संपत्ति आणि सामर्थ्य वाढवण्याकडेच असतें. कलेच्या विकासाला पिट्स्बर्गमध्यें त्या काळांत या विशिष्ट परिस्थितीमुळें फारसा वाव नव्हता. बराच मोठा होईपर्यंत या परिस्थितीमुळें स्टिफनला युरोपच्या संगीतपरंपरेची ओळख झालेली नव्हती; बाक, बीथोवन, मोझार्ट आणि इतर श्रेष्ठ संगीतकार यांच्या कलाकृतींचा स्टिफनला परिचय नव्हता. ग्रामोफोन, रेडिओ हीं साधनें त्या वेळीं नव्हतीं. पिट्स्बर्गमध्यें क्वचित् जलसे होत. अशा परिस्थितींत चांगलें संगीत स्टिफनच्या कानीं कुठून पडणार होतें !

स्टिफनच्या संगीताच्या वेडाचें विल्यम फॉस्टरला आश्चर्य वाटे. स्टिफनच्या मोठ्या बहिणीला संगीताची आवड होती. तिच्यासाठीं एक पियानो विल्यमनें आणला होता. विल्यम फॉस्टरला संगीताची आवड होती. अधूनमधून तो फिडलवर एखादी धून वाजवीहि. परंतु असें असलें तरी संगीत हें पुरुषाचा व्यवसाय होऊं शकेल या गोष्टीवर विल्यमचा विश्वास नव्हता. संगीत शिकणें मुलींना ठीक आहे ! परंतु स्टिफनचें संगीताचें वेड त्याला दुबळेपणाचाच प्रकार वाटे. स्टिफनच्या आईनें पूर्वेकडच्या शहरांत संगीताचे जलसे ऐकलेले होते. तिला कदाचित् विल्यमपेक्षां आपल्या मुलाची संगीताविषयींची भावना अधिक कळली असेल.

विल्यम फॉस्टरला स्टिफनविषयीं विशेष काळजी वाटत असे याचें कारण स्टिफनचा शाळेंतला अभ्यास ठीक नव्हता हें होय. स्टिफनला अभ्यासाची व वाचनाची आवड होती. परंतु शाळा आणि तिथली शिस्त यांचा मात्र त्याला

तिटकारा होता. तो पांच वर्षांचा असतांना त्यानें शाळेंत एक भयंकर प्रकार केला. शिक्षकांनीं त्याला वर्गात मूळाक्षरें म्हणायला सांगितलीं. स्टिफन उभा राहिला आणि प्रथम धीटपणें मूळाक्षरें म्हणूं लागला. अर्ध्यावर आल्यानंतर तो अकस्मात् थांबला आणि रेड इंडियनांसारखी किंकाळी फोडून शाळेबाहेर पळत सुटला. पळत पळत थेट एक मैल अंतरावर असलेल्या आपल्या घरीं तो आला. पळतां पळतां तो न थांबतां किंकाळ्या फोडीत होता.

स्टिफनचें आपल्या घरावर फार प्रेम होतें. आईविषयीं त्याला भक्ति वाटे. आपल्या बहीणभावांशीं त्याचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. घर सोडून तो बाहेर कुठेंहि गेला कीं विलक्षण अस्वस्थ होई, बेचैन होई. याला एकच अपवाद होता. तो म्हणजे अंकल स्ट्रदर्सचें घर. एकदां स्टिफननें आपल्या वडिलांना एक पत्र लिहिलें. त्या वेळीं त्याचें वय दहा वर्षांचें होतें. कोऱ्या कागदावरच्या ओळी सरळ येईनात, डोंगर चढूं लागल्या. त्यामुळें तो फारच चिडचिडला होता. या पत्रांतून त्यानें संगीताच्या पुस्तकाची मागणी केली होती. पत्र पुढीलप्रमाणें होतें :

प्रिय बाबा,

तुम्हीं मला विनोदी गीतांचे पुस्तक देण्याचें कबूल केलें होतें तें पाठवावें अशी विनंति आहे. जर माझ्याकडे माझी पेणशील अस्ती तर मीं या कागदावर ओळी आखल्या अस्त्या किंवा माझ्याजवळ जर शाई घेण्यासाठीं पैसे अस्ते तर मी ओळी आखल्या असत्या पण माझ्याजवळ जर शिट्टी असती तर मीं हें पत्र लिहायलाच बसलों नसतों. सकाळीं घसरगाडीचा खेळ खेळण्यासाठीं अनेक लोक आलेले पाहिले. वीस किंवा तीस जोड्या असतील. डॉक्टर बेन काल रात्रीं घरीं आले. आणि त्यांनीं हेन्री इथें येणार असल्याचें आम्हांला सांगितलें. हेन्रीबरोबर डनिंगसुद्धां आला तर फार बरें होईल. त्या दोघांनाहि मीं बोलावलें आहे म्हणून सांगा. मला त्यांच्याशीं खूप खूप बोलायचें आहे. तुमचा आवडता मुलगा,

स्टिफन सी. फॉस्टर

अंकल स्ट्रूदर्सच्या घरीं गेला कीं स्टिफन खूष असे. एकदां त्याच्या बहिणीनें विल्यमला पत्र लिहिलें होतें, "अंकल स्ट्रूदर्सच्या घरीं स्टिफन मजेंत आहे. इथून जाण्याचें त्याच्या मुळींच मनांत येत नाहीं. अंकल त्याला घोडे आणि गुरें यांच्याबरोबर मन मानेल तसें खेळूं देतात. त्यामुळें इथल्या या भूमीवर आपण कोणीतरी विशेष आहोंत असें त्याला वाटतें."

अंकल स्ट्रूदर्स त्या वेळीं चांगलेच म्हातारे होते. ते पूर्वीं सर्व्हेयर होते, उत्तम शिकारी होते, रेड इंडियनांशीं युद्ध खेळलेले होते. सरहद्द विभागांत रहाणाऱ्या माणसाचें असायला हवें तसें त्यांचें व्यक्तिमत्त्व होतें. म्हातारवयांत त्यांनीं ओहिओ येथें शेत विकत घेतलें होतें. ओहिओची गणना अजूनहि सरहद्द विभागांतच होत होती. ओंडक्यांच्या घरांत ते राहत असत. रात्रीच्या वेळीं अजूनहि ते शिकारीला जात. एखाद्या चांदण्या रात्रीं ते स्टिफनला आपल्याबरोबर शिकारीला घेऊन जात. रेड इंडियन लोकांशीं झालेल्या झटपटींच्या कहाण्या म्हाताऱ्या अंकलच्या तोंडून ऐकतांना छोटा स्टिफन थरारून जाई. एके दिवशीं म्हाताऱ्याला आपला पुतण्या कोठें दिसेना. त्यानें खूप शोधाशोध केली. शेवटीं एकदांचा स्टिफन सांपडला. गळ्यापर्यंत आलेल्या तुसांच्या ढिगाऱ्यांत स्टिफन बसला होता आणि कोंबड्या, त्यांचीं पिल्लं आणि गोठ्यांतले प्राणी यांना बारकाईनें न्याहाळत होता. म्हातारा स्ट्रूदर्स जवळ गेला, आणि त्यानें 'काय करतो आहेस' असें स्टिफनला विचारलें. स्टिफन म्हणाला, "मी विचार करतों आहें."

अंकल स्ट्रूदर्सचें स्टिफनवर फार प्रेम होतें. संगीतकलेची असाधारण देणगी या मुलाला लाभलेली आहे याची म्हाताऱ्याला जाणीव होती. हा मुलगा जगला वांचला तर मोठेपणीं नांव मिळवील असें भविष्य म्हाताऱ्यानें केलें होतें.

शाळेंत जाण्यापेक्षां एकटे भटकणें स्टिफनला आवडत असे. नदीच्या कांठानें, रानांतून तो भटकत असे. स्टिफनचा स्वभाव लाजरा होता, तो बरोबरीच्या मुलांत फारसा मिसळत नसे. परंतु त्याच्या खास मित्रांच्या गटांत तो मोकळेपणानें वागे, आणि खूप गंमत करी. स्वभावानें बुजरा असला तरी स्टिफन भागूबाई नव्हता. मारामारी करण्याचा प्रसंग आला म्हणजे इतर कुठल्याहि मुलाइतका तो त्यांत भाग घेत असे. त्याचा भाऊ म्हणत असे, "स्टिव्ह अत्यंत थंड डोक्यानें आणि तरबेजपणें मारामारी करतो; त्याला

कोणाचीहि दादागिरी खपत नाहीं." शाळेंत तो आणि त्याचा वयानें थोडा लहान असलेला मित्र असे दोघे मिळून शाळेला दांडी मारीत आणि रानांत भटकत. स्ट्रॉबेरीचीं फळें ते गोळा करीत. पायांतले बूट आणि मोजे काढून ठेवून ते झऱ्याचें पाणी तुडवीत. मोठेपणीं या मित्रानें स्टिफनच्या आठवणी सांगतांना लहानपणींच्या मारामाऱ्यांचा उल्लेख केला. तो म्हणाला, "शाळेंतल्या मारामाऱ्यांत स्टिफन नेहमीं माझ्या रक्षणाकरतां धावून येई." एके दिवशीं, त्या वेळीं स्टिफन पंधरा वर्षांचा होता, दोन गुंड एका प्यालेल्या माणसाला शिवीगाळ करून मारीत असलेले स्टिफननें पाहिलें. त्या प्यालेल्या गरीब माणसाच्या संरक्षणासाठीं स्टिफन धावून गेला. त्या दोघांपैकीं एकाला स्टिफननें ठोकून काढला, आणि दुसऱ्याला पळवून लावला. या मारामारींत स्टिफनच्या गालाला सुऱ्याची जखम झाली. या जखमेचा वण त्याच्या गालावर शेवटपर्यंत होता.

नऊ वर्षांचा असतांना स्टिफननें आपल्या बरोबरीच्या मुलांना घेऊन एक छोटीशी नाटकमंडळी स्थापन केली. तबेला हें या नाटकमंडळीचें थिएटर होतें. स्टिफन सोडून बाकीच्या सगळ्या मुलांची भागी होती. स्टिफनला भागी ठेवण्याचें कारण नव्हतें. कारण तो त्यांच्यांतला प्रमुख कलावंत होता. त्या काळांत निग्रो गाणीं अत्यंत लोकप्रिय होतीं. हीं मुलेंहि त्या गाण्यांचेंच अनुकरण करीत. स्टिव्ह स्टेजवर आला आणि झिप कून, लॉंगटेल्ड् ब्लू, कोलब्लॅक रोझ, जंप जिम क्रो हीं गाणीं म्हणूं लागला कीं त्याला अनेकदां 'वन्स मोअर' मिळे. स्टिफन विनोदी कामेंसुद्धां करीत असे. हीं मुलें आठवडयांतून तीन खेळ करीत. शनिवारीं रात्रीं बाहेरगांवाहून आलेले नट जे खेळ करीत त्यांचीं तिकिटें विकत घेण्यापुरते पैसे हीं पोरें आपल्या या कार्यक्रमांतून मिळवीत. या काळांत विल्यम फॉस्टरची आर्थिक घडी विस्कटत चालली होती. व्हाइट कॉटेज हें त्याचें सुंदर घर विकावें लागलें होतें. स्टिफन मोठा होत असतांना पिट्स्बर्गच्या परिसरांत फॉस्टर कुटुंबाला अनेकदां घरें बदलावीं लागलीं. कांहीं वर्षें फॉस्टर कुटुंब ॲलेघनी शहरांत राहिलें. परंतु हा एक अपवाद सोडल्यास फॉस्टर कुटुंब पिट्स्बर्गचा परिसर सोडून बाहेर गेलें नाहीं.

घरें बदलण्याच्या या काळांत अर्थातच स्टिफनची शाळेंत विशेष प्रगति झाली नाहीं. कांहीं दिवस एक धर्मोपदेशक स्टिफनला शिकवीत असे. त्याची

शिस्त करडी नव्हती. त्यामुळें स्टिफननें थोडी प्रगति केली. स्टिफनचें शिक्षण ही त्याच्या आईबापांना पडलेली एक समस्याच होती. या वाढाळू वयांत उत्तम संगीत ऐकण्याची, अभ्यास करण्याची संधि दुर्दैवानें स्टिफनला मिळाली नाहीं. संगीताचा गंभीरपणें व्यासंग करतां येतो, संगीत हा एक प्रतिष्ठित, आर्थोत्पादन करून देणारा व्यवसाय होऊं शकतो याची जाणीव स्टिफनला किंवा त्याच्या आईवडिलांना नव्हती. संगीताच्या अभ्यासामुळें आवश्यक ती शिस्त स्टिफनच्या अंगीं बाणली असती, आपल्या आयुष्यांत तो कांहीं एक सूत्र निर्माण करूं शकला असता, या गोष्टीची स्वप्नांत देखील त्यांना कल्पना आली नाहीं. अठरा वर्षांचा होईपर्यंत स्टिफन धडपडत होता, परंतु ज्या गोष्टीसाठीं तो धडपडत होता ती गोष्ट त्याच्या हातीं नीटशी येत नव्हती. संगीतांतले सिद्धान्त, विविध प्रकार यांचें पद्धतशीर शिक्षण स्टिफनला कधींच मिळालें नाहीं. तो लिहीत असलेल्या मेलडी त्याला सहजस्फूर्तीमुळें सुचत असत.

गीतांचे शब्द आणि स्वर या दोन्ही गोष्टी स्टिफन स्वतःच रची. दुसऱ्याचे शब्द घेऊन चाल बांधण्यापेक्षां स्वतःचेच शब्द स्वरबद्ध करणें त्याला अधिक सोपें वाटे. त्याच्या भावना आणि कल्पनाशक्ति तल्लख होती. त्याच्या वडिलांचे शब्द वापरून सांगायचें झाल्यास, त्याला संगीताची 'विलक्षण' देणगी होती.

स्टिफन तेरा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या शालेय शिक्षणाची समस्या त्याच्या आईवडिलांना विशेषच भंडावूं लागली. स्टिफनचा चुलत भाऊ विल्यम यानें यांतून वाट काढली. विल्यमचे आईवडील लहानपणींच वारले होते. लहानपणापासून तो फॉस्टर कुटुंबांत वाढल्यामुळें सख्ख्या भावासारखाच तो होता. विल्यम घरांत आला त्याच वेळीं फॉस्टर कुटुंबांतलें एक मूल वारलें होतें. तेव्हां त्याची जागा भरून काढणाऱ्या विल्यमला फॉस्टर पतिपत्नींनीं आपल्या मुलासारखेंच वाढवलें. टोवांडा येथें विल्यम काम करीत होता. आपण स्टिफनला आपल्याबरोबर घेऊन जातों आणि जवळच असलेल्या ॲथेन्सच्या ॲकेडमींत त्याला पाठवतों असें विल्यम म्हणाला. फॉस्टर पतिपत्नींनीं या सूचनेला मंजुरी दिली. हिंवाळ्याच्या मध्याला दोन घोड्यांच्या गाडींतून जवळजवळ तीनशें मैलांहून अधिक प्रवास करून स्टिफन विल्यमच्या घरीं गेला. स्टिफनला हा प्रवास फारच आवडला.

ॲथेन्सच्या ॲकेडमींत असतांना स्टिफन संगीतलेखन करूं लागला. पदवीदान-समारंभाच्या वेळीं चार फ्ल्यूटवर वाजवण्यासाठीं त्यानें एक स्वररचना केली. तिचें नांव 'टिओगा वॉल्झ'. या रचनेचा पहिला भाग स्वतः स्टिफननें वाजवला. श्रोत्यांना तो इतका आवडला कीं, त्यांनीं तो पुन्हां वाजवण्याची विनंति केली. स्टिफनला आतां पुन्हां घरच्या आठवणी येऊं लागल्या होत्या. या शाळेंत तो फक्त एक वर्षच राहिला. इथून परतल्यानंतर जेफर्सन कॉलेजांत त्यानें प्रवेश केला. परंतु इथेंहि तो टिकला नाहीं. मात्र स्टिफननें फ्रेंच आणि जर्मन भाषांचा अभ्यास केला. स्टिफनला जलरंगी चित्रें काढण्याची हौस होती असें त्याचा भाऊ मॉरिसन सांगत असे.

त्याचें पहिलें गीत प्रसिद्ध झालें तेव्हां तो सोळा वर्षांचा होता. 'ओपन दाय लॅटिस, लव्ह' हें तें गीत. आपली दहा वर्षांची मैत्रीण सुसान पेंटलॅंड हिच्यासाठीं स्टिफननें हें गीत लिहिलें होतें. त्या वेळीं फॉस्टरच्या घरीं पिआनो नव्हता. पेंटलॅंडच्या घरीं पिआनो होता. त्यामुळें स्टिफन पिआनोसाठीं त्यांच्या घरीं नेहमीं जात असे.

याच वेळीं स्टिफनला 'वेस्ट पॉइंट' किंवा 'ॲनापॉलिस' येथें घालावा कीं काय याविषयीं घरांत चर्चा चालली होती. यावरून स्टिफनच्या व्यक्तित्वाच्या विकासासाठीं नेमकें काय हवें याचें किती अज्ञान त्याच्या घरांत होतें याची कल्पना येईल. सैन्यांत किंवा नौदलांत प्रवेश करणें हें कांहीं मुलांच्या दृष्टीनें अगदीं योग्य असेल. परंतु तासन्तास पिआनोवर बसून संगीत वाजवणाऱ्या स्वप्नाळू स्टिफनला हा मार्ग मुळींच योग्य नव्हता. त्याची बहीण किंवा त्याचे मित्र गात असले कीं स्टिफन फ्ल्यूटवर मोठ्या खुषीनें त्यांना साथ करी. संगीताच्या क्षेत्रांतलें तुझें खरें ध्येय हें आहे, असें निश्चितपणें सांगून मार्गदर्शन करणारा मनुष्य जर त्या वेळीं स्टिफनला भेटला असता, तर अत्यंत आवडीनें, कष्टांची तमा न बाळगतां स्टिफन झटला असता.

स्टिफनचे जिवलग मित्र जमले कीं स्टिफन त्यांच्यासाठीं गंमत म्हणून गीतरचना करूं लागला. संध्याकाळच्या पार्टीसाठीं त्याच्या ओळखीची मित्रमंडळी जमली कीं तो पिआनोवर बसून त्यांच्याबरोबर गाणीं म्हणे. मध्यम आणि खर्ज यांच्या मधला त्याचा आवाज होता. त्याच्या आवाजांत एक प्रकारचा आर्त गोडवा होता. तो म्हणत असलेलें गीत ऐकत असतांना त्याच्या

मित्रमंडळींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहत. संगीताचा एखादा जलसा जर धर्मार्थ होत असला तर स्टिफन संघगीतांत भाग घेई. परंतु लोकांच्यासमोर मिरवण्याची त्याला चीड होती. आपलें संगीतांतलें कौशल्य कोणीतरी मिरवण्याचा प्रयत्न करतो आहे अशी जर त्याला जाणीव झाली, तर तो पिआनोच्याजवळहि जायला नकार देई. स्टिफन अठरा वर्षांचा असतानांची गोष्ट. फॉस्टर कुटुंबाच्या एका जुन्या स्नेह्यानें पार्टी द्यायचें ठरवलें होतें. फॉस्टर कुटुंबाला अर्थातच निमंत्रण होतें. त्या स्नेह्याच्या बायकोनें स्टिफनला निरोप पाठवला होता कीं, पार्टीला येतांना स्टिफनला आपली फ्ल्यूट बरोबर घेऊन यायला सांग. हा निरोप समजतांच स्टिफन संतापला. पार्टीला जायचें नाहीं असें त्यानें ठरवलें. फ्ल्यूट घेऊन ये असें सांगणाऱ्या बाईला उद्देशून निरोप म्हणून तो एवढेंच म्हणाला, "तिची इच्छाच असेल तर मी माझी फ्ल्यूट पाठवून देतों."

संध्याकाळीं स्टिफन खोलींत बसून एकटाच गात, वाजवत असला कीं त्याचा भाऊ मॉरिसन तिथें शांतपणें बसून ऐकत असे. वाजवतांना आणि गातांना स्टिफनच्या डोळ्यांतून अश्रू वहात असत—असें तो सांगे. मॉरिसन म्हणे कीं, मेलडीचे सूर स्टिफनच्या डोक्यांत सारखे नाचत असत. "कधीं कधीं रात्रीं तो अकस्मात् जागा होई, मेणबत्ती पेटवी आणि डोक्यांत आलेले सूर कागदावर टिपून ठेवी."

स्टिफन एकोणीस वर्षांचा असतांना त्याच्या बरोबरीच्या मित्रांनीं एक छोटेंसें संगीतमंडळ स्थापन केलें होतें. आठवड्यांतून दोन वेळां या संगीतमंडळाचे सदस्य स्टिफनच्या घरीं जमत. हार्मनींतलीं गीतें घटवण्यासाठीं ही मंडळी जमत असे. या गीतगायनाचें नेतृत्व स्टिफनकडे असे. स्टिफन हीं गीतें अचूक गात असे. त्या वेळीं लोकप्रिय असलेलीं निग्रोगीतें हे सगळे गात. पण त्यांना आणखी कांहीं गीतें हवीं होतीं. तेव्हां त्यांच्यासाठीं स्टिफननें गाणीं लिहायला सुरवात केली. 'लुई सिआना वेल' हें गीत आपल्या या संगीतमंडळासाठीं स्टिफननें प्रथम लिहिलें. त्याच्या या मित्रांना हें गीत इतकें आवडलें कीं, त्यांनीं दुसरें गीत लिहिण्याचा आग्रह स्टिफनला केला. या उत्तेजनामुळें स्टिफननें पुढल्या आठवड्यांत 'ओल्ड अंकल नेड' हें गीत लिहिलें. स्टिफनला उत्तेजनाची जरूर होती. लौकरच स्टिफनचीं हीं दोन्ही

गाणीं पिट्स्बर्गमध्यें लोकप्रिय झालीं. आणि एकाकडून दुसऱ्याकडे अशा रीतीनें लोकगीतांसारखीं तीं सर्वत्र पसरलीं.

एखादी फिरती नाटकमंडळी पिट्स्बर्गला आली कीं स्टिफन आणि मॉरिसन नाटकें पहायला जात. कांहीं वेळां शेक्सपिअरचीं नाटकें लागत. त्यांत कांहीं उत्तम नटहि काम करीत असत. अशा रीतीनें दिवस चालले होते. स्टिफन आतां वीस वर्षांचा झाला होता. स्टिफनचीं गाणीं लोक गात होते. परंतु गीतलेखन हा जीवनांत व्यवसाय होऊं शकेल असें त्याला किंवा त्याच्या वडिलांनाहि वाटत नव्हतें. संगीताच्या या खुळामागें आतां न लागतां स्टिफननें कामाला लागावें असें त्याच्या वडिलांना वाटत होतें. त्याचा भाऊ डनिंग याचा सिनसिनाटी येथें व्यापार होता. डनिंगच्या व्यापारी पेढीवर स्टिफननें हिशेबनिसाचें काम करावें असें ठरलें. एके दिवशीं स्टिफनच्या घरच्या मंडळींनीं आणि त्याच्या मित्रांनीं त्याचा निरोप घेतला. स्टिफन सिनसिनाटीला गेला. भावाच्या पेढीवर तीन वर्षें त्यानें हिशेबनिसाचें काम चोखपणें केलें. हिशोबाचीं पुस्तकें तो अतिशय नीटनेटकीं ठेवीत असे. आपलें ऑफिसचें काम सांभाळून फावल्या वेळांत स्टिफन गाणीं लिही. सिनसिनाटीला संगीताचे अनेक जलसे होत असत. त्यामुळें स्टिफनला चांगलें संगीत ऐकण्याची संधि येथें मिळाली. संगीतावर जगणें शक्य आहे याची जाणीव स्टिफनला इथें असतांनाच झाली. पिट्स्बर्गमधला एक संगीतशिक्षक स्टिफनच्या ओळखीचा होता. या संगीत-शिक्षकानें संगीताचीं पुस्तकें प्रकाशित करण्याचा व्यवसाय सुरू केला होता. या प्रकाशकाला स्टिफननें 'ओल्ड अंकल नेड' आणि 'ओह्! सुसाना' हीं आपलीं दोन गीतें दिलीं. हीं गीतें इतकीं खपलीं कीं, त्या प्रकाशकाला दहा हजार डॉलर्सचा फायदा झाला. त्यामुळें आपला प्रकाशनाचा व्यवसाय त्यानें खूप वाढवला. परंतु स्टिफनला मात्र आपल्या गीतांची किंमत माहीत नसल्यामुळें या गीतांच्या कांहीं मोफत प्रती त्याला मोबदला म्हणून मिळाल्या!

पैसे जरी मिळाले नाहींत तरी या दोन गीतांच्या प्रकाशनामुळें स्टिफनला कीर्ति मिळाली. निग्रोगीतें गाणाऱ्या मिन्स्ट्रेल पथकांची स्टिफनकडे गीतांसाठीं मागणी येऊं लागली. न्यू यॉर्कच्या एका प्रकाशकानें जेव्हां स्टिफनच्या गीतांसाठीं मागणी केली तेव्हां आपल्या वाढत्या कीर्तीच्या जाणिवेनें स्टिफन सुखावला. निग्रोगीतें गाणारीं गायकांची फिरती पथकें आतां स्टिफनला ओळखूं लागलीं

होतीं. संगीताच्या जगांतल्या आंतल्या वर्तुळांत आतां स्टिफनचा प्रवेश झाला होता. थिएटरांच्या जगांत आतां त्याचें स्वागत होऊं लागलें होतें. संगीताचा जलसा कुठेंहि असला तरी तिकीट न घेतां आतां स्टिफन जाऊं शकत होता. गायकांचीं पथकें आतां स्टिफनच्या गीतांच्या जाहिराती करूं लागलीं होतीं. फॉस्टर्स 'इथिओपिअन मेलडीज्' या शीर्षकाखालीं स्टिफनचीं, 'नेली वॉज अ लेडी', 'माय ब्रदर गम', 'डाल्सी जोन्स' आणि 'नेली ब्लाय्' हीं चार गाणीं प्रकाशित झालीं. स्टिफन तेवीस वर्षांचा असतांना सोनें शोधण्यासाठीं कॅलिफोर्नियाकडे वर्दळ सुरू झाली होती. स्टिफनचे 'ओह्! सुसाना' हें गीत या वेळीं गाजलें. सुप्रसिद्ध युरोपियन पिआनोवादक हर्झ् आणि थॉलबर्ग् यांनीं हें गाणें वाजवायला घेतलें होतें. हे दोघे जलशांतून या गीतावर आधारलेली वेगवेगळी स्वररचना सादर करीत.

स्टिफन फॉस्टर अखेर यशस्वी झाला होता. त्याचें हें यश अकस्मात् आलें होतें. प्रत्येकजण त्याची गाणीं गात होता, गुणगुणत होता, शीळ घालून वाजवीत होता. आतां स्टिफनला संगीताचें वेड असलेलें आपलें मन मारून हिशेबनीस म्हणून काम करण्याची जरूर नव्हती. सिनसिनाटी येथील तीन वर्षें संपल्यानंतर तो घरीं परतला. पिट्स्बर्ग येथें आल्यानंतर आपल्या घरीं वरच्या माळ्यावरील मागच्या बाजूला खोलींत स्टिफननें आपला स्टूडिओ स्थापन केला. न्यू यॉर्कच्या प्रकाशकाची त्याच्या गीतांसाठीं मागणी होतीच. स्टिफन आतां खूप काम करूं लागला. त्याच्या गीतांच्या खपलेल्या प्रत्येक प्रतीवर स्टिफनला तीन सेंट मिळावे असा करार प्रकाशकानें ठरवला होता. स्टिफन आतां कामांत अतिशय गढून गेला होता. आपल्या आईशिवाय तो स्टूडिओंत कुणालाहि येऊं देत नसे.

एव्हांना स्टिफनबरोबरच्या मुलांमुलींचीं लग्नें झालीं होतीं. सिनसिनाटी येथें असतांना स्टिफन सुसान पेंटलँडच्या लग्नसमारंभाला गेला होता. ती दहा वर्षांची असतांना तिच्यासाठीं स्टिफननें आपलें पहिलें गीत लिहिलें होतें. तिचा नवरा स्टिफननें पिट्स्बर्गला आपल्या घरीं स्थापन केलेल्या संगीतमंडळाचा सदस्य होता.

स्टिफनच्या मित्रमंडळांत जेन मॅक्डुवेल ही मुलगीहि होती. तिचे वडील डॉक्टर होते. सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार चार्ल्स् डिकन्स अमेरिकेंत

प्रवास करीत असतांना पिट्स्बर्गला आला होता. पिट्सबर्गला तो आजारी पडला. तेव्हां डॉ. मॅक्डुवेल यांनीं चार्ल्स् डिकन्सला औषधोपचार केले होते. डॉ. मॅक्डुवेल रोग्यांच्या घरीं व्हिजिटला जात तेव्हां त्यांचा निग्रो नोकर ज्यो हा बगी हाकीत असे. हें काम नसे तेव्हां ज्यो घरीं स्वयंपाक करी. जेनीचे चाहते तिला घरीं भेटायला आले कीं पुष्कळ वेळां दार उघडण्याचें काम ज्योच करी. पाय फरफटत चालणारा ज्यो रुंद हास्य करून येणाऱ्यांचें स्वागत करी आणि त्यांनीं आणलेले पुष्पगुच्छ जेनला नेऊन देई.

जेन मॅक्डुवेल ही अतिशय देखणी मुलगी होती. तिचे केस पिंगट होते. तिचे डोळे या केसांना शोभून दिसत. स्टिफन तिला भेटण्यासाठीं वारंवार जात असे. होतां होतां तो तिच्या प्रेमांत पडला. जेनच्या केसांमुळें आपण तिच्या प्रेमांत पडलों असें स्टिफन पुढें म्हणत असे. एक दिवस स्टिफन आला तेव्हां ज्योनें दार उघडलें. स्टिफन ज्योला चटकन् म्हणाला, "मी एक दिवस तुला माझ्या गाण्यांत पकडून ठेवीन." आणि स्टिफननें तसें केलें; पण तें बऱ्याच वर्षांनंतर. 'ओल्ड ब्लॅक ज्यो' हें आपलें गाणें त्यानें ज्योवर लिहिलें. पण त्यानें हें गाणें लिहिलें तेव्हां ज्यो मात्र या जगांत नव्हता.

आपल्याविषयीं जेनला काय वाटतें याचा सोक्षमोक्ष स्टिफननें करून घेतला तो प्रसंग मोठा गंमतीचा आहे. स्टिफन जेनच्या घरीं आधीं येऊन बसला होता. इतक्यांत म्हाताऱ्या ज्योनें रिचर्ड कॉवन भेटायला आल्याचें सांगितलें. (तोहि संगीत मंडळाचा सदस्य होता.) हा घोटाळा जेननें चुकीनें दोघांनाहि एकाच वेळीं भेटायला बोलावण्यानें झाला होता. परंतु स्टिफन तिथें अगोदर आला होता, आणि निघून जाण्याची त्याची मुळींच इच्छा नव्हती. रिचर्ड खोलींत येतांच स्टिफननें बाजूचें एक पुस्तक हातांत घेतलें आणि तो रिचर्डकडे पाठ फिरवून वाचण्याचें सोंग करीत ती सगळी संध्याकाळ तसाच बसून राहिला. रिचर्ड कॉवन हा श्रीमंत होता, देखणा होता. तो वकिली करीत असे. लग्न करण्याइतकी त्याची आर्थिक स्थिति होती. स्टिफन दिसायला बरा असला तरी त्याला देखणा असें म्हणतां आलें नसतें. तो उंचीला कमी होता आणि श्रीमंत तर नव्हताच. आपल्या तुलनेनें आपला प्रतिस्पर्धी रिचर्ड जेनला कसा अधिक चांगला वाटत असेल या गोष्टीचा विचार पुस्तक वाचण्याचें सोंग करतांना स्टिफन कडवटपणें करीत होता. स्टिफन स्वभावानें मृदु आणि सौम्य होता. पण त्या

दिवशीं मात्र आपण भलतें कांहीं सहन करणार नाहीं असा निग्रह त्यानें केला होता. साडेदहा वाजले तेव्हां भेटण्याची वेळ संपल्यामुळें रिचर्ड जाण्यासाठीं म्हणून उठला. स्टिफनच्या पाठीसमोर वाकून त्यानें त्याला अभिवादन केलें. परंतु स्टिफन एक शब्दहि बोलला नाहीं. तो तसाच बसून राहिला होता. जेननें रिचर्डला दरवाजापर्यंत पोंचवलें आणि त्याचा निरोप घेतला. मग ती दिवाणखान्यांत आली. वातावरण चांगलेंच तापलेलें असणार हें तिनें ओळखलें होतें. "आपल्या मनाची ओढ रिचर्डकडे आहे कीं स्टिफनकडे आहे हें तेव्हां माझें मलाच उमगलेलें नव्हतें" असें ती पुढें एकदां म्हणाली होती. अर्थात् आतां या परिस्थितींत विचार करायला वेळ नव्हता. जेन दिवाणखान्यांत येतांच स्टिफन टेबलाशेजारीं उभा असलेला तिला दिसला. त्याचा चेहरा फिकट आणि निग्रही दिसत होता. जेन खोलींत येतांच स्टिफन म्हणाला, "जेन, मला तुझें उत्तर हवें आहे : होय किंवा नाहीं तें सांग."

अचानक घातलेल्या मागणीला जर बक्षीस असतें तर तें स्टिफनला नक्कीच मिळालें असतें! परंतु कसेंहि असलें तरी, हा प्रसंग हाताळण्याची स्टिफनची ही पद्धतच अखेर बरोबर ठरली. जेननें स्टिफनशीं लग्न केलें. लग्नानंतरहि स्टिफन आणि कॉवन यांची मैत्री टिकून राहिली.

स्टिफन फॉस्टर आतां चोवीस वर्षांचा झाला होता. अंकल स्ट्रदर्सनें भविष्य केल्याप्रमाणें त्याला कांहींशी कीर्तिहि मिळाली होती. तो अधिकाधिक गीतें लिहूं लागला. प्रथम मिन्स्ट्रेल पथकांसाठीं तो लिहीत असल्यानें गीतांची शब्दरचना स्टिफन निग्रो बोलींत करीत असे. गोऱ्या लोकांसाठीं 'ओल्ड फोक्स् ॲट होम्' हें त्यानें लिहिलेलें पहिलें गीत. 'जिम क्रो' धाटणीचीं अर्थशून्य शब्दांची गंमत असणारीं विनोदी गाणींहि त्यानें लिहिलीं. अशा गाण्यांपैकीं 'द कॅंप टाउन रेसिस,' आणि 'ओह्!' 'लेम्युएल्' हीं दोन विशेष प्रसिद्ध आहेत. 'ओल्ड डॉग ट्रे,' 'हार्ड टाइम्स कम अगेन नो मोअर' अशीं भावुक गीतेंहि त्यानें लिहिलीं. जंट्ल ॲनी,' 'लॉरा ली' आणि 'कम व्हेअर माय लव्ह लाइज् ड्रीमिंग्' हीं त्याचीं प्रेमगीतें. पुष्कळशा गाण्यांची प्रेरणा त्याला जेनमुळेंच मिळाली. 'जेनी विथ धी लाइट ब्राऊन हेअर,' 'जेनी इज् कमिंग ओव्हर धी ग्रीन' या गीतांचा या संदर्भात उल्लेख करावा लागेल. स्टिफननें कांहीं भक्तिगीतेंहि लिहिलीं. त्यानें एकूण

लिहिलेल्या १८८ गीतांत जगांतल्या इतर भाषांत प्रसिद्ध झालेलें आणि जगभर सर्वत्र गाजलेलें गीत म्हणजे 'ओल्ड फोक्स् ॲट होम.'

एकदां तो 'वे डाऊन अपॉन धी पेडी रिव्हर' हें गीत लिहीत होता. परंतु नदीचें नांव कांहीं त्याला हवें होतें तसें गाण्यांत बसेना. एके दिवशीं स्टिफन आपला भाऊ मॉरिसन याच्या ऑफिसांत गेला आणि त्याला म्हणाला, दक्षिणेकडच्या नदीचें कुठलेंहि दोन अक्षरी नांव मला सांग. मला नव्या गाण्यांत तें वापरायचें आहे."

मॉरिसन म्हणाला, "याझू हें नांव चालेल कां?"

"नको. तें पूर्वीं वापरलं गेलं आहे."

"पेडी हें नांव कसं आहे?"

"मला सुचलं होतं तें. पण तें नको आहे."

मग मॉरिसननें नकाशा उघडला आणि फ्लॉरिडामधल्या एका नदीच्या नांवावर बोट ठेवून तो म्हणाला, "स्वानी हें नांव कसं आहे?"

स्टिफन एकदम आनंदानें ओरडला, "तेंच हवं होतं, अगदीं तेंच." असें म्हणून एक शब्दहि न बोलतां स्टिफन आपल्या भावाच्या ऑफिसांतून आपल्याच नादांत तरातरा निघून गेला.

फ्लॉरिडाला स्टिफन कधींच गेला नव्हता, त्यानें स्वानी नदीहि पाहिली नव्हती. दक्षिणेकडल्या कांहीं नद्यांतून मात्र त्यानें प्रवास केला होता, आणि तेवढा अनुभव त्याला होता. तो, पिंगट केसांची जेनी, त्याच्या जुन्या संगीतमंडळाचे सदस्य असलेले त्याचे मित्र—त्यांच्यापैकीं कांहींचीं आतां लग्नें झालीं होतीं—यांनीं नदींतून न्यू ऑर्लिन्सपर्यंत प्रवास केला होता. अमेरिकेंतील क्रांतियुद्धकाळांत स्टिफनच्या चुलत भावानें केंटकीला एक सुंदर घर बांधलें होतें. स्टिफन तिथें जाऊन आला. माय ओल्ड केंटकी होम्' हें गीत स्टिफनला याच घरावरून सुचलें असें म्हणतात. दक्षिणेकडच्या जीवनाचें त्याला झालेल्या दर्शनांतून 'मासाज् इन् द कोल्ड कोल्ड ग्राऊंड्' हें गीत जन्माला आलें.

फॉस्टरला त्यानें लिहिलेलीं गीतें आवडत असत. परंतु संगीतकलेचें रीतसर शिक्षण आपल्याला मिळालेलें नाहीं, स्वररचनेच्या तांत्रिक ज्ञानाची आपल्याजवळ उणीव आहे या मर्यादांची त्याला नेहमीं जाणीव असे. आपल्या गीतांना तो फारसे पैसे मागत नसे याचें हें एक कारण असण्याची

शक्यता आहे. कदाचित् त्याला पैशांची फारशी पर्वा नसल्यामुळेंहि असें होत असेल. परंतु कारण कोणतेंहि असलें तरीहि पैशांची चणचण जेन आणि फॉस्टरचें कुटुंबीय यांना जाणवूं लागली ही वस्तुस्थिति होती.

या काळांत वेगवेगळ्या मिन्स्ट्रेल पथकांत नवीं नवीं गीतें सादर करण्याच्या बाबतींत स्पर्धा असे. निग्रोगीतें सादर करणाऱ्या या पथकांपैकीं इ. पी. ख्रिस्टी याची कंपनी विशेष प्रसिद्ध होती. आपल्या गीतांचा पहिल्यानें वापर करण्याची परवानगी फॉस्टरनें ख्रिस्टीच्या कंपनीला पंधरा डॉलर्स इतका नाममात्र मोबदला घेऊन दिली. ख्रिस्टीच्या कंपनीनें 'ओह्! बॉईज्, कॅरी मी अलाँग्' आणि 'ओल्ड् फोक्स ॲट होम्' हीं फॉस्टरचीं गीतें प्रथम म्हटलीं. यांपैकीं दुसरें गीत ख्रिस्टीच्या नांवावर प्रसिद्ध करण्याची परवानगी त्यानें दिली होती. बराच काळपर्यंत हें गीत ख्रिस्टीनेंच लिहिलें आहे असें लोक मानीत असत. ही परवानगी देण्याच्या काळांत फॉस्टर वेगळ्या प्रकारची संगीतरचना करण्याच्या प्रयत्नांत होता. 'इथिओपिअन' गीतें लिहिणारा लेखक म्हणूनच केवळ लोकांनीं आपल्याला ओळखूं नये अशी त्याची इच्छा होती. पुढें 'ओल्ड फोक्स ॲट होम' या गीतावर लेखक म्हणून तो आपलें नांव घालूं लागला.

फॉस्टरच्या मित्रानें एकदां त्याला एक कुत्रा भेट म्हणून दिला. या कुत्र्याची आणि फॉस्टरची मोठी दोस्ती जमली. फॉस्टर त्या वेळीं बागेच्या कोपऱ्याजवळ रहात होता. कुत्रा बागेंत मुलांबरोबर खेळूं लागला कीं फॉस्टर कौतुकानें त्याच्याकडे पहात बसे. या कुत्र्याची आपल्यावर असलेली निष्ठा फॉस्टरनें 'ओल्ड डॉग ट्रे' या गीतांतून व्यक्त केली. यानंतर रस्त्यावर फिरणारा एक अनिकेत कुत्रा फॉस्टरनें घरीं आणला. या कुत्र्याचें नांव फॉस्टरनें 'संकट' या अर्थाचें ठेवलें होतें. एखादें संकट आल्यासारखा हा कुत्रा रात्रीं केविलवाण्या सुरांत रडत असे म्हणून त्याचें नामकरण असें करण्यांत आलें होतें.

प्रथम स्टिफन आणि त्याची बायको फॉस्टर कुटुंबांतच राहत असत. स्टिफनला मुलगी झाली तेव्हां तो आणि त्याची बायको न्यू यॉर्कला गेले. न्यू यॉर्कला आर्केस्ट्रा आणि वृंदगीतें ऐकण्याची संधि फॉस्टरला लाभली. संधि लाभली खरी, पण ती खूपच उशीरां. न्यू यॉर्कला असतांना त्यानें आपल्या छोट्या कुटुंबाला पुरेल इतके पैसे मिळवले. परंतु भविष्यकाळाचा विचार

करून कांहीं पैसे सांठवून ठेवावे ही प्रवृत्ति त्याच्यांत नव्हती. कसल्याहि तऱ्हेची योजना न करतां तो लहरीला येईल त्याप्रमाणें राहत असे. यामुळें त्याच्या जीवनांत पुढें एक प्रकारचें असमाधान निर्माण झालें, त्याच्या आयुष्याची घडी विस्कटली. आणि या योजनाशून्य आयुष्याचा शोकान्त झाला.

घरच्या आठवणींचा झटका आला कीं स्टिफन फॉस्टर अगदीं विव्हळ होत असे. न्यू यॉर्कमध्यें एक वर्ष राहिल्यानंतर स्टिफन फॉस्टरला एकाएकीं घरच्या आठवणींचा झटका आला. कसलाहि विचार न करतां त्यानें ताबडतोब बायकोला घरीं जाण्यासाठीं सामान बांधण्यास सांगितलें. चोवीस तासांच्या आंत घरांतलें सर्व फर्निचर विकून तो न्यू यॉर्क सोडून निघाला. रात्रीच्या वेळीं तो घरीं पोंचला--अगदीं अनपेक्षितपणें. त्यानें दरवाजाची घंटा वाजवली. स्टिफनची आई जागी झाली. जिना उतरून खालीं आली. आवारांत वाजलेलीं स्टिफनचीं पावलें तिनें ऐकलीं होतीं. दार उघडण्यासाठीं येतांयेतांच तिनें विचारलें, "माझा लाडका मुलगा आला का पुन्हा घरीं?"

आईचा आवाज ऐकून स्टिफन इतका हेलावून गेला कीं, आवारांतल्या बाकावर बसून तो लहान मुलासारखा रडूं लागला. व्यवसायासाठीं म्हणून किंवा कधीं गंमत म्हणून स्टिफन न्यू यॉर्कला जाऊन येई. आई जिवंत असेपर्यंत तो घर सोडून बाहेर गेला नाहीं.

स्टिफनची बायको जेन हिला अर्थातच हा प्रकार रुचणें शक्य नव्हतें. एकत्र कुटुंबांत पुष्कळ वेळां कुरबूर ही सुरू असतेच. आपण आणि आपली मुलगी मॅरियन स्टिफनच्या जीवनांत पूर्णता निर्माण करूं शकत नाहीं या जाणिवेमुळें तिचा अभिमान दुखावला जाई. कांहीं काळ तर ती स्टिफनपासून वेगळीहि राहिली होती. न्यू यॉर्क सोडून स्टिफन आईकडे येऊन राहिला, फारसे पैसे मिळवीना तेव्हां जेन नोकरी करूं लागली. आज एखादी स्त्री घरचें पाहूनहि नोकरी करूं लागली तर आपण तिच्याकडे आदरानें पाहातों. परंतु त्या काळांत नाइलाज झाल्याखेरीज विवाहित स्त्री नोकरी करण्यासाठीं घराबाहेर पडत नसे. स्टिफन फॉस्टरच्या जीवनांत निर्माण झालेल्या असमाधानांत बायकोच्या या नोकरीमुळें आणखी भर पडली. स्टिफनचे आई-वडील आणि डनिंग हा भाऊ यांचा मृत्यु झाला, इतर भांवडें दुसरीकडे राहाण्यास गेलीं तेव्हां घरवेड्या स्टिफनला आपलें आयुष्य अगदीं ओकें ओकें

वाटूं लागलें. जिथें त्याची आई राहात होती तें घर हा त्याला बांधणारा एकमेव धागा होता. परंतु हाहि आधार गेला तेव्हां स्टिफनचें आयुष्य वाहवत जाऊं लागलें.

तो न्यू यॉर्कला परत आला. यापूर्वींच कांहीं दिवस दारूच्या व्यसनानें त्याच्यावर झडप घातली होती. त्यानें आपलें मन आवरण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्याला तें जमलें नाहीं. गुलामीविरुद्ध युद्ध सुरू होण्याच्या वेळीं स्टिफन आपल्या बायकोमुलीला घेऊन न्यू यॉर्कला राहात होता. त्याची मुलगी मॅरियन त्या वेळीं आठ वर्षांची होती. या काळांत स्टिफटन अतिशय नीटनेटका राहात असे. परंतु हळूहळू त्याची ही सगळी शान हरपली. मध्यंतरीं असा एक काळ आला कीं, त्याला गाणींहि सुचेनाशीं झालीं. आर्थिक चटके भासूं लागले. शेवटीं नोकरी शोधण्यासाठीं म्हणून त्याची बायको पिट्स्बर्गला परतली. दरम्यान स्टिफन हींव भरून खूप आजारी पडला.

तिशीच्या मध्याला तो आला तेव्हां त्याची गीतलेखनाची स्फूर्ति पुन्हां जागृत झाली. 'ओल्ड ब्लॅक ज्यो' 'व्हर्जिनिया बेल,' 'द मेरी मेरी मंथ ऑफ मे,' 'अवर ब्राइट समर डेज् आर गॉन' इत्यादि गीतें त्यानें याच काळांत लिहिलीं. 'ब्यूटिफुल ड्रीमर' हें त्याचें शेवटचें गीत. आयुष्याच्या अखेरीला स्टिफननें आपलीं गीतें अत्यंत अल्प मोबदला घेऊन विकलीं. आपल्याला फारशा पैशांची गरजच नाहीं अशी त्याची भावना झाली होती. अन्नावरची त्याची वासना उडाली होती, तो अतिशय थोडें खात असे. हळूहळू पोशाखाकडेहि त्याचें दुर्लक्ष होऊं लागलें. तो एकाकी झाला, एकाकी दिसूं लागला. हेस्टर अँड चेस्टर स्ट्रीटच्या कोपऱ्यावर एक जुनें किराणा मालाचें दुकान होतें. या दुकानाच्या मागच्या बाजूच्या खोलींत तो आपला बराचसा वेळ घालवूं लागला.

या काळांत कूपर नांवाचा एक तरुण मनुष्य फॉस्टरला चाली बांधण्यासाठीं गीतांची शब्दरचना करून देत असे. फॉस्टर सतत पीत असे; परंतु तो झिंगलेला कधींहि नसे असें कूपर सांगे. खाण्याकडे स्टिफनचें फारसें लक्ष नसल्यामुळें सफरचंद आणि मुळे यांच्यावरच तो जेवण भागवून घेई. पिआनोवर न बसतांहि फॉस्टर अत्यंत सहजपणें स्वरलेखन करीत असे अशी आठवण कूपरनें सांगितली आहे. सामान बांधण्याचा ब्राऊन पेपर घेऊन त्यावर ओळी आखून

स्टिफन स्वरलेखन करी. मेलडीचे सूर त्याच्या डोक्यांत सारखे नाचत असत.

हिंवाळ्यांतल्या एका सकाळीं फॉस्टरला अपघात झाला असल्याचा निरोप कूपरला आला. स्टिफन फॉस्टर ज्या हॉटेलांत राहत होता तिथें कूपर घाईघाईनें गेला. जखमी झालेला फॉस्टर तिथें जमिनीवर पडलेला त्याला दिसला. कूपरनें डॉक्टरला बोलावणें पाठवलें. फॉस्टरला हॉस्पिटलांत नेण्यांत आलें आणि तिथें तो मरण पावला. त्याच्या खिशांतल्या पाकिटांत अडतीस सेंट्स होते; आणि एका कागदाच्या कपट्यावर पेन्सिलीनें खरडलेल्या पुढील अर्थाच्या ओळी होत्या :

माझ्या प्रिय मित्रांनो
आणि दयाळू हृदयांनो

यानंतर कांहीं वर्षांनीं सुप्रसिद्ध गायिका निल्सन अमेरिकेला आली. तिनें प्रथम "ओल्ड फोक्स ॲट होम" हें गीत ऐकलें. "या गीताचे शब्द आणि स्वर तिच्या मनाला उतके भिडले कीं, तिनें ताबडतोब हें गीत शिकायला सुरवात केली." निल्सन हें गीत आपल्या कार्यक्रमांत नेहमीं म्हणत असे.

फॉस्टर जिवंत असतांनाच त्याच्या या गीतानें देशोदेशीं प्रवास केला होता. हें गीत लिहून झाल्यानंतर कांहीं वर्षांची गोष्ट. एक मनुष्य स्कॉच सीमेवरून प्रवास करीत होता. तिथें त्यानें बर्न्स्, रॅमसे यांच्या पवाड्यांबरोबरच गुराख्यांच्या मुलांमुलींच्या तोंडीं फॉस्टरचें हें गीत ऐकलें. चीन, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया इथपर्यंतहि फॉस्टरचीं गीतें जाऊन पोंचलीं होतीं.

स्कॉटलंडमधल्या एका माणसानें फॉस्टरच्या गीतांविषयीं एक मजेदार आठवण सांगितली आहे. तो विद्यार्थी असतांना ग्लॅस्गोमधला एक दुसरा विद्यार्थी फॉस्टरच्या गीतांचे सूर वाजवीत असे. परंतु हीं गाणीं फॉस्टरनें लिहिलीं आहेत हें त्यांना माहीतच नव्हतें. शाळेंतल्या मेजवानीच्या कुठल्याहि प्रसंगीं फॉस्टरच्या गीतांचा कार्यक्रम हटकून होत असे. लोकगीतांसारखींच हीं गीतें आहेत असेंच समजून विद्यार्थी तीं म्हणत असत. फॉस्टर नांवाच्या अमेरिकन माणसानें तीं लिहिलीं आहेत याची कल्पनाहि नव्हती. फॉस्टरच्या गीतांची सुरावट ऑर्केस्ट्रावर वाजवली गेली कीं सगळें वातावरण बदलून जात असे, असें तो स्कॉटलंडचा मनुष्य सांगे.

फॉस्टर खराखुरा अमेरिकेचा पुत्र होता. इतर कुठल्याहि देशांत त्याचें हें व्यक्तिमत्त्व घडूंच शकलें नसतें. आपला देश, आपली जनता यांच्याविषयींचीं गीतें तो गात असे. त्याच्या गाण्यांत साधेपणा आहे, तळमळ आहे आणि लोकगीतांतल्या भावनांचा जिव्हाळा आहे. बिकट असें त्या गाण्यांत कांहींहि नाहीं. घर, स्नेह, निष्ठा, प्रेम यांच्याविषयीं या गीतांतून व्यक्त होणाऱ्या भावना सर्व माणसांना जाणवतात. या गीतांचा गाभा सार्वत्रिक आहे. या गीतांची भाषा ही सामान्य माणसाच्या हृदयाची भाषा आहे.

१९४० सालीं, म्हणजे स्टिफन फॉस्टरच्या मृत्यूनंतर शहात्तर वर्षांनीं न्यू यॉर्कच्या युनिव्हर्सिटींत स्मारकांच्या दालनांत स्टिफन फॉस्टरचें स्मारक उभारलें गेलें. या दालनांत स्मारक असणारा स्टिफन फॉस्टर हा पहिला, आणि अजूनपर्यंत तरी एकच, संगीतकार.

स्टिफन फॉस्टर :
जन्म : पेन् सिल्व्हानिया राज्यांत पिट्सबर्ग येथें,
चार जुलै १८२६.
मृत्यु : न्यू यॉर्क येथें,
१३ जानेवारी १८६४.
दफन : पिट्सबर्ग येथें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92625
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

✲

# जॉन फिलिप साउसा

**' मार्च ' संगीताचा सम्राट !**

अमेरिकेचें राजधानीचें शहर वॉशिंग्टन येथें जॉन फिलिप साउसा याचा जन्म झाला आणि तिथेंच तो वाढला. लहानपणीं त्याला बँड-संगीत खूप ऐकायला मिळालें. तो काळ आणि तें स्थळ गुलामीविरुद्ध झालेल्या युद्धाचें असल्यामुळें बँड ऐकायला तेव्हांच खरी मजा होती. राष्ट्रीय भावना जाग्या झालेल्या असतांना बँड-संगीत थरारून सोडतें; आणि युद्धाच्या काळांत देशभक्तीच्या भावना पेटलेल्या असतात. बरोबरच्या इतर मुलांप्रमाणेंच जॉन फिलिपसुद्धां बँड-संगीत ऐकतांना थरारून जात असे. बरें असो, वाईट असो, तें संगीत त्याला फार आवडे.

नौदलाच्या बँडपथकांत जॉन फिलिपचे वडील अँटोनिओ हे ट्रॉम्बोन वाजवीत असत. छोट्या जॉनला त्याचे वडील फार आवडत, त्यांच्याविषयीं त्याला फार आदर होता. जॉन फिलिपनें निवडलेल्या व्यवसायाशीं त्याच्या या भावनेचा निकटचा संबंध होता. आपले वडील जें करतात तें विशेष चांगलें असें सर्वांनाच वाटतें. परंतु रस्त्यावरून बँड कवायतीच्या ठेक्यांत चाललें असतांना थरारून जाणार नाहीं असा मुलगा किंवा मुलगी या जगांत आढळणें कठीण.

अँटोनिओ साउसा हा मूळचा पोर्तुगीज. पोर्तुगालमध्यें क्रांति झाली तेव्हां त्याचें कुटुंब स्पेनला पळालें. सेव्हिल येथें अँटोनिओचा जन्म झाला. अँटोनिओ नंतर इंग्लंडला गेला आणि त्यानंतर अमेरिकेला आला. अमेरिका पहाण्यासाठीं

म्हणून एक बव्हेरियन मुलगी आली होती. तिची आणि अँटोनिओची ब्रुकलिन येथें भेट झाली. अमेरिका पहाण्यासाठी आलेली ही मुलगी आयुष्याच्या अखेरपर्यंत अमेरिकेंतच राहिली. कारण तिनें अँटोनिओ साउसाशीं लग्न केलें. त्यांना एकूण दहा मुलें झालीं. त्यांपैकीं जॉन फिलिप हा सगळ्यांत मोठा. त्याच्यामागें वाढणारीं लहान भावंडें असल्यामुळें उपार्जनाला त्याला लौकर सुरुवात करावी लागली. लहानपणापासूनच आपण संगीतकार व्हायचें असें जॉनच्या मनानें घेतलें होतें.

जॉन फिलिपच्या संगीतशिक्षणाची सुरवात मात्र फारशी सुखाची झाली नाहीं. ही सुरवात अशी झाली : जॉन फिलिपच्या वडिलांचा एक जुना स्पॅनिश मित्र त्यांच्या घरीं नेहमीं येत असे. एके दिवशीं संध्याकाळीं अँटोनिओ आणि त्यांचा हा मित्र गप्पा मारीत बसले असतांना जॉन फिलिप तिथें बेसबॉल घेऊन खेळूं लागला. त्यांच्या गप्पांत अर्थातच यामुळें व्यत्यय आला. अँटोनिओचा हा स्पॅनिश मित्र पूर्वीं ऑर्केस्ट्रांत वाजवीत असे. आतां तो निवृत्त झाला होता. चेंडू घेऊन खेळणाऱ्या जॉन फिलिपकडे त्याचें लक्ष गेलें. तो अँटोनिओला म्हणाला कीं, जॉन फिलिपला सॉल्फा पद्धतीचें नोटेशन वाचण्याचे धडे दिले तर तें चांगलें होईल. या स्पॅनिश मित्राला वाद्यसंगीत चांगलें येत असे. परंतु गाण्याच्या दृष्टीनें त्याचा आवाज मात्र भयानक होता. त्यानें जेव्हां जॉन फिलिपला पहिला धडा द्यायला सुरवात केली तेव्हां म्हाताऱ्याच्या गळ्यांतून निघणारा एक सूर आणि दुसरा सूर यांच्यांतला फरकच जॉन फिलिपला कळेना ! त्याच्या गळ्यांतून निघणारे सगळेच सूर सारखे वाटूं लागले. एकच फरक जॉन फिलिपला जाणवला : "तो शांत असे तेव्हां कर्कशपणें खेकसे, आणि चिडला कीं किंचाळूं लागे." पहिल्या धड्याच्या वेळीं म्हाताऱ्यानें सुरावट म्हणून दाखवली आणि आपल्यामागून त्यानें ती जॉन फिलिपला म्हणायला सांगितली.

"म्हण," हा म्हातारा शिक्षक खेकसला.

"म्हण." शिक्षकाचें अनुकरण करीत जॉन फिलिप खेकसला.

"तें नाहीं. सुरावट म्हण." या वेळीं शिक्षक किंचाळला.

"सुरावट म्हण." जॉन फिलिप पुन्हां अनुकरण करून किंचाळला.

असे हे संगीताचे धडे घेत असतांना जॉन फिलिप कंटाळून गेला यांत

कांहीं नवल नाहीं. संगीताचें हें शिक्षण घेण्यापेक्षां बेसबॉल खेळणेंच त्याला अधिक पसंत होतें.

जॉन फिलिप जिथें राहत होता त्याच्या जवळपास या म्हाताऱ्या शिक्षकाच्या मुलानें संगीताची शाळा उघडली होती. जॉन फिलिप सात वर्षांचा झाला तेव्हां त्याचें नांव या शाळेंत घालण्यांत आलें. शाळेंत एकूण साठ मुलें होतीं. जॉन फिलिप व्हायोलिन शिकूं लागला. व्हायोलिन शिकवणाऱ्या म्हाताऱ्याच्या मुलाशीं जॉन फिलिपचे अनेक खटके पुढें उडणार होते.

व्हायोलिन शिकवणाऱ्या शिक्षकाचें नांव होतें प्रोफेसर एस्पुटा. मुलगा व्हायोलिन शिकला नाहीं तरी या शाळेच्या निमित्तानें त्याचें गांवांत भटकण्याचें तरी थांबेल असें हा शिक्षक जॉन फिलिपच्या वडिलांना एकदां सांगत होता. प्रोफेसर एस्पुटा हें सांगत असतांना जॉन फिलिपच्या कानांवर ते शब्द पडले. आपल्या शिक्षकाच्या या उद्गारांमुळें जॉन फिलिप संतापला. वर्गांत एक शब्ददेखील बोलायचा नाहीं असें त्यानें ठरवलें. पहिलीं तीन वर्षें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं म्हणूनसुद्धां तो बोलत नसे. त्यामुळें हा पोरगा कांहीं शिकतो आहे किंवा नाहीं हेंच प्रोफेसर एस्पुटाला कळेना. जॉन फिलिप जरी मौन पाळीत असला तरी शिकवल्या जाणाऱ्या धड्यांकडे त्याचें लक्ष असे. एकाग्रतेनें तो विद्याग्रहण करीत होता. तीन वर्षांनंतर परीक्षा आली.

या परीक्षेस एकूण शाळेतर्फे पांच सुवर्णपदकें ठेवण्यांत आलीं होतीं. जॉन फिलिपनें एकच नव्हे तर पांचहि सुवर्णपदकें जेव्हां पटकावलीं तेव्हां सर्वांना किती आश्चर्य वाटलें असेल याची कल्पनाच केलेली बरी. प्रोफेसर एस्पुटाची अगदीं पंचाईत झाली. तो जॉन फिलिपच्या वडिलांकडे येऊन म्हणाला कीं, जॉन फिलिपला जर पांचहि पदकें दिलीं तर इतर विद्यार्थ्यांचा गैरसमज होण्याची शक्यता आहे. अँटोनियो साउसा हा समजूतदार मनुष्य होता. तो प्रोफेसर एस्पुटाला म्हणाला कीं, जॉननें पांचहि पदकें मिळविलीं यांतच आपल्याला सारें कांहीं मिळालें; हीं पदकें त्याला प्रत्यक्ष दिल्यामुळें त्याच्या हुशारींत थोडीच भर पडणार होती ! त्यांतलीं कांहीं इतर विद्यार्थ्यांना दिल्यास आपणास मुळींच वाईट वाटणार नाहीं. जॉन फिलिपच्या वडिलांनीं असें सांगतांच प्रोफेसर एस्पुटानें तीन पदकें जॉन फिलिपला दिलीं आणि दोन इतर विद्यार्थ्यांना दिलीं. मोठेपणीं जॉन फिलिपचे अनेक सन्मान झाले, राजेरजवाड्यांकडून

त्याला पदकें बहाल करण्यांत आलीं. परंतु प्रोफेसर एस्पुटाकडून मिळालेल्या या तीन पदकांइतकी मातब्बरी त्याला कुठल्याहि बक्षिसाची वाटली नाहीं. हीं तीनहि पदकें त्यानें जपून ठेवलीं होतीं. आपण वर्गात एकहि शब्द न बोलतां सर्वांना कसें चकवलें होतें याची या पदकांकडे पाहतांना त्याला आठवण येई. या सुवर्णपदकांकडे पाहतांना "मौन हेंच खरें सोनें" ही जाणीव त्याच्या मनावर तीव्रतेनें बिंबत असे.

तो अकरा वर्षांचा झाला त्या वर्षीं त्याच्या या शाळेच्या वार्षिक संगीत-जलशांत त्याचा व्हायोलिनचा कार्यक्रम होणार होता. या वयांतदेखील वेगवेगळ्या ठिकाणीं व्हायोलिन वाजवून जॉन फिलिप पैसे मिळवीत असल्यामुळें वार्षिक समारंभांतल्या या कार्यक्रमाची त्याला मुळींच भीति वाटत नव्हती. त्याला जर भीति वाटली असती तर बरें झालें असतें; कारण भीतीमुळें तरी त्यानें त्या दिवशीं केलेला मूर्खपणाचा प्रकार केला नसता. या प्रकारानें त्याला चांगलाच धडा मिळाला.

ज्या दिवशीं हा कार्यक्रम व्हायचा होता त्याच दिवशीं त्याला बेसबॉल खेळायला जायचें होतें. कार्यक्रम संध्याकाळीं होता. जॉन फिलिप सबंध दिवस बेसबॉल खेळत राहिला. कार्यक्रमाला जाण्यापूर्वी मैदानावरून तो घरीं आला तेव्हां तो खूप दमला होता, त्याचे कपडे मळले होते, त्याला कडकडून भूक लागली होती. पण घरीं येऊन पाहातो, तर आई आजारी होती, मोठी बहीण बाहेर गेली होती, आणि मोलकरीणहि घरांत नव्हती. एका सँडविचवरच त्याला भूक भागवून घ्यावी लागली. रविवारीं घालायचे खास कपडे त्यानें काढले. परंतु स्वच्छ शर्ट कांहीं त्याला मिळेना. लॉन्ड्रींतून कपडे परत आलेले नव्हते. तो धावत धावत शाळेंत गेला आणि त्यानें प्रोफेसर एस्पुटाला ही परिस्थिति सांगितली. प्रोफेसर एस्पुटा म्हणाला, "ठीक आहे, आतां धावत माझ्या घरीं जा, आणि माझ्या बायकोकडून माझा एक शर्ट मागून घे."

त्याप्रमाणें जॉन फिलिपनें केलें. मोठ्या माणसाचा शर्ट जॉन फिलिपच्या अंगांत बसावा म्हणून प्रोफेसर एस्पुटाच्या बायकोनें या शर्टाला पिना लावल्या होत्या.

व्हायोलिन वाजवतांना दोन्ही हातांची हालचाल होतच असते. उजवा हात तर सारखा हालत असतो. या सगळ्या प्रकारांत शर्टाच्या पिना सैल झाल्या

आणि शर्ट मानेवरून खालीं येऊं लागला. श्रोत्यांमध्यें एकच हंशा पिकला. श्रोत्यांत हंशा पिकल्यानें घाबरलेल्या जॉन फिलिपला सुरावट आठवेना. तेव्हां तो स्टेजवरून पळाला. तो इतका शरमला कीं, यापेक्षां आपल्याला मरण येतें तर बरें झालें असतें असा विचार त्याच्या मनांत येऊन गेला.

जलसा संपल्यानंतर विद्यार्थी आणि शिक्षक यांना आइसक्रीम आणि केक यांची पार्टी होती. प्रोफेसर एस्पुटानें दडून राहिलेल्या जॉन फिलिपला हुडकून काढलें. तो म्हणाला, "तूं उत्तमपैकीं गोंधळ केलेला आहेस. तुला या प्रकाराची शरम वाटली पाहिजे. पार्टीला येण्याचा तुला कांहींहि अधिकार नाहीं. संध्याकाळच्या जलशांत तुला व्हायोलिन वाजवायचें आहे हें माहीत असतांना तूं बेसबॉल खेळायला कां गेलास? खरें म्हणजे तूं खेळायला न जातां दुपारीं कार्यक्रमाची तयारी करीत बसायला हवें होतेंस."

त्या दिवशीं जॉन फिलिपला आइसक्रीम मिळालें नाहीं. या प्रसंगामुळें मिळालेला धडा तो कधींहि विसरला नाहीं. तो म्हणे कीं, यापुढें मीं खेळणें आणि वाजवणें या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं करायच्या नाहींत असें ठरवलें.

प्रोफेसर एस्पुटाबरोबर जॉन फिलिपचा आणखी एक खटका उडाला. या प्रकरणांतून दुसऱ्यांचें मन सहानुभूतीनें समजून घ्यावें हा धडा जॉन फिलिप शिकला.

वर्गांत शिकवणारा शिक्षक नेहमींच शांत, आनंदी राहूं शकत नाहीं हें सगळ्यांनाच माहीत आहे. डोकें दुखत असलें किंवा कुठें तरी पार्टीला जायचें असलें तर विद्यार्थी पुष्कळ वेळां शाळेला दांडी मारतात. परंतु शिक्षकाला तसें करतां येत नाहीं. प्रोफेसर एस्पुटाला एकदां गळवें झालीं होतीं. चांगलाच ठणका लागला होता, पण तरीहि शाळेंत जाऊन शिकवणें त्याला भाग होतें. गळवांमुळें वेदना तर होतातच, पण माणसाचें मनहि अतिशय चिडचिडें बनतें. प्रोफेसर एस्पुटा वर्गांत शिकवत असतांना जॉन फिलिपनें त्याला बरें वाटेल असें वागण्याचा कसलाहि प्रयत्न केला नाहीं. उलट, आपण कसेंहि वाजवलें तरी प्रोफेसर एस्पुटा प्रसन्न होत नाहीं याचेंच त्याला वाईट वाटूं लागलें. शिकवतां शिकवतां प्रोफेसर एस्पुटा मध्येंच थांबला आणि त्यानें व्हायोलिनचा गज अधिक मागें ओढ असें जॉन फिलिपला सांगितलें. यावर गज आणखी मागें ओढणें शक्य नाहीं असें जॉन फिलिपनें उत्तर दिलें. या उत्तरामुळें प्रोफेसर

एस्पुटा चिडला. त्यानें पुनः जॉन फिलिपला गज मागें ओढायला सांगितलें. जॉन फिलिप वाद घालूं लागला. तेव्हां संतापून प्रोफेसर एस्पुटानें आपल्या हातांतला गज जोरानें मागें ओढला. त्यामुळें बाजूच्या खुर्चीला गज आपटून त्याचे दोन तुकडे झाले.

"वर्गाबाहेर चालता हो." प्रोफेसर एस्पुटा ओरडला. त्या दिवशींचा जॉन फिलिपचा धडा इथेंच संपला.

बिचारा जॉन फिलिप! आपण कांहींहि केलें नसतांना आपल्याला उगीचच ही वागणूक मिळाली असें त्याला वाटलें. जॉन फिलिप घरीं आला तेव्हां त्याचें मन अस्वस्थ असल्याचें त्याच्या वडिलांच्या ध्यानांत आलें. त्यांनीं विचारतांच जॉन फिलिपनें झालेली सर्व हकिकत सांगितली. त्याचे वडील म्हणाले, म्हणजे तुला संगीताचें शिक्षण घ्यायचें नाहीं. तुला दुसरें कांहीं करायचें आहे का?"

"होय, मला पाव तयार करायच्या बेकरींत काम करायचें आहे."

'बेकरींत काम?"

"होय."

"ठीक आहे. तुझ्या मनासारखं होऊं दे. बेकरींत तुला अनुभव मिळण्याच्या दृष्टीनें मी काम मिळविण्याचा प्रयत्न करतों." असें म्हणून जॉन फिलिपचे वडील बाहेर गेले.

थोड्या वेळानें ते घरीं परत आले. त्यांच्या घराच्या बाजूला दोन चौक ओलांडल्यानंतर चार्ली नांवाच्या माणसाची एक बेकरी होती. चार्लीनें जॉन फिलिपला पाव भाजायचें शिक्षण देण्याचें कबूल केलें होतें. जॉन फिलिपच्या वडिलांनीं तसें आपल्या मुलाला सांगितलें. ते म्हणाले, इतर बेकरीवाल्यांपेक्षां तूं शिक्षण मात्र अधिक घे. त्याची तुला तुझी आर्थिक स्थिति सुधारण्यास मदत होईल. बेकरीमधलें शिक्षण घेत असतांनाच शाळेंतहि गेलें पाहिजे असें जॉन फिलिपच्या वडिलांनीं त्याला सांगितलें. त्या दिवशीं रात्रीं साडेआठ वाजतां चार्लीनें जॉन फिलिपला आपल्या बेकरींत बोलवलें होतें.

रात्रीं साडेआठ वाजतां जॉन फिलिप चार्लीच्या बेकरींत गेला. त्यानें रात्रभर काम केलें. पहांटे त्यानें गाडींत पाव भरायला मदत केली. आणि ड्रायव्हर-बरोबर पावांचे वांटप करण्यासाटीं तो गेला. गाडीच्या घोड्याला पाव घेणाऱ्या

गिऱ्हाइकांच्या घरांचे पुढचे दरवाजे बरोबर माहीत असतात हें पाहतांच त्याला कौतुक वाटलें. सकाळीं आठ वाजतां तो या कामांतून मोकळा झाला आणि न्याहारीसाठीं घरीं गेला. सबंध रात्रीं तो फक्त अर्धा तास झोपला होता. पाव भट्टींत टाकल्यानंतर कांहीं वेळ कामगारांना डुलकी घेणें शक्य होतें.

संध्याकाळीं फिलिप शाळेंतून परत आला तेव्हां बेसबॉल खेळण्याची इच्छा त्याला होईना. घरीं जेवण्याच्या वेळेपर्यंत तो अगदीं थकून जाऊन बसला होता. जेवण झाल्यानंतर साडेआठ वाजतां बेकरींत जावें लागणार होतें. त्या रात्रीं जॉन फिलिप बेकरींत गेला तेव्हां पहिल्या दिवसाइतकी चार्ली आणि त्याची बायको आपल्याशीं चांगलीं वागलीं नाहींत याची त्याला जाणीव झाली. दुसऱ्या दिवशीं तो शाळेंत गेला तेव्हां त्याच्या डोक्यांत कांहींच शिरलें नाहीं. संध्याकाळीं तो थकून घरीं आला आणि तिसऱ्या रात्रीं पुन्हां बेकरींत गेला. या वेळीं चार्लीनें त्याच्या अंगावर ओरडून त्याला हुकूम सोडले. एकदां तर त्याला वर जाऊन रडणाऱ्या मुलाचा पाळणा हलवण्याचें काम सांगण्यांत आलें. जॉन फिलिप इतका थकला होता कीं, पाळण्याला झोके देतां देतां त्याला झोप लागली. पाळण्यांतलें मूल रडतच होतें. त्यामुळें चार्लीची बायको वर आली आणि तिनें जॉन फिलिपला धपाटा मारून जागें केलें. सकाळीं जेव्हां जॉन घरीं आला तेव्हां तो फार थकून गेला होता. त्याचे वडील त्याच्याजवळ आले आणि त्यांनीं "कसं काय चाललं आहे तुझं?" असा प्रश्न त्याला विचारला. परंतु या प्रश्नाला उत्तर देण्याच्या आंतच त्याला गाढ झोप लागली. जॉनच्या वडिलांनीं न्याहारी करून जॉनला सबंध दिवस झोपूं दे असें बायकोला सांगितलें. त्या दिवशीं संध्याकाळीं ते फिलिपला म्हणाले,

"मग काय जॉन, तुला बेकरीचं काम पुढें करायचं आहे ना?"

"नाहीं. त्यापेक्षां मरण पत्करीन." कण्हत तो म्हणाला.

"मग बेकरींतलं काम तूं सोडून दे, आणि पुन्हां प्रोफेसर एस्पुटाकडे संगीत शिकायला जा."

यानंतर मात्र जॉन फिलिपचें प्रोफेसर एस्पुटाबरोबर चांगलें पटूं लागलें. तो मनःपूर्वक शिकूं लागला. फिलिपच्या वडिलांनीं त्याला ट्रॉम्बोन शिकवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत त्याची गति दिसेना. शेजाऱ्यांनाहि त्याच्या ट्रॉम्बोनवरील रियाजाचा त्रास होऊं लागला. ज्या बँडच्या पथकांत त्याचे वडील

काम करीत होते त्या पथकांत पुष्कळ वेळां मुलांना सिंबाल्स् किंवा ट्रँगल किंवा सॅक्स हॉर्न वाजवायला घेत असत. त्यामुळें वयाच्या दहाव्या वर्षी बँडमध्यें वादकाचें काम करण्यांत काय मजा असते याचा अनुभव जॉन फिलिपला आला होता.

तेराव्या वर्षी जॉन फिलिपनें वृंदनृत्यसंगीत वाजवणारें आपलें स्वतःचें एक बँडचें पथक स्थापन केलें. त्यानें स्थापन केलेल्या या पथकांत तो स्वतः सोडल्यास बाकीचीं मोठीं माणसें होतीं. फिलिप या पथकांत व्हायोलिन वाजवत असे. नृत्याचा कार्यक्रम असला कीं या बँडला आमंत्रण येई. फिलिपच्या व्हायोलिनवादनानें अनेकांचें लक्ष वेधून घेतलें.

एकदां जॉन फिलिप कंचर्टोचा रियाज करीत बसला असतांना दरवाजावर कोणींतरी थाप मारली. जॉन फिलिपनें दरवाजा उघडला. भेटायला आलेला मनुष्य म्हणाला कीं, तो पांच मिनिटें बाहेर उभा राहून ऐकत होता. कोण वाजवतो आहे हें कळून घेण्याची उत्सुकता वाटल्यामुळें त्यानें दरवाजा ठोठावला होता. फिलिपनें त्या माणसाला आंत बोलावलें. त्या गृहस्थानें फिलिपच्या वादनाची स्तुति केली, आणि त्यानें फिलिपनें सर्कसमध्यें बँडपथकांत वाजवण्याचा कधीं विचार केला आहे किंवा काय असें विचारलें. या दृष्टीनें आपण विचार केलेला नाहीं असें फिलिप म्हणाला. आपण एका सर्कशीच्या बँडपथकाचे प्रमुख आहोंत, ती सर्कस सध्यां वॉशिंग्टनमध्यें आहे, फिलिपची इच्छा असल्यास त्याला या बँडपथकांत प्रवेश मिळूं शकेल असें तो गृहस्थ म्हणाला. जॉन फिलिपला ही कल्पना आवडली. सर्कस या गोष्टीचें कुठल्याहि मुलाला आकर्षण वाटणें स्वाभाविक आहे. सर्कशींत येणें आपल्याला आवडेल, परंतु आपल्या वडिलांना तें पसंत पडणार नाहीं असें जॉन फिलिप त्या गृहस्थाला म्हणाला. वडिलांना न सागतां तूं सर्कसमध्यें ये असें त्यानें सुचवलें. परंतु फिलिपला त्याच्यापेक्षां अधिक समज होती; आणि आपल्या वडिलांवर त्याचें फार प्रेम असल्यानें त्यांच्या परवानगीशिवाय सर्कशींत जाणें त्याला मुळींच रुचलें नसतें. तो गृहस्थ म्हणाला कीं, फिलिपच्या वडिलांना सर्कशींत जाणाऱ्या मुलाला केवढा उज्ज्वल भविष्यकाल आहे याची कल्पनाहि असणें शक्य नाहीं. त्या माणसानें फिलिपला खूप पटवण्याचा प्रयत्न केला. उद्यां आम्ही तंबू हलवणार तेव्हां फिलिपनें आपल्याबरोबर यावें

आणि नंतर पत्रानें वडिलांना आपण कसें सुखांत आहों तें कळवावें असें त्यानें सुचवलें. फिलिपला हें पटलें. ही गोष्ट कुणलाहि सांगू नकोस असें सांगून तो निघून गेला.

फिलिप जसजसा विचार करूं लागला तसतशी सर्कशींत जाण्याची ही कल्पना त्याला अधिकाधिक आकर्षक वाटूं लागली. आपण सर्कशींत जाऊं, खूप पैसे मिळवूं, सर्कशीच्या बँडचे कांहीं वर्षांनीं आपणच प्रमुख होऊं इत्यादि कल्पनाचित्रें तो आपल्या डोळ्यांसमोर रंगवूं लागला. इतकी चांगली बातमी कुणालाहि न सांगतां राहाणें त्याच्या अगदीं जिवावर आलें. एड् नांवाचा त्याचा मित्र शेजारीं राहात असे. एड्ला त्यानें ही गोष्ट सांगितली. एड्नें ती आपल्या आईला सांगितली. एड्च्या आईकडून ती जॉन फिलिपच्या आईपर्यंत पोंचली.

दुसऱ्या दिवशींच्या सकाळची गोष्ट. एका प्रचंड तंबूंतील सर्कसच्या बँडचें आपण नेतृत्व करीत आहोंत असें स्वप्न जॉन फिलिप पडल्या पडल्या डोळ्यांसमोर पहात होता. इतक्यांत वडिलांनीं त्याला हांक मारल्यामुळें तो जागा झाला. त्याचे वडील म्हणाले, "आज तूं कपडे करशील तेव्हां रविवारचे खास कपडे घाल."

"हें कशासाठीं ? आज काय आहे ? जॉन फिलिपला आश्चर्य वाटलें. तो कांहीं रविवार नव्हता. पण जॉन फिलिपनें रविवारचे कपडे घालूनच न्याहारी केली. मग त्याचे वडील म्हणाले, "आतां आपण फिरायला जाऊं."

ती जूनची नऊ तारीख होती. जॉन फिलिपचे वडील त्याला नौदलाच्या बँडपथकांत घालण्यासाठीं घेऊन गेले. इथें एकदां नांव घातल्यानंतर तेरा वर्षांचा आपला मुलगा सर्कशीच्या वेडामुळें इथून पळून जाऊं शकणार नाहीं हें त्याच्या वडिलांना माहीत होतें.

याच काळांत फिलिपनें संगीताचे कांहीं जलसे ऐकले. हा अनुभव तो आयुष्यांत कधीं विसरला नाहीं. थिओडॉर थॉमस या श्रेष्ठ संगीतकारानें व्हायोलिनवर वाजवलेली 'त्राउमॅराय' ही रचना ऐकण्याची संधि त्याला मिळाली. इतकें सुंदर संगीत त्यानें यापूर्वीं कधींहि ऐकलेलें नव्हतें. श्रोत्यांवर मोहिनी घालणारें संगीत आपण स्वतः रचावें ही कल्पना त्याच्या मनांत या वेळीं प्रथम निर्माण झाली.

एकामागून एक वर्षें जात होतीं. वेगवेगळ्या संगीतपथकांतून जॉन फिलिप आतां वाजवूं लागला होता. 'ऑर्केस्ट्रल युनियन' या पथकांत तो 'मुख्य व्हायोलिन' वाजवत असे. याच वेळीं तो पथकाच्या निर्देशकाजवळ व्हायोलिन, पियानो आणि हार्मनी संगीत यांचा अभ्यास करीत होता. संगीतकारांशीं, आणि संगीतप्रेमी रसिकांशीं त्याच्या ओळखी होत होत्या. असाच एक संगीतप्रेमी त्याला एकदां भेटला. तो दर मंगळवारीं आपल्या घरीं संध्याकाळीं चार वादकांचा कार्यक्रम करीत असे. तंतुवादकांच्या या पथकांत येण्याचें आमंत्रण त्यानें जॉन फिलिपला दिलें. युरोपियन संगीतकारांच्या खास मागवलेल्या कलाकृति जॉन फिलिपला प्रथम इथेंच ऐकायला मिळाल्या. या माणसानें जॉन फिलिपनें विनंति केल्यावरून नौदलाच्या सेक्रेटरीशीं बोलणें केलें आणि त्या बँडच्या पथकांतून जॉन फिलिपची सुटका करून घेतली. संगीताचें शिक्षण घेण्यासाठीं जॉन फिलिपनें युरोपला गेलें पाहिजे असें या माणसाचें मत होतें. जॉन फिलिपच्या मनावर तो ही गोष्ट ठसवण्याचा प्रयत्न करूं लागला. कुठल्याहि अमेरिकन माणसाला संगीताचा अभ्यास करावयाचा असल्यास त्यानें जर्मनीला गेलें पाहिजे असें त्या काळीं मानलें जाई.

आपल्या वडिलांची आर्थिक स्थिति बेताचीच असल्यामुळें संगीताचें शिक्षण घेण्यासाठीं युरोपला जाणें आपल्याला झेपणार नाहीं असें जॉन फिलिपनें आपल्या या नव्या मित्राला सांगितलें. आणि तें खरेंच होतें. कारण दहा मुलांचा संसार अँटोनिओ साउसाला करायचा होता. मग त्या माणसानें असें सुचवलें कीं, त्याच्या ओळखीचा एक श्रीमंत मनुष्य आहे; संगीताचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना तो मदत करतो; तेव्हां जॉन फिलिपनें त्याच्याकडे जाऊन मदत मागावी; परंतु जॉन फिलिपला हें रुचेना. कुणाच्याहि उपकारांचें ओझें डोक्यावर वागवावें असें त्याला वाटत नव्हतें. अशा तऱ्हेनें मदतीची याचना करण्यानें जॉन फिलिपचा स्वाभिमान दुखावला गेला असता. संगीताचें शिक्षण घेण्याकरितां अमेरिकेंतच राहायचें असें त्यानें ठरवलें. मोठेपणीं जॉन फिलिप म्हणे कीं, आपण संगीताच्या शिक्षणासाठीं अमेरिका सोडून बाहेर गेलों नाहीं याबद्दल आपल्याला कधींच वाईट वाटलें नाहीं. उलट, खराखुरा अमेरिकन संगीतकार असें यामुळें आपण स्वतःला अभिमानानें म्हणवून घेऊं शकलों.

जॉन फिलिपकडे आतां विद्यार्थी येऊं लागले होते. तो आतां स्वतःच्या संगीतरचना करूं लागला होता. त्यानें वॉल्ज संगीताच्या केलेल्या कांहीं रचना एका माणसाला त्याच्या नांवानें प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली. हा मनुष्य संगीतकार नव्हता. परंतु तो प्रेमांत पडला होता. आपल्या नांवानें जर या रचना प्रसिद्ध झाल्या तर ती मुलगी खूष होईल असें त्याला वाटत होतें. यानंतर जॉन फिलिपनें दोन संचलनें (Marches) लिहिलीं. हीं संचलनें त्यानें प्रकाशकाला प्रत्येक संचालनाच्या शंभर प्रती एवढ्या मोबदल्यांतच विकलीं.

आपला संगीताचा व्यासंग घरचें वातावरण तेवढें पोषक नसल्यामुळें व्हायला पाहिजे तेवढा होत नाहीं असें आतां जॉन फिलिपला वाटूं लागलें होतें. जॉन फिलिपच्या आईला संगीताचा कान नव्हता. त्याचे वडील ट्राम्बोन वाजवीत, परंतु संगीताचें तंत्रशुद्ध ज्ञान त्यांना नव्हतें. प्रोफेसर एस्पुटा फारच कडक होता. मुलींच्या बाबतींत तेवढा तो मऊ असे. हें वातावरण सोडून बाहेर एखादी संधि मिळाली तर घ्यावी असें जॉनला तीव्रतेनें वाटूं लागलें याचें कारण त्याला उत्तेजनाची आवश्यकता होती हेंच होय.

अशी संधि मिळतांच तिच्यावर झडप घालण्याचें त्यानें ठरवलें होतें. एकदां एका थिएटरमधला वृंदवादकांचा निर्देशक कांहीं कारणामुळें हजर राहूं शकला नाहीं. जॉन फिलिपला थिएटरच्या चालकांनीं बोलावणें पाठवलें. जॉन फिलिप अशा या संधीची वाट बघतच होता. नोटेशनचा तक्ता त्याला वाचतां येत असे. एक तालीम घेण्यापुरताच अवधि होता. आणि तरीहि जॉन फिलिपनें हा कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पाडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्याची इतकी तीव्र इच्छा त्याच्या मनांत होती कीं, कार्यक्रमापूर्वी तीन तास आधीं तो आला होता. एकदां या थिएटरचा संगीतनिर्देशक आजारी पडला. या बाबतींत जॉन फिलिपवर अवलंबून राहतां येईल ही जाणीव असल्यामुळें थिएटरच्या चालकांनीं त्याला बोलावणें पाठवलें. यानंतर एका फिरत्या वृंदवादक संघानें आपला निर्देशक म्हणून जॉन फिलिपला बोलावलें. ही त्याला आलेली पहिली मागणी असें म्हणतां येईल.

जॉन फिलिप पंचविशीच्या जवळ होता त्या काळांत गिल्बर्ट आणि सालिव्हन यांनीं लिहिलेला एच. एम. एस. पिनॅफोर हा 'लाइट ऑपेरा' अमेरिकेंत विलक्षण लोकप्रिय झालेला होता. त्या काळांत आंतरराष्ट्रीय कॉपीराइटचा

कायदा नसल्यानें गिल्बर्ट आणि सालिव्हन या लेखकांना एक दिडकीहि न देतां डझनावारी कंपन्या या ऑपेराचा कार्यक्रम करीत असत. उच्च वर्गांतल्या कांहीं मुलींना या रचनेची तालीम करायची होती. ही तालीम जॉन फिलिप करून घेईल किंवा काय असें विचारण्यांत आलें. इथें पैसे चांगले मिळणार होते, आणि बरेच दिवसहि काम चालणार होतें. जॉन फिलिपनें आनंदानें होकार दिला. दुसरे दिवशीं संध्याकाळीं तो तालीम घेण्यासाठीं गेला तेव्हां "पूर्वी कधीं पाहिले नव्हते इतके सुंदर चेहरे आणि आवाज" त्याला इथें आढळले. या तालमी-विषयींची आठवण सांगतांना तो म्हणे, "मी त्या वेळीं तरुण असल्यामुळें तालमीच्या बाबतींत अत्यंत कडक होतों. ज्यांना शिकण्याची आस्था असते अशीं गुणी माणसें कितीहि कडक तालीम असली तरी कुरकुर करीत नाहींत. ज्यांच्या डोक्यांत निष्कारण वारें शिरलेलें असतें अशीं मूर्ख माणसेंच तालमींना कंटाळतात, सुधारणा करण्याच्या दृष्टीनें शिक्षकाचा कडकपणा त्यांना आवडत नाहीं. आम्हीं अशा कसून तालमी केल्यानंतर जेव्हां या पथकानें 'पिनॅफोर'चा प्रत्यक्ष प्रयोग केला तेव्हां त्याचा सर्वत्र बोलबाला झाला. एका प्रयोगाला गिल्बर्ट आणि सालिव्हन हे लेखकच हजर होते. सालिव्हननें स्तुति केली तेव्हां जॉन फिलिपला अतिशय समाधान वाटलें.

२२ फेब्रुवारी या दिवशीं जॉन फिलिप तालीम घेत असलेल्या या पथकांतल्या एका सुंदर मुलीनें तिच्या बदली आयत्या वेळीं गाण्यासाठीं तयार केलेल्या जेनी बेलिस या मुलीची त्याच्याशीं ओळख करून दिली. ही मुलगी फिलाडेल्फियाची होती. तिला पाहतांच तिच्या सौंदर्याचा ठसा जॉन फिलिपच्या मनावर उमटला. तिचें बोलणें, चालणें, वागणें, आवाज, तिचा चेहरा या सगळ्यांनीं तो अगदीं भारला गेला. आपण वॉशिंग्टनचा आणि आपला स्वतःचा असे दोघांचेच वाढदिवस साजरे करतें असें ती त्याला म्हणाली. त्या वेळीं जेनीचें वय सोळा होतें. तिला सतरावें वर्ष लागण्यापूर्वी जॉन फिलिपनें तिच्याशीं लग्न केलें.

नौदलाच्या बँडपथकांत पूर्वी त्याच्या वडिलांनीं त्याला शिकण्यासाठीं घातलें होतें. जॉन फिलिप आतां या बँडपथकाचा प्रमुख झाला होता. सर्कशींत पळून जाण्याच्या आपल्या विचारापासून आपल्या वडिलांनीं आपल्याला परावृत्त केलें याबद्दल या क्षणीं जॉन फिलिपला विलक्षण कृतज्ञता वाटली असली पाहिजे.

नौदलाच्या बँडचा प्रमुख म्हणून आतां आपण कांहीं सुधारणा केल्या पाहिजेत असें जॉन फिलिपला वाटूं लागलें होतें. चांगल्या बँडपथकाजवळ देशोदेशींच्या श्रेष्ठ कलावंतांनीं रचलेल्या संगीताचीं पुस्तकें असणें आवश्यक असतें. अशी संगीताची चांगली लायब्ररी नौदलाच्या बँडपाशीं नव्हती. जीं कांहीं चार पुस्तकें होतीं तीं अगदींच जुनाट होतीं. जॉन फिलिपनें मरीन बँडच्या संगीताची लायब्ररी अद्ययावत् करण्याचा प्रयत्न केला, आणि आपल्या बँडच्या कसून तालमी घेतल्या.

नौदलाचें बँडपथक हें सरकारी बँडपथक. 'व्हाइट हाउसमध्यें' कसलाहि महत्त्वाचा समारंभ असला कीं तिथें या बँडपथकाचीच हजेरी असते. जेव्हां इतर राष्ट्रांचे वकील व्हाइट हाउसमधल्या समारंभाला हजर असतात तेव्हां त्यांचें स्वागत विशेष नजाकतीनें करणें आवश्यक असतें. अशा वेळीं वेगवेगळ्या देशांचीं राष्ट्रगीतें वाजवण्याच्या तयारींत या बँडपथकाला राहावें लागतें. जॉन फिलिप या दृष्टीनें नेहमीं तयारींत असे. आपल्या पथकाच्या लायब्ररींत त्यानें देशोदेशींचीं राष्ट्रगीतें जमवून ठेवलीं होतीं. मोठमोठ्या देशांची तर सोडाच, पण सामोआ, लॅपलँड, ॲबिसिनिआ यांचींहि राष्ट्रगीतें त्यानें जमवलीं होतीं. अमेरिकेंतल्या रेड इंडियनांचीं गीतेंहि त्याच्या संग्रहांत होतीं. रेड इंडियनांचीं हीं गीतें बँडवर वाजवतां यावींत या दृष्टीनें जॉन फिलिपनें हार्मनींत बसवलीं होतीं. हार्मनींत बसवलेलीं आपलीं गीतें खुद्द रेड इंडियनांनाहि ओळखतां आलीं नसतीं. परंतु जॉन फिलिपनें तीं मिळवण्यासाठीं खूप धडपड केली होती. मानववंशशास्त्रज्ञांना आणि रेड इंडियनांच्या प्रदेशांतून ज्यांनीं प्रवास केला होता, जे राहिले होते अशा लोकांना जॉन फिलिप या संग्रहासाठीं जाऊन भेटला होता.

व्हाइट हाउसमध्यें अमेरिकेच्या अध्यक्षांचें स्वागत करण्यासाठीं मंत्री व परराष्ट्रीय वकील, वरिष्ठ सैन्याधिकारी जमले कीं अध्यक्षांचें आगमन होतांच 'हेल टु द चीफ' हें गीत वाजवण्याची अनेक वर्षांपासूनची परंपरा होती. अशाच एका समारंभाच्या वेळीं प्रेसिडेंट आर्थर हे पाहुण्यांपासून जरा दूर होऊन जॉन फिलिपपाशीं आले. त्यांनीं जॉन फिलिपला विचारलें, "आम्ही जेवणासाठीं आंत गेलों तेव्हां तूं कोणतें गीत वाजवलेंस ?"

"हेल टु द चीफ हें गीत आम्हीं वाजवलें."

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................

"हें गीत प्रसंगाला साजेसें आहे असें तुला वाटतें ?"

"नाहीं. या गीतांतल्या अर्थापेक्षां त्यांतल्या पहिल्या ओळीमुळेंच हें गीत पूर्वीं निवडलें गेलें असावें. खरें म्हणजे तें आहे नाविकगीत. समारंभाच्या किंवा कवायतीच्या वेळीं 'मार्च' संगीत म्हणून वाजवण्यासाठीं तें तेवढें साजेसें नाहीं."

"मग तें बदला." अध्यक्षांनीं आज्ञा केली.

यानंतर व्हाइट हाउसमध्यें आंत होणाऱ्या समारंभासाठीं 'प्रेसिडेन्शियल पोलोनेज' आणि बाहेर होणाऱ्या कार्यक्रमांसाठीं 'सेंपर फिडलिस मार्च' या दोन रचना जॉन फिलिपनें केल्या.

वॉशिंग्टन पोस्ट या अमेरिकेंतल्या विख्यात नियतकालिकानें एकदां विद्यार्थ्यांच्या निबंधांची स्पर्धा जाहीर केली होती. जून महिन्यांत या स्पर्धेचा बक्षीससमारंभ प्रचंड प्रमाणांत साजरा होणार होता. या समारंभाच्या वेळीं नौदल बँडपथक जॉन फिलिपच्या नेतृत्वाखालीं हजर राहाणार होतें. जॉन फिलिपनें या समारंभासाठीं खास नवा असा एक 'मार्च' लिहावा अशी चालकांतर्फे त्याला विनंति करण्यांत आली. या प्रसंगासाठीं जॉन फिलिपनें 'वॉशिंग्टन पोस्ट मार्च' ही रचना केली आणि वाजवली. त्यानें लिहिलेलें हें संचलन सर्व जगभर लोकप्रिय झालें. बक्षीससमारंभाच्या वेळीं हजारों मुलें जमलीं होतीं. संगीत जवळून ऐकूं यावें म्हणून मुलींनीं आजूबाजूच्या झाडांवरहि गर्दी केली होती. 'वॉशिंग्टन पोस्ट मार्च'चे सूर हवेंत घुमले आणि त्या तालावर हायस्कूल कॅडेट्स् संचलन करीत पुढें आले. जमलेल्या हजारों मुलांनीं त्यांचें एका आवाजांत स्वागत केलें. वॉशिंग्टन येथील मुलांच्या जीवनांतला तो अविस्मरणीय दिवस होता. यानंतर जॉन फिलिपनें 'स्कूल कॅडेट्स् मार्च' लिहिला.

'वॉशिंग्टन पोस्ट मार्च' किती लोकप्रिय झाला होता याविषयींची एक आठवण सैन्यांत मेजरच्या हुद्द्यावर असलेल्या एका अधिकाऱ्यानें सांगितली होती. हा अधिकारी एकदां बोर्निओच्या जंगलांतून जात होता. रानांत त्याला अचानक व्हायोलिनचे सूर ऐकूं आले. व्हायोलिनवर कोणीतरी 'वॉशिंग्टन पोस्ट मार्च' वाजवीत होतें. त्या स्वरांच्या दिशेनें तो अधिकारी निघाला. थोड्या वेळानें या 'मार्चचें' स्वरलेखन असलेला छापील कागद झाडाला लावून त्याच्यासमोर तिथलाच एक मुलगा ही रचना वाजवीत बसल्याचें त्याला दिसलें.

वॉशिंग्टन पोस्ट मार्चच्या स्वरांकडे नृत्यविशारदांचें लक्ष गेलें. या स्वरांबरोबर नाचण्यासाठीं त्यांनीं एक नवें नृत्य बसवलें. प्रथम या नृत्याला 'टू स्टेप' किंवा द्विपद नृत्य असें म्हणत. परंतु नंतर जॉन फिलिप युरोपमध्यें गेला तेव्हां इंग्लंड आणि जर्मनी इथें हें नृत्य 'वॉशिंग्टन पोस्ट' या नांवानेंच ओळखलें जात असल्याचें त्याला आढळलें.

जॉन फिलिपनें नौदल बँडपथकाच्या आतां कसून तालमी घेतल्या होत्या. लायब्ररींत संगीताचाहि अद्ययावत् संग्रह केला होता. आतां आपलें पथक फिरतीवर न्यावें आणि वॉशिंग्टनबाहेरील लोकांना तें ऐकवावें असें त्याला वाटूं लागलें. फायेट व्हिल या नॉर्थ कॅरोलिनांतील शहरांत तथाकथित 'मेक्लेनबर्गचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा' साजरा करण्यासाठीं एक समारंभ व्हायचा होता. अमेरिकेचे अध्यक्ष भाषण करण्यासाठीं जाणार होते. परंतु कांहीं अडचणीमुळें ते जाऊं शकले नाहींत. तेव्हां या समारंभांत भाग घेण्यासाठीं नौदल बँडपथक पाठवण्यांत आलें. समारंभाच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षानें जॉन फिलिपशीं या प्रसंगीं कोणकोणतें संगीत वाजवायचें याची चर्चा केली.

"आम्ही प्रथम 'स्टार स्पँगल्ड बॅनर' या गीतानें सुरवात करूं." जॉन फिलिप म्हणाला.

"बरोबर आहे." त्याला अध्यक्षानें मान्यता दिली.

"यानंतर आम्ही मेयर बिअर यानें लिहिलेला धी प्रॉफेट या ऑपेरांतील कॉरोनेशन मार्च हा 'मार्च' वाजवूं. यानंतर विल्यम टेल, ऑन धी ब्लू डॅन्यूब यांच्या सुरवातीचा भाग वाजवूं. नंतर 'आयडा' मधले कांहीं बंध वाजवूं. आणि यानंतर माय कंट्री इट् इज् ऑफ दी हें गीत वाजवूं."

"छान योजना आहे. परंतु मला आणखी एक गोष्ट सुचवली पाहिजे. इथें एक गीत लहान मुलाला आईचें दूध आवडतें तसें इथल्या जनतेला आवडतें. तुमच्या बँडच्या पथकाला तें वाजवतां येतें किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. परंतु हें गीत ऐकायला आम्हांला फार आवडेल." तो अध्यक्ष म्हणाला. दक्षिण अमेरिकेंतली आपली आवड त्यानें अचूक सांगितली होती.

"कुठलें गीत?" थंड स्वरांत जॉन फिलिपनें विचारलें.

"डिक्सी"

"डिक्सीचे सूर मला माहीत आहेत. हें गीत वाजवतां येईल किंवा नाहीं

याचा आम्ही विचार करूं. कारण असं पहा कीं, आमचं पथक हें कलावंतांचं पथक आहे. आम्ही आमच्या प्रत्येक कार्यक्रमाची योजना अत्यंत काळजीपूर्वक आंखत असतों." जॉन फिलिप म्हणाला.

"होय, होय. तें खरें आहे. पण तुम्ही जर हें गीत वाजवूं शकलांत तर इथली जनता अगदीं खूष होईल. गुलामीविरोधी युद्धांत दक्षिणेनें पराभव पत्करल्यानंतरच्या काळांत कित्येकांनीं हे सूर अजून ऐकलेले नाहींत."

जॉन फिलिपला ही संधि हवीच होती. कुठलाहि संगीतकार आपल्या संग्रहांत डिक्सीचा अंतर्भाव केल्याखेरीज दक्षिणेकडे जाणार नाहीं याची त्याला जाणीव होती.

समारंभासाठीं डोंगरांतून, शेतांतून, शेंकडों माणसें आलीं होतीं. शहरांत एकच गर्दी उडाली होती. समारंभाला सुरवात झाली. प्रथम गव्हर्नरनें भाषण केलें. त्यानंतर जॉन फिलिपच्या बँडनें राष्ट्रगीत वाजवलें. समोर जमलेल्या गर्दीनें तें शांतपणें ऐकलें. यानंतर कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षानें "राज्याचा आदर्श" असलेल्या सिनेटची ओळख करून दिली. ओळख करून दिल्यावर तो खालीं बसला. आतां सिनेटर भाषण करायला उभा राहणार इतक्यांत जॉन फिलिपनें खूण केली आणि त्याच्या पथकानें त्या क्षणीं डिक्सीचे सूर वाजवायला सुरवात केली. विजेचा धक्का बसावा तसें क्षणभर झालें. या टोकापासून त्या टोकापर्यंत माणसें थरारून गेल्याचा आवाज उमटला. लोकांनीं आनंदानें हॅट्स् उडवल्या. म्हाताऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. बायकांनीं एकमेकांना मिठ्या मारल्या. पंधरा मिनिटें या प्रचंड आवेगामुळें समारंभ थांबवून धरावा लागला.

संगीताचा माणसांच्या हृदयाशीं किती जिव्हाळ्याचा संबंध असतो नाहीं! त्या आठवड्यांत या बँडच्या कार्यक्रमांत डिक्सीला सारखा वन्समोअर मिळाला.

गंमत अशी कीं, डिक्सीचें लेखन डॅन एमेट या उत्तर अमेरिकेंतल्या माणसानें केलें होतें. गुलामीविरुद्ध युद्ध चालू असतांना न्यू यॉर्कमध्यें एका मिन्स्टेल कार्यक्रमांत प्रथम हें गीत गायिलें गेलें होतें.

मरीन बँडचा प्रमुख झाल्यानंतर पांच राष्ट्राध्यक्षांच्या कारकीर्दींत जॉन फिलिपनें बारा वर्षें काम केलें; आणि त्यानंतर आपल्याला निवृत्त करावें अशी त्यानें विनंति केली. स्वतःचें एक बँडचें पथक स्थापन करण्याची त्याची

इच्छा होती. लौकरच त्यानें आपलें पथक स्थापन केलें आणि शिकागो येथें भरलेल्या जागतिक जत्रेंत त्याचा पहिला कार्यक्रमहि झाला. शिकागोला त्याचा खूप मोठा सन्मान झाला. त्याच्या मनांतली अनेक दिवसांची एक इच्छा इथें पूर्ण झाली. हा अनुभव तो कधींहि विसरला नाहीं. थिओडॉर थॉमस याच्या नेतृत्वाखालीं शिकागोला ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम झाला. या ऑर्केस्ट्राच्या बरोबरीनें जॉन फिलिपच्या बँडपथकाला वाजवण्याची संधि मिळाली. अनेक वर्षांपूर्वी थिओडॉर थॉमसनें व्हायोलिनवर वाजवलेली ट्रॉमेरी ऐकून जॉन फिलिपला स्वतंत्र स्वररचना करण्याची स्फूर्ति झाली होती. जॉन नोवेल्स पेन या प्रसिद्ध अमेरिकन संगीतकारानें लिहिलेल्या 'कोलंबस' या रचनेवर जॉन फिलिपच्या पथकानें बँड बसवलें होतें. जॉन फिलिप कसून तालमी घेत होता. त्यानें घेतलेल्या या तालमींबद्दल, कष्टांबद्दल थिओडॉर थॉमसनें त्याची स्तुति केली तेव्हां त्याला धन्य वाटलें.

एके दिवशीं थिओडॉर थॉमस आणि जॉन फिलिप दुपारच्या जेवणासाठीं एका हॉटेलांत गेले. संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत ते दोघे तिथें गप्पा मारीत बसले होते. त्या दोघांच्या मनांत एकमेकांविषयीं स्नेहभाव निर्माण झाला होता. ही आठवण काढून जॉन फिलिप साउसा म्हणत असे, "तो माझ्या आयुष्यांतला अत्यंत सुखाचा असा दिवस होता. थिओडॉर थॉमस हा जगांतल्या श्रेष्ठ संगीतनिर्देशकांपैकीं एक होता." हॉटेलांत गप्पा मारतांना जॉन फिलिप थॉमसला म्हणाला कीं, थॉमसनें वाजवलेली ट्रॉमेरी आपल्याला व्हायोलिनवर वाजवतां यावी हें आपलें एक स्वप्न होतें. त्याचे हे शब्द ऐकतांच उत्कंठित नेत्रांनीं त्याच्याकडे पहात आठवणीच्या सुरांत थॉमस म्हणाला, "हां, ती एक हळुवार गत होती."

'द ग्लॅडिएटर मार्च' हा जॉन फिलिपचा लोकप्रिय झालेला पहिला 'मार्च.' ही रचना लिहून झाल्यानंतर त्यानें ती एका प्रकाशकाला पन्नास डॉलर्सना विकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्रकाशकानें ती नाकारली. त्यानंतर त्यानें दुसऱ्या एका प्रकाशकाला ती पस्तीस डॉलर्सना विकली. याच प्रकाशकानें जॉन फिलिपची 'सेंपर फिडेलिस,' 'हायस्कूल कॅडेट्स्', हे दोन 'मार्च' या किंमतीलाच विकत घेतले होते. या प्रकाशकाला 'ग्लॅडिएटर मार्च'वर प्रचंड फायदा झाला. त्यानें या फायद्यावर वाद्यांचे दोन कारखाने विकत घेतले. या

प्रसंगीं स्टिफन फॉस्टरची आठवण होते. फॉस्टरच्या ओल्ड अंकल नेड, आणि ओह् ! सुसाना या दोन गीतांवर त्याच्या प्रकाशकानें दहा हजार डॉलर्स फायदा मिळवला होता, प्रकाशनगृह काढलें होतें आणि याबद्दल फॉस्टरला मिळाल्या होत्या फक्त कांहीं विनामूल्य प्रती ! या व्यवहारापासून जॉन फिलिपनें धडा घेतला. यानंतर त्यानें आपली कुठलीहि रचना सर्व हक्कांसकट विकली नाहीं. त्याच्या 'लिबर्टी बेल मार्च' या रचनेचें त्याला पस्तीस हजार डॉलर्स मानधन मिळालें.

जॉन फिलिप साउसाला दीर्घायुष्य लाभलें होतें. त्यानें खूप काम केलें. शंभरांहून अधिक मार्च त्यानें लिहिले. यांखेरीज वॉल्ज, फँटेशिया, ऑपेरा इत्यादि प्रकारहि त्यानें लिहिले. त्यानें आपलें आत्मचरित्र लिहून काढलें आणि लहान मुलांसाठीं पाइप–टाउन सँडी ही गोष्टहि लिहिली. परंतु जॉन फिलिप साउसाचें नांव राहिलें आहे तें त्याच्या 'मार्च'साठीं. कुठल्याहि प्रसंगासाठीं तो मार्च लिहूं शकत असे. आपल्या बँडचें पथक घेऊन तो अनेक वेळां सर्व अमेरिकाभर फिरून आला. यामुळें त्याला प्रचंड लोकप्रियता लाभली. जॉन फिलिप आपलें पथक घेऊन जेव्हां एखाद्या शहरांत जाई तेव्हां तिथल्या लोकांच्या दृष्टीनें ती एक 'घटना' असे. कांहीं वेळां त्या शहराचा मेयर जॉन फिलिपच्या आगमनाप्रीत्यर्थ सुट्टी जाहीर करीत असे. शहरांत त्याचें स्वागत करण्यासाठीं पताका लावल्या जात. आपलें पथक घेऊन जॉन फिलिप अनेकदां युरोपचाहि प्रवास करून आला; आणि एकदां त्यानें आपल्या पथकाबरोबर जगप्रवासहि केला.

जॉन फिलिप पहिल्यांदा इंग्लंडला गेला तेव्हां सहाव्या जॉर्जचा आजोबा सातवा एडवर्ड याच्यासमोर त्याचा कार्यक्रम ठेवण्यांत आला. त्या दिवशीं राणीचा वाढदिवस होता. या वाढदिवसाच्या दिवशीं राणीला चकित करून टाकण्यासाठीं राजानें मुद्दाम जॉन फिलिपच्या पथकाचा हा कार्यक्रम योजला होता. राजाच्या घराच्या दिशेनें जाईपर्यंत आपल्याला कशासाठीं तिथें नेलें जात आहे याची खुद्द जॉन फिलिपलाहि कल्पना नव्हती. त्या संध्याकाळीं जॉन फिलिपच्या बँडपथकानें संगीताचे वेगवेगळे प्रकार वाजवून दाखवले. त्याला राजाकडून सात वेळां वन्समोअर मिळाला. कार्यक्रम संपल्यानंतर राजानें त्याला व्हिक्टोरिया पदक बहाल केलें. इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या

एका भडक मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या नियतकालिकानें जॉन फिलिपची स्तुति करणारा एक लेख प्रसिद्ध केला. या लेखांत जोहान स्ट्रॉसला ज्याप्रमाणें वॉल्जचा सम्राट म्हणून ओळखलें जातें त्याप्रमाणें जॉन फिलिपला 'मार्च'चा सम्राट म्हणून ओळखलें जावें असें म्हटलें होतें. इंग्लंडहून परत येतांना बोटींत जॉन फिलिप डेकवर येरझाऱ्या घालीत होता. येरझाऱ्या घालतां घालतां अचानक त्याच्या मनांत एक स्वरबंध नाचूं लागला. तो स्वरबंध त्याचा पिच्छा सोडीना. घरीं आल्यावर त्यानें तो लिहून काढला. मनांत सूर नाचतांना त्यानें जसें ऐकलें होतें त्याच्यांत प्रत्यक्ष लिहितांना त्यानें जराहि फरक केला नाहीं. त्यानें लिहिलेल्या सर्व रचनेंत ही रचना अत्यंत लोकप्रिय झाली. ही रचना म्हणजे 'द स्टार्स अँड स्ट्राइप्स फॉरएव्हर' हा मार्च होय. या त्याच्या रचनेला राष्ट्रीय मार्चची पदवी प्राप्त झाली.

इंग्लिश श्रोत्यांविषयीं जॉन फिलिप साउसाला विलक्षण आदर वाटत असे. तो म्हणे, "जगांतले उत्कृष्ट श्रोते असें मी इंग्रजांचें वर्णन करीन. अमेरिकेंतल्या कांहीं मोठ्या शहरांतून इंग्रजांच्या तोडीचे श्रोते मिळतील. परंतु त्यांच्याहून वरच्या दर्जाची रसिकता कुठें आढळेल असें वाटत नाहीं. जाणकार, सुशिक्षित इंग्रज रसिकांच्या जगांत संगीतकार म्हणून नांव करण्यासारखें सुख नाहीं. इंग्लंडमधले श्रोते विलक्षण समजूतदार आणि उत्साही असतात. इंग्रज मनुष्य कुठल्याहि संगीतकृतीचें मूल्यमापन कलाबाह्य साधनानें करीत नाहीं."

एकदां लेडीज होम जर्नलचा संपादक एडवर्ड बॉक जॉन फिलिपकडे आला आणि म्हणाला, "एस. एफ. स्मिथचें 'माय कंट्री इट इज ऑफ दी' हें गीत गॉड सेव्ह धी किंग या चालीवर वाजवलें जातें. या गीतासाठीं तूं नवी स्वररचना कर." या कामासाठीं एडवर्ड बॉकनें जॉन फिलिपला पांचशें डॉलर्स मानधन देऊं केलें होतें. परंतु साउसानें हें नाकारलें. एखाद्या गीताचे विशिष्ट स्वर जर वर्षानुवर्षें समाजाच्या मनांत रुळले असतील तर त्यांची जागा दुसऱ्या कुठल्याहि स्वररचनेला घेतां येणार नाहीं असें त्याला वाटे.

दुसऱ्या वेळीं साउसा आपलें पथक घेऊन इंग्लंडला गेला तेव्हांहि त्याचा राजासमोर कार्यक्रम झाला. या वेळीं अभिवादनाची भावना व्यक्त करणारा 'इंपीरियल एडवर्ड' नांवाचा नवा 'मार्च' जॉन फिलिपनें खास राजासाठीं लिहिला होता. विंडसर कॅसल येथें राजासमोर जॉन फिलिपच्या पथकाचा

कार्यक्रम झाला. राजवाड्यांतलीं मुलें जॉन फिलिप येणार असें कळतांच खूष झालीं होतीं. त्यांनीं जॉन फिलिपच्या बँडच्या ध्वनिमुद्रिका गोळा करून स्वतःच एक जलसा केला होता. त्या दिवशीं संध्याकाळीं राजासमोर झालेल्या कार्यक्रमांत मुलांना हजर राहण्याची परवानगी मिळाली नव्हती. इंग्लंडचा राजा सहावा जॉर्ज हा या मुलांपैकीं एक होता.

या कार्यक्रमाचे वेळीं शेवटीं अमेरिकन राष्ट्रगीत ऐकण्याची राजाची इच्छा आहे असें जॉन फिलिपला सांगण्यांत आलें होतें. जॉन फिलिपनें आपल्या सहकाऱ्यांना सूचना देऊन ठेवली होती कीं, अमेरिकन राष्ट्रगीत वाजवून संपतांच त्यांनीं ताबडतोब हलक्या स्वरांत गॉड सेव्ह दि किंग हें गीत वाजवायला सुरवात करायची आणि हळूहळू सूर उंचावत नेत या गीताचा शेवट करायचा. ठरल्याप्रमाणें कार्यक्रमाच्या शेवटीं जॉन फिलिपच्या पथकानें 'स्टार स्पँगल्ड बॅनर' वाजवायला सुरवात केली. राजा उठून उभा राहिला. इतर श्रोतेहि उभे राहिले. हें गीत संपतांच क्षणाचाहि विलंब न लावतां गॉड सेव्ह दि किंगचे सूर हलकेच उमटले. जॉन फिलिप राजासमोर उभा होता. गॉड सेव्ह दि किंगचे सूर ऐकतांच राजाचा चेहरा बदललेला जॉन फिलिपला जाणवला. जसजसा स्वरांचा विस्तार होऊं लागला तसतसा राजाचा चेहरा जणूं कांहीं म्हणूं लागला, "हे परक्या राष्ट्रांतले लोक असूनसुद्धां ईश्वरानें माझें आणि माझ्या राष्ट्राचें संरक्षण करावें अशी प्रार्थना करीत आहेत." जॉन फिलिपला त्या क्षणीं धन्य वाटलें. पांच अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या कारकीर्दींत त्यानें बँडचा प्रमुख म्हणून काम केलें होतें. मोठ्या पदावर मनुष्य काम करूं लागला कीं त्या पदाच्या जबाबदाऱ्या सामान्यत्वाच्या मर्यादा ओलांडून माणसाला वर उचलतात असें त्याला वाटलें.

इंग्लंडमधल्या अशाच एका कार्यक्रमाच्या वेळीं जॉन फिलिपच्या पथकाचें कौशल्य कसोटीला लागलें. काउंटेस ऑफ वॉरविक हिनें वॉरविक कॅसलवर येऊन जॉन फिलिपच्या पथकानें कार्यक्रम करावा अशी विनंति केली. त्या दिवशीं इतर कार्यक्रम घेतल्यामुळें जॉन फिलिपला मुळींच वेळ नव्हता. तेव्हां काउंटेस ऑफ वॉरविकनें मध्यरात्रीं जॉन फिलिपच्या पथकानें कार्यक्रम करावा असें सुचविलें. त्या रात्रीं वादळ झालें. आपलीं वाद्यें घेऊन जॉन फिलिपचें पथक वॉरविक कॅसलवर आलें. त्यांपैकीं ज्या मोटारींत संगीताचीं पुस्तकें होतीं

ती मोटार दुर्दैवानें एका टेकडीवरून खालीं पडली. त्यामुळें प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळीं स्वररचना छापलेलें एकहि पुस्तक जॉन फिलिपला मिळूं शकलें नाहीं. या कार्यक्रमाचें सर्व वादन जॉन फिलिपच्या पथकानें स्मरणानेंच केलें.

जॉन फिलिपला अनेकांनीं पाहिलेला होता. हा प्रसिद्ध कलावंत एकदां चेक वटवण्यासाठीं बँकेंत गेला. बँकेंतला कॅशियर म्हणाला कीं, तुझी ओळख देणारा कुणीतरी मनुष्य तूं हजर करीपर्यंत चेक वटणार नाहीं. कॅशियरनें जॉन फिलिपला ओळखलें नव्हतें हें अगदीं उघड होतें. शेवटीं जॉन फिलिपनें शीळ घालून 'द स्टार्स अँड स्ट्राइप्स फॉरएव्हर' वाजवायला सुरवात केली आणि बँडचें निर्देशन केल्यासारखे हातवारे तो करूं लागला. त्यानें तसें करतांच बँकेंतल्या सर्व कारकुनांनीं मोठ्यानें हंसून टाळ्या वाजवायला सुरवात केली. एकानें कॅशियरच्या कानांत चेक वटवायला आलेला मनुष्य कोण आहे तें सांगितलें. जॉन फिलिपला चेकचे पैसे मिळाले.

जॉन फिलिपला शिकारीचा नाद होता. लहान असतांना तो आपल्या वडिलांबरोबर शिकारीला जात असे. जिवंत कबुतरांपेक्षांसुद्धां मातीच्या कबुतरांवर नेम मारणें त्याला आवडे. नेमबाजींत तो अत्यंत प्रवीण होता. जॉन फिलिपला घोड्यावर बसण्याचाहि शोक होता. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं घोड्यावरून तो हजार मैलांच्या प्रवासाला निघाला होता. घरींहि त्यानें घोडे बाळगले होते.

वयाच्या बासष्टाव्या वर्षीं त्याचा संगीतकार मित्र जॉन ॲल्डन कार्पेंटर याचा त्याला एकदां निरोप आला कीं, नौदलाच्या बँडला तुझ्या मदतीची आवश्यकता आहे. जॉन फिलिपनें मदत करण्याचें कबूल केलें. परिणामीं संगीतविभागाचा प्रमुख म्हणून जॉन फिलिप लेफ्टनंटच्या हुद्द्यावर आरमारांत रुजू झाला. तीनशें पन्नास वादकांचें एक पथक त्यानें संघटित केलें. नौदलाच्या प्रत्येक रेजिमेंटसाठीं यानंतर त्यानें बँडचीं पथकें संघटित केलीं. यामुळें कुठल्याहि केंद्रावर किंवा जहाजावर जॉन फिलिप हवें तेव्हां बँडचें पथक पाठवूं शकत असे. युद्धकालांत रेड क्रॉस आणि लिबर्टी लोन फंडासाठीं जॉन फिलिपच्या पथकानें लक्षावधि डॉलर्स गोळा केले.

तरुणपणीं नौदल बँडचा प्रमुख म्हणून काम करीत असतांना जॉन फिलिपनें मोठी दाढी ठेवली होती. दाढी ठेवल्यामुळें आपण एखाद्या परदेशी

इसमासारखे दिसतों असें त्याला वाटत असे. यामागें एक कारण होतें. कारण असें कीं, त्या काळीं अमेरिकन संगीतकारांना समाजांत विशेष मान्यता नसे. संगीतकार जर परदेशचा असला तरच तो चांगला अशी समजूत होती. दाढी वाढवून आपण परदेशी आहोंत असें भासवण्याचा जॉन फिलिपनें कां प्रयत्न केला हें कळण्यासारखें आहे. दाढीमुळें आपल्याला वर यायला खूप मदत केली असें तो म्हणे. तो जसजसा मोठा होत गेला तसा आपली दाढी कमी कमी करीत गेला. आणि शेवटीं युद्धकाळांत त्यानें दाढीला साफ छाट दिली. आपण दाढी काढल्यामुळें युद्धांत विजय मिळवला असें तो म्हणे. आपण दाढी काढलेली जेव्हां कैसरला कळलें तेव्हां ज्या देशांतलीं माणसें एवढा त्याग करतात तो देश जिंकणें शक्य नाहीं या जाणिवेनें कैसरनें माघार घेतली असें जॉन फिलिप म्हणत असे ! अर्थात् दाढी काढण्यामागचें खरें कारण वेगळें होतें. तो नौदलांत रुजू झाला त्या वेळीं त्याचें वय बासष्ट वर्षांचें होतें. नियमाप्रमाणें सत्तेचाळीस वर्षांच्या वर वय असलेल्या माणसाला नौदलांत प्रवेश देतां येत नसे. पण नौदलाला तर जॉन फिलिपची गरज होती. दाढी काढल्यामुळें आपण सत्तेचाळिसापेक्षां लहान दिसूं असें कदाचित् जॉन फिलिपला वाटलें असावें !

स्वतःचें बँडपथक स्थापन केल्यानंतर हळूहळू अमेरिकन संगीतकारांची संख्या वाढते आहे असें जॉन फिलिपला आढळून आलें. तरुणपणीं जेव्हां त्यानें नौदल बँडचें नेतृत्व स्वीकारलें होतें तेव्हां त्या बँडच्या पथकांत जेमतेम सहा अमेरिकन होते. एखादें वाद्य उत्तम वाजवणारा मनुष्य जरी परदेशी असला तरी त्याला जॉन फिलिप घेत असे. पण नंतर नंतर त्याच्या बँडच्या पथकांत बहुतेक अमेरिकन होते. त्याच्या बँडच्या पथकांत पूर्वी वाजवणाऱ्या लोकांनीं जेव्हां आपल्या मुलांनाहि त्याच्याच पथकांत पाठवलें तेव्हां जॉन फिलिपला विलक्षण आनंद झाला.

जॉन फिलिप साउसाचा स्वभाव अतिशय आनंदी व विनोदी होता. चार माणसें नेहमीं यावीं असेंच त्याला वाटे. बरोबर कोणी नसतांना एकट्यानें जेवणें ही गोष्ट त्याला मुळींच आवडत नसे. लोकांना आकर्षित करून घेण्याचें विलक्षण सामर्थ्य त्याच्या व्यक्तित्वांत होतें. तालीम घेत असतांना त्याची शिस्त अतिशय कडक असे. परंतु त्याच्या पथकांतल्या सर्व वादकांचें त्याच्यावर

अतिशय प्रेम होतें. त्याच्या पथकांत नेहमीं खेळीमेळीचें वातावरण असे. वादकांची संख्या ऐंशीपर्यंत जाऊन पोंचली तेव्हां या वादकांनीं आपापले संघ स्थापन करून वेगवेगळे खेळ खेळायला सुरवात केली. तरुण असतांना एका धनिकाची मदत घेऊन जॉन फिलिपला संगीताच्या शिक्षणासाठीं परदेशीं जाण्याची संधि आली होती. अमेरिकेंत न रहातां जॉन फिलिप जर परदेशीं गेला असता तर कदाचित् 'मार्च संगीता'चा सम्राट या योग्यतेपर्यंत तो कधींच पोंचला नसता. मग कदाचित् त्यानें वेगळ्या प्रकारची संगीतरचना केली असती. ज्या हार्मनींचा उपयोग जॉन फिलिप करीत असे त्या अगदीं सोप्या असत. त्या फॉस्टरच्या हार्मनी होत्या. संगीताच्या क्षेत्रांतले विद्वान् त्यांना मनापासून मान्यता देत नसत. ज्या संगीतकारांना संगीताचें विशेष ज्ञान नसतें तेच अशा प्रकारच्या हार्मनी वापरतात असें या विद्वानांचें मत. परंतु प्रत्येक संगीतकाराला अशा प्रकारच्या विद्वत्तेची आवश्यकता असतेच असें नाहीं. हे विद्वान् पुष्कळ वेळां संगीत वाजवणाऱ्याची वृत्ति ही विद्वत्तेपेक्षांहि अधिक महत्त्वाची असते हें विसरून जातात. जॉन फिलिप साउसानें लिहिलेल्या 'मार्च' संगीतांत कवाईत करणाऱ्या सैनिकांत, त्यांच्या थकल्याभागल्या शरिरांत चैतन्य निर्माण करण्याचें सामर्थ्य होतें. लोकांना संगीताच्या तांत्रिक ज्ञानापेक्षांसुद्धां मनोरंजन ही गोष्ट महत्त्वाची वाटते असा जॉन फिलिपचा अनुभव होता. मनोरंजन हेंच संगीताचें पहिलें मूल्य हीच गोष्ट खरी. एखादें मूल जेव्हां संगीत ऐकतें तेव्हां हें संगीत कसें चांगलें आहे हें त्याला कळत नसतें. परंतु त्या संगीतामुळें त्याचें मनोरंजन मात्र होतें. मनोरंजनाचें हें मूल्य डोळ्यांसमोर ठेवूनच जॉन फिलिप साउसा आपले कार्यक्रम योजीत असे. त्याला मिळालेल्या लोकप्रियतेचें हेंच कारण होतें.

जर्मनींत एकदां जॉन फिलिपचें बँड चांगलें असतें परंतु तें फारच गोड गोड वाटतें असा अभिप्राय कोणींतरी व्यक्त केला. हा अभिप्राय फारच चुकीचा आहे. कारण दोन अनुभवांच्या चुकीच्या तुलनेवर तो आधारलेला आहे. कांहीं लोकांना गोड पदार्थ आवडतात. कांहींना लोणचें आवडतें. या दोन पदार्थांच्या चवींची तुलना कशी करणार ? एकाच माणसाला वेगवेगळ्या वेळीं हे दोन्ही पदार्थ आवडूं शकतील.

हेलिकॉन टयुबा हें वाद्य नौदल बँडचा प्रमुख असतांना प्रथम जॉन फिलिप

वापरीत असे. या अवजड वाद्याचे सूर जॉन फिलिपला आवडत नसत. जॉन फिलिपनें हें वाद्य तयार करणाऱ्या माणसाला खास सूचना देऊन त्यांत बदल करून घेतला. बदल केलेल्या या वाद्याचे सूर केकवर साखरेचा थर पसरावा तसे सर्व बँडवर पसरतील असें तो म्हणे. जॉन फिलिपनें बदल करून तयार केलेलें हें वाद्य साउसाफोन या नांवानें ओळखलें जातें, आणि तें अजूनहि वापरलें जातें.

ध्वनिमुद्रित संगीताला 'कॅन्ड् म्यूझिक' (डबाबंद संगीत) हा शब्दप्रयोग प्रथम साउसानें वापरला. संगीतकारांनीं प्रत्यक्ष हजर राहून सादर केलेल्या संगीताची जागा हें डबाबंद संगीत कधींहि घेऊं शकणार नाहीं असें जॉन फिलिप म्हणत असे. तो सत्तरीच्या मध्यावर असतांना त्यानें लिहिलेला एक जगप्रसिद्ध 'मार्च' ट्रकमधून जाणारे सैनिक वाजवणार आहेत–अर्थात् डबाबंद संगीताच्या रूपानें–असें त्याला कोणींतरी सांगितलें. तेव्हां जॉन फिलिपनें गंमतीनें विचारलें, "म्हणजे ही ट्रक मार्चबरोबर तालावर पावलं टाकीत जाणार कीं काय?"

संगीताला राष्ट्रीयतेच्या मर्यादा असतात या गोष्टीवर जॉन फिलिपचा विश्वास नव्हता. राष्ट्रीय संगीत लिहिणारे म्हणून जे संगीतकार ओळखले जातात ते आपल्या भावना, जीवनविषयक प्रतिक्रिया एका विशिष्ट परिभाषेंत व्यक्त करतात एवढेंच असें तो म्हणे. जॉन फिलिपचें हें म्हणणें बरोबर असावें. विषुववृत्ता-जवळील जंगलांत राहणारा मनुष्य आणि नॉर्वेमधला मनुष्य या दोघांच्या बर्फाच्छादित प्रदेश पाहिल्यावर वेगळ्या प्रतिक्रिया होणार. या दोन माणसांनीं विमान पाहिलें तरीहि त्यांच्या प्रतिक्रिया भिन्न होतील. जॉन फिलिप साउसा म्हणत असे, "राष्ट्राला तुम्ही मर्यादा घालतां तशा संगीताला मर्यादा घालतां येणार नाहींत. संगीताच्या बोली अनेक असल्या तरी संगीताची भाषा विश्वात्मकच असते." जॉन फिलिपनें आपलें पथक घेऊन सर्व जगभर प्रवास केला होता. जगांतल्या कुठल्याहि भागांत गेला तरी संगीत ऐकतांना लोकांच्या भावनात्मक प्रतिक्रिया सारख्याच होतात असें तो म्हणे. स्पेनमध्यें असो किंवा नॉर्थ डाकोटामधल्या शहरांत असो विनोदी संगीत ऐकतांना सगळीकडचे लोक एका विशिष्ट ठिकाणींच हंसतात असें तो सांगे.

जॉन फिलिप साउसाचें आयुष्य सुखी आणि गजबजलेलें होतें. तशाच प्रकारचें संगीतहि त्यानें लिहिलें. चित्तवृत्ति खिन्न करून टाकणारें संगीत वाजवायला

जॉन फिलिपला आवडत नसे. अर्थात् तसाच एखादा प्रसंग असला तर तो तें वाजवूं शकत असे. "सूर्यप्रकाशासारखं मन प्रसन्न करून टाकणारं" संगीत आपण वाजवीत असल्यामुळें आपणाला यश मिळालें असें त्याला वाटे. कारण "मन प्रसन्न करणारं असं संगीत जगाला हवं असतं" असें तो म्हणे.

जॉन फिलिप साउसा :

जन्म : वॉशिंग्टन डि. सी. येथें ६ नोव्हेंबर १८५४.

मृत्यु : रीडिंग–पेन् सिल्व्हानिया येथें ६ मार्च १९३२.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# व्हिक्टर हर्बर्ट्

"कसलंहि काम असलं तरी तें
होईल तितकं चांगलं करण्याची शर्थ करा."

शंभर वर्षांपूर्वी कलेचें बहुरंगी देणें लाभलेला सॅम्यूएल लव्हर या नांवाचा एक आयरिश मनुष्य होऊन गेला. या सॅम्यूएल लव्हरला त्याचा नातू कधींच विसरूं शकला नाहीं. चित्रकार, कवि, गीतलेखक, गायक, नाटककार, विनोद्कार, संगीतकार, नट, एकपात्री कार्यक्रम करणारा, करुण आणि विनोदी दोन्ही प्रकारचे ऑपेरा लिहिणारा, कादंबरीकार अशीं सॅम्यूएल लव्हरच्या व्यक्तित्वाला अनेक अंगें होतीं. त्यानें लिहिलेलें 'हॅंडी अॅंडी' हें पुस्तक तर प्रसिद्धच आहे. त्याचा नातू त्याच्याविषयीं अभिमानानें बोलत असे हें अगदीं स्वाभाविक होतें. सॅम्यूएल लव्हरची स्मरणशक्ति असाधारण होती. एखादी 'मेलडी' एकदां ऐकली कीं त्याच्या ती तशीच्या तशी स्मरणांत राहात असे. त्याचा नातू व्हिक्टर हर्बर्ट् याला सुद्धां आपल्या आजोबासारखेंच स्मरणशक्तीचें हें देणें लाभलें होतें. ऐकलेली मेलडी मूळ कुठली हें नेहमींच व्हिक्टरला सांगतां येत नसे, पण या मेलडीची सुरावट मात्र त्याच्या पक्की ध्यानांत असे.

सॅम्यूएल लव्हरच्या या असाधारण स्मरणशक्तीचा उपयोग त्यानें एकदां गमतीदारपणें कसा करून घेतला याविषयींची एक गोष्ट आहे. पॅगानिनी हा एक थोर व्हायोलिनवादक होता. पॅगानिनीचें चित्र सॅम्यूएल लव्हरला काढावयाचें होतें. हा व्हयोलिनवादक दिसायला विलक्षण होता, त्याचें व्यक्ति-

मत्त्वहि आगळेंच होतें. उंच, काटक शरीरयष्टि, मोठें नाक, फिकट चेहरा, पिंजारलेले काळे केस, अशी ही मूर्ति होती. व्हायोलिन वाजवण्यांतलें त्याचें कौशल्य इतकें अद्‌भुत होतें कीं, कुठली तरी अमानवी शक्ति त्याच्या द्वारें व्हायोलिन वाजवत असली पाहिजे असें लोकांना वाटे. डब्लिन येथें पॅगानिनीचा कार्यक्रम सॅम्यूएल लव्हरनें ऐकला होता. तेव्हांपासून या वादकाचें चित्र आपण काढावें अशी इच्छा त्याच्या मनांत निर्माण झाली होती. पॅगानिनीनें चित्र काढून घेण्यासाठीं समोर बसण्याचें कबूल केलें. ज्या दिवशीं तो चित्र काढून घ्यायला आला त्या दिवशीं त्याची वृत्ति कांहींशी उदास होती. चित्र काढण्यापूर्वीं या थोर व्हायोलिनवादकाला प्रसन्न करणें, त्याच्या वृत्ति खुलवणें आवश्यक होतें. तेव्हां सॅम्यूएल लव्हर पॅगानिनीनें रचलेली एक सुरावट गुणगुणूं लागला. ती ऐकतांच पॅगानिनीला आश्चर्य वाटलें.

"तूं कधीं स्ट्रॅसबर्गला गेला होतास काय ?

"नाहीं."

"मग ही रचना तूं कुठें ऐकलीस ?"

"तूं वाजवलेली मीं ऐकली आहे."

"नाहीं. तूं जर स्ट्रॅसबर्गला गेलेला नसशील, तर तूं म्हणतोस तें शक्य नाहीं."

"होय, मीं ती लंडनला ऐकली आहे." चित्रकार सॅम्यूएल लव्हर खात्रीपूर्वक म्हणाला.

"मीं ही गत स्ट्रॅसबर्गला जेव्हां कार्यक्रम केला तेव्हां प्रथमच वाजवली. लंडनमध्यें मीं ती कधींच वाजवलेली नाहीं." पॅगानिनी ठासून म्हणाला.

"क्षमा कर. तूं ती लंडनच्या थिएटरांत वाजवली होतीस."

"मला आठवत नाहीं."

"त्या कार्यक्रमाच्या रात्रीं पॅस्टा या गायिकेला तूं साथ करीत होतास."

"हां, हां, पॅस्टा...मीं गायिली आहे ती त्या रात्रीं!"

"आणि तूंसुद्धां किती अप्रतिम वाजवलंस!"

"आतां आठवलें. मीं ती गत लंडनला वाजवली होती खरी—पण फक्त एकदांच. एकदां ऐकून ती लक्षांत राहिली, याचा अर्थ तूं संगीतकार असला पाहिजेस."

"एकदां नाहीं. या रचनेला तुला वन्समोअर मिळाला होता. त्यामुळें मीं ती दोनदां ऐकली."

"अस्सं. पण दोनदां ऐकूनसुद्धां ती कठीण सुरावट जो स्वतः संगीतकार नाहीं त्याच्या स्मरणांत राहाणार नाहीं."

हा सगळा संवाद चालू असतांना सॅम्यूएल ल्व्हरला हवें होतें तें साधलें होतें. पॅगानिनीच्या वृत्ति खुलल्या होत्या.

सॅम्यूएल ल्व्हरचा एक मित्र एकदां अडचणींत आला. सॅम्यूएल ल्व्हरनें पैसे दिले. सॅम्यूएल ल्व्हरचें हें औदार्य त्याच्या खिशाला न झेपणारें होतें. त्याच्याजवळचे सर्व पैसे संपले. तेव्हां पैसे मिळवण्यासाठीं म्हणून सॅम्यूएल ल्व्हरनें अमेरिकेला जायचें ठरवलें. ज्यांना स्वातंत्र्य हवें आहे किंवा ज्यांना अधिक पैसे मिळविण्याची संधि हवी आहे अशा परदेशी लोकांना अमेरिकेंत नेहमींच आसरा मिळत आलेला आहे. अमेरिकेंत येतांना सॅम्यूएल ल्व्हर बऱ्याच लोकांसाठीं ओळखपत्रें घेऊन आला होता. या लोकांपैकीं सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक हाथॉर्न हाहि होता. या ओळखपत्रांचा अमेरिकेंत ल्व्हरचें स्वागत होण्याच्या दृष्टीनें चांगला उपयोग झाला.

लौकरच सॅम्यूएलनें बहुरंगी करमणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या खेळाला त्यानें एक डॉलरचें तिकीट लावलें होतें. हॉल भरून गेला. शहरांतल्या अनेक फॅशनेबल सुंदरी खेळाला हजर होत्या. अनेक लोकांना तिकिटाअभावीं परत जावें लागलें. न्यू यॉर्क हेराल्डमध्यें या कार्यक्रमाचा पुढीलप्रमाणें वृत्तान्त आला होता :

"आठ वाजतां सॅम्यूएल ल्व्हर रंगमंचावर आला आणि त्यानें श्रोत्यांना अभिवादन केलें. श्रोत्यांनीं त्याचें मनःपूर्वक स्वागत केलें. या कार्यक्रमाचें वर्णन करणें खरोखरीच कठीण आहे. तल्लख विनोद, बहारदार कोट्या, गाणीं याचबरोबर मनांतलें कारुण्य जागवणारें नाट्य असा हा विविधरंगी कार्यक्रम होता. एका क्षणीं श्रोत्यांच्या डोळ्यांत अश्रू असत तर दुसऱ्या क्षणीं ते हंसत असत. विलक्षण सफाईनें हा कार्यक्रम सादर केला गेला. यांतल्या गीतांचें स्वरलेखन सॅम्यूएल ल्व्हरनें स्वतः केलें होतें. दोनतीन गाणीं सोडल्यास बाकीचीं इथल्या श्रोत्यांना नवीन होतीं."

अमेरिकेंतल्या आपल्या दोन वर्षांच्या वास्तव्यांत सॅम्यूएल ल्व्हरनें प्रचंड यश मिळवलें. नंतर तो इंग्लंडला परत गेला आणि लंडनजवळच सेव्हन-ओक्स

येथें राहिला. इथें कांहीं काळ तो आपलें करमणुकीचे कार्यक्रम करीत होता. अमेरिकेंतला अनुभव जमेला धरून त्यानें आपल्या कार्यक्रमांत कांहीं नवीन भर घातली. कांहीं काळ त्यानें असे कार्यक्रम केले आणि नंतर लेखन आणि चित्रकला यांना त्यानें वाहून घेतलें.

सॅम्यूएल लव्हरची मुलगी फॅनी हिचें एडवर्ड हर्बर्ट याच्याशीं लग्न झालें होतें. त्यांचा मुलगा व्हिक्टर हा दोन वर्षांचा असतांनाच एडवर्ड हर्बर्टला काळानें हिरावून नेलें. नवऱ्याच्या मृत्यूनंतर फॅनी व्हिक्टरला घेऊन आपल्या वडिलांच्या घरीं इंग्लंडला आली. यामुळें व्हिक्टर हर्बर्ट हा जरी आयरिश असला तरी अगदीं लहानपणींचा कांहीं काळ सोडल्यास तो आयर्लंडमध्यें राहिलाच नाहीं. दोन वर्षांचा असतांना वडील वारल्यामुळें त्यांची आठवण त्याला असणें शक्य नव्हतें. सॅम्यूएल लव्हरला—आपल्या आजोबाला—तो कधींच विसरला नाहीं.

आपल्या आजोबांच्या घरीं व्हिक्टरला खूप संगीत ऐकायला मिळालें. त्याची आई पिआनो फार चांगला वाजवीत असे. त्याच्या आजोबांकडेहि अनेक संगीतकार येत. पाळण्यांत असल्यापासून आयरिश लोकगीतें व्हिक्टरच्या कानीं पडलीं होतीं. सॅम्यूएल लव्हर नातवाला मांडीवर घेऊन न्यू यॉर्क शहर, नायगारा धबधबा आणि अमेरिकेंतले आपले अनुभव यांच्या गोष्टी सांगत असे.

व्हिक्टरचें शाळेंत घालण्याचें वय झालें तेव्हां सॅम्यूएल लव्हरनें त्याला शिक्षणासाठीं जर्मनीला घेऊन जावें असा सल्ला आपल्या मुलीला दिला. जर्मनीमध्यें चांगलें शिक्षण कमी खर्चांत होईल असें सॅम्यूएल लव्हरला वाटत होतें. इंग्लंडमध्यें राहून आपल्या नातवानें फार इंग्रजाळणेंसुद्धां सॅम्यूएल लव्हरला पसंत नसल्यानें त्यानें हा निर्णय घेतला असावा. सॅम्यूएल लव्हर जरी इंग्लंड-मध्यें राहिला होता तरी तो खराखुरा आयरिश देशभक्त होता. देशभक्तीची ही भावना आपल्या नातवांतहि निर्माण व्हावी असें त्याला वाटत असे.

फॅनीनें वडिलांचा सल्ला मानला आणि ती व्हिक्टरला घेऊन दक्षिण जर्मनींत गेली. लेक् कॉन्स्टन्सच्या सुंदर तीरावर असलेल्या एका शहरांत तिनें आपलें घर केलें. तिथें तिला एक जर्मन डॉक्टर भेटला. त्याच्याशीं तिनें लग्न केलें. लग्नानंतर ती आपल्या नवऱ्याबरोबर स्टट्गार्ट येथें गेली. संगीतकार म्हणून पुढें अमेरिकेंत प्रसिद्धीला आलेला आयरिश मुलगा व्हिक्टर हर्बर्ट याचें शिक्षण अशा रीतीनें जर्मनींत झालें.

शाळेंत गेल्यानंतर अभ्यासांत आपण चमकावें अशी इच्छा व्हिक्टर हर्बर्टच्या मनांत निर्माण झाली. त्याला खेळ आवडत असत. परंतु त्याच्या आईनें एखादें वाद्य तूं शीक असें त्याला सांगितलें तरी तो त्याकडे लक्ष देईना. सावत्र बाप डॉक्टर असल्यामुळें व्हिक्टरनेंहि तोच व्यवसाय पुढें घ्यावा असें घरांत ठरलें असावें. व्हिक्टरला हें पसंत होतें. आणि म्हणून आपण संगीतकार व्हावें असा विचार त्याच्या मनांत कधींच आला नाहीं.

त्यांच्या घरीं व्हायोलन सेलो वाजवणारा एक मनुष्य येत असे. हें वाद्य आपल्या मुलानें शिकावें असें फॅनीला फार वाटे. आपल्या मुलानें एक तरी वाद्य शिकलेंच पाहिजे अशी तिची इच्छा होती. परंतु व्हिक्टरचें संगीताकडे मुळींच मन नव्हतें. सेलो वाजवायला शिकायचें म्हणजे त्यांत बराच वेळ जाणार. याचा अर्थ अभ्यास झाल्यानंतर खेळायला वेळ मिळणार नाहीं. खरें म्हणजे आपल्याला संगीतकार व्हायचें आहे हें कळण्याआधींच व्हिक्टर डॉक्टर झाला असता. परंतु अशी एक घटना घडली कीं, ज्यामुळें व्हिक्टर आपल्या आईच्या इच्छेप्रमाणें संगीताकडे वळला.

शाळेंत एक समारंभ होता. डॉनीझेटीची 'द डॉटर ऑफ धी रेजिमेंट' ही रचना या समारंभांत बँडवर बसवायची होती. यांतला उपोद्घाताचा भाग फ्ल्यूटवर वाजवण्यासाठीं एकाची जरुरी होती. व्हिक्टर हर्बर्टला हें काम द्यायचें शाळेनें ठरवलें. व्हिक्टर हर्बर्टनें होय म्हटलें आणि एकदां होय म्हटल्यानंतर तो जिद्दीनें कामाला लागला. गोष्ट सोपी नव्हती. कारण समारंभाला फक्त दोन आठवड्यांचा अवधि होता. या दोन आठवड्यांत वाद्य शिकून शिवाय तें सभेंत श्रोत्यांसमोर वाजवायचें होतें.

व्हिक्टर हर्बर्टनें ही जबाबदारी पार पाडली. परंतु हे दोन आठवडे घरीं व्हिक्टर शिकत असतांना फ्ल्यूटच्या कर्कश आवाजानें त्याच्या आईचे कान अगदीं किटून गेले. आपल्या मुलानें मधुर, खोल आवाज असलेलें सेलो हें वाद्य शिकावें अशी तिची इच्छा होती. त्याच्याऐवजीं फ्ल्यूटचा कर्कश आवाज ऐकणें तिला भाग पडलें होतें. आपल्या दणकट शरिराच्या मुलाच्या हातांत तें लहानसें वाद्य बरेंहि दिसत नाहीं असें तिला वाटे. कसेंहि असेना, व्हिक्टरच्या संगीत-साधनेला इथून सुरवात झाली.

यानंतर व्हायोलिन वाजवणाऱ्या एका मुलाशीं व्हिक्टरची ओळख झाली.

आपल्या या नव्या मित्राचें व्हायोलिनवादन व्हिक्टरला आवडलें. फ्ल्यूटविषयीं या मित्राचें मत व्हिक्टरच्या आईसारखेंच होतें! यामुळें एक दिवस व्हिक्टर आपल्या आईकडे गेला, आणि त्यानें तिला मला सेलो विकत आणून दे असें सांगितलें. शाळेंतला अभ्यास बुडूं नये म्हणून व्हिक्टर प्रथम संगीत शिकायला कबूल नव्हता. व्हिक्टर पुढें म्हणे, "एका अर्थानें माझें हें म्हणणें बरोबर होतें. कारण मी सेलो शिकण्याकडे जसजसें लक्ष देऊं लागलों तसतसें शाळेंतल्या अभ्यासांतील माझें लक्ष उडूं लागलें." आतां पहिल्या पांचांत त्याचा नंबर येईना.

सेलो शिकायला व्हिक्टरनें सुरवात केली तेव्हां त्याचें वय पंधरा-सोळा वर्षांचें होतें. सेलो वाजवणाऱ्या त्याच्या मित्राच्या वडिलांच्या ओळखीचा त्या काळांतला एक प्रसिद्ध सेलोवादक होता. या ओळखीमुळें या सेलोवादकाकडे व्हिक्टर हर्बर्ट शिकूं लागला. एक वर्षपर्यंत व्हिक्टर या शिक्षकाच्या घरीं राहत होता. याचा त्याला खूप फायदा झाला. या शिक्षकाचें त्याच्याकडे सतत लक्ष राहूं शकत असल्यामुळें एखादें वाद्य शिकतांना लागणाऱ्या चुकीच्या संवयी व्हिक्टरला लागल्या नाहींत आणि त्याची सतत प्रगति होत राहिली. यानंतर लिझ्झ, ब्रॅहम्स, रुबिनस्टाइन, सेंट-सेन्स, डेलिब्ज इत्यादि विख्यात संगीतकारांच्या निर्देशनाखालीं व्हिक्टरला वाजवण्याची संधि मिळाली आणि त्यामुळें त्याची अधिकाधिक प्रगति होत गेली.

मग व्हिक्टरनें युरोपचा प्रवास केला. या प्रवासांत त्यानें वेगवेगळ्या ऑर्केस्ट्रांतून सेलोवादन केलें. त्याचप्रमाणें स्वतंत्र वादनाचेहि जलसे केले. ड्रेस्डन येथें असतांना कार्यक्रम सुरू होण्याच्या आधीं कांहीं वेळ तो थिएटरमध्यें गेला होता. कार्यक्रम सुरू व्हायला वेळ होता म्हणून तो सहज पिआनोवर बसला आणि बोटें फिरवूं लागला. तो पिआनो वाजवायला असा शिकला नव्हता. थोडेसे सूर छेडण्याइतकी त्याला माहिती होती. बाजूलाच ऑर्केस्ट्रांतला दुसरा एक वादक उभा होता. व्हिक्टरनें वाजवलेला पिआनो ऐकून तो त्याला म्हणाला, "व्हिक्टर, तूं स्वतंत्र स्वरलेखन केलं पाहिजेस."

स्वतंत्र संगीतरचना करण्याची कल्पना व्हिक्टरच्या डोक्यांत या क्षणींच प्रथम आली. आपल्याला ही गोष्ट जमेल किंवा नाहीं याबद्दल त्याला संशय होता. परंतु त्या सहकाऱ्याला मात्र खात्री वाटत होती. आणखी वेळ न घालवतां व्हिक्टरनें स्वतंत्र संगीतरचनेंत लक्ष घालावें असें त्यानें आग्रहानें सुचवलें.

लौकरच हर्बर्ट स्टटगार्ट् येथें 'कोर्ट ऑपेरा' या ऑर्केस्ट्रांत पहिला सेलोवादक झाला आणि यानंतर आपल्या वादकमित्रांच्या सल्ल्यानुसार त्यानें एका शिक्षकाकडे स्वरलेखनाचें शिक्षण घ्यायला सुरवात केली. या शिक्षकानें व्हिक्टरला हार्मनी, काउंटरपॉइंट आणि ऑर्केस्ट्रेशन यांचें चांगलें शिक्षण दिलें, त्याची बैठक तयार केली. याच वेळीं कांहीं जुन्या मेलडींची सेलो आणि ऑर्केस्ट्रा यांच्यासाठीं मांडणी करण्याचें काम त्याच्याकडे देण्यांत आलें होतें. हें काम त्यानें पार पाडलें. यानंतर त्याच्याकडे सेलो आणि ऑर्केस्ट्रासाठीं 'स्वीट' लिहिण्याची कामगिरी सोपवण्यांत आली. स्वरलेखन शिकायला सुरवात करून व्हिक्टरला एव्हांना चारच महिने झाले होते. पण तरीहि त्यानें या 'स्वीट'ची रचना सार्वजनिक कार्यक्रमांतहि वाजवतां यावी इतकी चांगली केली.

व्हिक्टर हर्बर्ट अतिशय कष्टाळू होता. स्वरलेखन करायला तो बसला कीं अर्धमर्धं थांबत नसे. परंतु इतकें काम करून सुद्धां खेळकरपणें चारचौघांत मिसळण्याच्या बाबतींत तो मागें नसे. तो देखणा होता, उदार होता, गमतीच्या गोष्टी सांगण्याची हातोटी त्याच्याकडे होती. यामुळें स्टटगार्ट् येथें असतांना तो लोकप्रिय झाला. कोर्ट ऑपेरांत एकदां एक उंच आवाजाची सुंदर मुलगी काम करण्यास आली. कोर्ट ऑपेराचा मुख्य सेलोवादक व्हिक्टर आणि एखाद्या पुतळ्यासारखें सौंदर्य असलेली ही मुलगी यांच्यांत प्रणयभावना निर्माण झाली. त्यांचें लग्न ठरलें.

याच वेळीं न्यू यॉर्कचा तरुण अमेरिकन संगीतनिर्देशक वॉल्टर डॅम्रॉश इथें आला होता. मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउस या कंपनीसाठीं गायक शोधण्यासाठीं तो आला होता. वॅगनरच्या संगीतिकांतील कांहीं भूमिकांसाठीं त्याला आवाज हवे होते. व्हिक्टर हर्बर्टच्या प्रेयसीचा आवाज त्याला फार आवडला आणि त्यानें तिला न्यू यॉर्कला येण्याचें निमंत्रण दिलें. पुढें येण्याच्या दृष्टीनें ही फार चांगली दृष्टि होती. परंतु हर्बर्टशीं लग्न ठरल्यामुळें आपण येऊं शकत नाहीं असें तिनें सांगितलें. डॅमरॉशला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें आणि त्यानें व्हिक्टर हर्बर्ट कोण आहे याची चौकशी केली. व्हिक्टर हर्बर्टला मेट्रोपॉलिटन ऑर्केस्ट्रांत प्रमुख सेलोवादक म्हणून घेतल्यास ती न्यू यॉर्कला येईल काय असें डॅमरॉशनें विचारलें. व्हिक्टर हर्बर्टनें लग्न केलें आणि हें जोडपें न्यू यॉर्कला गेलें. व्हिक्टर हर्बर्ट तेव्हां सत्तावीस वर्षांचा होता.

आपल्या आजोबांप्रमाणें व्हिक्टर हर्बर्टलाहि अमेरिका फार आवडली. आपलें उरलेलें आयुष्य त्यानें अमेरिकेंतच घालवलें. व्हिक्टर हर्बर्ट नेहमीं कसल्या ना कसल्या कामाच्या गडबडींत असे. धडक मारून पुढें जाण्याची खास अमेरिकन वृत्ति त्याच्यांत होती. सेलोवादकाची कुठेंहि जरूर पडली कीं तिथें हर्बर्ट हजर राहिलाच असें समजावें. फिल–हार्मोनिक सोसायटी या कंपनींत त्यानें थिओडॉर थॉमस याच्या निर्देशनाखालीं वादन केलें. थिओडॉर थॉमसविषयीं साउसाला विलक्षण आदर वाटत असे याचा उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे. मेट्रोपॉलिटन कंपनींत ऑपेरांचें निर्देशन करणाऱ्या अँटॉ सिड्‌ल्‌विषयीं हर्बर्टला फार आदर वाटत असे. हर्बर्टच्या सर्वांगीण कौशल्याकडे सिड्‌ल्‌चेंहि लक्ष गेलें आणि ब्राइटन बीच येथील उन्हाळी जलशांत आपला सहाय्यक–निर्देशक म्हणून सिड्‌ल्‌नें व्हिक्टर हर्बर्टला घेतलें. नॅशनल कॉन्झर्‌वेटरी या संस्थेंत व्हिक्टर हर्बर्ट याच काळांत सेलो वाजवायला शिकवीत होता. एडवर्ड मॅक्‌डुवेलची आई या संस्थेची चिटणीस होती. लिव्होझॅक हाहि या काळांत इथेंच होता. 'चेंबर म्यूझिक' वाजवणाऱ्या पथकांतूनहि हर्बर्ट वाजवीत असे. सेलोवादक म्हणून त्याचें चांगलेंच नांव झालें. फर्दे ग्रॉफ हा जाझ् संगीताचा 'संयोजका'चा आजोबा मेट्रोपॉलिटन ऑर्केस्ट्रांत सेलो वाजवायला व्हिक्टर हर्बर्टच्या शेजारींच बसत असे.

व्हिक्टर हर्बर्ट अमेरिकेंत राहायला येऊन सात वर्षें झालीं होतीं. न्यू यॉर्कचा प्रसिद्ध बँडमास्टर गिलमोर याच्या मृत्यूनंतर गिलमोर बँडचा प्रमुख म्हणून व्हिक्टर हर्बर्टला बोलावणें आलें. या काळांत गिलमोरचें बँड अमेरिकेंत अतिशय नांवाजलेलें होतें. जॉन फिलिप साउसाचा गिलमोर हा एक आदर्श होता. गंभीर संगीताकडून सुगम संगीताकडे व्हिक्टर हर्बर्टचें पाऊल इथून पडायला सुरवात झाली. सिड्‌ल्‌च्या हाताखालीं काम केल्यामुळें व्हिक्टर हर्बर्टला त्याच्या बरोबरीचे वादक मानीत असत. सिड्‌ल्‌च्या हाताखालीं काम केल्यामुळें व्हिक्टर हर्बर्ट खूप गोष्टी शिकला होता. तालीम घेण्याच्या बाबतींत तो फार कडक होता. कोणीं टंगळमंगळ केली तर तो त्याचा खरपूस समाचार घेत असे. परंतु पथकांतले वादक थकलेले आहेत असें जाणवतांच व्हिक्टर हर्बर्ट तालीम थांबवी आणि त्यांना गमतीच्या गोष्टी सांगून त्यांचीं मनें प्रफुल्लित करी. त्याच्या पथकांतल्या वादकांचें त्याच्यावर प्रेम होतें. पुढें तो पिट्‌स्‌बर्ग

ऑर्केस्ट्राचा प्रमुख झाला. या पथकांतले वादकहि त्याच्यावर फार प्रेम करीत. आपला हा प्रमुख आपल्यापैकींच एक आहे अशी खेळीमेळीची भावना त्यांच्या मनांत असे. व्हिक्टर हर्बर्टच्या वाढदिवसाच्या दिवशीं त्याच्या पथकांतले हे वादक त्याच्या घराबाहेर जमत आणि त्याचा गौरव करणारें गीत गात.

व्हिक्टर हर्बर्टला सुखविलासाच्या जीवनाची आवड होती. भपका करणें त्याला आवडे. सुखानें राहणें हें त्याच्या आयुष्यांतलें एक ध्येय होतें असें म्हणायला हरकत नाहीं. तो पैसे उधळीत असे. संगीतकलेप्रमाणेंच मित्र जमवण्याची कलाहि त्याला अवगत होती. तो जिथें जाई तिथें स्नेह जोडी, संगीत आणि स्नेह या दोन गोष्टींवर व्हिक्टरचें जिवापाड प्रेम आहे असें त्याचे मित्र म्हणत. त्याचें पथक जेव्हां फिरतीवर असे तेव्हां व्हिक्टर हर्बर्ट खाण्या-पिण्याच्या बाबतींत विलक्षण दक्ष असे. फिरतीच्या वेळीं त्यानें खाण्याची खास व्यवस्था करण्यासाठीं ट्यूबा वाजवणारा एक मनुष्य मुद्दाम घेतला होता. भोजनाच्या थाळीकडे व्हिक्टरच्या मनासारखें लक्ष देणें हें या वादकाचें काम होतें. त्याला या कामाबद्दल खास भत्ता मिळत असे. एखादें जेवण चुकणें किंवा हवीं असलेलीं खाद्यपेयें न मिळणें ही कल्पना व्हिक्टरला सहन होणें शक्य नव्हतें. खाण्यावर त्याचें विलक्षण प्रेम होतें. जेवतांना धंद्याच्या गोष्टी त्याला मुळींच खपत नसत. एकाग्रचित्तानें तो खाद्यपेयांचा समाचार घेत बसे. उत्तम स्वैंपाकाचें त्याला कौतुक होतें. संगीत शिकणाऱ्या श्रीमंत बायकांनीं त्याच्या पथकाला वाजवण्यासाठीं घरीं बोलवलें असतांना जर या बायांनीं चांगलेंचुंगलें खाऊंपिऊं घातलें नाहीं तर तो चिडचिडत असे. जेवण उत्तम पाहिजे—ती आयुष्यांतली एक महत्त्वाची घटना असें व्हिक्टरला वाटे. जेवतांना मन प्रसन्न करणाऱ्या, दोन घास अधिक जातील अशा गप्पा त्याला आवडत असत.

बँडमास्तर म्हणून आपल्या पथकाच्या आघाडीला उभा राहून रुबाबांत मिरवणूक काढणें व्हिक्टर हर्बर्टला फार आवडत असे. मॅकिन्लेनें राष्ट्राध्यक्ष-पदाचीं सूत्रें हातीं घेतलीं त्या दिवशींच्या समारंभप्रसंगीं बॉल डान्सचा एक खास कार्यक्रम ठेवण्यांत आला होता. या वेळीं व्हिक्टरच्या बँड-पथकाला वाजवण्याचें निमंत्रण होतें. आपल्या पथकाची निवड झाली यामुळें व्हिक्टर बेहद्द खूष झाला होता. या काळांत बॉल डान्सचा कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय

असे. अशा कार्यक्रमावर हजारों डॉलर्स खर्च केले जात. अशाच तऱ्हेच्या इतर कार्यक्रमांवर आपण कडी केली पाहिजे असें एखाद्याला वाटलें कीं तो व्हिक्टर हर्बर्टच्या पथकाला खास निमंत्रण देई. प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या गोष्टींचें व्हिक्टरला आकर्षण होतें. या पोकळ रुबाबी वृत्तीमुळें आपल्या पथकाच्या प्रमुखपदीं आपण आहोंत या गोष्टीचा तो भलताच डौल मिरवी. या त्याच्या वागण्यामुळें त्याचा कांहीं माणसें द्वेषहि करूं लागत.

आपण 'ग्रँड ऑपेरा' चा स्वरसंयोजक म्हणून प्रसिद्धीला यावें अशी व्हिक्टरची फार इच्छा होती. अशा तऱ्हेच्या दोन ग्रँड ऑपेरांचें स्वरलेखन करून त्यानें तें सादर केलें. परंतु या बाबतींत त्याचें नांव मागें राहिलें नाहीं. अमेरिकेंत आठ वर्षें राहिल्यानंतर त्यानें ऑपरेटाचें स्वरलेखन करायला सुरवात केली. संगीताच्या इतिहासांत त्याला स्थान मिळालें तें यामुळेंच.

क्लासिकल संगीतापेक्षां सुगम संगीतच व्हिक्टर हर्बर्टच्या वृत्तीशीं जुळणारें होतें. क्लासिकल संगीताचें स्वरलेखनहि त्यानें केलें. डिव्हेशेंकसारख्याकडून त्यानें व्हायोलिन–सेलोच्या जलशाबद्दल शाबासकीहि मिळवली. परंतु सुगम संगीताच्या क्षेत्रांत त्याला जसें यश मिळालें तसें या क्षेत्रांत मिळालें नाहीं. संगीतनियोजक अमेरिकेंत सुगम संगीतच लिहून यशस्वी होऊं शकेल हें त्यानें हेरलें होतें. तेव्हां त्यानें याच क्षेत्रावर लक्ष केंद्रित करायचें ठरवलें. सुगम संगीत लिहून भरपूर पैसे मिळवायचे आणि मग क्लासिकल संगीताकडे वळायचें त्यानें ठरवलें. अर्थात् या निश्चयाचा परिणाम म्हणून त्यानें आयुष्यभर फक्त सुगम संगीतच लिहिलें.

या क्षेत्रांत मात्र त्याला स्वतःची अशी जागा सापडली. अत्यंत मधुर अशा मेलडी त्याला सहज सुचत. शुबर्टचें संगीत त्याला फार आवडत असे. आपण शुबर्टसारखेंच लिहितों असें कल्पनाचित्र तो रंगवी. तो इतका सव्यसाची होता कीं, आपल्या पथकांतल्या लोकांना निर्देशन करीत असतांना तो इंग्लिश, जर्मन, इटालियन किंवा फ्रेंच या चारी भाषांमधून सूचना देऊं शकत असे. वेगवेगळ्या प्रकारच्या ऑपेरांचें स्वरलेखन तो एकाच वेळीं करूं शकत असे.

ऑपेरासाठीं स्वरलेखन करायचें म्हणजे ऑपेराचे शब्द आधीं कोणींतरी लिहायला हवे हें उघड आहे. वॅग्नर हा संगीतकार या दोन्ही गोष्टी करूं शकत असे. व्हिक्टर हर्बर्टनें सव्यसाची संगीतकार म्हणून नांव मिळवलें होतें.

परंतु अजून एका बाबतींत त्याला असमाधान होतें. विनोदी ऑपेराचें स्वरलेखन करावें अशी त्याची फार इच्छा होती. शिकागो येथें भरणाऱ्या जागतिक जत्रेंत संगीतलेखन करण्यासाठीं व्हिक्टर हर्बर्टला निमंत्रण आलें. हा कार्यक्रम इतक्या प्रचंड प्रमाणावर करण्याचा प्रयत्न झाला होता कीं, प्रत्यक्षांत तो झाला नाहीं. परंतु या निमित्तानें व्हिक्टरचा रंगभूमीशीं संबंध आला. इथें त्याच्या वेगवेगळ्या लोकांशीं ओळखी झाल्या आणि या ओळखीं-मुळेंच त्याला हवा असलेला विनोदी ऑपेरा मिळाला. वयाच्या पस्तिसाव्या वर्षीं व्हिक्टरनें 'प्रिन्स ॲनानिअस' हा ऑपरेटा सादर केला. तो अयशस्वी झाला. परंतु अपयशानें डरणाऱ्यांपैकीं व्हिक्टर नव्हता. दुसऱ्या वर्षीं त्यानें 'द विझार्ड ऑफ द नाइल' हा ऑपेरा केला. या ऑपेराचें संगीतलेखन अनुकरणात्मक आणि थिल्लर असल्याचें मत टीकाकारांनीं दिलें. परंतु लोकांना मात्र तो फार आवडला. पुढें हा ऑपेरा इंग्लंड, जर्मनी आणि मेक्सिको येथेंहि सादर करण्यांत आला.

व्हिक्टर हर्बर्ट आतां पिट्स्बर्ग सिम्फनी ऑर्केस्ट्राचा निर्देशक म्हणून काम करूं लागला होता. सहा वर्षें हें काम करीत असतानांच तो वेळांत वेळ काढून आपल्या आवडीचें सुगम संगीतहि लिहीत होता. पिट्स्बर्ग येथें तो ज्या वर्षीं गेला त्या वर्षींच त्यानें 'द फॉरच्युन टेलर' या ऑपरेटाचें स्वरलेखन केलें. व्हिक्टरच्या अतिशय लोकप्रिय झालेल्या ऑपरेटांपैकीं हा एक होय. सव्यसाची संगीतकार म्हणून आपलें नांव होतें आहे या गोष्टीवर व्हिक्टर खूष असे. सुगम संगीत लिहिणारा हर्बर्ट क्लासिकल संगीतांत फारशी कामगिरी करूं शकणार नाहीं अशी पुष्कळदां त्याच्यावर टीका होई. आपण कष्टाळू आहोंत असें लोकांनीं म्हणावें अशी त्याची इच्छा होती. आपल्या ऑर्केस्ट्राबरोबर कार्यक्रम करण्यासाठीं रिचर्डस स्ट्रॉस आणि क्राइस्लर यांच्यासारखे प्रसिद्ध कलावंत पिट्स्बर्गला येतात, या नामवंत मानकऱ्यांशीं आपल्या ओळखी आहेत याचा त्याला फार अभिमान वाटत असे. अँड्र्यू कार्नेजी हा अमेरिकेंतला संगीताचा एक प्रसिद्ध आश्रयदाता व्हिक्टर हर्बर्टचा फार मोठा चाहता होता. अँड्र्यू कार्नेजी म्हणत असे, "व्हिक्टर हर्बर्टचा ऑर्केस्ट्रा दिवसांतून दोनदां ऐकायला मिळणें हीच माझी स्वर्गीय सुखाची कल्पना आहे."

न्यू यॉर्कमध्यें थिएटरांत होणाऱ्या जलशांसाठीं अधिकाधिक संगीतलेखन

करण्याकडे व्हिक्टरचा आतां कल होऊं लागला. त्याचें सुरवातीचें कांहीं संगीत-लेखन न्यू यॉर्कच्या एका प्रकाशकानें नाकारलें होतें. "व्हिक्टर हर्बर्टनें आपलें ऑर्केस्ट्राचेंच काम करावें, स्वतंत्र स्वरलेखनाच्या भानगडींत पडूं नये," असें तो त्याला म्हणाला होता. परंतु पुढें याच प्रकाशकानें व्हिक्टरचें स्वरलेखन मोठ्या आनंदानें प्रसिद्ध केलें. या प्रकाशकानें स्वरलेखनाच्या भानगडींत तूं पडूं नकोस असा सल्ला ज्याला दिला होता तो व्हिक्टर हर्बर्ट अमेरिकेंतला एक लोकप्रिय संगीतलेखक ठरला.

व्हिक्टर हर्बर्टनें बरेंचसें स्वरलेखन मागणी आल्यामुळेंच केलें. मागणी आली कीं तो सहसा नाहीं म्हणत नसे. एकदां तर त्यानें एका वेळीं धी सिंगिंग गर्ल, धी अमीर, सिरॅनो द बर्जरॅक, द व्हाइसरॉय या चार ऑपेरांचें स्वरलेखन करण्याचें काम घेतलें होतें. आपल्या स्टूडियोंत त्यानें या चार ऑपेरांच्या स्वरलेखनासाठीं तीन लहान आणि एक उंच अशीं चार टेबलें ठेवलीं होतीं. बसून स्वरलेखन करून दमला कीं तो या उंच टेबलापाशीं उभा राहून काम करीत असे. एका टेबलापाशीं बसून स्वरलेखन करीत असतांना मध्येंच दुसऱ्या ऑपेराचें स्वरलेखन करण्याची स्फूर्ति आली कीं तो दुसऱ्या टेबलाकडे जात असे. प्रत्येक टेबलावर स्वरलेखन करण्यासाठीं कागद उघडून ठेवलेले असत. प्रत्येक ऑपेराच्या भाववृत्तीशीं जुळेल असें पेय त्यानें त्या त्या टेबलापाशीं ठेवलेलें असे.

दोन वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारा कलावंत पुष्कळ वेळां टीकाकारांच्या रोषाला पात्र होतो. या दोन्ही क्षेत्रांत त्यानें केलेल्या कामगिरीचें एकूण मूल्य-मापन करणें या टीकाकारांना कठीण जात असावें म्हणूनच हें असें होतें. क्लासिकल संगीताच्या क्षेत्रांतले व्हिक्टरच्या बरोबरचे लोक त्याच्या सुगम संगीताच्या लोकप्रियतेला नाकें मुरडीत. सुगम संगीताच्या क्षेत्रांतले लोक मात्र त्याचें फार कौतुक करीत. व्हिक्टरनें केलेल्या स्वरलेखनाची ऑर्केस्ट्रासाठीं निराळीं मांडणी करावी लागत नसे. कारण व्हिक्टर स्वतःच ती करी. ऑर्केस्ट्राच्या रूपांतच तो स्वरलेखनाचा विचार करी. तो पिआनोवर बसून स्वरलेखन करीत नसे. पिआनो त्याला विशेष चांगला वाजवतां येत नसे. पिआनोवर स्वरलेखन करीत असतांना ऑर्केस्ट्रांतलीं सगळीं वाद्यें ऐकूं येत नसल्यानें पिआनो त्याला अपुरा वाटे.

पुष्कळ वेळां दुसऱ्यांच्या मेलडी व्हिक्टर आपल्या नांवावर खपवतो अशी टीका त्याच्यावर होई. व्हिक्टरची स्मरणशक्ति असाधारण होती. त्यामुळें स्वतःला सुचलेले सूर कुठले आणि पूर्वीं कधीं ऐकून स्मरणांत राहिलेले सूर कुठले हें त्याच्या ध्यानांत येत नसावें. पुष्कळ वेळां एखादी नवी सुरावट रचल्यानंतर तो ती आपल्या मित्राला वाजवून दाखवी आणि उत्सुकतेनें त्याला विचारी, "हे कुठले सूर आहेत सांग बरं." पुढें व्हिक्टर हर्बर्टनें आपण श्रेष्ठ संगीतकाराच्या कलाकृतींतून कांहीं गोष्टी उचलल्याचें कबूल केलें. हर्बर्टच्या बेब्ज् इन् टॉयलँडमधील मार्च ऑफ धी टॉइज् वर बसवलेला त्याचा ऑर्केस्ट्रा रेडिओवर अनेकदां वाजवला गेला होता.

मागणी आल्यानंतरच व्हिक्टर हर्बर्ट स्वरलेखन करीत असल्यामुळें गीताचे स्वर कोण गाणार आहे हें पुष्कळदां त्याला ठाऊक असे. 'बॅबेट' हा व्हिक्टरनें लिहिलेला ऑपेरा त्याच्या दृष्टीनें फारसा यशस्वी झाला नाहीं. परंतु त्यांत गाणाऱ्या फ्रिझी शेफ् या गायिकेनें मात्र मोठें नांव कमावलें. श्रोत्यांनीं तिला विलक्षण दाद दिली. त्यामुळें ती इतकी खूष झाली कीं, ऑपेरा संपल्यावर सर्व श्रोत्यांच्या समोर व्हिक्टर हर्बर्टला तिनें स्टेजवर बोलाविलें आणि त्याला आलिंगन देऊन त्याचें चुंबन घेतलें. वर्तमानपत्रांनीं या आलिंगनचुंबनाचा खूप गाजवाजा केला. व्हिक्टर हर्बर्टनें देखील आपल्या परीनें तेंच केलें.

दोन वर्षांनंतर हर्बर्टच्या अत्यंत लोकप्रिय झालेल्या 'मिले मॉडिस्टे' या ऑपेरांत याच गायिकेनें काम केलें. या ऑपेरांतलें 'किस मी अगेन' हें गीत अतिशय लोकप्रिय झालें. या गाण्याच्या लेखनाविषयींची हर्बर्टनें सांगितलेली गोष्ट अशी : "एकदां मिले मॉडिस्टे या ऑपेराचा लेखक मला भेटायला आला. हा ऑपेरा लिहिल्याचें मला सांगून तो म्हणाला कीं, फ्रिझी शेफ् खूष होऊन जाईल असें एक गाणें यांत मीं लिहावें. इतर गाण्यांत हें गाणें अगदीं वेगळें उठून दिसलें पाहिजे. याप्रमाणें मीं स्वरलेखन करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु ऑर्केस्ट्रा आणि इतर जलसे यांच्या कामांत मला माझें मन या कामावर एकाग्र करतां येईना. असे बरेच दिवस गेले. शेवटीं मीं बैठक मारून हें काम तडीला नेण्याचें ठरवलें. मी जर मांडी मोडून बसलों नाहीं तर ही सुरावट मला कधींच रचतां येणार नाहीं असें मला वाटलें. त्या दिवशीं रात्रीं याचाच विचार करीत मी झोपीं गेलों. अचानक मला जाग

आली. मी उठलों आणि सुचलेल्या बत्तीस पट्ट्या लिहून काढल्या. विजयाच्या भावनेनें मी झोपीं गेलों."

हर्बर्टनें सांगितलेली आठवण ही अशी. परंतु या ऑपेराच्या प्रकाशकानें पुढें या गोष्टीला स्वतःच्या आठवणीची जी पुस्ती जोडली ती अशीः "'किस मी अगेन' हें गाणें आधीं या ऑपेरांत नव्हतेंच. 'इफ आय वेअर ऑन धी स्टेज' हें संघगीत या ऑपेरांत होतें. मुख्य गायिकेच्या (फ्रिझी शेफ्) भावना व्यक्त करणारा तो प्रवेश होता. या संघगीतांतली एक ओळ 'किस् मी अगेन' विशेष उठून दिसत होती. तेव्हां मी हर्बर्टला या ओळीवर संपूर्ण गीताचें स्वरलेखन करावें असें सुचवलें. त्याप्रमाणें मीं लेखकाकडून हें गाणें नव्यानें लिहून घेतलें आणि व्हिक्टर हर्बर्टनें मग त्याचें स्वरलेखन केलें." हें गाणें इतकें लोकप्रिय झालें कीं, त्याच्या प्रतींचा खप सात हजारांवरून दहा लक्षांवर गेला. यानंतर कांहीं वर्षांनीं व्हिक्टर हर्बर्टनें आवाजांत चोरटा गोडवा आणणाऱ्या एका गायकानें किस मी अगेन हें गीत म्हटलेलें ऐकलें. आपल्या गीताची अशी वाट लागलेली पाहिल्यामुळें व्हिक्टर हर्बर्ट संतापला. लेखक, संगीतलेखक आणि प्रकाशक यांचे कॉपी राइट सुरक्षित रहावे या दिशेनें व्हिक्टर हर्बर्टनें जो प्रयत्न केला त्याची सुरवात यामुळेंच झाली.

व्हिक्टर हर्बर्टच्या धी रेड मिल या ऑपेराच्या पहिल्या प्रयोगाच्या वेळीं थिएटरच्या मॅनेजरनें बाहेर तांबड्या दिव्यांनीं सजवून एक फिरती पवनचक्की लावली होती. ब्रॉडवे येथील हलत्या दिव्यांची ही पहिली जाहिरात.

व्हिक्टर हर्बर्ट पन्नास वर्षांचा झाला तेव्हां सुगम संगीत आणि क्लासिकल संगीत या दोन्ही क्षेत्रांत त्यानें उत्तम नांव कमावलें होतें. त्या काळांत अमेरिकन ऑपेरांविषयीं लोकांच्या मनांत तेवढा जिव्हाळा नसे. युरोपमधून आलेलें संगीतच चांगलें अशी अमेरिकन जनतेची भावना होती. इतर भाषांत ग्रँड ऑपेरा ऐकण्याची लोकांना संवय होती. परंतु हाच ऑपेरा इंग्रजी भाषेंत अगदींच सपक आणि मूर्खपणाचा वाटतो असें त्यांना वाटे. एका विशिष्ट तऱ्हेनें विचार करायची लोकांना संवय लागली कीं ती बदलायला वेळ लागतो. अमेरिकन गायक आणि संगीतलेखक यांची जनतेंत कदर व्हायला यामुळें बराच काळ जावा लागला.

पुढें दिवस बदलले. अमेरिकेच्या या लाडक्या संगीतकारानें लिहिलेले

लाइट ऑपेरे गर्दी खेचून घ्यायला असमर्थ ठरूं लागले. त्याची लोकप्रियता ओसरतीला लागली. संगीताच्या जगांतली फॅशन बदलत होती. संगीताच्या बहुरंगी खेळासाठीं व्हिक्टर हर्बर्ट आतां खास लेखन करण्याचा प्रयत्न करूं लागला. एका प्रोड्यूसरला व्हिक्टरनें लिहिलेल्या सुरावटींत जाझ् संगीताचा तुकडा घुसडून द्यायचा होता. हर्बर्टला तें करतां येईना. स्वप्नरम्य कथांवर ज्या काळांत ऑपेरा आधारलेले असत तेव्हांच्या काळांतला व्हिक्टर हर्बर्ट होता. त्या वेळीं ऑपेरांत संघगीतें असत, प्रेमगीतें असत, ऑर्केस्ट्राची भरगच्च साथ असे. पण ते दिवस आतां भूतकाळांत जमा झाले होते. अनेक प्रकारांची भेळ असलेले बहुरंगी संगीत कार्यक्रम (Revue) आतां लोकप्रिय होऊं लागले होते. जाझ् संगीताचा प्रभाव सर्वत्र पडत होता. व्हिक्टर हर्बर्ट आणि त्याचे ऑपेरा जुनाट समजले जात होते. अगदीं नजिकचा भूतकाळच माणसांना अधिक जुनाट वाटतो. कांहीं लोक कधीं कधीं हर्बर्टला विचारीत कीं, 'किस मी अगेन' सारखे वॉल्स तो अलीकडे कां लिहीत नाहीं ? यावर व्हिक्टर हर्बर्ट उत्तर देई कीं, याहिपेक्षां चांगलें लिहिलें आहे. पण लोकांची अभिरुचि बदलल्यामुळें कुणाचेंच त्यांच्याकडे लक्ष नाहीं.

सुप्रसिद्ध व्हाइटमनच्या जलशांत व्हिक्टर हर्बर्टचें स्वीट ऑफ सेरेनेडस् वाजवलें गेलें. याच व्हाइटमनसाठीं गर्शवीननें र्‍हॅप्सोडी इन् ब्ल्यू लिहिलें होतें. व्हिक्टर हर्बर्टनें जाझ संगीत लिहिलें नाहीं; परंतु जाझ ऑर्केस्ट्रासाठीं लिहिण्याचा हा त्याचा पहिला प्रसंग होता. एकच मनुष्य दोन दोन वाद्यें वाजवतो या गोष्टीचा आपल्याला इथें त्रास होतो असें तो म्हणे. तेव्हां त्याला ऑबो हवा असेल तेव्हा ऑब्रो वाजवणार्‍याच्या हातांत क्लॅरिओनेट दिसे.

व्हिक्टर हर्बर्टचें ऑर्केस्ट्रेशनवर प्रभुत्व होतें. जॉर्ज अर्शव्हिनला ऑर्केस्ट्रेशन शिकवतों असें तो म्हणाला होता. पण लौकरच व्हिक्टर हर्बर्टचा मृत्यु झाला. अर्व्हिंग बर्लिनचें संगीताच्या तांत्रिक ज्ञानाकडे लक्ष वेधण्याचा व्हिक्टर हर्बर्टनें प्रयत्न केला होता. तो बर्लिनला म्हणाला होता, "संगीताच्या शास्त्राची माहिती करून घेतली तर आपल्याला सुचणार्‍या मेलडींची उत्स्फूर्तता अवघडेल असें मानणें चुकीचें आहे. उलट, संगीताच्या तांत्रिक ज्ञानामुळें तुमच्या कलाकृतींत सुधारणा होण्याची शक्यता असते."

चित्रपटासाठीं संगीतरचना करणारा व्हिक्टर हर्बर्ट हा पहिला महत्त्वाचा

अमेरिकन संगीतकार होय. व्हिक्टर भराभर स्वरलेखन करूं शकत असे. जेव्हां तो स्वरलेखन करीत नसे तेव्हां तो जागरण करून पूर्वी केलेलें स्वरलेखन वाजवीत बसत असे. मे महिन्यांतल्या एका दिवशीं बराच वेळ रियाज केल्यानंतर तो आपल्या एका आवडत्या हॉटेलांत जेवण्यासाठीं गेला. कांहीं वेळ त्यानें मित्रांसोबत घालवला. कारण व्हिक्टर जाई तिथें त्याला मित्र मिळत. हॉटेलांत एका टेबलापाशीं त्याच्या ओळखीचा एक गृहस्थ जेवत होता. तो पाव खात होता. त्याच्याजवळून जातांना व्हिक्टर त्याला गंमतीनें म्हणाला कीं, आतां आपण म्हातारे झालों आहोंत, पाव खाणं बरं नव्हे! नंतर तो मनुष्य हर्बर्टच्या टेबलाजवळून गेला. हर्बर्ट सँडविच् खात बसला होता. आतां तो मित्र हर्बर्टला म्हणाला कीं, वय झालं बाबा, आतां सँडविच् नको! यावर हर्बर्ट उत्तरला, "चार्ली, मी अजून खिळेसुद्धां खाऊन पचवूं शकेन."

अर्थात् व्हिक्टर हर्बर्टला असें स्वतःच्या भुकेविषयीं नेहमींच वाटत असे. त्याला जवळून ओळखणारे लोक सांगत कीं, त्यानें खाण्याच्या बाबतींत संयम न ठेवल्यानें मरण जवळ ओढवून घेतलें. त्या दिवशीं तो हॉटेलांत खात असलेलें सँडविच् हेंच त्याचें अखेरचें जेवण ठरलें. दुपारीं बरें वाटेना म्हणून तो डॉक्टरला भेटायला गेला. डॉक्टर बाहेर गेला होता. डॉक्टर परत येण्याच्या आंतच व्हिक्टरचें प्राणोत्क्रमण झालेलें होतें.

डीम्स टेलरनें व्हिक्टर हर्बर्टविषयीं लिहिलें आहे, "मध्ययुगीन भाटांच्या परंपरेंतला तो अखेरचा दुवा होता. गीतलेखनाची त्याला देणगी होती. त्याच्या संगीतांत चमक होती, चैतन्य होतें. त्याच्या सुरावटीची मनाला मोहिनी पडे. पुष्कळशा कलावंतांच्या कलाकृतींमुळें संगीतकलेला एक प्रकारचा दिखाऊपणा, स्वयंकेंद्रित अवघडलेपणा प्राप्त होतो. परंतु व्हिक्टर हर्बर्टमुळें संगीतकलेला प्रसन्नता लाभली."

व्हिक्टर हर्बर्ट :
जन्म : आयर्लंडमधील डब्लिन येथें.
१ फेब्रुवारी १८५९.
मृत्यु : न्यू यार्क येथें.
२७ मे १९२४.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ........................ दि: ..........
क्रमांक ........................ नों दि ..........

## एडवर्ड मॅक्डुवेल्

"परोपकार हाच श्रेष्ठ धर्म"

अमेरिकेच्या भूमीवर गोऱ्या लोकांचें पहिलें पाऊल पडलें तें धर्मस्वातंत्र्य मिळवण्यासाठीं. धर्मकल्पना हा त्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होता. ज्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं धडपड केली तें स्वातंत्र्य इतरांना आणि खुद्द त्यांच्याच मुलांबाळांनाहि हवें ही गोष्ट खरें म्हणजे त्यांना कळायला पाहिजे होती. परंतु या जगाला कुठलीहि गोष्ट शिकायला फार वेळ लागतो. आपल्याला जें वाटतें तेंच सत्य, इतरांनीं त्याप्रमाणेंच वागायला पाहिजे असेंच बहुतेक माणसांना वाटत असतें, अर्थात् लहानपणीं जें आपल्याला मिळालें नाहीं, जी संधि आपल्याला घेतां आली नाहीं, ती आपल्या मुलाला मिळावी असें वाटणारा एखादा मनुष्य असतोच.

ॲब्राहम लिंकन अमेरिकेचा अध्यक्ष होता त्या काळांतली गोष्ट. न्यू यॉर्क-मधील २२०, क्लिंटन स्ट्रीट येथें क्वेकर पंथीयांच्या वस्तींत थॉमस मॅक्डुवेल नांवाचा एक व्यापारी राहात होता. तो आयरिश-स्कॉच वंशाचा होता. क्वेकर सांप्रदायाचा तो एकनिष्ठ अनुयायी होता. आपल्या बापाच्या इच्छेपुढें न वांकतां स्वतःच्या इच्छेप्रमाणें जर आयुष्य घडवतां आलें असतें तर थॉमस मॅक्डुवेल चित्रकारच झाला असता. तरुणपणीं त्याला कलेचें वेड होतें, तो सुंदर चित्रें काढीत असे. निसर्गावर त्याचें प्रेम होतें आणि निसर्गचित्रें रेखाटण्यांत त्यानें आपलें आयुष्य सुखानें व्यतीत केलें असतें. परंतु थॉमसचे

वडील कला हा पुरुषमाणसाचा व्यवसाय होऊं शकत नाहीं असें मानणाऱ्या लोकांपैकीं होते. चित्रकलेच्या या वेडांत अर्थ काय ? आपल्या मुलानें व्यापार केला पाहिजे असें त्यांना वाटे. आणि त्याप्रमाणें त्यांनीं मुलाला करायला लावलें. थॉमस मॅकडुवेल शहरांतल्या आपल्या व्यापारी कचेरींत दिवसामागून दिवस जात राहिला. थॉमसचें एका सुंदर इंग्लिश मुलीशीं लग्न झालें. ती क्वेकर संप्रदायाची नव्हती. थॉमसला दोन मुलें झालीं. त्याचा मोठा मुलगा वॉल्टर तीन वर्षांचा असतांना दुसरा मुलगा एडवर्ड अॅलेक्झँडर जन्माला आला.

लहान असतांना दर रविवारीं थॉमसच्या या दोन्ही मुलांना क्वेकर संप्रदायाच्या धार्मिक सभांना जावें लागे. या सभांत उंच पाठीच्या कडक बाकांवर त्यांना मौन पाळून तासन्तास बसावें लागे. या मौनी सभेंत भाषणें नसत, संगीत नसे, गाणें नसे. ध्यानस्थ बसल्यासारखे सगळे मूक बसत. मधेंच जर एखाद्या माणसाला आध्यात्मिक स्फूर्ति झाली तर तो उठून थोडेंसें बोले. सभागृहांत एका बाजूला बायका आणि दुसऱ्या बाजूला पुरुष बसत. तरुण मुलांना हें एकूण जाचाचेंच होई. या सभांचा एडवर्डवर इतका खोल परिणाम झाला कीं, मोठेपणीं चर्चमध्यें गेल्यावर गाणें किंवा भाषण चालू असतांना तो नकळत दरवाजापाशीं येऊन बसे. आपण पकडले जाऊं आणि उंच पाठीच्या बाकावर बंदिस्त होऊन पडूं, तिथून आपली सुटका होणार नाहीं, ही भावना त्याच्या मनांतून कधींच मावळली नाहीं.

आपले मुलगे क्वेकर पंथाचे चांगले अनुयायी ठरावेत असा थॉमसचा प्रयत्न असे. परंतु थॉमसचे वडील त्याच्या बाबतींत जसे कडक होते तसा तो आपल्या मुलांच्या बाबतींत कडकपणें वागत नसे. आपल्या बापाकडून स्कॉच-आयरिश वंशांतले कांहीं गुण एडवर्डच्या रक्तांत उतरले होते.

जगांतलें बरेंचसें उत्कृष्ट असें लोकसंगीत स्कॉटलंड आणि आयर्लंड इथलेंच आहे. जुन्या आयर्लंडमधल्या लोककथा पऱ्या, वनदेवता यांनीं भरलेल्या आहेत. या कहाण्यांवर तिथल्या लोकांचा पूर्ण विश्वास असे. एडवर्डचासुद्धां या कथांतल्या पात्रांवर पूर्ण विश्वास असे. या कथा वाचण्यांत तो गढून गेलेला असे. शहरांत राहात असूनसुद्धां खेड्यांतल्या रानांतून भटकणें, तिथें लपलेल्या वनदेवतांच्या विचारांत गुंग होऊन एकटें फिरणें त्याला अधिक आवडे.

आपल्या बापाकडून चित्रकलेची देणगी एडवर्डला मिळाली होती. तो

आपला बराचसा वेळ चित्रें काढण्यांत घालवी. त्याच्या आईनें त्याला चित्रें काढण्यासाठीं वही आणून दिली. या बाबतींत लहानपणीं आपला कसा कोंडमारा झाला होता याची थॉमसला आठवण असल्यामुळें त्यानें या गोष्टीला हरकत घेतली नाहीं.

एडवर्डच्या आईला चित्रकलेची किंवा संगीतकलेची देणगी अशी नव्हती. परंतु आपल्या मुलानें या क्षेत्रांत कांहीं तरी करावें अशी तिची आकांक्षा होती. जीवनांतल्या गंमती-जंमतीकडे आपल्या छोट्या मुलाचा नैसर्गिक ओढा आहे याची तिला जाणीव होती. संगीत, चित्रकला, साहसें आणि परीकथा ही मुलाची अभिरुचि क्वेकर पंथीयांच्या घरांत उथळ, थिल्लर मानली जाणार हें तिला ठाऊक होतें. आपल्या मुलाची अभिरुचि आणि घरांतलें हें वातावरण यांच्यांतल्या विरोधाची तिला जाणीव होती. आणि म्हणूनच आपल्या या मुलाला वाढवतांना अतिशय काळजी घेतली पाहिजे असें तिला वाटे. हा मुलगा राहायचा शहरांत, घरांत वातावरण क्वेकर पंथाचें, पण असें असूनहि तो दिवास्वप्नांत गुंगून जायचा, आपल्या कल्पनेच्या विश्वांतच रमायचा. याचा अर्थच असा कीं, हा मुलगा चारचौघांपेक्षां वेगळा असावा.

एडवर्ड स्वप्नाळू होता. पण बायकी नव्हता. आपलीं खेळणीं तो फोडून टाकूं शकत असे! एकदां ख्रिसमसला आपोआप चालणाऱ्या कळीच्या खेळण्यांनीं वॉल्टर आणि एडवर्ड खेळले. कांहीं वेळानें त्यांना कंटाळा आला. तेव्हां त्यांनीं तीं सगळीं खेळणीं मोडून टाकलीं. एडवर्ड एखाद्या कामाला अगदीं नेटानें लागत असे. क्वेकर सांप्रदाइकाला न शोभणारी आणखी एक गोष्ट त्याला करतां येत असे—आणि ती म्हणजे मारामारी. गुलामीविरुद्ध सुरू झालेलें युद्ध नुकतेंच संपलें होतें तेव्हांची गोष्ट. त्या काळांत देशभक्तीची भावना तीव्र असे. एडवर्ड तेव्हां सात वर्षांचा होता. एकदां तो रस्त्यानें जात असतांना एक द्वाड परदेशी मुलगा अमेरिकेच्या ध्वजाविषयीं अपमानकारक शब्द बोलला. एडवर्डला तें सहन झालें नाहीं. त्यानें त्या पोराशीं मारामारीला सुरवात केली. कांहीं वेळानें एडवर्डच्या आईनें त्यांना गटारांत लोळतांना पाहिलें. यानंतर कांहीं वर्षांनीं, तेव्हां एडवर्डचें वय विशीच्या आंतच होतें, तो जर्मन शिकत असतांना एका अमेरिकन मित्राबरोबर रस्त्यानें चालत होता. रस्त्यावरचा एक आढ्यताखोर जर्मन पोलीस या त्याच्या अमेरिकन मित्राविषयीं

कांहींतरी अनुदारपणें बोलला. तें ऐकतांच एडवर्ड संतापला आणि त्या पोलिसाच्या अंगावर धावून गेला. एडवर्डच्या मित्रानें एडवर्डला आवरलें. या सगळ्या गोष्टींवरून एडवर्ड लाजाळू आणि संवेदनाशील असला तरी अन्याय सहन करणारा नव्हता ही गोष्ट दिसून येते.

एडवर्डच्या लहानपणीं रेडियो किंवा फोनोग्राफ नव्हते. त्यामुळें वाचनासाठीं किंवा स्वतःची करमणूक करून घेण्यासाठीं एखाद्या छंदाचा विकास करण्यासाठीं लोकांना वेळ मिळत असे. एडवर्डला वाचनाचें वेड होतें. तसेंच, घरांत असो किंवा घराबाहेर असो तो सारखा चित्रें काढीत असे.

एकदां हें सगळें कुटुंब त्यांच्या आजोबांच्या शेतावर राहायला गेलें. वॉल्टर आणि एडवर्ड यांना संगीताचा पहिला धडा मिळाला तो इथें. वॉल्टरपेक्षां एका वर्षानें मोठा असलेला त्याचा चुलतभाऊ चार्लस् हा या वेळीं इथें होता. एकदां सकाळीं थंडी पडली होती. मुलें न्याहारीची वाट पहात होतीं. जेवणाच्या खोलींत एडवर्डच्या आईनें मुलांना रांगेत उभे केलें होतें आणि ती त्यांना गायला शिकवीत होती : "ट्रॅम, ट्रॅम, ट्रॅम द् बॉयज् आर मार्चिंग."

हें युद्धगीत त्या वेळीं उत्तर अमेरिकेंत अतिशय लोकप्रिय झालें होतें. आईनें शिकवलेलें हें गाणें गात, हातानें टाळ्या वाजवीत मुलें खोलींत कवायतीच्या तालावर चालत होतीं. एडवर्डचें वय तेव्हां तीन वर्षांचें होतें. पण गंमत अशी कीं, गाण्याची चाल आणि ताल या बाबतींत तोच सर्वांत अचूक होता. संगीताच्या बाबतींत त्याला मिळालेली ही उपजत देणगी पाहून त्याला शिकतां यावें यासाठीं त्याच्या आईवडिलांनीं घरांत एक पिॲनो विकत घेतला. दक्षिण अमेरिकेंतला एक पिॲनो–शिक्षक एडवर्डला शिकवण्यासाठीं त्यांनीं घरांतच ठेवून घेतला. एडवर्डच्या आजोबांना मात्र हा प्रकार भयंकर वाटला. एडवर्डनें कांहींतरी उपयुक्त काम शिकावें असें त्याच्या आजोबांना वाटत होतें. बाजा वाजवीत माकडांचे खेळ करीत फिरणारा मनुष्य आणि संगीतकार हे एकाच दर्जाचे आहेत असें आजोबा मानीत असत.

आजोबांचा हा दृष्टिकोन अमेरिकन होता किंवा क्वेकर संप्रदायाचा होता असें मानण्याचें कारण नाहीं. कारण युरोपमध्यें जुन्या काळापासून परंपरेनें हाच दृष्टिकोन चालत आला होता. रॅशमॅनिऑफ किंवा सिबेलिअस यांची जीवनकथा वाचली तर त्यांच्याहि आजोबांना एडवर्डच्या आजोबांसारखें वाटत

होतें हें कळतें. हा गैरसमज संगीतकारांना श्रीमंतांच्या घरीं नोकराचा दर्जा होता तेव्हांपासून चालत आला होता. फक्त राजपुत्रच आपल्या दरबारांत संगीतकारांना नोकर म्हणून ठेवूं शकत असत. हेडन्सारख्या प्रसिद्ध संगीतकारालासुद्धां त्याचा आश्रयदाता प्रिन्स इस्टरहेझी याच्या दरबारांत नोकरांचा पोशाख घालून वावरावें लागे. या परिस्थितीच्या विरुद्ध बिथोवननें बंड केलें होतें. आपला उदार आश्रयदाता प्रिन्स लॅबकॉविझ याला बिथोवननें एकदां खडखडीतपणें बजावलें होतें कीं, संगीतकलेची आपल्याला देणगी असल्यामुळें खानदान कुटुंबांतल्या कुठल्याहि धनिक माणसाएवढा दर्जा आणि मानाची वागणूक आपल्याला मिळाली पाहिजे. बिथोवनच्या या स्वतंत्र, स्वाभिमानी वृत्तीमुळें युरोपमधल्या संगीतकारांचा सामाजिक दर्जा उंचवायला मोठी मदत झाली. ही जशी एक बाजू आहे त्याप्रमाणेंच लेखकांचा आणि संगीतकारांचा या आश्रयदात्यांच्या परंपरेविषयीं चांगला अनुभव असलेलाहि एक वर्ग आहे. व्हिक्टर हर्बर्टचें असें मत होतें कीं, अमेरिकेंत आश्रयदात्यांचा हा वर्ग नसल्यामुळें संगीताचा व्हावा तेवढा विकास होत नाहीं. ही मात्र गोष्ट खरी कीं, अमेरिकेंत कलेला उत्तेजन मिळावें इतकी जेव्हां राष्ट्राची समृद्धि वाढली तेव्हांपासून संगीतकलेचा वेगानें विकास सुरू झाला.

अगदीं लहानपणीं एखाद्या क्षेत्रांत प्रगतीचा अद्‌भुत चमत्कार करून दाखवणारीं मुलें असतात तसा एडवर्ड मॅक्डुवेल नव्हता. त्याला शिक्षणाची आवड होती, परंतु रियाज करण्याचा त्याला कंटाळा होता. शिकवलेला धडा पुन्हां पुन्हां वाजवीत बसण्याऐवजीं पिॲनोवर बसून एखादा स्वतंत्र तुकडा रचायला त्याला आवडत असे. गोष्टी लिहिण्याची आणि चित्रें काढण्याची त्याला आवड होती. एकदां त्याचा संगीतशिक्षक एक तुकडा कसा वाजवायाचा तें एडवर्डला शिकवीत होता. थोडया वेळानें तो एडवर्डकडे पाहतो तर एडवर्ड वहींत या शिक्षकाचें चित्रच काढीत बसला होता. हें पाहून शिक्षकाला फार वाईट वाटलें.

एडवर्डच्या कांहीं बाबतींत आवडीनिवडी फार तीव्र होत्या. एड किंवा एडी असा आपल्या नांवाचा अपभ्रंश करून कोणी हांक मारलेली त्याला आवडत नसे. आपली एकसारखी कोणीं काळजी करणें, आपला मुका घेणें आणि नृत्यशाळेंत जाणें या तिन्ही गोष्टींचा त्याला कंटाळा होता. नृत्याच्या शाळेंत

जाणें ही गोष्टच मुळीं क्वेकर सांप्रदाइकांच्या विचारांत बसणारी नव्हती. एडवर्डला नृत्याच्या शाळेंत पाठवण्याची कल्पना अर्थातच त्याच्या आईची असणार हें उघड होतें. आपल्या आईच्या इच्छेप्रमाणें तो नृत्य शिकायला जाऊं लागला. तो देखणा होता. काळेभोर केस, चकाकते निळे डोळे, गौरवर्ण आणि गुलाबी गाल यांमुळें त्याची इच्छा नसतांनाहि तो मुलींच्या वर्तुळांत प्रिय होऊं लागला. ताल या गोष्टीचें त्याला उपजत भान होतें. अर्थातच तो चांगला नाचत असे. परंतु नृत्य शिकण्यापेक्षां बेसबॉल खेळण्याकडेच त्याचें अधिक लक्ष असे.

दक्षिण अमेरिकेंतली पिॲनो वाजवणारी एक तरुण मुलगी न्यू यॉर्कमध्यें आली होती. ती अत्यंत बुद्धिमान वादिका होती. तिच्या कार्यक्रमांना तुडुंब गर्दी होई. या असामान्य पिॲनोवादिकेचें नांव होतें टेरेसा कॅरीनो. ती न्यू यॉर्कला आली तेव्हां अठरा वर्षांची होती. परंतु वयाच्या नवव्या वर्षापासूनच चमत्कार केल्यासारखी ती अतिशय सुंदर पिॲनो वाजवूं लागली होती. एडवर्डला पिॲनो शिकवणारा दाक्षिणात्य शिक्षक ब्यूट्रॅगो याच्याबरोबर कॅरीनो मॅक्‌डुवेलांच्या घरीं आली. एडवर्डनें तिला पिॲनो वाजवून दाखवला. तेव्हां या मुलाला आपण पिआनो शिकवूं असें ती स्वतः होऊन म्हणाली. एडवर्डचा शिक्षक ब्यूट्रॅगो हा खरा होता व्हायोलिनवादक. त्यामुळें पिॲनो शिकवण्यांत त्याचें तेवढें लक्ष नव्हतें. एडवर्ड आतां कॅरीनोकडे शिकूं लागला. टेरेसा कॅरीनो स्पॅनिश स्त्रीसौंदर्याचा नमुना होती. तिच्या वृत्तींत आणि वागण्यांत एक प्रकारचा जोरकसपणा, जिव्हाळा होता. शिकवलेला एखादा तुकडा एडवर्डनें वाजवून दाखवला कीं ती त्याला घट्ट जवळ घेऊन त्याचे पापे घेई. एडवर्डला हें मुळींच आवडत नसे. कॅरीनोला लौकरच हें कळून चुकलें, तेव्हां यानंतर एडवर्डनें रियाज केला नाहीं तर ती त्याला दम न देतां त्याचे मुके घेण्याची भीति घालत असे. मग एडवर्ड अगदीं सरळ येई.

एडवर्ड प्रथम पब्लिक स्कूलमध्यें गेला आणि नंतर एका खाजगी फ्रेंच शाळेंत त्यानें नांव घातलें. थर्ड ॲव्हेन्यूमधील पूर्वेकडच्या एकोणिसाव्या रस्त्यावर तेव्हां मक्‌डुवेल कुटुंब राहात होतें. या वेळीं एडवर्डला एक बक्षीस मिळालें. हें बक्षीस संगीत, चित्रकला किंवा फ्रेंच भाषा यांसाठीं नव्हतें. हें बक्षीस मिळाल्यामुळें एडवर्डच्या वडिलांना इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्यांचा या

गोष्टीवर क्षणभर विश्वासच बसेना. एके दिवशीं घरांतलीं मुलें एकत्र जमून गप्पा मारीत होतीं. एडवर्डचा चुलतभाऊ चार्लस्सुद्धां तिथें होता. वॉल्टर चार्लस्ला म्हणाला :

"एडीनं काय केलं असेल असं तुला वाटतं?"

"मला माहीत नाहीं काय केलं?"

"एडी हा अगदीं अचाट मुलगा आहे बघ!" वॉल्टर आपल्या धाकट्या भावाच्या अभिमानानें म्हणाला, "आतां हेंच पहा!" असें म्हणून त्यानें खणांतून एक पिस्तुल काढलें आणि तो पुढें म्हणाला, "नेमबाजीच्या स्पर्धेत आपल्याला हें मिळावं असं तुला वाटतं कीं नाहीं? एडीनं तें मिळवलंय."

मग हीं सगळीं मुलें मागील अंगणांत गेलीं. वॉल्टरनें नेम मारण्यासाठीं लक्ष्य म्हणून भिंतीवर एक कार्ड लावून ठेवलें. वॉल्टर आणि चार्लस् यांनीं आपला नेम अजमावण्यासाठीं कांहीं गोळ्या झाडल्या. आणि मग त्यांनीं एडी कसा चांगला नेम मारतो हें आपण पाहिलेंच पाहिजे असें ठरविलें.

यापूर्वीं कांहीं दिवस अगोदर एडवर्ड हें पिस्तुल घेऊन घरीं आला होता, आणि त्या वेळीं त्याच्या हातांत तें पाहून त्याच्या वडिलांनीं कडक शब्दांत त्यानें तें कुठून आणलें असें विचारलें होतें. एडवर्डनें सांगितलें तें असे : नेमबाजी शिकण्याची शाळा आहे तिथून एडवर्ड जात होता. शाळेच्या बाहेरच फलकावर एक पत्रक लावलें होतें. त्यावर लिहिलें होतें कीं, आज जो नेमबाजीच्या स्पर्धेत पहिला येईल त्याला हें बक्षीस मिळेल. ही नोटीस वाचून एडवर्ड या स्पर्धेत उतरला आणि त्यानें तें पिस्तुल मिळवलें.

एडवर्डच्या वडिलांचा या हकिगतीवर विश्वास बसेना. या हकिकतीचें खरेंखोटेंपण पाहण्यासाठीं ते त्याला त्या शाळेंत घेऊन गेले. चालकांनीं गोष्ट खरी असल्याचें सांगून मुलाच्या प्रावीण्याबद्दल एडवर्डच्या वडिलांचें अभिनंदन केलें. पुढें एडवर्ड मोठा पिआनोवादक आणि संगीतरचनाकार झाल्यानंतर एडवर्डचे वडील ही गोष्ट मोठ्या अभिमानानें सांगत असत. परंतु ज्या वेळीं त्यानें हें बक्षीस मिळवलें तेव्हां मात्र तें अगदींच घाबरून गेले होते.

एडवर्ड बारा वर्षांचा असतांना त्याची आई त्याला परदेशपर्यटनाला घेऊन गेली. एडवर्डलाहि जग पाहण्याची इच्छा होतीच. जिथल्या लोककथांच्या विश्वांत तो रंगला होता तें आयर्लंड त्याला पाहायचें होतें. तिथें त्याचे पूर्वज राहिले

अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................


होते तें स्कॉटलंड त्याला बघायचें होतें. त्याच्या आईचे नातेवाईक इंग्लंडचे होते. तिथेंहि त्याला जायचें होतें. शाळेंत तो फ्रेंच शिकला होता. आपलें हें फ्रेंच भाषेचें ज्ञान अजमावण्यासाठीं अर्थातच फ्रान्सला जाण्याची त्याची इच्छा होती. संगीत ऐकण्यासाठीं तो जर्मनीलाहि जाणार होता.

त्या उन्हाळ्यांतले आपले समृद्ध अनुभव एडवर्ड कधींच विसरला नाहीं. पुढें त्यानें 'सी पिसेस' या शीर्षकाखालीं पिआनोवरच्या स्वररचना केल्या. त्यांत हे सगळे जुने अनुभव उमटले होते. अटलांटिक समुद्र ओलांडतांना बहुतेक अमेरिकनांच्या मनांत हा समुद्र ओलांडून वसाहत करण्यासाठीं प्रथम अमेरिकेंत आलेल्या यात्रिकांची आठवण जागी होते. मे फ्लॉवर या जहाजांतून आलेल्या त्या यात्रिकांना आपल्या तीन महिन्यांच्या प्रवासांत अटलांटिक पाहतांना काय वाटलें असेल असा विचार अमेरिकनांच्या मनांत येतो. 'ए. डी. १६२०' ही स्वररचना करतांना एडवर्ड मॅक्डुवेलच्या मनांतहि याच भावना जाग्या होत्या.

बरकंदाजांचा बादशहा विल्यम टेल याची भूमि स्वित्सर्लंड येथेंहि एडवर्ड जाऊन आला. बोटींतून तो ऱ्हाइन नदींतून गेला आणि त्यानें जुन्या काळांतल्या लुटारू सरदारांचे किल्ले पाहिले. पॅरिसमध्यें आलेला एक अनुभव मात्र तो कधींच विसरला नाहीं.

पॅरीसमधल्या रस्त्यांतून भटकत असतांना त्याला मिठाई खाण्याची इच्छा झाली. तिथल्या मिठाईविषयीं त्यानें खूप ऐकलें होतें. एका दुकानावर त्यानें पाटी पाहिली. त्या पाटीवर असलेल्या शब्दाचा अर्थ मिठाई असावा असें वाटलें. तो दुकानांत गेला. दुकानांत मिठाई दिसेचना. त्याला वाटलें मिठाई बाहेर न ठेवण्याची फ्रेंच पद्धत असावी. पाटीवरचा तो फ्रेंच शब्द वापरून त्यानें मिठाई मागितली. दुकानांतल्या मुली खुदुखुदु हसूं लागल्या. थोड्या वेळानें त्यांनीं बायकांचें आंतले कपडे आणले तेव्हां ज्या फ्रेंच शब्दाचा अर्थ एडवर्डनें मिठाई असा घेतला होता त्याचा खरा अर्थ त्याला कळला. फ्रेंच भाषेंतला हा धडा एडवर्डला पुन्हां कधीं शिकावा लागला नाहीं. लाजेनें लाल झालेलें तोंड घेऊन तो बाहेर पळाला.

एडवर्ड तेरा वर्षांचा झाला तेव्हां त्यानें न्यू यॉर्कमधली ती फ्रेंच शाळा सोडली. यानंतर तो संगीत शिकूं लागला. आपल्या मुलानें मोठा पिआनोवादक

व्हावें अशी त्याच्या आईची आकांक्षा होती. युरोपचा प्रवास एकदां केल्यानंतर तीन वर्षांनीं एडवर्डची आई त्याला घेऊन पुन्हां एकदां प्रवासाला गेली. आतां तो पंधरा वर्षांचा झाला होता. पॅरीसमधल्या एका संगीतशाळेच्या प्रमुखाकडे त्याच्या आईनें त्याला ठेवलें. एडवर्ड आतां मन लावून शिकत होता. सकाळीं सहा वाजतां तो कामाला सुरवात करी ती थेट रात्रीं नऊ वाजेपर्यंत. पिआनोबरोबरच तो स्वरलेखन आणि संगीतांतल्या उपपत्ति (Theory) शिकत होता. फ्रेंच भाषाहि त्याला चांगली शिकणें भाग होतें.

एकदां वर्गांत फ्रेंचचा धडा चालला होता. शिक्षक शिकवीत होते. फ्रेंच व्याकरणाच्या आड आपला हा विद्यार्थी एडवर्ड कांहीं तरी लपवतो आहे ही गोष्ट शिक्षकांच्या ध्यानांत आली. हातांत पेन्सिल असली कीं एडवर्डचा चित्र काढण्याचा उद्योग सुरू असे. एडवर्ड आतांहि तेंच करीत होता. शिक्षक जवळ येतांच आतां आपली चांगलीच खरडपट्टी निघणार असें त्याला वाटलें. कारण एडवर्डनें या वेळीं खुद्द त्या शिक्षकांचेंच चित्र काढलें होतें. या शिक्षकांचें नाक जरा फाजील मोठें होतें. एडवर्डच्या चित्रांत अर्थातच या नाकाचा मोठेपणा उतरला होता. शिक्षकांनीं तें चित्र पाहिलें. एडवर्डला आश्चर्य वाटलें. कारण खरडपट्टी काढण्याऐवजीं तूं चित्रकला कुठें शिकलास असा प्रश्न त्यांनीं विचारला. एडवर्ड कुठेंहि शिकलेला नव्हता, आणि तसेंच त्यानें सांगितलें. कुठेंहि न शिकतां इतकें असाधारण कौशल्य या मुलाच्या हातांत कसें याचें त्या शिक्षकांना आश्चर्य वाटलें. शिक्षकांनीं तें चित्र आपल्याकडे ठेवून घेतलें.

ही गोष्ट इथेंच थांबली नाहीं. कांहीं दिवसांनीं फेंचच्या त्या शिक्षकांनीं एडवर्डच्या आईला बोलावणें पाठवलें. ते तिला म्हणाले कीं, आपण एडवर्डनें काढलेलीं चित्रें आपल्या एका थोर चित्रकार मित्राला दाखवलीं. त्या चित्रकारालाहि एडवर्डच्या कौशल्याचें आश्चर्य वाटलें आणि त्यानें सुचवलें कीं, आपण या मुलाला तीन वर्षें आपल्या घरीं ठेवून विनामूल्य शिक्षण द्यायला तयार आहोंत. एडवर्ड हा पुढें फार मोठा चित्रकार होणार असें तो म्हणाला.

मोह पडावा अशीच ही गोष्ट होती. युरोपमध्यें ठेवून एडवर्डला संगीताचें शिक्षण देणें ही फार खर्चाची गोष्ट होती. आतां एडवर्डला ही अशी संधि आली होती कीं, पदरचा एक पैसाहि खर्च न करतां त्याला कलेचें शिक्षण मिळणार होतें. संगीतकलेचें नव्हे, चित्रकलेचें, पण संगीतकलेइतकीच त्याला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13828



चित्रकलेची उपजत देणगी होती. एडवर्डनें चित्रकार व्हावें कीं पिॲनोवादक व्हावें ! आतांपर्यंत एडवर्डनें संगीतासाठीं खूप परिश्रम घेतले होते. चित्रें तो आपली गंमत म्हणून काढीत असे. या दोन्ही कलांची त्याला आवड होती. एका कलेचें शिक्षण फार खर्चाचें होतें आणि दुसऱ्या कलेचें शिक्षण विनामूल्य घेण्याची संधि आली होती. चार्लस् गॉनॉड या संगीतकाराच्या जीवनांतहि अगदीं असाच संघर्ष निर्माण झाला होता. संगीत आणि चित्र या दोन्ही गोष्टींत त्याला बक्षिसें मिळालीं होतीं. पण हा कलावंत संगीतकलेलाच चिकटून राहिला. एडवर्ड मॅक्डुवेलनें तसेंच केलें. एडवर्डची आई अमेरिकेला परत आली आणि त्यांच्याबरोबर पॅरीसला आलेला एडवर्डचा पहिला शिक्षक ब्यूट्रॅगो याच्याबरोबर एडवर्ड पॅरीसमध्येंच राहिला.

एका सुटींत एडवर्ड चाट्रेसजवळच्या एका शेतावर आपल्या फ्रेंच मित्राकडे राहायला गेला होता. फ्रेंच कुटुंबांत राहाण्याचा हा त्याचा अनुभव त्याला फार विलक्षण वाटला. गांवांत चर्च होतें. चर्चमध्यें ऑर्गन वाजवणाऱ्या माणसाला सुटीवर जायचें होतें. एक संगीतकार गांवांत आला आहे हें कळतांच त्यानें एडवर्डला आपलें काम करण्याची विनंति केली. एडवर्डनें चर्चमध्यें ऑर्गन वाजवायला सुरवात केली. एडवर्डनें लहानपणीं क्वेकरपंथीयांच्या धर्मसभा पाहिल्या होत्या. या फ्रेंच चर्चमधलें वातावरण त्याहून साफ वेगळें होतें.

पॅरीसमध्यें दोन वर्षें संगीताचा अभ्यास केल्यानंतर एडवर्ड अस्वस्थ होऊं लागला. पॅरीसमधल्या या वास्तव्यांत संगीतकलेची मजबूत बैठक त्याला लाभली होती; पण तरीहि आपल्या पियानोवादनाची व्हावी तितकी प्रगति होत नाहीं असें त्याला वाटत होतें. रूबिनस्टाइन या श्रेष्ठ कलावंताला पिआनो वाजवतांना एडवर्डनें ऐकलें तेव्हां असा दर्जा फ्रान्समध्यें राहून आपणाला मिळवतां येणार नाहीं असें एडवर्डला वाटलें. यानंतर कुठल्या तरी उत्तम पिॲनोवादकाबरोबर काम केलें पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. एका वर्षानें तो जर्मनीमधल्या वीस्बेडन या छोट्याशा सुंदर शहरांत पिॲनो शिकण्यासाठीं गेला. यानंतर तो फ्रँकफोर्ट येथल्या संगीत शाळेंत दाखल झाला. तिथें त्यानें राफकडे स्वरलेखनाचा अभ्यास केला. राफनें रचलेल्या कांहीं चिजा पिआनोचे विद्यार्थी अजूनहि वाजवतात. फ्रँकफोर्ट येथल्या संगीतशाळेंत शिक्षकांनीं त्याला उत्तेजन दिलें. दोन वर्षांनंतर एडवर्ड पिॲनो इतका सुंदर वाजवूं लागला होता

कीं, त्याचा पिआनोशिक्षक हेमान् जेव्हां आजारी पडला तेव्हां त्यानें स्वतः आपल्या जागीं कांहीं दिवस एडवर्डनें शिकवावें असें सुचवलें. पण कांहीं शिक्षकांना असें व्हावेंसें वाटत नव्हतें. कुठल्याहि क्षेत्रांत कांहीं जुनाट बुजुर्ग असतातच. या जुनाट वृत्तीच्या लोकांनीं कितीहि प्रयत्न केला तरी त्यांना कलेंत प्राण भरतां येत नाहीं. कोष्टकांत अडकलेलें नियमबद्ध संगीत वाजवण्यांतच त्यांना सार्थक वाटत असतें. संगीतांत नियमबद्धतेची मातबरी नाहीं असा याचा अर्थ नव्हे. परंतु कलावंत मानवी जिव्हाळा जर कलेंत ओतूं शकला नाहीं, जीवनाच्या रसरसत्या स्पर्शानें सूर भारून टाकूं शकला नाहीं तर नियमांच्या निर्जीव कोष्टकांचा उपयोग तरी काय ? अशा या कोष्टकवाल्या कांहीं शिक्षकांनीं हेमानच्या जागीं एडवर्डनें शिकवावें या गोष्टीला हरकत घेतली. तेव्हां राफनें कांहीं खाजगी विद्यार्थी एडवर्डकडे पाठवायला सुरवात केली. आणि अशा रीतीनें एडवर्ड जर्मनींत शिकवण्याचें काम करूं लागला.

काळेभोर केस, नितळ अंगकांति, उत्कट निळे डोळे, तांबुस मिशा असें रूप असलेला एडवर्ड 'देखणा अमेरिकन' या नांवानें ओळखला जाऊं लागला.

फ्रँकफोर्टमधल्या एका उन्हाळ्यांतली गोष्ट. एडवर्ड तेव्हां एकोणीस वर्षांचा होता. त्या दिवशीं सायकलवर बसून त्याला भेटायला कोण यावें ? त्याचा चुलत भाऊ चार्लस् त्याला भेटायला आला होता. बरींच वर्षें त्यांची भेट नव्हती. एडवर्डनें आपल्या चुलत भावाचें आदरातिथ्य केलें. लहानपणीं नेमबाजींत पिस्तुल बक्षीस मिळवणारा एडवर्ड जसा राहात होता, जसें काम करीत होता तसाच तो परदेशांतल्या एका शहरांत राहतो आहे, काम करतो आहे हें पाहून चार्लसला अतिशय आनंद झाला.

राफनें एडवर्डकडे पाठवलेल्या विद्यार्थ्यांत कॉनेक्टिकट येथील मेरियन नेव्हिन्स नांवाची एक मुलगी होती. या अमेरिकन मुलीला तिची भाषा येणारा शिक्षक मिळाला तर तिची लौकर प्रगति होईल असें राफचें मत होतें. या मुलीला अर्थात् ही गोष्ट तेवढी पसंत नव्हती. कारण अमेरिकन शिक्षकाकडेच जर शिकायचें तर ती युरोपमध्यें कशाकरतां आली होती ? पण असें वाटत असूनहि तिनें एडवर्डकडे एक वर्ष शिकण्याला संमति दिली. एडवर्डलाहि अनुभव घेण्याच्या दृष्टीनें खरें म्हणजे युरोपमधलेच विद्यार्थी हवे होते. पण मेरियन नेव्हिन्सला एडवर्ड शिकवूं लागला. एका वर्षानंतर क्लॅरा शूमन हिच्याकडे

शिकण्याची संधि आलेली असतांहि मेरियन नेव्हिन्सनें ती नाकारली आणि ती एडवर्डकडे शिकूं लागली.

या 'देखण्या अमेरिकनानें' स्वतंत्र स्वररचना करावी यासाठीं त्याला पहिलें उत्तेजन राफनें दिलें. एडवर्डनें रचलेली पिआनोवरची पहिली चीज जेव्हां ऐकली तेव्हां राफ खूष झाला आणि त्यानें लिस्ट या सुप्रसिद्ध पिआनोवादकाला ही चीज एडवर्डनें वाजवून दाखवावी असें सांगितलें. विमार येथें लिस्ट राहत होता. एडवर्ड धीर करून राफचें ओळखपत्र घेऊन लिझ्ट्च्या घरीं गेला. ओसरीवरच्या बाकावरच तो बसून राहिला. आंत जाण्याचा धीर त्याला होईना. लिझ्ट्च्या कांहीं विद्यार्थ्यांनीं त्याला पाहिलें आणि आंत जाऊन एक कोणी तरुण मनुष्य बाहेर वाट बघत बसला आहे असें सांगितलें. लिझ्ट् बाहेर आला. त्याच्याकडे पाहतांच हाच तो थोर कलावंत हें एडवर्डनें ओळखलें. एडवर्डनें सोबत आणलेलें राफचें ओळखपत्र लिस्टकडे दिलें. लिझ्ट्नें त्याला अदबीनें आंत नेलें आणि एडवर्डनें रचलेली चीज ऐकली. केवळ रचनेबद्दलच नव्हे तर एडवर्डच्या पिॲनोवादनाबद्दलहि लिस्टनें गौरवाचे उद्गार काढले. केवळ स्तुति करूनच तो थांबला नाहीं. एडवर्डनें रचलेली ही चीज जर्मनींतल्या श्रोत्यांना ऐकवायची असें त्यानें ठरविलें.

जर्मन सोसायटी ऑफ म्युझिसियन्सच्या ऑर्केस्ट्राबरोबर लिस्टनें शब्द टाकल्यामुळें ही चीज जाहीररीत्या एडवर्ड वाजवून दाखवणार आहे हें ऐकतांच राफला अत्यानंद झाला. तो दिवस केव्हां उगवतो याची राफ वाट पहात होता. परंतु दुर्दैवाचा आघात झाला. हा कार्यक्रम होण्याआधींच राफ हें जग सोडून गेला. आपल्या या उदार मनाच्या प्रेमळ शिक्षकावर एडवर्डचें विलक्षण प्रेम होतें. राफच्या मृत्यूमुळें एडवर्ड अगदीं खचून गेला. या अवस्थेंत त्याला अगदीं एकाकी वाटूं लागलें कीं तो आपली विद्यार्थिनी मेरियन नेव्हिन्सकडे जात असे. ती एडवर्डला हें दुःख विसरण्याच्या दृष्टीनें त्यानें कामांत जास्त लक्ष घालावें असें सांगे. यानंतर दोन आठवड्यांनीं एडवर्डनें ठरल्याप्रमाणें आपला जाहीर कार्यक्रम केला. श्रोत्यांनीं त्याला डोक्यावर घेतलें. एडवर्ड स्वभावानें इतका नम्र होता कीं, आपण केलेली रचना इतरांना आवडूं शकेल या गोष्टीची प्रथमच त्याला कल्पना आली. या घटनेमुळें एडवर्डला उत्तेजन मिळालें. त्याच्या विकासाला गति आली. लिझ्ट्नें तारीफ

केल्यामुळें ही चीज प्रसिद्धहि झाली. एडवर्डनें ती लिझ्ट्लाच अर्पण केली. वाजवणें, स्वरलेखन करणें, शिकवणें–एडवर्ड खूप काम करीत होता. याच वेळीं तो आपली अमेरिकन विद्यार्थिनी मेरियन नेव्हिन्स हिच्या प्रेमांत पडला.

वयाच्या तेविसाव्या वर्षी उन्हाळ्यांत एडवर्ड एका महिन्यासाठीं अमेरिकेंत आला. या वेळीं कॉनेक्टिकट येथें त्याचें लग्न झालें. लग्नानंतर या पतिपत्नींनीं युरोपचा प्रवास केला. आणि नंतर तीं दोघें जर्मनींत येऊन राहिलीं. जर्मनींत एडवर्डनें आणखी अनेक वर्षें संगीतशिक्षणाचें काम केलें. त्यानंतर तो अमेरिकेस परत आला. यापूर्वी तो अमेरिकेंत जितकीं वर्षें राहिला होता तितकेंच वास्तव्य त्यानें युरोपमध्येंहि केलें होतें.

एडवर्ड आणि त्याची बायको आतां बोस्टनला राहूं लागलीं. एडवर्डला अधिकाधिक यश मिळत गेलें. बोस्टन सिंफनी ऑर्केस्ट्राबरोबर त्यानें आपण रचलेली दुसरी चीज वाजवली. या आर्केस्ट्रानें एडवर्डची 'इंडियन स्वीट' ही रचनाहि त्या दिवशीं वाजवली. आपल्या या यशाचा एडवर्डला विशेष अभिमान वाटला. त्या दिवशीं संध्याकाळीं त्याचा सत्कार करून त्याला गौरवचिन्ह देण्यांत आलें. न्यू हॅम्पशायर येथील शेतावरील घराच्या भिंतीवर त्यानें हें गौरवचिन्ह लावून ठेवलें होतें. आपल्या कलाकृतींचें कौतुक झालें कीं एडवर्डला अतिशय आनंद होत असे. परंतु त्याचा स्वभाव लाजरा असल्यामुळें कोणी त्याची स्तुति करूं लागलें कीं तो अगदीं बावरून जाई. अप्रामाणिकपणा ही गोष्ट त्याला आवडत नसे, त्याची त्याला चीड येई. आपलें संगीताचें शिक्षण करण्यासाठीं आपल्या आईवडिलांनीं खूप खर्च केला याबद्दल त्याला कृतज्ञता वाटे. ही कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठीं त्यांनीं खर्च केलेले सगळे पैसे एडवर्डनें त्यांना परत दिले.

बोस्टन येथें राहात असतांना एडवर्डनें दोन कुत्रे पाळले होते. या दोन्ही कुत्र्यांचा त्याला अतिशय लळा होता. एका कुत्र्याचें नांव होतें शार्लेमन आणि दुसऱ्याचें चार्ली. उन्हाळ्यांत एडवर्ड आणि त्याची बायको न्यू हॅम्पशायर इथल्या आपल्या शेतावर राहायला गेलीं कीं चार्ली त्यांच्याबरोबर जात असे. हा चार्ली संगीताचा टीकाकार झाला होता! वॅगनरचें संगीत वाजवलें कीं आनंदानें भुंकायचें आणि ब्रॅहम्सचें संगीत वाजवलें कीं चिडून भुंकायचें असें चार्लीला शिकवण्यांत आलें होतें. चार्ली बरोबर तसें ओळखत असे.

कोलंबिया युनिव्हर्सिटीनें संगीतविषयाचा प्रोफेसर म्हणून काम करण्यासाठीं एडवर्डला बोलावलें. एडवर्डनें हें निमंत्रण स्वीकारलें आणि तो पुन्हां न्यू यॉर्क येथें आला. तो लहान असतांना त्यांचें क्लिंटन स्ट्रीट येथें असलेलें घर आतां तिथें नव्हतें. क्लिंटन स्ट्रीट हा आतां 'ईस्ट साइडचा' भाग बनला होता आणि तिथें भाड्यानें दिलेलीं भिकार घरें बांधण्यांत आलीं होतीं. अमेरिकेंत पैसा मिळविण्यासाठीं देशांतर करून आलेल्या लोकांची आतां तिथें गर्दी उडाली होती. देशांतर करून आलेल्या या लोकांत रशियाहून आलेलें बॅलिन नांवाचें कुटुंब होतें. या कुटुंबांत चार वर्षांचा एक मुलगा होता. पुढें लोकप्रिय गीतलेखक झालेला अर्व्हिंग बर्लीन म्हणजे हाच मुलगा होय. 'ॲलेक्झांडर्स रॅगटाईम बॅंड' आणि 'गॉड ब्लेस अमेरिका' या अर्व्हिंग बर्लीनच्याच रचना.

कोलंबिया युनिव्हार्सिटींत एडवर्ड उत्तम शिक्षक ठरला. मन लावून तो शिकवीत असे. तिथल्या संगीत विभागाचा त्यानें खूप विकास केला. ज्यांना कलेची देणगी होती आणि परिश्रम करण्यांत जे मागेंपुढे पहात नसत अशा विद्यार्थ्यांना एडवर्ड खूप मदत करीत असे. त्यांच्यापैकीं कांहींजवळ पैसे नसले तर तो त्यांना फुकट शिकवी. एडवर्डला तल्लख विनोदबुद्धि होती. तो हंसू लागला कीं आजूबाजूच्या लोकांच्या वृत्ति प्रसन्न होत.

कुठेंहि जाहीर कार्यक्रम असला कीं उत्सुकता, शंका, श्रोत्यांची भीति इत्यादींचा विलक्षण ताण कार्यक्रमाला जाण्यापूर्वीं एडवर्डच्या मनावर पडत असे. अशा वेळीं त्याची बायको त्याला धीर देत देत स्टेजपर्यंत आणीत असे. विद्यार्थ्यांना शिकवण्यांत तो खूप वेळ घालवी. त्याच्या वाजवण्यावर या गोष्टीचा परिणाम होणें स्वाभाविक होतें. न्यू यॉर्कच्या एका संगीतटीकाकारानें पेडण्युस्कीनंतर एडवर्ड मॅक्डुवेलएवढा समर्थ पिआनोवादक आपण दुसरा ऐकला नाहीं असे उद्गार काढले होते. असें असूनहि आपण कांहीं तेवढें चांगलें वाजवीत नाहीं असें जर एडवर्डला वाटत असलें तर तें त्याचें दुर्दैवच समजलें पाहिजे.

शहरांतली गजबज, गर्दी एडवर्डच्या वृत्तीला मानवत नसे. न्यू हॅम्पशायर येथील डोंगरांतून भटकावें, घोड्याच्या दुचाकी गाडींत बसून त्यानें ठेवलेल्या शेतकऱ्याबरोबर शेतावर जावें...शहरापासून दूर असावें हेंच एडवर्डला आवडे.

दैनंदिन कामाच्या रगाड्यापासून दूर असला कीं तो स्वतंत्र स्वरलेखन करूं लागे. आपल्या शेतापासून जवळच असलेल्या छोट्याशा जंगलांत निवांतपणें संगीतलेखन करतां यावें म्हणून त्यानें एक छोटेंसें घर बांधलें होतें. तें घर अजूनहि तिथें आहे. परंतु त्याच्या त्या शेतावर मात्र आतां कलावंतांना राहण्यासाठीं कलानगर बांधण्यांत आलें आहे. लेखक, संगीतकार, चित्रकार या कलानगरांत येऊन राहतात. इथें येऊन राहाणाऱ्या कलावंतांना टेलिफोनच्या घंटेचा खणखणाट, जेवणाची तजवीज आणि अशीच इतर धावपळ करावी लागत नाहीं. नवनिर्मिति करण्यासाठीं लागणारा निवांतपणा त्यांना या कलानगरांत लाभतो. एडवर्डच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोनें हें कलानगर निर्माण व्हावें यासाठीं आपला वेळ आणि शक्ति खर्च केली. आपल्या नवऱ्याला कलानिर्मितीसाठीं हवाहवासा वाटणारा निवांत इतर कलावंतांना मिळावा हीच तिची इच्छा होती. जिथें एडवर्डचें छोटें घर होतें त्याच्या आसपास आतां वीस घरें उभीं राहिलेलीं आहेत. अमेरिकेंतले अनेक संगीतकार इथें कांहीं काळ राहून गेलेले आहेत.

लहानपणीं एडवर्डला वाचनाची अतिशय आवड होती. कुणींतरी त्याच्याविषयीं लिहिलें होतें कीं, "सर्वसामान्य संगीतकार पुष्कळ वेळां मठ्ठ असतो. अशांच्या तुलनेनें एडवर्ड मॅक्डुवेल हा अगदीं वेगळा उठून दिसतो. बौद्धिक विषयांत त्याला विलक्षण रस होता आणि यामुळें चौरस अशी संस्कृति त्याच्या ठिकाणीं होती." एडवर्डच्या अनेक छंदांकडे पाहिलें असतां त्याच्या बहुरंगी अभिरुचीचें प्रत्यंतर येतें. काव्याची त्याला अतिशय आवड होती. मध्ययुगीन अद्‌भुत रम्यकथा आणि लोककथा यांची त्याला खूप माहिती होती. पण याचबरोबर मार्क ट्वेनचें वाङ्मय आणि अंकल रेमसच्या कथाहि त्याला आवडत असत. बागकाम, फोटोग्राफी, सुतारकाम यांतहि तो रस घेई. बागा आखणें, इमारतीचा आराखडा तयार करणें हींसुद्धां कामें त्यानें केलेलीं होतीं. एकदां युनिव्हर्सिटींत कलाविभागाच्या सदस्यांची मीटिंग होती. त्याच दिवशीं मुष्टियुद्धाचा सामना होता. एडवर्डनें मीटिंगला चाट दिली आणि तो मुष्टियुद्धाच्या सामन्याला गेला. तिथें गेल्यानंतर त्याला आपल्या सहकाऱ्यांपैकीं एक तृतीयांश लोक त्याच्याप्रमाणेंच मीटिंगला दांडी मारुन तिथें आलेले दिसले. तें पाहून त्याला बरें वाटलें.

पिटरबारो या खेड्यांत गोल्फचें मैदान नाहीं हें कळतांच त्यानें एक शेत विकत घेऊन ती जमीन गोल्फसाठीं म्हणून गांवाला देऊन टाकली. आपल्या एका श्रीमंत शेजाऱ्याला ती कल्पना पटवून देऊन त्यानें या मैदानावर क्लबसाठीं इमारत बांधून घेतली. गरीब माणसालाहि तो गोल्फ खेळायला इथें बोलावीत असे. या राजेशाही खेळाची मजा सर्वांना मिळावी असें त्याला वाटे.

शिकवण्यांत त्याचा कितीहि वेळ गेलेला असला तरी दिसामाजीं कांहीं तरी स्वतंत्र स्वरलेखन आपण केलेंच पाहिजे असें त्याला वाटे. फ्रान्समध्यें असतांना त्याच्या अंगीं ही शिस्त बाणली होती. यामुळेंच दररोज पिआनोवर बसून रियाज करणें जितकें आवश्यक आहे तितकेंच नेमानें स्वरलेखन करणें महत्त्वाचें आहे असें त्याला वाटे. पिआनोवर बसून तो स्वरलेखन करीत नसे. जेव्हां जेव्हां त्याला सुरावट सुचे तेव्हां त्यांची नोंद तो वहींत करून ठेवीत असे. उन्हाळ्यांत शेतावरच्या आपल्या निवांत घरांत तो राहायला गेला कीं आपल्या स्वतंत्र रचना करीत असतांना वहींत नोंदलेल्या या तुकड्यांचा तो उपयोग करी. पिआनोवर वाजवायचे चार मोठे 'सॉनाटा' त्यानें लिहिले. त्यांपैकीं 'केल्टिक सॉनाटा' त्याला सर्वांत अधिक पसंत होता. ग्रीग या संगीतकाराविषयीं त्याला विलक्षण आदर होता. 'केल्टिक सॉनाटा' आणि 'नॉर्थ सॉनाटा' त्यानें ग्रीगलाच अर्पण केले होते. त्याच्या लहान रचनांपैकीं 'सी पिसेस' त्याला विशेष आवडत असत. 'इंडियन स्वीट' या रचनेंतला डर्ज (Dirge) हा भाग त्याला विशेष आवडे.

डिव्होराक (Divorak) या बोहेमियाच्या संगीतकारानें 'न्यू वर्ल्ड सिंफनी' या आपल्या रचनेंत निग्रो मेलडींचा उपयोग केला होता. खास अमेरिकन संगीत निर्माण करण्यासाठीं निग्रो मेलडींचा असा उपयोग करतां येईल हें एडवर्डला पटलें नाहीं. ज्याला संगीतांतली खास अमेरिकन शैली म्हणतां येईल ती अशा बारीकसारीक युक्त्या करून सांपडेल असें एडवर्डला वाटत नव्हतें. एडवर्ड स्वतः रेड इंडियन मेलडींचा उपयोग करीत असे. परंतु केवळ यामुळेंच आपली खास अमेरिकन शैली आहे असें त्याला वाटत नसे. एल्गर या संगीतकाराचेंहि असेंच मत होतें, आणि म्हणूनच तो लोकसंगीताचा जाणीवपूर्वक उपयोग करीत नसे. एडवर्ड मॅक्डुवेलनें लिहिलें आहे : "प्रत्येक मनुष्य कसलेना कसले कपडे वापरतो, कसला ना कसला व्यवसाय करतो.

परंतु हे कपडे आणि हा व्यवसाय यांच्याहून तो माणूस कुठेंतरी वेगळा असतो. ज्या माणसाचें हें वेगळेपण कपडे आणि व्यवसाय यांत हरखून गेलेलें असतें अशा माणसाविषयीं आपल्याला फारसा आदर वाटत नाहीं. संगीताचें देखील तसेंच आहे. रशियन संगीत, बोहेमियन संगीत—या आणि अशा खास राष्ट्रीय म्हणून गणल्या जाणाऱ्या संगीताला कलेच्या क्षेत्रांत स्थान नाहीं. याचें कारण असें कीं, अशा प्रकारच्या संगीताचें वैशिष्ट्य म्हणून मानलें जातें. त्याच्या कोणालाहि आवृत्त्या काढतां येतील. याच्या उलट, व्यक्तित्वाचें वेगळेंपण हा संगीताचा गाभा आहे. हें वेगळेंपण उठून दिसतें. कोष्टकें पुढें ठेवून जें संगीत निर्माण केलें जातें तें संगीत नसून शिंपीकाम आहे असें समजायला हरकत नाहीं. अशा तऱ्हेनें बेतलेलें राष्ट्रीय संगीत हा पोरकटपणाचा प्रकार आहे. एखाद्या समाजाची विशिष्ट तऱ्हेची प्रतिभा आपल्या संगीतांतून व्यक्त व्हावी, तसा संगीतकार निर्माण व्हावा असें ज्या समाजाला वाटतें त्या समाजांत असा कलावंत निर्माण होण्यासाठीं आधीं त्या लोकांवर प्रेम करणारीं, त्या लोकांचा अविभाज्य भाग असलेलीं माणसें निर्माण व्हावीं लागतात. या माणसांनीं राष्ट्रानें जें आपल्या जीवनांत उतरविलें तें संगीतांत उतरविण्याचा प्रयत्न करावा लागतो. अमेरिकन् जनता आणि संगीतकार या दोघांच्याहि मनावर युरोपिअन विचार आणि पूर्वग्रह यांचा अमर्याद पगडा दिसतो. या मर्यादेंतून अमेरिकनांनीं आपली सुटका करून घेणें आवश्यक आहे. बोहेमियांत बेतलेले निग्रो कपडे घालून राष्ट्रीयता मिरवण्यानें साधणारी ही गोष्ट नव्हे. तारुण्यशील, आशावादी चैतन्य आणि निर्भय जिद्दीची वृत्ति हें अमेरिकन माणसाचें वैशिष्ट्य आहे. अमेरिकन कलावंताला तिथें जाऊन पोंचलें पाहिजे."

युरोपमध्यें ज्याला कीर्ति मिळाली, ज्याच्या रचना तिथें प्रसिद्ध झाल्या अशा या अमेरिकेंत जन्म झालेल्या संगीतकाराच्या मृत्यूला आज पन्नासांहून अधिक वर्षें होऊन गेलीं. या पुस्तकांत लिहिलेलीं संगीतकारांचीं चरित्रें वाचीत असतांना एडवर्ड मॅक्डुवेलचे अमेरिकन संगीताविषयींचे हे विचार किती खरे आहेत याचें वारंवार प्रत्यंतर येतें. एखाद्या कलेला परिपक्वता प्राप्त होणें ही एका व्यक्तीच्या हयातींत पूर्ण होणारी गोष्ट नव्हे, परंतु एडवर्ड मॅक्डुवेलनें म्हटल्याप्रमाणें, "तारुण्यशील आशावादी चैतन्य आणि

निर्भय जिद्दीची वृत्ति" या गोष्टी अमेरिकन संगीतकाराच्या रचनेंतून डोकावूं लागलेल्या आहेत.

एडवर्ड मॅक्डुवेल :
जन्म : न्यू यॉर्क शहरांत
१८ डिसेंबर १८६१.
मृत्यु : न्यू यॉर्क येथेंच
२३ जानेवारी १९०८.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम .......................... दिः ..................
क्रमांक .......................... नों दिः ..................

## एथिलबर्ट नेव्हिन

" बाकचें संगीत हें माझें रोजचें अन्न आहे. "

स्टिफन फॉस्टर वारला तेव्हां एथिलबर्ट नेव्हिन दीड वर्षांचा होता. ज्या गांवांत स्टिफन फॉस्टरनें आपलें बालपण घालवलें तिथेंच एथिलबर्ट नेव्हिन वाढत होता. पिट्स्बर्गच्या जवळच हा विभाग होता. फॉस्टर लहान असतांना पिट्स्बर्ग हें नदीकांठीं असलेलें एक शहर होतें. वसाहत करीत करीत गवताळ प्रदेशाकडे सरकणारे लोक ज्या वाटेनें गेले त्या वाटेच्या जवळच पिट्स्बर्ग होतें. पिट्स्बर्गच्या पलीकडे जंगलभरली सरहद्द होती. नदीवरच्या बोटीवर काम करणाऱ्या निग्रो कामगारांच्या तोंडून फॉस्टरनें अनेक गाणीं ऐकलीं होतीं. हे गरीब मजूर काम करीत असतांना एकमेकांची करमणूक करण्यासाठीं गात असत. एथिलबर्ट नेव्हिन हासुद्धां पुढें गीतलेखक झाला. परंतु त्यानें लिहिलेल्या गीतांचें फॉस्टरच्या गीतांशीं कांहींच साम्य नव्हतें. एथिलबर्टची घडण अगदीं वेगळ्या प्रकारची होती. एथिलबर्टला संगीताचें शिक्षण मिळालें होतें—फॉस्टरला तें मिळूं शकलें नव्हतें. परंतु या दोघांनाहि संगीताचा व्यवसाय म्हणून स्वीकार करायला फार वेळ लागला. एखादें अनोळखी फळ ज्याप्रमाणें कसें वाढवावें हें कळत नाहीं त्याप्रमाणेंच त्या काळीं संगीताची देणगी असलेलें घरांतलें मूल कसें वाढवावें हें आई-बापांना कळत नसे. फॉस्टरचीं गाणीं त्याच्या हृदयांतून उचंबळून आलेलीं होतीं. हृदयाच्या भाषेंत तीं बोलत असत. नेव्हिनचीं गाणीं त्याच्या

काव्यात्म कल्पनेंतून उमलून येत. या अर्थानें तीं नैसर्गिक होतीं म्हणण्यापेक्षां कृत्रिम होतीं असें म्हणतां येईल. परंतु नेव्हिनला मात्र आपलें हें कल्पनाविश्व खरेंखुरें वाटत असे. हें विश्व तो अतिशय प्रामाणिकपणें व्यक्त काण्याचा प्रयत्न करी.

नेव्हिन वाढत होता तेव्हां पिट्सबर्ग हें रेल्वेमार्गांचें केंद्र बनलें होतें. फॉस्टरच्या आईवडिलांना त्यांचें लग्न झाल्यानंतर जें अंतर घोड्यावर बसून ओलांडायला दोन आठवडे लागत तेंच अंतर एथिलबर्ट नेव्हिनला आगगाडी-मुळें कांहीं तासांत ओलांडणें शक्य झालें होतें. अटलांटिक समुद्र ओलांडून आपण प्रवासाला जावें ही गोष्ट स्टिफन फॉस्टरच्या स्वप्नांतदेखील येत नसे. परंतु नेव्हिननें अनेकदां युरोपचा प्रवास केला होता. त्यानें युरोपमध्यें संगीताचा अभ्यास केला. युरोपची संगीतपरंपरा त्याला अगदीं आपलीशी वाटली. या दृष्टीनें त्याच्यापेक्षां एका वर्षानें मोठा असलेल्या एडवर्ड मॅक्डुवेल-सारखी नेव्हिनची घडण होत गेली असें म्हणायला हरकत नाहीं. परंतु मॅक्डुवेल न्यू यॉर्कमध्यें राहात असे. वयाच्या सोळाव्या वर्षी तो युरोपला गेला. त्यामुळें हे दोघे मोठे होईपर्यंत, संगीतकार म्हणून प्रसिद्धीला येईपर्यंत, त्यांची भेट पूर्वी कधींच झाली नाहीं. हे दोघेहि स्वतंत्र संगीतरचना करीत. पिॲनोवादनांत या दोघांचेंहि कौशल्य वाखाणण्याजोगें होतें. या दोघांचेंहि पिॲनोवादन ऐकलेल्या एका माणसानें असा उद्‌गार काढला होता कीं," "मॅक्डुवेल झपाट्यासारखा वाजवी. नेव्हिनचें वाजवणें एखाद्या कवीसारखें असे."

मॅक्डुवेल कुटुंबाप्रमाणेंच नेव्हिन कुटुंबाचेहि पूर्वज स्कॉच-आयरिश वंशाचे होते. एथिलबर्टच्या वडिलांनीं फॉस्टरच्या काळांतलें पिट्सबर्ग पाहिलें होतें. जेव्हां स्टिफन फॉस्टरनें जेफर्सन कॉलेजांत नांव घातलें तेव्हां एथिलबर्टचे वडील बहुधा कॉलेजमध्यें शिकत असावेत. परंतु स्टिफननें एका आठवड्यांतच हें कॉलेज सोडलें. एथिलबर्टच्या वडिलांनीं पुढें स्टिफन फॉस्टर आणि निग्रोगीतें यांच्यावर एक लेख लिहिला. एथिलबर्टची आई सुसंस्कृत स्त्री होती. ती लहान असतांना तिच्यासाठींच ॲलेगनी पर्वत ओलांडून घोड्याच्या गाडींतून एक मोठा पिआनो आणलेला होता. तिला संगीताची अतिशय आवड होती.

पिट्स्बर्गपासून पंधरा मैलांवर ओहियो नदीच्या कांठीं सेविक्ली (Sewickley) जवळ एजवर्थ नांवाचें गांव आहे. या एजवर्थमध्यें व्हिनेकर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागांत नेव्हिन कुटुंबाची शेती आणि घर होतें. तें एक मोठें थोरलें, कांहींसें अव्यवस्थित बांधलेलें घर होतें. पोरांना खेळायला तें घर आवडत असे. या घरांत खेळायला मुलेंहि खूप होतीं. कारण एथिलबर्टच्या वडिलांना आठ मुलें झालीं. एथिलबर्ट हा पांचवा.

एथिलबर्ट जन्माला आला तेव्हां गुलामीविरुद्धचें युद्ध चालू होतें. अशा या काळांत लोकप्रिय असलेलीं गीतें पाळण्यांत असल्यापासून त्याच्या कानावर पडलीं होतीं. 'टेंटिंग ऑन धी ओल्ड कॅम्प ग्राउंड' आणि 'मार्चिंग थ्रू जॉर्जिआ' हीं गीतें एथिलबर्ट तीन वर्षांचा असल्यापासून गात असे. पांचव्या वर्षीं तो स्वतः पिॲनो वाजवीत गाऊं शकत होता. त्या वेळीं संगीत शिकण्याची त्याची इच्छा दिसत होती. त्याचीं चुलतभावंडें गाण्याचे पाठ घेण्यासाठीं शाळेंत जाऊं लागलीं कीं छोटा एथिलबर्टहि काखोटीला कागद मारून त्यांच्यामागून घराबाहेर पडण्याची तयारी करी. कुठें जातो आहेस असें त्याला विचारल्यावर तो उत्तर देई कीं, "म्हणजे? मला संगीताचा पाठ आज घ्यायचाय्." खिसमसच्या आदल्या रात्रीं त्याचे वडील एक कळीची संगीतपेटी घेऊन आले. कळ दाबली कीं या पेटींतून टिंग् टिंग् टिंग् आवाज येऊं लागे. खिसमसच्या दिवशीं एथिलबर्टच्या वडिलांनीं त्याला आपल्या मांडीवर घेतला आणि ते त्याला खिसमसची गोष्ट सांगूं लागले. मधूनमधून गोष्ट विशेष परिणामकारक होण्यासाठीं हळूच खिशांत हात घालीत आणि त्यांत ठेवलेल्या संगीतपेटीची कळ दाबीत. त्या पेटींतून निघणारे इवलेसे गोड स्वर हवेंत तरंगूं लागत. छोट्या एथिलबर्टला अतिशय आश्चर्य वाटे. स्वर्गांतले देवदूतच हे स्वर छेडीत असणार अशी त्याची भावना होई.

लहान असतांना एथिलबर्टला पोरांचे खेळ आवडत नसत. त्याला मुलींबरोबरच खेळायला आवडे. कधीं कधीं मुलगे बेसबॉल खेळतांना पाणी आणून देण्याचें काम त्याच्यावर सोंपवीत. छोटा एथिलबर्ट या कामावर खूष होई. त्याला तो आपला सन्मान वाटे. कदाचित् तसें असेलहि. कधीं कधीं हे मुलगे एथिलबर्टला खेळायला घेत. पण खेळतां खेळतां एथिलबर्ट मधेंच बॅट जमिनीवर टाकून घरांत पळत असे. आणि पिॲनोपुढें जाऊन बसत असे. असें कां

केलंस या प्रश्नाला तो उत्तर देई, "कारण खेळतां खेळतां मला जे सूर वाजवायचे होते त्यांची आठवण झाली."

पिॲनो वाजवायचा पहिला पाठ त्यानें शिक्षकाकडून घेतला तेव्हां तो आठ वर्षांचा होता. लहानपणापासून त्याची मनोवृत्ति अत्यंत तीव्र, अस्वस्थ अशी होती. त्याला संभाळायला ठेवलेली निग्रो दाई कोणीहि आला कीं त्याच्याकडून नाचून गाऊन घेई. या सतत प्रदर्शनामुळें त्याची ही वृत्ति निवळण्याची आतां अर्थातच शक्यता नव्हती. पिॲनो शिकायला लागल्यानंतर लवकरच त्यानें स्वतःच्या मेलडी लिहायला सुरवात केली. त्यानें लिहिलेली पहिली मेलडी आपल्या बहिणीसाठीं लिहिली होती. या मेलडीला त्यानें नांव दिलें होतें 'लिलिअन् पॉल्का.' वर लिहिलें होतें, 'रचना : बर्टि नेव्हिन. वय : अकरा वर्षें.'

एजवर्थ येथल्या शाळेंत एथिलबर्ट जाऊं लागला. ही त्याची पहिली शाळा. ही शाळा चर्चमध्येंच भरत असे. कारण तिथल्या एपिस्कोपल चर्चचा रेक्टर हा त्या शाळेचा शिक्षक होता. नेव्हिनच्या चुलत भावंडांपैकीं बरींच मुलें याच शाळेंत होतीं.

बर्टीचा आवाज स्वच्छ, गोड तारस्वर असलेला होता. 'नेव्हिन ऑक्टेट' आणि 'गॉनॉड क्लब' यांच्यातर्फे जलसे झाले कीं त्यांत बर्टी गात असे. ज्या वर्षीं त्यानें आपली पहिली स्वतंत्र स्वररचना केली त्याच वर्षी त्यानें वॅगनर—लिझ्ट यांनीं रचलेलें 'टॅनहॉसर मार्च' जाहीरपणें वाजवून दाखविलें.

तो पंधरा वर्षांचा झाला तेव्हां त्याला आणि त्याची बहीण लिली हिला आईवडिलांनीं युरोपच्या सफरीला नेलें. ड्रेस्डन येथें बर्टीला संगीताचा अभ्यास करण्याची संधि मिळाली. लिप्झिग, बर्लिन आणि व्हिएन्ना इथें संगीताचे उत्तोमात्तम कार्यक्रम त्याला ऐकायला मिळाले. तो रोमला गेला. तिथल्या एपिस्कोपल चर्चमध्यें त्याचा चुलतभाऊ रेक्टर होता. या चर्चमध्यें भक्तिगीतें गाणाऱ्या समूळ गायकवृंदांतून एथिलबर्टला गाण्याची संधि मिळाली. या काळांत त्याचा आवाज बदलत होता. इथें तो आवाजावर फाजील ताण पडेल इतका गायला असणार. त्यामुळें पुढें त्याच्या आवाजांत गाण्याच्या दृष्टीनें तेवढी ताकद राहिली नाहीं. त्याला या गोष्टीचें वाईट वाटलें. ही सगळी मंडळी युरोपचा प्रवास संपवून व्हिनेकरला परत आली तेव्हां बर्टीनें आपलें नांव

कॉलेजच्या पहिल्या वर्षाला घातलें. आज तें कॉलेज पिट्सबर्गची युनिव्हर्सिटी म्हणून ओळखलें जातें.

कॉलेजचें वातावरण बर्टीच्या वृत्तीला मानवणारें नव्हतें. त्याच्या अगदीं जवळच्या मित्रांशीं तो समरस होई. परंतु भेटेल त्याच्याशीं दोस्ती हें त्याला जमत नसे. कॉलेजांतल्या अभ्यासांतहि त्याला विशेष रस नव्हता. त्यानें जें कांहीं ज्ञान मिळवलें तें स्वतः वाचन करून आणि नंतर प्रवास करून. या कॉलेजांत त्यानें फक्त एकच वर्ष काढलें. या काळांतदेखील त्याचें सगळे लक्ष संगीताकडेच होतें. पिट्सबर्ग ऑर्केस्ट्रांतून त्यानें शॉपिनचे इफ-फ्लॅट पोलोनेज' वाजवलें होतें. सोव्हिक्लीच्या गायकपथकांतूनहि तो गात असे. या वर्षी त्यानें लिहिलेलीं गाणीं पुढें प्रकाशित झालीं. कॉलेजमधलें त्याचें पहिलें वर्ष हेंच शेवटचें वर्ष ठरलें.

संगीत हा आपल्या जीवनाचा व्यवसाय आपण करणार असें जेव्हां एथिलबर्ट सुचवूं लागला तेव्हां त्याच्या वडिलांना तें आवडलें नाहीं. एथिलबर्टच्या गाण्याबजावण्याचें छंद म्हणून त्यांनीं कौतुक केलें होतें. परंतु उपजीविकेचें साधन म्हणून संगीताचा स्वीकार करणें त्यांना पसंत नव्हतें. या व्यवसायांत कसले पैसे मिळणार? संगीतकार आणि नट हे कांहीं आपल्या दर्जाचे लोक नव्हेत असें ते मानीत. बर्टीनें जर संगीताचा व्यवसाय म्हणून स्वीकार केला तर त्याला पुढें उपास काढावे लागतील असें ते म्हणाले. त्यांच्या या सगळ्या युक्तिवादाचा परिणाम बर्टीनें आपली बाजू मागें घेण्यांत झाला. त्याच्या वडिलांनीं जिंकलें. बर्टीनें व्यापार करण्याचा प्रयत्न केला.

त्याचे दोन मोठे भाऊ छपाईच्या व्यवसायांत होते. बर्टीनें कांहीं काळ या व्यवसायांत काम करण्याचा प्रयत्न केला. कचेरीच्या समोर एक वस्तुभांडार होतें. सेविक्ली इथल्या मुली या वस्तुभांडारासमोर आंतल्या वस्तु पहात रेंगाळत असत. अधूनमधून त्या काम करीत असलेल्या बर्टीकडे पहात. इतक्या नाजूक नजरा खिळत असून देखील छपाईच्या व्यवसायांत बर्टीचें मन कांहीं रमेना. कारण तें काम शिकत असतांना त्याच्या डोक्यांत विचार चालू असत संगीताचे. एके दिवशीं रात्रीं त्याचे वडील वाचत बसले होते. बर्टी जवळ जाऊन म्हणाला, "मी आयुष्यभर गरीब राहिलों तरी चालेल, पण मला संगीतकार व्हायचं आहे." बर्टीच्या पुढल्या आयुष्याविषयीं जेव्हां जेव्हां

चर्चा चाले तेव्हां तेव्हां त्याची आई बर्टींचीच बाजू घेत असावी. शेवटीं एकदांचे त्याचे वडील कबूल झाले. आणि वयाच्या अठराव्या वर्षीं बर्टीनें संगीत शिकायला सुरुवात केली—खरें म्हणजे ही सुरुवात त्यानें फार पूर्वीच करायला हवी होती !

व्हिनेकरसारख्या छोट्या ठिकाणीं संगीताचें तांत्रिक शिक्षण त्याला कुठून मिळणार ? तेव्हां हें शिक्षण पत्रव्यवहारानें घ्यायचें त्यानें ठरवलें. न्यू यॉर्कमध्यें शिकवणाऱ्या एका इंग्रज संगीतकाराकडून त्यानें पत्रानें धडे घ्यायला सुरवात केली. याच वर्षीं त्यानें केलेली दुसरी रचना—'ॲपल ब्लॉसम' हें गीत—प्रसिद्ध झाली. हें गीत त्यानें वूडब्रीज या टोपण नांवानें प्रसिद्ध केलें होतें.

गांवांत अनेक समारंभ होत असत. आणि बर्टी त्यांत भागहि घेत असे. त्याच्याबरोबर वाढलेल्या मुली बोर्डिंग स्कूलमध्यें राहात होत्या. परंतु त्यांच्यापैकीं बऱ्याच जणी पिट्सबर्गपासून फार दूर नसल्यामुळें शनिवार-रविवारीं घरीं येत असत. एकदां वसंत ऋतूंत यांपैकीं एका मुलीनें सुट्टीसाठीं आपल्या दोन मैत्रिणी बरोबर आणल्या. बर्टी नेव्हिन आणि त्याचे दोन मित्र या तिघींना स्टेशनवर भेटले.

त्या काळांत मोटारी नव्हत्या. चालत येणं हेंच सर्वपरिचित होतं. या तिघांपैकीं एका मुलाला द्राक्षवेलींचे झोके कुठें आहेत तें माहीत होतें. तो म्हणाला कीं, आपण खेळायला तिथें जाऊं. त्या मुलींना सुद्धां ही कल्पना आवडली. त्या या पोरांबरोबर नदी ओलांडून डोंगरावर गेल्या. शेवटीं त्यांना द्राक्षांच्या वेलींचे हे झोपाळे लागले. हे झोपाळे विलक्षण होते. एकांत एक गुंतलेल्या या वेली इतक्या लांब होत्या कीं, मधली छोटी दरी ओलांडून झोका पलीकडे जात असे. प्रथम मुलगे या झोपाळ्यावर चढले आणि त्यांनीं मुलींच्या दृष्टीनें हा झोका कितपत सुरक्षित आहे याचा अंदाज घेतला. यानंतर बर्टी आणि बिली वूड्स् या दोघांनीं झोके घ्यायला सुरवात केली. झोका उंच उंच जाऊं लागला. दरी ओलांडून पुढें जाऊं लागला. तो एक विलक्षण अनुभव होता. इतक्यांत वेल तुटली—बर्टी आणि बिली वूड्स् खालच्या दरींत कोसळले : प्रथम बर्टी आणि नंतर बिली. हे दोघे अशा रीतीनें पडत असतांना पाहुणी म्हणून आलेली ॲन पॉल ही देखणी मुलगी मोठमोठ्यानें हंसूं लागली. तिला हंसूंच आवरेना त्याला ती तरी काय करणार ?

सुदैवानें कुणालाच विशेष लागलें नाहीं. बर्टीचा गुडघा जरा दुखावला गेला इतकेंच. त्या दिवशीं संध्याकाळीं पार्टी होती. गुडघा दुखावल्यामुळें नृत्य चालू असतांना बर्टीनें पिआनो वाजवण्याचेंच काम केलें. तो त्या दिवशीं आपल्या मित्रांना म्हणाला कीं, ॲन पॉल दिसायला सुंदर असली तरी इतक्या कठोर अंतःकरणाची मुलगी मीं पाहिलेली नाहीं. झोपाळ्यावरून तो पडत असतांना ती हंसत होती ही गोष्ट या तरुण पिआनोवादकाच्या मनांत सलत होती.

सहा महिन्यांनंतर या ॲन पॉलनें नववर्षाच्या पार्टीला आपल्या घरीं येण्याचें निमंत्रण बर्टीला दिलें. ॲन पॉलच्या वडिलांनीं आपल्या मुलीच्या मित्रमैत्रिणींना आणण्यासाठीं खास आगगाडीची व्यवस्था केली होती. फुलांची आणि संगीताची आवड असलेला, अतिशय संवदेनाशील असा बर्टी ॲनच्या ओळखीच्या कॉलेजांतील इतर मुलांहून फार वेगळा होता. ती स्वतः वृत्तीनें जरा मर्दानीच होती. घोड्यावर बसणें, भटकणें तिला फार आवडे. पार्टीचें निमंत्रण देतांना तिनें बर्टीची आठवण ठेवावी हें थोडेंसें आश्चर्यकारकच होतें. इतकेंच नव्हे तर तिनें नृत्याच्या वेळीं इतक्या पाहुण्यांतून आपल्याबरोबर नाचण्यासाठीं बर्टीचीच निवड केली.

एथिलबर्टचें संगीताचें शिक्षण पत्रांच्या द्वारें चालूच होतें. चर्चमध्येंहि तो ऑर्गन वाजवीत होता. परंतु आतां संगीताचें काळजीपूर्वक शिक्षण घेतलें पाहिजे असें त्याला तीव्रतेनें जाणवूं लागलें होतें. बोस्टन हें त्या काळीं संगीताचें केंद्र होतें. पुढचें शिक्षण घेण्यासाठीं म्हणून बर्टी बोस्टनला गेला. ॲन आतां आपला कॉलेजचा अभ्यास संपवून बरोबरच्या कांहीं मैत्रिणींबरोबर परदेशीं गेली होती. शिक्षण संपल्यानंतर परदेशप्रवासाचा शिक्का असलेला बरा असाच तिच्या वडिलांचा हेतु होता.

एथिलबर्ट नेव्हिनचें संगीताचें शिक्षण आतां जोरांत सुरू झालें होतें. त्याला पिॲनो शिकवणारा शिक्षक लिझ्टचा शिष्य होता. तो नेव्हिनकडून अतिशय कसून रियाज करून घेत असे. ड्रेस्डनमध्यें शिक्षण घेत असतांना कितीतरी कमी परिश्रम करावे लागत—तें अगदीं स्वर्गसुख होतें—असें बर्टीनें एका पत्रांत आपल्या आईला लिहिलें होतें. बर्टी यानंतर स्वरलेखनाचें शिक्षण घेऊं लागला. स्वरलेखन शिकवणारा शिक्षकसुद्धां बर्टीकडून खूप काम करून घेत असे. जे प्राथमिक धडे खरें म्हणजे आठ वर्षांपूर्वींच बर्टीनें शिकायला हवे

होते ते त्याला आतां शिकावे लागत होते. पण त्याला इलाज नव्हता. कारण त्यानें संगीताचें शिक्षण घ्यावें यासाठीं वडिलांचें मन वळविण्यांतच इतका काळ गेला होता. जेव्हां हें शिक्षण घेण्यासाठीं तो तहानेला होता, त्याच्या वृत्ति ताज्या होत्या, तेव्हां त्याला जर हें शिक्षण मिळालें असतें तर अधिक चांगलें झालें असतें. परंतु निराशेचीं आंदोलनें सहन केल्यानंतर आतां इतक्या वर्षांनंतर त्याला हें शिक्षण मिळत होतें. त्यामुळें तालीम घेतां घेतां त्याच्या वृत्ति हेलकावे घेऊं लागत. कधीं कधीं त्याला विलक्षण उत्साह वाटूं लागे तर कधीं कधीं त्याचें मन खिन्नतेच्या गर्तेत बुडून जाई आणि आपलें ध्येय आपल्याला साध्य होईल किंवा काय अशी शंका त्याला छळूं लागे. या शिक्षणाला सुरवात होण्यापूर्वीं इतकीं वर्षें तो आपल्या घरींच राहात होता. घरापासून दूर राहाण्याची त्याला संवय नव्हती. त्यामुळें आतां घरच्या आठवणींनीं त्याचें मन बेजार होऊन जाई. तो आणि त्याची आई यांच्यांत विलक्षण जिव्हाळा होता. तिला आपल्या मुलाविषयीं फार सहानुभूति वाटत असे. त्यामुळें सर्वसामान्य मुलाला वाटतो त्यापेक्षां बर्टीला आईविषयीं अधिक जिव्हाळा वाटे. तो तिला पत्रांत लिही कीं, चोवीस तासांऐवजीं दिवसाचे पंचवीस तास केले तरच शिक्षकांच्या अपेक्षेप्रमाणें मी काम करूं शकेन. सारखा रियाज करून करून पुष्कळ वेळां त्याचा हातहि दुखून येई. परंतु कितीहि अडचणी आल्या तरी नेव्हिन हटणारा नव्हता. आपल्या आईला लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें म्हटलें होतें, "कांहींहि झालें तरी मी थांबणार नाहीं."

बोस्टनमधल्या दुसऱ्या वर्षीं खर्च भागवण्यासाठीं एथिलबर्टनें कांहीं शिकवण्या मिळविण्याचा प्रयत्न केला. चर्चमध्यें ऑर्गन वाजवणाऱ्याची जागा मिळते किंवा काय हें पाहिलें. पण यापैकीं कांहींच त्याला साधलें नाहीं. कधीं उत्साह तर कधीं खोल निराशा अशा दोन टोकांत त्याचें मन आंदोलन घेऊं लागलें. या काळांत तो स्वतःकडे गीतलेखक म्हणून न पाहतां पिॲनोवादक म्हणूनच पहात असे. त्यानें एका पत्रांत लिहिलें आहे, "सकाळपासून रात्रीपर्यंत एकसारखा रियाज, रियाज, रियाज. मी अगदीं थकून जातों, निराश होतों. कसलेल्या कलावंताप्रमाणें पिॲनो वाजवायला येण्यासाठीं मला आणखी किती वर्षें घालवावीं लागतील कोणाला ठाऊक." या पत्राप्रमाणेंच त्यानें असेंहि पत्र आपल्या आईला लिहिलें होतें कीं, आपल्या

एका जाहीर कार्यक्रमाबद्दल आपल्या शिक्षकानें पाठ थोपटली. या काळांत स्वरलेखनाविषयीं तो म्हणतो, “माझ्या मेंदूंत अनेक कल्पना भरलेल्या आहेत.” परंतु सुचलेल्या या कल्पना कागदावर उतरवण्यासाठीं त्याला ती गोष्ट अजूनहि अधिक शिकली पाहिजे असें वाटे.

नंतर एका हिंवाळयांत नेव्हिननें पिटस्बर्ग येथें एक स्टूडिओ भाड्यानें घेतला. आतां तो व्यावसायिक प्रिॲनोवादक आणि शिक्षक झाला होता. त्या वर्षी त्याची ‘आय्, वन्स हॅड अ स्वीट लिटल् डॉल, डिअर्स’ आणि ‘व्हेन ऑल धी वर्ल्ड इज यंग, लॅड’ हीं दोन गीतें प्रसिद्ध झालीं. याच काळांत पूर्वी तो झोपाळ्यावरून पडला असतांना त्याला जी मुलगी हंसली होती तिचें आणि याचें प्रेम जुळलें. तिच्याशीं नेव्हिनचें लग्न ठरल्यानंतर उन्हाळयांत तो युरोपला जाण्यासाठीं निघाला. आतां त्याचें वय एकवीस होतें. याची प्रेयसी ॲन हिचे वडील व्यापारी होते. परंतु संगीताच्या अभ्यासाविषयींची नेव्हिनची गरज खुद्द त्याच्या वडिलांपेक्षां यांनाच अधिक कळत होती असें दिसतें.

त्याचे वडील भाऊ या वर्षीच्या शिक्षणाचा खर्च करीत होते. त्यानें त्यांना बर्लिन पाहून आपण भारून गेलों असें पत्र लिहिलें होतें. बर्लिन येथें राहूनच नेव्हिन शिकत होता. त्याच्या शिक्षकाचें नांव होतें क्लाइंडवर्थ, हा शिक्षक जुलमी आहे असें प्रथम नेव्हिनला वाटलें. परंतु हळूहळू नेव्हिनला त्याच्याविषयीं आदर वाटूं लागला. त्याच्याइतकें आपल्याला कोणींच शिकवलें नाहीं ही जाणीव त्याला होऊं लागली. आणि ते दोघे जिवलग मित्र बनले. तो आतां खूप अभ्यास करीत होता, उत्तमोत्तम संगीताचे जलसे ऐकत होता, जर्मन भाषा शिकत होता—अशी ही उत्तम संधि त्याला लाभली होती. पण या परिस्थितींतहि मधूनमधून त्याला निराशेचे झटके येत. आणि तो आपल्या पत्रांतून लिही, “प्रगतीची आशा दिसत नाहीं. संगीत हा व्यवसाय म्हणून स्वीकारण्याचा मी कुणालाहि सल्ला देणार नाहीं.”

बर्लिनमध्यें नेव्हिन केवळ कामांतच गढलेला होता असें नाहीं. तो पार्ट्यांना जाई, ऑपेरा पाही. तिथलें सामाजिक जीवन प्रसन्न होतें. नाटकगृहांत नेव्हिनच्या शिक्षकाची बसायची खास जागा राजाच्या जागेशेजारीं होती. क्लाइंडवर्थ नेव्हिनला आपल्या शेजारीं बसवीत असे. मध्यंतराच्या काळांत ड्यूक, काउंट, त्यांच्या स्त्रिया वगैरे बडे लोक क्लाइंडवर्थ बसलेल्या जागीं येत. इतकीं मोठीं

माणसें एकत्र आपण पूर्वीं कधींच पाहिलीं नव्हतीं असें नेव्हिननें आपल्या एका पत्रांत लिहिलें होतें.

एका वर्षानंतर तो सुट्टीसाठीं घरीं आला आणि त्यानंतर दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासासाठीं म्हणून पुन्हां बर्लिनला गेला. वाटेंत तो लंडनला थांबला. तिथें त्यानें गिलबर्ट आणि सलिव्हन यांनीं लिहिलेल्या 'द मिकॅडो'चा प्रयोग पाहिला. तो त्याला विलक्षण आवडला. बर्लिनमधलें दुसऱ्या वर्षाचें वास्तव्य नेव्हिनला सुखाचें झालें असणार. कारण या वर्षीं ॲन आणि तिची बहीण बर्लिनला गेली होती. त्या वर्षीची ख्रिसमसची पार्टी खूप रंगली. मित्रमंडळींनीं जमून गाणीं म्हणणें, नृत्य करणें हें जुन्या जर्मनीचें वैशिष्ट्य होतें. त्या वर्षीच्या ख्रिसमस पार्टीच्या वेळीं गाणीं म्हणतांना आपण किती सुदैवी आहोंत याची नेव्हिनला कल्पनाहि नसेल. कारण लवकरच संगीताचें वरदान असलेल्या या भूमीवर संगीत मारलें जाणार होतें. युद्ध आणि संगीत एकत्र वाढूं शकत नाहीं. राष्ट्राचे विचार युद्धानें व्यापले गेले कीं संगीत दूर जातें.

वसंत ऋतूच्या उबदार दिवसांत सफरी, नदीवरच्या सहली अशा कार्यक्रमांनीं नेव्हिनचें आयुष्य गजबजलें होतें. जुन्या हाय्‌ड्‌लबर्गलाहि तो जाऊन येई. अशा या कार्यक्रमानें गजबजलेल्या दिवसांत पिॲनोसमोर बसून नेव्हिनला घाम गाळावा लागत नसे. नेव्हिनची जीवनकथा वाचतांना जर्मनीमधल्या त्या काळांतील विद्यार्थ्यांचें जीवन कसें प्रसन्न असे याची कल्पना येते.

अमेरिकेला परत आल्यानंतर पिट्सबर्ग येथें नेव्हिननें पिआनोवादनाचा पहिला जाहीर कार्यक्रम केला. त्याला खूप यश मिळालें. यानंतर तो वेगवेगळ्या जलशांतून वाजवूं लागला, संगीतरचना करूं लागला. सव्विसाव्या वर्षीं त्याचें ॲनशीं लग्न झालें. तीं मॅसच्युसेटस् येथें बोस्टनमध्यें किंवा जवळच राहूं लागलीं. कांहीं वेळां तो शिकवण्याहि करीत असे. त्यानें पुष्कळ गाणीं आणि पिॲनोवर वाजवण्यासाठीं चिजा लिहिल्या.

युरोपला तो पुष्कळदा जाऊन आला. 'वॉटर सीन्स' या त्याच्या पिआनोवरच्या चिजा प्रसिद्ध झाल्या तेव्हां तो युरोपमध्येंच होता. या चिजांपैकीं 'नार्सिसस' ही चीज विलक्षण लोकप्रिय झाली. तिच्या लक्षावधि प्रती खपल्या. पिॲनो शिकणारा प्रत्येक विद्यार्थी ही चीज वाजवायला शिकूं लागला. रस्त्यावरून फिरवल्या जाणाऱ्या हर्डीगर्डीसारख्या वाद्यापासून तों थेट

ऑर्केस्ट्रापर्यंत ही चीज सर्वत्र पोंचली. प्रिन्स ऑफ वेल्सनें आपल्यासाठीं ती खास वाजवून घेतली. क्लॉंडाइक येथें कामगार बाजावर ती चीज वाजवूं लागले. बिचाऱ्या नेव्हिनची पाठ ही चीज कांहीं सोडेना. त्यानें कुठेंहि जाहीर कार्यक्रम केला कीं ही चीज वाजवण्याचा आग्रह आणि वाजवल्यानंतर बन्समोअर यांतून नेव्हिनची सुटका होईना. "ती तापदायक चीज नार्सिसस" असा तो तिचा उल्लेख करीत असे.

एक मुलगा आणि मुलगी अशीं दोन मुलें नेव्हिनला झालीं. एकदां नेव्हिन आपल्या कुटुंबाबरोबर राहण्यासाठीं पॅरीसला जागा शोधीत होता. शेवटीं त्यानें एक जागा पसंत केली. खालच्या मजल्यावर 'द हॉर्स फेअर' या गाजलेल्या चित्राचा चित्रकार रोझा बॉनहूर राहात होता. आपल्या वरच्या मजल्यावर पिआनो वाजलेला चालणार नाहीं अशी त्यानें हरकत घेतली. त्यामुळें नेव्हिनला तिथें राहतां आलें नाहीं. त्यानें लिहिलें होतें, "एखाद्या इमारतींत मायकेल एंजेलो आणि शेक्सपिअर जरी राहात असले तरी तिथें मला जर पिॲनो वाजवतां येत नसेल तर ती जागा मिळून मला उपयोग काय?"

अमेरिकेंत असतांना त्याची आणि मॅक्डुवेलची ओळख झाली. एका कार्यक्रमांत ते एकत्र स्टेवजर आले. मॅक्डुवेल किंवा नेव्हिन संगीताच्या क्षेत्रांतल्या कुठल्याहि गटाला धरून नव्हते. मॅक्डुवेल हा स्वभावानें लाजरा आणि कांहींसा अबोल असल्यामुळें तो कुठल्याहि गटांत जाणें शक्य नव्हतें. बोस्टनमधले प्रतिष्ठित संगीतकार नेव्हिनला किरकोळ मानीत. परंतु मॅक्डुवेलला कलावंताचें हृदय असल्यामुळें त्याला नेव्हिनचें मोल ठाऊक होतें. नेव्हिन सिंफनी लिहीत नसला तरी उत्स्फूर्त अशा मेलडींचें लेखन करूं शकतो या त्याच्या सामर्थ्याची जाणीव मॅक्डुवेलला होती. मॅक्डुवेल म्हणे, "परिश्रम करून पाडलेल्या अनेक सिंफनी लोक विसरून जातील. पण नेव्हिननें लिहिलेलं नार्सिसस टिकून राहील."

नेव्हिन तसा फारसा धडधाकट नव्हता. मनावर पडलेला ताण हलका करण्यासाठीं युरोपमध्यें जाऊन शांतपणें राहण्याची त्याला आवश्यकता वाटत असे. तिथलें जीवन त्याला आवडे. तिथें अभ्यास करणें, वाजवणें त्याला रुचत असे. एका अर्थानें तें खरें होतें. कारण अमेरिकेंतल्या वास्तव्यांतला त्याचा बहुतेक वेळ पैसे मिळवण्यासाठींच खर्च होत असे. युरोपच्या त्याच्या शेवटच्या

सफरींत तो एकदां आपल्या कुटुंबाला घेऊन इटलींत राहिला होता. त्या दिवशीं ख्रिसमसची संध्याकाळ होती. खोलींत एकटाच बसून नेव्हिन आपल्या गीतांतल्या काल्पनिक मुलांना पिॲनो वाजवून दाखवत होता. तें विलक्षण दृश्य होतें. मानवी जगापेक्षां वेगळें असें अद्‌भुत वातावरण असलेला तो जलसा होता. नेव्हिन झपाटल्यागत वाजवत होता. खोलींत आपली बायको मागें येऊन उभी राहिली आहे याची त्याला कल्पनाहि नव्हती. तिनें तें विलक्षण दृश्य पाहिलें :

"तो पिआनोवर 'एव्हरिव्हेअर एव्हरिव्हेअर ख्रिसमस टुनाइट' हें गीत हलकेंच वाजवीत गात होता. थोडया वेळानें आयत्या वेळीं जसं सुचेल तसं तो वाजवूं, गाऊं लागला. यापूर्वी किंवा त्यानंतरहि त्यानें इतका सुंदर पिॲनो कधीं वाजवला नाहीं. त्याच्या सुंदर गीतांतून वावरणाऱ्या स्वप्नपुत्रांसाठीं, स्वप्नकन्यांसाठीं तो वाजवीत होता. तीं सगळीं मुलं त्याच्याभोंवतीं जमलीं होतीं. त्याला जणूं तीं 'दिसत' होतीं. तो विश्वासभरल्या आवाजानें त्यांच्याशीं बोलत होता. स्वप्नांतल्या एका मुलाकडे वळून तो म्हणायचा, आतां हें गाणं तुझ्यासाठीं. मग दुसऱ्याकडे वळून म्हणायचा, आणि आतां हें तुझ्यासाठीं बरं! त्याच्या गीतांतून वावरणारीं मुलं एकामागून एक त्याच्याकडे येत होतीं. जिची बाहुली मोडली होती ती छोटी मुलगी, रात्रीं जागा झालेला तो छोटा मुलगा...या सगळ्यांचं नाजूक शब्दांनीं, स्मितांनीं तो स्वागत करीत होता." यानंतर नेव्हिनचा डॉक्टर असें म्हणाला कीं, एखाद्या कवीच्या डोक्यांत निर्माण होऊं शकेल असें हें कल्पनाविश्व नेव्हिनला बहुधा इन्फ्लुएंझामुळें दिसलें असणार!

एथिलबर्ट नेव्हिननें केलेल्या स्वतंत्र संगीतलेखनांत एक प्रकारचा डौल आहे, माधुरी आहे. त्याच्या काळांतल्या लोकांना त्याचें संगीत आवडलें होतें. त्यानें लिहिलेल्या मेलडी सुरेल होत्या. संगीतलेखक म्हणून तो फार मोठा नव्हता किंवा संगीतांतले बिकट प्रकार हाताळण्याचाहि त्यानें प्रयत्न केला नाहीं. परंतु त्याच्या संगीतांतल्या भावना जरी सांकेतिक असल्या तरी त्यांत एक प्रकारची तळमळ होती. अर्व्हिंग बर्लिन या संगीतकाराचें जीवन आणि संगीत नेव्हिनपेक्षां फार वेगळें होतें. आणि म्हणूनच नेव्हिनच्या 'द रोझरी' सारखें गीत आपण लिहावें असें बर्लिनला वाटलें होतें याचें आपल्याला आश्चर्य वाटतें.

'द रोझरी' हें गीत नेव्हिननें लिहिलें तेव्हां त्याचें वय पस्तीस वर्षांचें होतें. त्या वेळीं तो न्यू यॉर्कमध्यें राहात होता. एकदां त्याच्या आईनें त्याला एक पत्र पाठवलें. या पत्रासोबत तिनें एक कात्रण पाठवलें होतें. हें कात्रण म्हणजे रॉबर्ट कॅमेरॉन रॉजर्स याची 'द रोझरी' ही कविता होती. त्याच्या आईला ती फार वर्षांपूर्वी वर्तमानपत्रांतून कुणींतरी कापून दिली होती. आईनें ती कविता पाठवल्यानंतर एक महिना त्यानें ती तशीच ठेवून दिली. आणि एके दिवशीं त्यानें ही कविता काढून पाठ केल्यासारखी पुन्हां पुन्हां वाचली. आणि एका बैठकींत त्या कवितेची चाल बांधली. स्वरलेखन करून झाल्यानंतर त्यानें तें आपल्या बायकोला भेट म्हणून दिलें. भेट देतांना त्यानें एक छोटेंसें पत्र जोडलें होतें. "परमेश्वरानें माझ्या आयुष्यांत तुला आणलं याबद्दल मला किती कृतज्ञता वाटते ती तुला कळण्यासाठीं हें स्मृतिचिन्ह मी तुला देत आहें. माझं सर्व प्रेम, माझी सर्व निष्ठा तुझ्यासाठीं. तुझा एथिलबर्ट नेव्हिन."

एखाद्या माणसाविषयीं वाटणारें प्रेम अचानकपणें विलक्षण माधुर्यानें, उत्स्फूर्तपणें व्यक्त करणें हें नेव्हिनच्या स्वभावाचें एक वैशिष्ट्य होतें. लहान असतांनाहि तो अकस्मात् फुलांचा गुच्छ घेऊन आईसमोर किंवा बहिणीसमोर भेट देण्यासाठीं उभा राहात असे. 'द रोझरी' या गीताचा खपाच्या बाबतींतला विक्रम जगांत दुसऱ्या कुठल्याहि गीतानें अजून मोडलेला नाहीं. या कवितेला व्यापारी पद्धतीनें कसलाहि प्रचार न करतां अमाप लोकप्रियता लाभली.

एका टीकाकाराचें असें म्हणणें आहे कीं, नेव्हिननें 'लिटल् बॉय ब्ल्यू' या गीताखेरीज दुसरें कांहींहि लिहिलें नसतें तरी नेव्हिनचें नांव अमर झालें असतें. हें गीत नेव्हिननें आगगाडींतल्या प्रवासांत रचल्याची आठवण त्याच्या बायकोनें लिहिली आहे. प्रवासांत अनेक लिफाफ्यांच्या मागच्या बाजूला त्यानें या गीताचें लेखन केलें होतें. त्यानें मुलांसाठीं इतरहि अनेक गीतें लिहिलीं. शिकागोच्या जागतिक जत्रेसाठीं मुलांचें एक खास गाणें लिहावें अशी त्याला मागणी आली होती. त्यानें अनेक फ्रेंच आणि जर्मन कवितांना चाली दिल्या होत्या. ख्रिसमससाठीं भक्तिगीतेंहि त्यानें लिहिलीं. 'मायटी लॅक अ रोझ्' हें त्याचें गीत त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालें. हें गीत अतिशय लोकप्रिय झालें आणि त्याच्या हजारों प्रती खपल्या.

नेव्हिनच्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षीची गोष्ट. तो सेंट व्हॅलेंटाइनचा दिवस होता. नेव्हिन तेव्हां न्यू हॅवन, कॉनेक्टिकट येथें राहात होता. या दिवशीं त्यानें आपल्या छोट्या मुलीसाठीं एक पार्टी करायचें योजलें होतें. त्याचा मुलगा तेव्हां शाळेंत गेला होता. बायको घरीं नव्हती. तेव्हां त्यानें स्वतः रिबीनींनीं आणि फुलांनीं खोली सजवली. मग त्यानें घोड्याच्या गाड्या पाठवून आपल्या मुलीच्या छोट्या मित्रमैत्रिणींना घरीं आणलें. त्या छोट्या मुलांनीं नाच केले आणि नेव्हिननें पिॲनो वाजवला. त्यानें मुलांचीं गाणीं म्हटलीं. त्यांच्याबरोबर तो खेळला. शेजारचा एकजण घरांत डोकावला तेव्हां नेव्हिन त्याला हंसून म्हणाला, "मी माझं आयुष्य भोगतों आहें."

नेव्हिनच्या आयुष्यांतली ही शेवटची पार्टी ठरली. कारण या पार्टीनंतर तीन दिवसांनीं तो हें जग सोडून गेला. तो जिवंत असतांना खर्च भागवण्यासाठीं पुरेसे पैसे त्याला त्याच्या गीतांतून मिळूं शकले नाहींत. त्याच्या मृत्यूनंतर 'द रोझरी' या गीतानेंच अमाप पैसा दिला.

एथिलबर्ट नेव्हिन

जन्म : पिट्स्बर्गजवळ व्हिनेकर येथें
२६ नोव्हेंबर १८६२

मृत्यु : न्यू हॅवन, कॉनेक्टिकट येथें
१७ फेब्रुवारी १९०१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम........................ विः ..........
क्रमांक ........................ नों: विः ........

# लोकप्रिय संगीतांतले बदलते ढंग

प्रत्येक काळांतील महत्त्वाचे प्रसंग, ऐतिहासिक घटना, वीरांच्या पराक्रमांच्या कथा, प्राचीन काळापासून आजतागायत पोवाड्यांतून आणि लोकप्रिय गीतांतून सांगितलेल्या आढळतात. प्रत्येक राष्ट्राचे खास स्वतःचे पोवाडे आणि लोकप्रिय गाणीं असतात. अमेरिकेंत नव्या राजकीय विचारसरणीबरोबरच समाजरचनेची एक नवी घडी बसत असल्यामुळें इथल्या लोकप्रिय संगीतांत विलक्षण बदल झालेले दिसतात.

दक्षिणेंतल्या मळ्यांत काम करणारे निग्रो जीं धार्मिक गाणीं म्हणत त्यांतून निग्रोंचे 'स्पिरिच्युअल्स' हें भक्तिसंगीत निर्माण झालें. गौरवर्णीय गायकांचीं पथकें निग्रो गीतांचे कार्यक्रम करीत.—हा गोऱ्या लोकांवर झालेला निग्रोसंगीताचा परिणाम होता. हे कार्यक्रम 'मिन्स्ट्रेल शोज' म्हणून ओळखले जात. स्पिरिच्युअल्स या भक्तिसंगीतानंतर ब्ल्यूज (Blues) या नांवानें ओळखला जाणारा निग्रोसंगीताचा प्रकार जन्माला आला. मिन्स्ट्रेल शोज, लोकप्रिय गाणीं आणि भावपूर्ण पोवाडे यांतून एक नृत्याचा नवा ताल निर्माण झाला, नव्या ठेक्याचें संगीत आलें. हें संगीत रॅग्टाइम् (Ragtime) या नांवानें ओळखलें जाऊं लागलें.

अमेरिकेचें लोकप्रिय संगीत विकास पावत होतें त्या ऐन काळांत मध्य युरोपांत राहाणाऱ्या ब्रॅहम्स या संगीतकाराचें लक्ष रॅग्टाइम् या संगीतप्रकाराकडे वेधलें

होतें. रॅग्टाइमचा उपयोग आपल्या संगीतांत करून घेण्याचे विचार आपल्या मनांत घोळत असल्याचें ब्रॅहम्सनें आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें होतें. यानंतर लवकरच कांहीं वर्षांनीं ब्रॅहम्सचा मृत्यु झाला. बोहेमियाचा संगीतकार डिव्हीरॉक हा या काळांत अमेरिकेंत राहत होता. त्याचेंहि लक्ष निग्रोंच्या संगीतानें वेधून घेतलें होतें. या वेळीं पुष्कळसे अमेरिकन संगीतकार जन्माला येत होते आणि कांहींजण अगदीं लहान होते.

रॅग्टाइम् संगीताविषयीं लिहितांना कुणींसे म्हटलें आहे, "खूप संगीत ऐकलेल्या संस्कारित माणसाला देखील खेचून घेईल असा जोम रॅग्टाइम् संगीतांत असतो." रॅग्टाइम्मधला हा जोमदारपणा पुढें अधिकाधिक महत्त्वाचा बनणार होता, वाढणार होता. निग्रोसंगीतांतल्या तालांनीं नकळत लोकप्रिय संगीताला एक नवी गति प्राप्त करून दिली होती. या संगीतांत अस्वस्थ ताण व्यक्त करणारी गति होती. अनाघाती मात्रेची सम घेऊन तालाशीं क्रीडा करणें हें या संगीताचें वैशिष्ट्य होतें. अनाघाती मात्रेच्या हुलकावणीचा हा खेळ कांहीं नवीन नव्हता. जिप्सी संगीत, हंगेरियन गाणीं आणि नाच, जुन्या स्पेनमधील संगीत यांत हा प्रकार भरपूर होता. पण रॅग्टाइम् संगीतामधल्या तालाच्या या खेळाला विशेष वेगळी चव होती यांत शंका नाहीं.

रॅग्टाइम् संगीतानें लोकांना अगदीं वेड लावलें. नंतर हळूहळू रॅग्टाइम् संगीत वाजवतां येणें हें एक विशेष नैपुण्य समजलें जाऊं लागलें. अगदीं कमी खर्चांत या संगीताचे धडे मिळण्याची सोय झाली. आपल्या घरीं स्वतःचा पिआनो असलाच पाहिजे असें लोकांना वाटूं लागलें. १८९० च्या सुमाराला रॅग्टाइम् संगीताला जी लोकप्रियता मिळाली त्यामुळें वाद्यसंगीताच्या प्रगतीला विशेष चालना मिळाली. नाचाचें वेड असणाऱ्या लोकांना अगदीं हवें होतें तसें हें संगीत होतें. बऱ्याच लोकांच्या घरीं आतां वाद्यें होतीं. त्यामुळें संगीताचीं पुस्तकें विकणें आतां बरेंच सोपें झालें होतें. अशीं पुस्तकें विकण्याचा मोठा धंदा निर्माण झाला. 'टिन पॅन ॲली' या नांवानें तो ओळखला जाऊं लागला.

न्यू यॉर्क शहरांत २८ व्या रस्त्यावर सहावा ॲव्हेन्यु आणि ब्रॉडवे यांच्यामध्यें लोकप्रिय संगीत प्रसिद्ध करणाऱ्या अनेक प्रकाशकांचीं कार्यालयें होतीं. या कार्यालयांतल्या लहान लहान खोल्यांतून हलक्या दर्जाचे पिआनो ठेवलेले होते. हा दर्जा सुचवणाऱ्या 'टिन पॅन' या शब्दानें हे पिॲनो आणि हा विभागहि

ओळखला जाई. या टिन पॅन ॲली' येथें सकाळपासून रात्रीपर्यंत पिॲनोंचा ठणठणाट चालू असे. "कांहीं करून गाणें विका." अशी या विभागाची व्यवसाय-घोषणा होती. तेव्हांपासून हळूहळू प्रगति होत 'टिन पॅन ॲली' हा विभाग न्यू यॉर्कमधल्या सुखवस्तु वस्तीपर्यंत जाऊन पोंचला. प्रगतीचा दुसरा भाग म्हणजे, या कचेऱ्यांच्या बैठकीच्या खोल्याहि अधिकाधिक चांगल्या सजवल्या जाऊं लागल्या. अर्व्हिंग बर्लीन लहानपणीं या विभागांतला एक अरुंद जिना चढून पिॲनो ठेवलेल्या एका मळकट खोलींत येत असे आणि त्याला सुचलेली चाल एका बोटानें पिॲनोवर वाजवण्याचा प्रयत्न करीत असे. जॉर्ज जर्श्विन हा टिन पॅन ॲलीच्या कारखान्यांत संगीत लोकांच्या कानांत ठासून ठासून लोकप्रिय करण्याच्या कामावर होता. अलीकडे अर्व्हिंग बर्लीनच्या कार्यालयांत लोकप्रिय संगीत प्रसिद्ध केलें जातें. त्या कार्यालयाचीं दालनें चांगलीं मोठीं आणि सुशोभित असतात. 'टिन पॅन ॲली' हा विभाग हळूहळू अधिकाधिक सुसंस्कृत रूप धारण करूं लागला आहे.

पहिलें महायुद्ध चालू असतांना आणि नंतर रॅग्टाइम् संगीतांतून जाझ हा प्रकार उदयाला आला आणि लोकप्रिय झाला. जाझ संगीत लोकप्रिय झाल्यानंतर वाद्यसंगीतांत 'स्विंग म्यूझिक' या नांवानें ओळखली जाणारी जाझचीच एक नवी शैली निर्माण झाली. या शैलीनें वाजवणारे कलावंत एखादी विशिष्ट धून घेऊन तिच्यावर आधारलेले आयत्या वेळीं सुचतील तसे वेगवेगळे प्रकार वाजवून दाखवतात.

बेन हार्नी हा रॅग्टाइम् संगीताचा एक अग्रेसर रचनाकार होता. तो पिॲनो-वादकहि होता. लुइस व्हिल येथला तो राहाणारा. न्यू यॉर्कमध्यें तो विलक्षण लोकप्रिय झाला. रॅग्टाइम् संगीताचा प्रसार व्हायला सुरवात झाली तेव्हां त्यानें 'द रॅग्टाइम् इन्स्ट्रक्टर' नांवाचें पुस्तक लिहिलें. कुठलीहि चाल रॅग्टाइम् संगीताच्या भोडणींत रचून देणें हें बेन हार्नीचें वैशिष्ट्य होतें. अशा प्रकारचे तो पिआनोचे कार्यक्रम करीत असे, आणि लोकांना ते आवडत. मेंड्लसॉहनचें 'स्प्रिंग सॉंग' आणि रुबिन्स्टाइनचें 'मेलडी इन् एफ्' देखील तो रॅग्टाइम् शैलींत वाजवीत असे. टिन पॅन ॲली या विभागांत जुळारी (Arranger) म्हणून जो एक वर्ग उदयाला आला त्यांतला बेन हार्नी हा अग्रेसर होता असें म्हणायला हरकत नाहीं.

अर्व्हिंग बर्लीन एखादी चाल सुचली कीं पिॲनोपुढें बसून एका बोटानें वाजवण्याचा प्रयत्न करीत असे. कारण त्याला पिॲनो वाजवतां येत नसे. परंतु एखादी चाल ऐकल्यानंतर दाही बोटांनीं ती सफाईनें पिॲनोवर वाजवणारे आणि त्या चालीचें नोटेशन कागदावर लिहूं शकणारे बरेच लोक होते. स्वतंत्र चाल निर्माण करण्याची सर्जनशीलता या जुळाऱ्यांच्या ठिकाणीं नव्हती. ही स्वतंत्र निर्माणशक्ति असलेल्या कलावंताला हे जुळारी सांगत, "तुला सुचलेली चाल गुणगुणून दाखव." ही चाल ऐकल्यानंतर ते तिचें नोटेशन लिहून काढीत, हार्मनींत बसवून देत आणि साथीच्या वाद्यांचेंहि नोटेशन लिहून देत. या कामापासून तों क्लासिकल मेलडी रॅग्टाइम् मोडणींत जुळवून देण्यापर्यंत हे जुळारी सर्व तऱ्हेचीं कामें करीत. वाद्यांच्या साथीच्या नव्या संगतीहि ते रचून देत असत. ब्ल्यू संगीतासाठीं हॅंडी या संगीतकारानें सॅक्साफोन हें वाद्य लोकप्रिय केलें. या वाद्यामुळें एक नवें युग निर्माण झालें. व्हिक्टर हर्बर्टच्या काळांतलें काव्यमय व्हायोलिन जाऊन नृत्यसंगीत बाजवणाऱ्या आर्केस्ट्रांनीं फुंकरीनें वाजवायच्या तालवाद्यांचा स्वीकार केला. जाझ संगीतासाठीं याच वाद्यांची जरुरी होती.

कांहीं गीतलेखक गीतांचे शब्द आणि स्वर स्वतःच लिहितात. कांहीं मात्र दुसऱ्याकडून शब्द घेऊन फक्त स्वरलेखन करूं शकतात. इरा जर्श्विन आपल्या भावासाठीं गीतांचे शब्द लिहीत असे. जार्ज जर्श्विननें 'ऱ्हप्सडी इन् ब्ल्यू'चें स्वरलेखन दोन पिआनोंसाठीं केलें होतें. फर्ड ग्राफे या जुळाऱ्यानें ऑर्केस्ट्रासाठीं 'ऱ्हप्सडी इन् ब्ल्यू'ची जुळणी केली—या गीताच्या लोकप्रियतेंत ग्राफेच्या आर्केस्ट्रा-जुळणीचा फार मोठा भाग होता. व्हिक्टर हर्बर्ट मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउसच्या ऑर्केस्ट्रांत सेलोवादक म्हणून काम करीत असतांना त्याच्या शेजारीं जो दुसरा सेलोवादक बसत असे त्याचा हा फर्ड ग्रॉफे नातू. टिन पॅन ॲली विभागांतून जाझ शैलींत जुळणी केलेल्या या लोकप्रिय संगीताच्या उत्पादनांत संयमाचा अभाव होता. रॅग् शैलींत अधिकाधिक, गरमागरम जोश निर्माण करण्याच्या प्रयत्नांत जीं गाणीं तयार होत तीं लोकप्रिय होत आणि फार लौकर विसरलींहि जात. जाझ शैलींत जुळणी करून देणाऱ्या या लेखकांना सतत नव्या नव्या मेलडींची आवश्यकता भासे. ज्या क्लासिकल संगीताला हे जुळारी उच्चभ्रू समजत त्या संगीतांतून ते हवी तशी उचलेगिरी करून, उचललेल्या तुकड्यांना वेडेंवांकडें रूप देऊन जाझ

शैलींत हा सगळा प्रकार ठांसून भरीत. 'आवाजांचें विचित्र स्वप्न' असें या जुळाऱ्यांनीं निर्माण केलेल्या तुकड्यांना म्हणतां येईल. कारण जाझ हें अस्वस्थ मनाचा ताण व्यक्त करणारें, अस्वस्थ युगाचें संगीत आहे.

अमेरिकेंत संगीताचा विकास प्रथम कला म्हणून होण्याऐवजीं उद्योगधंद्याचा प्रकार म्हणूनच झाला. अर्थात् लोकप्रिय संगीत अशा वेळीं विशेष भराला येणें स्वाभाविक होतें. गेल्या कांहीं पिढ्यांत अमेरिकेंत आर्थिक सुबत्ता नांदूं लागली आहे, त्यामुळें अभिजात संगीत किंवा गंभीर संगीत यांना उत्तेजन देणारे आश्रयदाते रसिक आणि संस्था निर्माण होऊं लागल्या आहेत. असें गंभीर संगीत लिहिणारे लेखकहि आपल्या रचनेंतून जाझ संगीताचा उपयोग करतात.

उत्कृष्ट कला ही तिचें रसग्रहण करणारे आहेत तोंपर्यंत टिकून राहाते. म्हणूनच आपण अशा संगीताला गंभीर संगीत असें म्हणतों. दोन दिवस बुडबुड्यासारखी लोकप्रियता मिळवून नाहींशा होणाऱ्या हलक्या फुलक्या संगीताच्या विरुद्ध अर्थाचा शब्द म्हणून आपण गंभीर संगीत हा शब्द वापरतों. परंतु यांतला गंभीर हा शब्द चुकीचा अर्थहि निर्माण करण्याची शक्यता आहे. गंभीर संगीत ऐकतांना न हंसतां लांब, गंभीर चेहरा करून बसलें पाहिजे असें उगीचच या शब्दामुळें वाटतें. परंतु हें बरोबर नाहीं. बरेंच गंभीर संगीत सूर्यकिरणांसारखें प्रसन्न करणारें आणि पिसासारखें हवेंत तरंगणारें असतें. आणि म्हणून गंभीर संगीताला 'काळाच्या कसोटीला टिकून राहाणारें संगीत' असें म्हणणेंच अधिक योग्य होईल. संगीत, कपडे, मोटारी यांच्यांतल्या लोकप्रिय फॅशनी जशा येतात तशा जातात.

व्हॉडव्हिल आणि आजच्या संगीत सुखात्मिका हे प्रकार मिन्स्ट्रेल शोजमधून निर्माण झाले. जाझ संगीताचाहि मूळ उगम तोच आहे. चित्रकला, शिल्पकला, साहित्य यांतून व्यक्त होणारी जाझ वृत्ति ही प्रथम युरोपमध्यें जन्माला आली. ही वृत्ति अमेरिकेंतल्या संगीतांतून व्यक्त होऊं लागली तेव्हां ही वृत्ति व्यक्त करणारा जाझ हा शब्द अमेरिकेनें दिला. मोझार्टच्या काळांत संगीत म्हणजे सुसंवादी स्वरांतून निर्माण केलेला आकृतिबंध असें मानलें जाई. आज विसंवादी स्वर, इतकेंच काय, पण आरडाओरडीचे आणि गोंधळाचे आवाजहि संगीत या नांवाखालीं खपूं शकतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.



अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नों दि ......................

## विल्यम सी. हँडी

"प्रयत्नांच्या पराकाष्ठेशिवाय गुणांचा प्रकर्ष साधत नाहीं."

अमेरिकेंत निग्रो लोक गोऱ्या धन्यांचे गुलाम म्हणून राहात या गोष्टीला अजून शंभर वर्षें पुरीं झालीं नाहींत. या गोऱ्या धन्यांपैकीं कांहींजण आपल्या गुलामांशीं कनवाळूपणें वागत. याच्या उलट कांहींजण अतिशय कठोर असत. कधीं कधीं एखादा गोरा धनी आपल्या निग्रो गुलामाला स्वातंत्र्य देत असे. ख्रिस्टोफर ब्युअर या निग्रो गुलामाला त्याच्या धन्यानें मोकळें केलें होतें. परंतु हा धनी इतका दयाळू होता कीं, ख्रिस्टोफरनें स्वतःच्या इच्छेनेंच या धन्याकडे विश्वासू नोकर म्हणून राहायचें ठरवलें. ख्रिस्टोफर चर्चची दीक्षा घेण्यापूर्वी नृत्याला फिड्लची साथ करीत असे. ही साथ केल्याबद्दल त्याला जे थोडे पैसे मिळत ते घेण्याची परवानगी त्याच्या मालकानें दिली होती. त्या काळांत एखाद्या निग्रोनें चर्चची दीक्षा घेतली कीं गाणंबजावणं ही गोष्ट पापमय आहे असें तो समजूं लागे. ख्रिस्टोफर ज्या दिवसापासून चर्चमध्यें जाऊं लागला. त्या दिवसापासून त्यानें फिड्लला हात लावला नाहीं. त्याची मुलगी एलिझाबेथ हिला गिटार हें वाद्य फार आवडत असे. परंतु तीहि चर्चची सदस्य असल्यामुळें तिला गिटार वाजवण्याची परवानगी कधींच मिळाली नाहीं.

विल्यम वाइज हँडी या नांवाचा दुसरा एक निग्रो गुलाम होता. तो आपलें स्वातंत्र्य मिळण्याच्या बाबतींत ख्रिस्टोफरइतका नशिबवान् नव्हता. तो आणि त्याचे दोन भाऊ स्वातंत्र्यासाठीं तहानेले होते. एके दिवशीं हे तिघे आपल्या

धन्याच्या घरून पळून गेले. त्यांचा पाठलाग केला गेला. दोघे भाऊ निसटले, पण विल्यम मात्र पकडला गेला. विल्यमला धन्यानें खालीं दक्षिणेकडे नेऊन विकून टाकलें. आलाबामा येथें असतांना विल्यमनें पुन्हां एकदा पळण्याचा प्रयत्न केला. या वेळीं त्याच्या धन्यानें त्याच्यावर गोळी झाडली. पण विल्यम मेला नाहीं. त्याचा मुलगा हॅनसम हा त्याच्यापासून तोडून अर्कान्सास येथें विकला जाणार होता. तें पाहण्याचें विल्यमच्या नशिबीं होतें म्हणूनच तो वांचला. हॅनसमला विकल्यानंतर पुढें त्याचें काय झालें हें कुणालाच कळलें नाहीं.

गुलामांना विकण्याच्या या प्रथेमुळें निग्रो कुटुंबांतल्या माणसांची एकामेकांपासून केव्हां ताटातूट होईल याचा नेम नसे. गुलामगिरीविरुद्ध झालेल्या युद्धांत दक्षिणेचा सेनापति ली यानें उत्तरेचा सेनापति ग्रँट याच्यासमोर जेव्हां शरणागति पत्करली तेव्हां निग्रोंच्या स्वातंत्र्याला प्रारंभ झाला. निग्रो समाजाच्या इतिहासांतली ही सर्वश्रेष्ठ घटना आहे.

विल्यम गुलाम असतांनासुद्धां आपलें काम संभाळून शिकत असे. आलाबामामधील फ्लॉरेन्स येथें विल्यमनें एक ओंडक्यांचें छोटेंसें घर बांधलें होतें. ज्या ठिकाणीं त्यानें हें घर बांधलें होतें ती जागा पुढें हॅंडीज् हिल या नांवानें ओळखली जाऊं लागली. त्याच्या या घरांतल्या स्वयंपाकघरांतली जमीन घाणेरड्या मातीची होती. त्यानें ती तुडवून तुडवून सपाट केली—अगदीं डांबरी जमिनीसारखी. त्यानें फ्लॉरेन्सच्या परिसरांतल्या गोऱ्या लोकांचा आदर मिळवला होता. निग्रो लोकांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फ्लॉरेन्स येथें स्वतःची इस्टेट केलेला विल्यम हा पहिला निग्रो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विल्यम मेथॉडिस्ट चर्चमध्यें धर्मोपदेशकाचें काम करूं लागला. त्याचा मुलगा चार्ल्स् हाहि धर्मोपदेशक झाला. चार्ल्सनें एलिझाबेथ ब्न्युअर हिच्याशीं लग्न केलें. त्यानें पुढें आपल्या कुटुंबासाठीं चांगलें घर बांधलें. चार्ल्स्चा मुलगा विल्यम ख्रिस्टोफर हा मात्र आपल्या आजोबाच्या ओंडक्यांच्या घरांत जन्माला आला. विल्यम ख्रिस्टोफर या नांवांत त्याच्या दोन्हीकडच्या आजोबांच्या नांवाचा समावेश झालेला होता. विल्यम ख्रिस्टोफर मोठा झाल्यानंतर त्यानें आपला आजा आणि बाप यांच्याप्रमाणेंच धर्मोपदेशक व्हावें अशीच सगळ्यांची अपेक्षा होती. परंतु विल्यम ख्रिस्टोफर हॅंडी यानें कुटुंबाच्या या अपेक्षेच्या

अगदीं विरुद्ध व्यवसाय स्वीकारला—तो संगीतकार झाला. हाच मुलगा पुढें 'ब्ल्यूज' या नांवानें ओळखलें जाणारें संगीत लिहिणार होता. विल्यम ख्रिस्टोफरला संगीतकार होण्याचें ध्येय सहजासहजीं गांठतां आलें नाहीं. त्यासाठीं त्याला विरोधाला तोंड देत खडतर प्रवास करावा लागला.

छोट्या विल्यमचे आईबाप नुकतेच गुलामींतून मुक्त झाले होते, त्यांना त्यांचें स्वातंत्र्य मिळालें होतें. परंतु छोट्या विल्यमला मात्र आपली संगीताची आवड पुरवण्याचें स्वातंत्र्य नव्हतें. छोट्या विल्यमला संगीताची लहानपणापासून आवड. निसर्गांत ऐकूं येणारे नाना तऱ्हांचे आवाज तो बारकाईनें ऐकत असे. त्यांचें सौंदर्य त्याला जाणवत असे. पशुपक्ष्यांच्या या आवाजांचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला. पुष्कळ वेळां रात्रीं घुत्रडांचे, वटवाघुळांचे आवाज ऐकले कीं त्याची चित्तवृत्ति अगदीं खिन्न होऊन जाई. विस्तव तयार करण्याची लोखंडी सळई जर रात्रभर आगींत घालून ठेवली तर घराच्या आसपास घुबडें येत नाहींत असें त्याला कुणींतरी सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें लोखंडाची सळई रात्रभर विस्तवांत ठेवली. असें केल्यामुळें घुबडें पळालीं अशी त्याची समजूतहि झाली. वयाच्या सहाव्या वर्षीं त्याला निग्रो मुलांच्या 'फ्लॉरेन्स डिस्ट्रिक्ट स्कूल' या शाळेंत घालण्यांत आलें. इथें तो लौकरच छापील सुरावट वाचायला शिकला.

लहानपणापासून चर्चमध्यें उत्स्फूर्तपणें गाइलीं जाणारीं 'स्पिरिच्युअल्स" हीं भक्तिगीतें विल्यमच्या कानावर पडलीं होतीं. 'मार्च अलॉंग, आय विल सी यू ऑन द जजमेंट डे' हें भक्तिगीत म्हटल्यानंतर आपले वडील घळघळां रडूं लागतात हें छोट्या विल्यमनें पाहिलें होतें. हें गाणें ऐकल्यावर तुम्ही कां रडतां असें एकदां त्यानें आपल्या वडिलांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, "तुझा भाऊ हॅन्सम याला जेव्हां गोऱ्या लोकांनीं विकलें तेव्हां बाकीचे निग्रो गुलाम हेंच गाणें म्हणाले होते."

विल्यमच्या शाळेंतले शिक्षक संगीतकारांना आळशी आणि वेळ फुकट घालवणारे लोक असेंच समजत असत. पण गंमत अशी कीं, त्यांना स्वतःला संगीताची आवड होती. इतर शाळांतून ज्या तासाला प्रार्थना आणि इतर धार्मिक गोष्टी शिकवल्या जात त्या तासाला विल्यमचे हे शिक्षक संगीत शिकवीत असत. त्यांच्या या वर्गांतलीं मुलें 'डो–रे–मी' पद्धतीनें सुरावट वाचायला शिकलीं. शाळेंत पिॲनो किंवा ऑर्गन नव्हता. त्याच्या या शिक्षकांकडे 'ए'

या पट्टीच्या सुरांत लावलेला चिमटा (Tuning fork) होता. हा चिमटा आपटला कीं त्यांतून निघणाऱ्या त्या सुराच्या स्पंदनावरून सूर पकडून मुलें पुढें गायला सुरवात करीत. डाव्या हातांत गाण्याचें पुस्तक धरीत, उजव्या हातानें ताल धरीत आणि ख्रिस्ताच्या जीवनावरचीं धार्मिक गाणीं, त्याचप्रमाणें संगीताच्या पुस्तकांतलीं गाणीं गात. हळूहळू प्रगति करीत करीत हीं मुलें वॅगनर, बिझेट आणि व्हर्डी यांच्या संगीतांतले उतारेहि गाऊं लागलीं होतीं. या गाण्यांमुळें या मुलांचे कान चांगले तरबेज होत. विल्यमला गाण्याचा हा तास सगळ्यांत आवडत असे. छापील तक्त्यावरून सुरावट वाजतां येऊं लागली तशी तो स्वतः कागदावर सुरावट लिहायला शिकूं लागला.

निग्रो वंशांत जन्माला आल्यामुळें तालसुराचा मुद्दाम अभ्यास करण्याची विल्यमला जरुरी नव्हती. तालसुराची जाणीव त्याच्या रक्तांत उपजतच होती. त्याचे आजोबा ब्युअर फिड्ल वाजवून नृत्याला साथ करीत असत. त्या आपल्या 'पापमय दिवसांतल्या' संगीताच्या आठवणी छोट्या विल्यमला सांगत. त्या काळांतले संगीतकार वाजवण्यांत जोम आणण्यासाठीं ताल अधिकाधिक द्रुत करीत. अशा वेळीं "फिड्ल वाजवणाऱ्याच्या डाव्या खांद्याकडे हातांत विणण्याच्या सुया घेऊन एखादा मुलगा उभा राही. फिड्ल वाजवलं जात असतांना हा मुलगा फिड्लच्या तारांवर ड्रम वाजवावा तशा त्या सुया आपटीत असे." यानंतर कांहीं वर्षांनीं एका म्हाताऱ्या माणसानें हा सर्व प्रकार कसा केला जाई, त्या वेळीं पायांनीं ताल कसा धरला जाई याचें प्रात्यक्षिक विल्यमला करून दाखविलें. म्हाताऱ्यानें स्वतः व्हायोलिन वाजवायला घेतलें आणि विल्यमच्या हातांत सुया दिल्या. फिड्ल वाजवतांना हे निग्रो वादक तोंडानें गाणें म्हणत आणि पायानें अत्यंत विकट असा ताल धरीत. अशा वादकांपैकीं अंकल व्हिट (याच नांवानें तो ओळखला जाई) हा एक नाणावलेला वादक होता. वाजवीत असतांना डोक्यापासून पायांपर्यंत तो संगीतमय झालेला असे. या आठवणी सांगतांना हँडीनें लिहिलें आहे, "त्या काळांत गांवांतल्या तरुण मुली आणि त्यांची प्रेमयाचना करणारे प्रियकर जोडजोडीनें करायचा नाच असो किंवा समूहनृत्य असो त्यांतून आमचे तरुण जाझ बँडपासून जसा आनंद मिळवतात तसा आनंद मिळवत असत."

तरुण असतांना विल्यमला अंकल व्हिटबरोबर वाजवण्याची परवानगी नव्हती.

तें त्याला पुढें शक्य झालें. विल्यमचा स्वतःचा चुलता अतिशय कडक होता. आपल्या मुलांना तो शीळदेखील वाजवूं देत नसे. एकदां विल्यमची आजी म्हणाली कीं, विल्यमचे कान मोठे आहेत ही संगीतकलेची देणगी त्याला असल्याची खूण आहे. आजीचे उद्‌गार ऐकून विल्यमला आनंद झाला. अप्रत्यक्षपणें विल्यमला कुटुंबांत संगीताविषयीं उत्तेजन मिळालें तें एवढेंच! एखाद्या बैलाला हंबरतांना ऐकलें तरी त्याचा संगीताचे सूर ऐकल्याचा परिणाम विल्यमवर होत असे. मोठेपणीं 'हूकिंग काउ ब्ल्यूज' लिहितांना त्यानें पूर्वी ऐकलेल्या या हंबरण्याचा उपयोग करून घेतला.

विल्यमचे आजोबा हँडी तो दोन वर्षांचा होण्यापूर्वीच वारले. त्याचे आजोबा वारल्यानंतर एका गोऱ्या माणसानें काढलेले उद्‌गार विल्यम कधींच विसरला नाहीं. तो म्हणाला होता, "बाळा, तूं जर आपल्या आजोबांसारखा झालास तर तूं फार मोठा मनुष्य होशील."

हँडीच्या घरांत खाण्यापिण्याची अडचण नव्हती. पण जर पैसे हवे असले तर मात्र विल्यमला ते स्वतः मिळवणें भाग होतें. चर्चला जातांना वर्गणीसाठीं पैसे लागत. त्यानें एकदां एक गॅलन दूध विकून बेंजामिन फ्रँकलिनचें 'पुअर रिचर्डस् ॲलमॅनॅक' हें पुस्तक घेतलें. जुनें लोखंड, जुने कपडे, रानांतील फळें इत्यादि गोष्टी विकून तो पैसे मिळवीत असे. जंगलांत पडलेलीं जनावरांचीं हाडें उकळून तो थंड करी आणि त्यापासून साबण बनवून तो विकी. आपल्या मुलाची ही उद्योगतत्परता पाहून विल्यमच्या बापाला बरें वाटे. त्यानें आपल्या मुलाला नांगरायला शिकवण्याचा प्रयत्न केला, परंतु घोडे आणि खेचरें यांच्याबरोबर कांहीं विल्यमचें तेवढें जमलें नाहीं.

विल्यम बारा वर्षांचा झाला तेव्हां त्याला एका मित्राच्या ओळखीनें मसल शोल्सजवळ असलेल्या एका दगडाच्या खाणींत नोकरी मिळाली. या कामाबद्दल विल्यमला रोजीं पन्नास सेंट्स मजुरी मिळे. तिथले कामगार पुढील गाणें म्हणत असत :

आठवतो का पोरी गऽ गेला हिंवाळा ?
खूप थंडी होती ना—हूं ?
खूप थंडी होती ना—हूं ?

कामगारांच्या या गाण्यांत दुसऱ्या ओळीच्या शेवटचा हुंकार ते हातोड्यानें घण घालतांना, दोरखंड ओढतांना, मोटं ओझं उचलतांना भरीत असत. हा हुंकार संगीतमय असे. दगडाच्या या खाणीप्रमाणेंच पुढें विल्यमनें इतरहि कामें केलीं. जोडे शिवणें, सुतारकाम, गवंडीकाम, छापखान्यांतलें काम हे सगळे उद्योग त्यानें पोटासाठीं केले. शेतमजुराचेंहि काम त्यानें केलें. हीं कामें करून जे थोडे पैसे मिळत त्यांतून तो कपडे, पुस्तकें आणि शालोपयोगी इतर वस्तू घेत असे.

विल्यम चौदा वर्षांचा झाला तेव्हां आपण गिटार वाजवावें असें त्याला फार तीव्रतेनें वाटूं लागलें. पण गिटार मिळणार कुठून ? मजुरी करून जे पैसे मिळत त्यांतले वांचवून गिटार विकत घेणें हाच एक मार्ग होता. कधीं कधीं त्याला आठवड्याला तीन डालरहि मिळत. पण मिळालेल्या मजुरीचे तो तीन भाग करीत असे. एक भाग तो आईला देई. दुसरा भाग वडिलांना देई. आणि तिसरा भाग स्वतःसाठीं ठेवी. स्वतःच्या वांट्याला आलेल्या या तिसऱ्या हिस्स्यांतून त्याला शाळेसाठीं लागणाऱ्या आवश्यक वस्तू घ्याव्या लागत. गिटार घेण्यासाठीं हवे असलेले पैसे वांचवायला त्याला एक वर्ष लागलें.

गिटार घेण्याचे विचार मनांत चालू असतांना विल्यम म्हणत असे, "एखाद्या प्रेमांत पडलेल्या माणसासारखी माझी स्थिति झाली होती. आजूबाजूचं जग आशेनें भरलेलं, बदललेलं मला दिसत असे." तो पुढें म्हणतो, "या काळांत झाडावर बसून किलबिल करणाऱ्या पक्ष्यांचा जल्लोश मी अतिशय काळजीपूर्वक ऐकत असें. माझ्या हृदयांत कसलं तरी संगीत घुमत होतं. हृदयांत निनादणाऱ्या या संगीतामुळेंच मी त्या पक्ष्यांच्या किलबिलाटाकडे ओढला जात होतों." या काळांत गिटार घेण्यापुरते पैसे उरावेत यासाठीं तो अतोनात श्रम करीत असे. असें असूनहि दिवस संपतां संपत नाहींत असें त्याला वाटे.

विल्यम सोळा वर्षांचा झाला तेव्हां गिटार घेण्यापुरते पैसे त्यानें एकदाचे जमवले. वाद्यांच्या दुकानांत तो गेला. ज्यासाठीं त्याचा जीव तहानेला होता तो क्षण अखेर आला होता. त्यानें गिटार विकत घेतलें. तें चकाकणारें नवें वाद्य हातांत घेऊन तो जणुं हवेंतून तरंगत घरीं आला. घरीं हें गिटार दाखवल्यानंतर आपण कौतुकाचा विषय होऊं असें त्याला वाटलें होतें. स्वतःच्या श्रमांतून पैसे जमा करून आपण हें वाद्य विकत घेतलें याचा घरांतल्या लोकांना

अभिमान वाटेल असें त्याला वाटत होतें. घरांत पाऊल टाकून जेव्हां त्यानें सगळ्यांना तें गिटार दाखवलें तेव्हां आनंदानें त्याच्या तोंडून शब्द फुटेनात. परंतु घरांत कोणीच बोलेनात तेव्हां शेवटीं तोच म्हणाला, "पहा...तें चकाकतय्...तें माझं आहे. मीं त्याच्यासाठीं पैसे वांचवले."

त्याचें हें बोलणें ऐकल्यानंतर शेवटीं वडील एकदांचे बोलले. पण त्यांचें तें बोलणें कौतुकाचें नव्हतें. संतापानें त्यांचा नुसता भडका उडाला होता. क्रोधानें धापा टाकीत ते म्हणाले, "गिटार! सैतानाचं खेळणं! मी तुला सांगतों, तें फेकून दे! तुझ्या हातांत तें नको. आपल्या ख्रिश्चन कुटुंबांत ही पापमय वस्तु तुला कोणीं पछाडल्यामुळें तूं आणलीस? जिथून तूं हें आणलंस तिथें तें देऊन टाक. ऐकूं आलं तुला?"

विल्यमनें ऐकलें होतें. तो सुन्न झाला. गिटार घेण्यांत चूक ती कसली असें त्याला म्हणायचें होतें. परंतु तें तो म्हणूं शकला नाहीं. कारण त्याच्या वडिलांच्या मनावरचे संस्कार, त्यांची विचारपद्धति अगदीं वेगळी होती. आपल्या वडिलांचें मन वळवणें केवळ अशक्य आहे ही गोष्ट विल्यमला कळून चुकली. तो हलकेंच म्हणाला कीं, तो दुकानदार आतां तें परत घेणार नाहीं. त्यावर त्याचे वडील गरजले, "परत घेतलं नाहीं तरी तेवढ्या किंमतीची दुसरी वस्तु देईल. त्या किंमतींत तुला वेब्स्टरची मोठी डिक्शनरी घेतां येईल. त्यामुळें तुझं कांहींतरी भलं होईल."

विल्यमचें मन निराश झालें. तो दुकानांत गेला आणि त्यानें गिटार देऊन डिक्शनरी घेतली. या घटनेनंतर त्याला घरांत संगीताचें शिक्षण मिळालें तें फक्त एका जुन्या ऑर्गनवर—भक्तिसंगीत वाजविण्याचें. हें भक्तिसंगीत शिकण्याचा खर्च वडिलांनीं दिला.

संगीताप्रमाणेंच चित्रकलेचीहि विल्यमला आवड होती. परंतु चित्रें काढण्याची सुद्धां परवानगी त्याला नव्हती. त्याचे शिक्षक त्याला नकाशे रेखाटूं देत. परंतु इतर चित्रें काढायला मनाई होती.

विल्यम अठरा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या आयुष्यांत संस्कार घडवणारी एक व्यक्ति आली. ही व्यक्ति म्हणजे जिम टर्नर हा व्हायोलिनवादक. जिम टर्नर फ्लॉरेन्समध्यें आला होता. शहरांत आतांपर्यंत झालेल्या व्हायोलिनवादनाच्या कार्यक्रमांत जिम टर्नरच्या तोडीचा एकहि नव्हता. जिमचें व्हायोलिन ऐकून

विल्यम अगदीं भारला गेला. एका वेगळ्या जगांत त्या व्हायोलिननें त्याला नेलें. जिमनें फ्लॉरेन्समध्यें एक ऑर्केस्ट्रा संघटित केला आणि तो नृत्यहि शिकवूं लागला. त्या काळांतले सर्व नृत्यप्रकार जिमला अवगत होते. मेमफिस येथील बील स्ट्रीटमधल्या अनेक गोष्टी तो सांगे. तिथलें जीवन म्हणजे "सकाळपासून दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत एक गाणें" असें होतें. तिथले कृष्णवर्णीय छानछोकी तरुण आणि तरुणी यांची तो वर्णनें करी. त्याच्या या हकीकती ऐकून विल्यमच्या मनांत असमाधान निर्माण झालें. घरांतून बाहेर पडावें, ठिकठिकाणीं भटकावें, बील स्ट्रीटवरचें हें खुशाल आयुष्य जगावें असें त्याला वाटूं लागलें. पुढें 'मेम्फिस ब्ल्यूज' आणि 'बील स्ट्रीट ब्ल्यूज' यांचा लेखक म्हणून तो अमेरिकन निग्रो समाजांत ओळखला जाणार होता. व्हायोलिन वाजवणाऱ्या जिम टनरला तो पुढें तो 'टर्नर ब्ल्यूज'मधून अमर करणार होता याची त्या वेळीं त्याला कल्पनाहि नव्हती.

शाळेंतलें शेवटलें वर्ष असतांनाची गोष्ट. फ्लॉरेन्समध्यें आलेली एक सर्कस आर्थिक अडचणीमुळें अडकून पडली होती. या सर्कशींतल्या बँडचा प्रमुख एक गोरा मनुष्य होता. पैसे मिळवण्यासाठीं तो निग्रोंना बँड शिकवूं लागला. एका केशकर्तनालयांत तो बँडचे धडे देत असे. दररोज दुपारीं शाळेंतून परत येतांना विल्यम केस कापण्याच्या दुकानाच्या खिडकीपाशीं उभा राही. वेगवेगळ्या वाद्यांवरून बोटें कशीं फिरवायचीं हें त्या शिक्षकानें फळ्यावर लिहून ठेवलेलें असे. दुकानाबाहेर उभा राहून खिडकींतून विल्यम तें बारकाईनें पाहात असे. शाळेंत आल्यानंतर बाकावर बोटें ठेवून तो फळ्यावरच्या सूचनांप्रमाणें प्रॅक्टिस करी. यानंतर कांहीं दिवसांनीं कॉर्नेट हें वाद्य जेव्हां विल्यमच्या हातीं आलें तेव्हां बोटें कशीं फिरवावीं हें विल्यमला आधींच माहीत होतें.

कॉर्नेट वाजवूं लागल्यानंतर त्यानें बँडच्या पथकांत सामील व्हावें हें अगदीं स्वाभाविक होतें. जिम टर्नरच्या पथकांत शहराबाहेर असलेल्या एका कार्यक्रमांत विल्यमनें प्रथम भाग घेतला. या कामाबद्दल त्याला आठ डॉलर्स मिळाले. आठवडाभर कष्ट करून त्याला धड तीन डॉलर्सहि मिळत नसत. एक दिवस मजेखातर त्यानें बँडमध्यें वाद्य वाजवलें तर त्याला आठ डॉलर्स मिळाले. यामुळें आपला सगळा वेळ संगीत शिकण्यासाठीं खर्च करावा अशी तीव्र इच्छा विल्यमला झाली—अर्थात् हें त्याच्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध होतें.

शाळेंतला अभ्यासक्रम पुरा झाला तेव्हां विल्यम अठरा वर्षांचा होता. आतां त्याच्या भटकंतीला सुरवात झाली. प्रथम त्यानें बेसेमर् येथें संगीत शिकवण्याचें काम केलें. यानंतर एका धातु ओतण्याच्या कारखान्यांत मजुरी चांगली असल्यामुळें त्यानें तिथें काम पत्करलें. बेसेमर् येथें त्यानें ब्रास बँडचें एक पथक संघटित केलें आणि तें शिकवून तयारहि केलें. आतां महागाई भयंकर वाढूं लागली होती. कारखाने बंद होत होते आणि काम कुठेंच मिळत नव्हतें. विल्यम बर्मिंगहॅमला गेला. तिथें त्याला कळलें, कीं शिकागोला जागतिक जत्रा भरायची आहे. शिकागोला काम करण्याची संधि मिळेल म्हणून आपलें बॅंडचें पथक घेऊन—या पथकाचें नांव त्यानें लॅझेटा क्वार्टेट असें ठेवलें होतें—तो शिकागोला गेला. वाटेंत कधीं ते गात, कोणीं बोलवलें तर बॅंड वाजवीत आणि असें करून जे चार पैसे मिळत ते घेऊन पुढें प्रवास करीत. पुष्कळ वेळां त्यांना मालगाड्यांतून प्रवास करावा लागे. कधीं कधीं सामानाच्या बंद डब्यांतूनहि ते जात. असा खडतर प्रवास करून विल्यम आणि त्याचें पथक शिकागोला पोंचलें. शिकागोला पोंचल्यानंतर जागतिक जत्रा एक वर्ष पुढें ढकलण्यांत आल्याचें त्यांना कळलें. यानंतर कांहींतरी संधि मिळेल या आशेनें ते सेंट लुईसला गेले. तिथें एका गोऱ्या माणसानें त्यांना गाडींतून फुकट नेण्याचें कबूल केलें. हा मनुष्य एका दगडाच्या खाणीचा एजंट होता. निग्रो कामगार आणून पुरवायचें त्याचें काम. त्यानें आणलेल्या प्रत्येक कामगारामागें त्याला पैसे मिळत. कामगार एकदां जाग्यावर आणून सोडले कीं त्याचें काम झालें. मग जरी हे कामगार परत गेले तरी त्याची जबाबदारी याच्यावर नसे. फुकट प्रवासाच्या आशेनें या गोऱ्या माणसाबरोबर निघालेल्या विल्यमच्या पथकाला त्यानें या खाणीवर आणून सोडलें.

सेंट लुइस येथें पोंचल्यानंतर बॅंडच्या पथकाचें विसर्जन करणें विल्यमला भाग पडलें. शहरांतली आर्थिक परिस्थिति तंग होती. तिथें अनेक संगीतकार बेकार होते. विल्यमला दोन आठवड्यांपुरतें काम मिळालें. हें काम देणारा कॉंट्रॅक्टर निग्रोच होता. काम संपल्यावर मजुरी देण्याची वेळ आली तेव्हां त्या कॉंट्रॅक्टरनें विल्यमला ठकवलें. आतां विल्यमला कठीण दिवस आले होते. बेकार भटक्यांच्या मागें पोलीस लागले होते. त्याच्याप्रमाणेंच रिकामा खिसा असलेले गोरे आणि काळे शेंकडों लोक शहरांत होते. रिकाम्या फ्रुटपासून तों

फूटपाथपर्यंत पोलिसांचा ससेमिरा चुकवीत झोपण्याचा अनुभव विल्यमनें घेतला. पोलिसांच्या या छळामुळेंच आपलीं दोन लोकप्रिय गाणीं जन्माला आलीं असें विल्यम म्हणत असे. त्यानें हे जे हाल सहन केले त्यांना पुढें गाण्यांच्या रूपानें फळ आलें. पिॲनोवर बसल्या बसल्या त्यानें पुढें 'सेंट लुईस ब्ल्यूज' लिहिलें याचें कारण हा जिवंत अनुभव त्यामागें होता. तो लिहायला बसला आणि तें गीत "कुठून तरी" अवतरलें.

खरें म्हणजे इतके हाल सोसण्याची विल्यमला गरज नव्हती. कारण तो फ्लॉरेन्सला आपल्या घरीं परत जाऊं शकला असता. पण आपल्या बापाचा संगीत शिकण्याला विरोध होता याची त्याला आठवण झाली. शाळेंतल्या शिक्षकांचे उद्‌गार त्याला आठवले, "संगीताच्या नादामुळें तूं गटारांत जाण्या-शिवाय काय होणार?" अशा परिस्थितींत आपण जर फ्लॉरेन्सला गेलों तर आपले हाल झाल्याचें ऐकल्यानंतर "आम्ही सांगत नव्हतों तुला?" असें हीं वडील माणसें विचारतील हें त्याला स्पष्ट दिसूं लागलें. या मानहानीपेक्षां दारिद्र्य आणि हाल पत्करले. या जाणिवेनें तो या खडतर परिस्थितीला तोंड देत राहिला. या प्रवासांत त्याला अनेक ठिकाणीं पाट्या लावलेल्या दिसत, "निगरड्या, सूर्य मावळायच्या आंत इथून चालता हो." म्हणूनच पुढें "सूर्य बुडत असतांना भडका उडतो माझा" हें गीत तो लिहूं शकला.— एका खोल अनुभवांतून हें गीत जन्माला आलें होतें.

अशा तऱ्हेनें भटकंती करीत करीत तो इंडिआनाकडे निघाला असतांना त्याचें नशिब बदललें. इव्हान्सव्हिल इथें रस्ता दुरुस्त करणाऱ्या एका कंपनींत त्याला काम मिळालें. त्याचें असें झालें कीं, तो भुकेनें व्याकुळ होऊन रस्त्यावर उभा होता. काम करणारीं माणसें जेवणासाठीं निघालीं होतीं. त्यांतल्या एकाला विल्यमची दया आली आणि त्यानें त्याला थोडे पैसे उसने दिले. चांगली वागणूक आणि अन्न मिळाल्यानें विल्यमला आतां बरें वाटूं लागलें. या कामगारांत फ्लॉरेन्समधलेहि कांहीं कामगार होते. ते सगळे कामगार आपले पैसे एकत्र करून खर्च वांटून घेत. शहरांत अनेक ब्रास बँडचीं पथकें असल्याचें विल्यमला आढळून आलें. कुठल्याहि निमित्तानें बँडचा कार्यक्रम असला कीं तो हजर राही. लौकरच हॅम्फ्रन हॅम्प्टन बँडमधून त्याला वाजवण्याचें काम मिळालें. त्याच्या वादनकौशल्याचा लोकांत बोलबाला झाला.

केंटकीमधील हेंडरसन येथें आल्यानंतर त्याला पार्टीच्या वेळीं वाजवण्याचें एक चांगलें काम मिळालें. भटकंतीचें जीवन संपून आतां तो व्यावसायिक संगीतकार झाला होता. त्याचे खडतर दिवस संपले होते. एलिझाबेथ प्राईस ही मुलगी त्याला इथेंच भेटली. पुढें त्यानें तिच्याशीं लग्न केलें. हेंडरसनमध्यें एक जर्मन गायनसमाज होता. या समाजांत शेंकडों गायक होते. तिथलें गाणें ऐकतां यावें, प्रमुख शिक्षकाच्या शिकवण्याच्या पद्धति समजाव्या म्हणून विल्यमनें या गायनसमाजाच्या हॉलमध्यें तिथली निगा राखण्याचें काम पत्करलें. कांहीं दिवसांनीं त्याला शिकागोहून 'मॅहाराज् मिन्स्ट्रेल्स' या पथकाकडून निमंत्रणाचें पत्र आलें. या पथकांतल्या एका वादकाबरोबर त्यानें पूर्वी वाजवलेलें होतें. पत्र मिळतांच दोन दिवसांतच विल्यम शिकागोला गेला. आर्थिक मंदीची लाट अजून ओसरलेली नव्हती. त्यामुळें बँडच्या या पथकांत जेवण आणि आठवड्याला सहा डॉलर्स एवढाच पगार विल्यमला मिळूं शकला. परंतु हळूहळू विल्यम वेगवेगळीं वाद्यें वाजवूं लागला. चार वादकांचें एक पथक त्यानें शिकवून तयार केलें. गायकांना साथ देण्यासाठीं त्यानें ऑर्केस्ट्राची जुळणी केली. या सगळ्या कामामुळें लौकरच विल्यमचा पगार वाढला. त्यानें आतां पैसे सांठवून एक नवी ट्रम्पेट विकत घेतली. हातांत ट्रम्पेट घेऊन "एखाद्या देवदूताप्रमाणें दिवसाला चार ते सहा तास रियाज करीत असे.

मॅकिन्ले राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून आर्थिक मंदीची लाट ओसरली आणि अमेरिकेचीं पावलें सुबत्तेच्या दिशेनें पडूं लागलीं—विल्यम हँडीचेंहि असेंच झालें. सेंट लुईसला असतांना तो गळ्यापर्यंत बटन लावून कोट घालत असे—कारण आंत घालायला त्याच्याजवळ शर्टहि नसे. पण आतां विल्यमनें चांगले कपडे विकत घेतले होते. त्यामुळें तो खुषींत होता. 'मॅहाराज् मिन्स्ट्रेल्स' या कंपनीचीं बँडचीं दोन पथकें होतीं. यांतल्या एका पथकाचा प्रमुख म्हणून विल्यमची नेमणूक झाली. झकास गणवेष घालून जेव्हां विल्यम प्रथम उभा राहिला तेव्हां क्षणभर त्याचाच विश्वास बसेना.

'मॅहाराज् मिन्स्ट्रेल्स' या कंपनींतले कलावंत निग्रो असले तरी तिचे व्यवस्थापक गोरेच होते. या कंपनीच्या दिवसाला सुरुवात दुपारीं होई. दुपारीं हें बँडपथक संध्याकाळच्या कार्यक्रमाची आगाऊ जाहिरात म्हणून शहरांतून बँड वाजवीत मिरवणूक काढीत असे. पावणेबारा वाजतां कंपनीचा मॅनेजर

शिटी वाजवीत असे. मग मिरवणुकीला प्रारंभ होई. कंपनी जर आदल्या दिवशीं बाहेरगांवीं गेलेली असली तर परत आल्यानंतर मिरवणुकीला स्टेशनपासूनच सुरवात होई. मिरवणुकीच्या आघाडीला चार घोड्यांच्या गाडींत बसलेले मॅनेजर लोक असत. रस्त्यांत उभ्या राहिलेल्या लोकांना अभिवादन करण्यासाठीं ते आपल्या डोक्यावरच्या सिल्कच्या हॅटला स्पर्श करीत. मागून येणाऱ्या गाडींत कंपनींतले प्रमुख कलावंत असत. आणि त्यांच्यामागून चालत येणाऱ्या लोकांत गायक, नट, सर्कशीचे खेळ करणारे इत्यादि लोक असत. या लोकांच्या मागें बँडचें पथक असे. मुख्य ड्रम वाजवणारा लोकांचें लक्ष आपल्याकडे खेचून घेत असे. बँडचें हें पथक पुष्कळ वेळां साउसानें लिहिलेलें 'मार्च' वाजवीत असे. नेहमीं वाजवल्या जाणाऱ्या लोकप्रिय सुरावटींत 'ब्रदर गार्डनर्स पिकनिक' ही स्टिफन फॉस्टरची रचना असे. ती फारच लोकप्रिय होती. बँड वाजवून झाल्यानंतर सायकलस्वार वेगवेगळे खेळ करून दाखवीत. त्यानंतर संध्याकाळच्या कार्यक्रमाची माहिती देणारें भाषण होई. भाषणाचा हा कार्यक्रम उरकल्यानंतर संध्याकाळीं साडेसात वाजेपर्यंत कांहीं काम नसे. संध्याकाळीं साडेसात वाजतां थिएटरसमोर पुन्हां एकदां जाहिरातीसाटीं बँडवादनाचा कार्यक्रम होई.

'मिनिस्ट्रेल शोज' करणाऱ्या कंपन्यांतून विल्यमनें बरींच वर्षें खूप प्रवास केला. क्यूबापासून कॅलिफोर्नियापर्यंत आणि कॅनडापासून मेक्सिकोपर्यंत तो फिरला. याच काळांत त्यानें लग्न केलें. त्याची बायको या प्रवासांत त्याच्याबरोबर असे. क्यूबामध्यें तिथल्या विशिष्ट संगीताचे सूर त्याला फार आवडले होते. कुठल्यातरी लहानशा गल्लींतल्या बारक्याशा खोलींत क्यूबांतलीं बँडपथकें हें खास क्यूबाचें संगीत वाजवीत असत. विल्यमला तें आवडल्यामुळें त्यानें हें संगीत काळजीपूर्वक ऐकलें होतें. तीस वर्षांनंतर न्यू यॉर्कमध्यें आणि पुढें सर्व अमेरिकाभर हें संगीत ऐकूं येऊं लागलें—रंबा (Rumba) या नांवानें ओळखलें जाणारें संगीत तें हेंच.

पुष्कळशा जलशांत विल्यमचा कॉर्नेट-वादनाचा स्वतंत्र कार्यक्रम होत असे. आलाबामा येथें 'मॉहाराज् मिन्स्ट्रेल्स्' या कंपनीचा तळ असतांना विल्यमचे वडील त्याचा कार्यक्रम ऐकण्यासाठीं मुद्दाम आले होते. विल्यमच्या आयुष्यांतला हा एक महान् क्षण होता. संगीताविषयींचा दूषित ग्रह वडिलांच्या मनांतून दूर करण्यास विल्यमला खूप प्रयत्न करावे लागले होते. कार्यक्रमावर त्याचे वडील

खूप झाले. बँडच्या पथकाचा प्रमुख आपला मुलगा आहे असें ते मोठ्या अभिमानानें श्रोत्यांना सांगूं लागले. कार्यक्रम संपल्यानंतर ते विल्यमजवळ आले. आणि त्याचा हात हातांत घेऊन म्हणाले, "मुला, मी चर्चचा सदस्य झाल्यापासून संगीताचा जलसा कधीं ऐकला नव्हता. तुमचा हा कार्यक्रम मला फार आवडला. मला तुझा अभिमान वाटला. संगीतकाराचा व्यवसाय तूं पत्करलास याबद्दल आतां माझ्या मनांत राग नाहीं. मीं तुला क्षमा केली आहे."

विल्यम आणि त्याची बायको फ्लॉरेन्सला परत गेलीं. त्यांचें पहिलें अपत्य तिथेंच जन्माला आलें. विल्यम आणि जिम टर्नर यांनीं एक लहानसा ऑर्केस्ट्रा स्थापन केला. ॲग्रिकल्चर अँड मेकॅनिकल कॉलेजच्या समारंभांत त्यांचा एक कार्यक्रम झाला. या संस्थेच्या अध्यक्षांना विल्यमचें वाजवणें आवडलें. कॉलेजच्या संगीतविभागाचा प्रमुख म्हणून विल्यमनें यावें असें ते म्हणाले. विल्यमनें तें निमंत्रण स्वीकारलें. ही नोकरी स्वीकारल्यानंतर त्याचें स्वत:चें असें राहतें घर त्याला प्रथम मिळालें.

रॅग्टाइम् संगीत आतां लोकप्रिय होत होतें. यापूर्वींचीं कित्येक वर्षें अमेरिकेमध्यें युरोपिअन संगीतच चांगलें असें मानलें जाई. अमेरिकन संगीत आणि संगीतकार यांना अमेरिकन समाजांत प्रतिष्ठा नव्हती. युरोपिअन संगीत अमेरिकन संगीतापेक्षां कमी दर्जाचें असलें तरी लोक तें चांगलें मानीत. लोकांच्या वृत्तींतला हा अप्रामाणिकपणा विल्यमला आवडत नसे. त्यानें एकदां एका जलशासाठीं 'माय रॅग्टाइम् बेबी' चें पुनर्लेखन केलें. क्लासिकल संगीत वाटावें असें नांव त्याला दिलें. आणि तें बँडवर वाजवून दाखवलें. लोकांना तें आवडलें. कॉलेजच्या अध्यक्षांनींहि त्याबद्दल विल्यमला शाबासकी दिली. पहिल्यापासून जिथें जिथें संधि मिळेल तिथें विल्यम रॅग्टाइम् संगीताचा वापर करीत असे. कॉलेजमधला पगार आतां त्याला अपुरा वाटूं लागला होता. तेथें दोन वर्षें काम केल्यानंतर विल्यमनें अधिक पगारची नोकरी मिळावी यासाठीं वर्तमानपत्रांत जाहिरात दिली. परिणामीं तो पुन्हां 'मॅहाराज् मिन्स्ट्रेल्स' या कंपनींत गेला. मिन्स्ट्रेल शोजची लोकप्रियता ओसरूं लागायला तेव्हां सुरवात झाली होती.

विल्यम म्हणत असे, "दक्षिणेकडचे निग्रो जीवनांतल्या सर्व तऱ्हेच्या अनुभवांचीं गाणीं गातात." हे निग्रो आगगाड्या, आगबोटी, हातोडा, दुष्ट

धनी, हट्टी खेचरं या सगळ्या विषयांवरची गाणीं गात असतात. हार्मोनिका-पासून तो धुणीं धुण्याऱ्या फळीपर्यंत कशाचीहि साथ ते आपल्या गाण्यांना घेऊं शकतात. या सगळ्या वातावरणांतून आणि साधनांतूनच विल्यम हँडीचा 'ब्ल्यूज' हा गीतप्रकार निर्माण झाला.

हेंडरसन येथें असतांना विल्यमनें हार्मनीवरचें एक पुस्तक आणि संगीताचा ज्ञानकोश हें दुसरें पुस्तक विकत घेतलें होतें. या दोन्ही पुस्तकांचा अभ्यास करतांना संगीताचें खरें ज्ञान पुस्तकांतूनच मिळतें अशी विल्यमची कल्पना झाली होती. निग्रो समाजांत प्रचलित असलेलें लोकसंगीत त्याला यामुळें क्षुद्र वाटूं लागलें होतें. विशिष्ट स्वरांची न संपणारी पुनरावृत्ति असलेल्या या संगीताचा घाट त्याला अति सोपा वाटत असे. परंतु हळूहळू त्याला जाणीव होऊ लागलीकीं, ब्ल्यूजचें संगीत जरी पुस्तकांतून आलेलें नसलें तरी खालच्या थरांतील लोकांचे दैनंदिन जीवनांतील अनुभव त्यांतून व्यक्त झालेले असतात. या लोकसंगीतांतली प्रामाणिक तळमळ त्यामुळेंच हृदयाला भिडते.

मिसिसिपी राज्यांतील एका गांवांत त्या दिवशीं संध्याकाळीं विल्यमच्या बँडचें पथक नृत्याला साथ करण्यासाठीं गेलें होतें. या कार्यक्रमाच्या वेळीं आयुष्यांतला एक फार मोठा धडा विल्यम शिकला. श्रोत्यांपैकीं कांहींनीं स्थानिक लोकसंगीत वाजवलें जावें अशी मागणी केली. मिन्स्ट्रेल शोजमधलीं माणसें मागणीसाठीं ज्याप्रमाणें कसलेंहि बनावट संगीत वाजवून विकतात तसें करणारे विल्यमच्या या पथकांतले वादक नव्हते. पुस्तकांतल्या छापील सुरावटीप्रमाणेंच ते वाजवीत असत. स्थानिक लोकसंगीतासाठीं मागणी आली तेव्हां त्यांनीं त्यांना माहीत असलेली जुनी दक्षिण अमेरिकेंतली मेलडी वाजवली. परंतु ही मेलडी शहराळलेलीच अधिक होती—लोकसंगीताचा अस्सलपणा त्यांत नव्हता. तेव्हां श्रोत्यांपैकीं कांहीं जणांनीं विचारलें कीं, स्थानिक निग्रोंच्या बँडनें जर थोडें नृत्यसंगीत वाजवलें तर विल्यमची कांहीं हरकत असेल का? विल्यमची अर्थातच हरकत नव्हती, उलट त्यांना त्या लोकांनीं वाजवलेलें संगीत ऐकायला आवडलें असतें. विल्यमनें होकार देतांच तीन पोरगे पुढें आले. "त्यांनीं गबाळे कपडे घातले होते. एक जुनें गिटार, मेंडोलिन आणि बास हीं वाद्यें त्यांच्या हातांत होतीं. त्यांच्या चेहऱ्यांना साजेसेंच संगीत त्यांनीं वाजवायला सुरवात केली. स्वरांची पुनरावृत्ति असलेला

एक तुकडा वाजवायला त्यांनीं घेतला. त्या तुकड्याला सुस्पष्ट अशी सुरवात नव्हती आणि शेवट असा त्याला नव्हताच. त्या वाजवण्यांत एक प्रकारचा कंटाळवाणा एकसुरीपणा होता. उंसाच्या मळ्यांत, बांधावर ऐकूं येणारें संगीत एकसुरीपणानें वाजवलें जात होतें. वाजवीत असतांनाच ते तिघे थप् थप् थप् असा पायानें ताल धरीत होते. त्यांचे डोळे गरगर फिरत होते, खांदे हलत होते. आणि या सगळ्यांबरोबर तो एकसुरी तुकडा वाजवला जात होता. खरें म्हणजे ती सुरावट कंटाळवाणी किंवा क्लेशकारक नव्हती. तिचें वर्णन करायचें तर तिच्यांत एक प्रकारचें पछाडलेंपण होतें असेंच म्हणावें लागेल."

विल्यम ती न संपणारी सुरावट ऐकत होता. गांवांतल्या या अडाणी लोकांखेरीज हें संगीत कुणालाहि आवडणार नाहीं असाच विचार त्या वेळीं त्याच्या मनांत येत होता. परंतु पुढें याच ताल धरणाऱ्या पायांभोंवतीं जेव्हां पैशांचा पाऊस पडूं लागलेला विल्यमनें पाहिला तेव्हां त्याला या संगीताचें महत्त्व कळलें. नाचणारे बेभानपणें नाचत होते. त्या निग्रो तरुणांनीं विल्यमला त्या संध्याकाळीं जें शिकवलें तें कुठल्याहि पुस्तकांत त्याला मिळालें नसतें याची त्याला जाणीव झाली. आदिवासी लोकसंगीताचें सादर्य त्याला त्या वेळीं जाणवलें. त्या रात्रीं माझ्यांतून एक नवा संगीतकार जन्माला आला असें तो म्हणाला. या तऱ्हेचें संगीत आपण लिहिलें पाहिजे या जाणिवेनेंच त्या दिवशीं विल्यम घरीं गेला. अमेरिकन जनतेला त्यांच्या नृत्यसंगीतांत अधिक जोरकस ताल आणि गति हवी होती. याची जाणीव विल्यमला फार पूर्वींपासून झालेली होती.

या लोकसंगीतांतल्या कांहीं सुरावटी विल्यमनें ऑर्केस्ट्रॉवर बसवल्या आणि मिसिसिपी राज्यांतल्या मळ्यावरच्या मोठमोठ्या घरांतून नृत्याच्या कार्यक्रमाच्या वेळीं त्यानें त्या वाजवल्या. राजकीय मेळाव्यांच्या वेळींसुद्धां त्यानें त्या वाजवून पाहिल्या. पूर्वीं कुठल्याहि कार्यक्रमाला मिळाले नव्हते इतके पैसे त्याला या कार्यक्रमांतून मिळाले.

१९०९ मध्यें विल्यम मेंफिसला पुन्हां आला. त्या वेळच्या राजकीय मोहिमेसाठीं त्यानें मिस्टर क्रम्प यांच्याविषयीं एक गीत लिहिलें होतें. त्या वेळीं विल्यमचें वय पस्तिशीच्या आसपास होतें. हें गीत लिहिल्यानंतर तीन वर्षांनीं 'मेंफिस ब्ल्यूज' या निराळ्या शीर्षकानें तें प्रसिद्ध झालें. मेंफिस ब्ल्यूजनंतर अनेक ब्ल्यूज प्रसिद्ध झाले. अग्रेसरत्वाचा मान अर्थातच विल्यमच्या मेंफिस

ब्ल्यूजचाच. तो आतां अनेक गाणीं लिहूं लागला होता. पुष्कळसे ब्ल्यूज त्याच्या हातून लिहून होत होते.

मेंफिस येथें असतांनाच तिथल्या निग्रो बँकेचे खजिनदार हॅरी एच. पेस यांच्याशीं विल्यमची ओळख झाली. हॅरी पेसनें कांहीं गाणीं लिहिलीं होतीं. चर्चमध्यें कार्यक्रम होत तेव्हां हॅरीला गायक म्हणून बरीच मागणी असे. हॅरी आणि विल्यम या दोघांनीं मिळून कांहीं गाणीं लिहिलीं आणि भागीदारींत एक संगीत प्रकाशनगृह सुरू केलें. या प्रकाशनगृहाचें नांव होतें 'पेस अँड हँडी म्यूझिक कंपनी.'

विल्यम पंचेचाळीस वर्षांचा झाला तेव्हां ही कंपनी बील स्ट्रीटवरून ब्रॉडवे येथें गेली. रॅग्टाइम् संगीत आतां जाझ म्हणून ओळखलें जाऊं लागलें होतें. टिन पॅन ॲलीमधून गीतांचें प्रचंड उत्पादन सुरू होतें. कांहीं वर्षें विल्यमनें प्राक्तनाचे चढउतार अनुभवले—या उतारांत विल्यमला कांहीं काळ आलेला आंधळेपणाहि धरला पाहिजे. पण नंतर ध्वनिमुद्रिका काढणाऱ्या कंपन्यांतून विल्यमकडे पैशाचा ओघ वाहूं लागला. न्यू यॉर्कमध्यें होणाऱ्या त्याच्या ब्ल्यूजच्या कार्यक्रमांचें निर्देशन करण्यासाठीं विल्यमला आमंत्रणें येऊं लागलीं. महायुद्धाच्या अखेरीला, जेव्हां जाझ संगीताची लोकप्रियता नुकतीच सुरू झाली होती, विल्यमचे ब्ल्यूज वाजवण्याचा कार्यक्रम अमेरिकन निग्रोंच्या एका बँड पथकानें पॅरीस येथें केला. गोऱ्या अमेरिकन सैनिकांनीं ते सूर ऐकतांच हे आपल्या देशांतलें संगीत असल्याचें ओळखलें आणि ते थरारून गेले. खालच्या थरांतील लोकांच्या संगीतांतून ब्ल्यूजचा जन्म झाला असें विल्यम म्हणत असे. पण शेवटीं हेच ब्ल्यूज मोठमोठ्या प्रेक्षागृहांतून वाजवले जाऊं लागले. हँडीच्या सेंट लुईस ब्ल्यूजवर पॉल व्हाइटमननें ऑर्केस्ट्रा बसवला होता. त्याची त्यानें ध्वनिमुद्रिकाहि करून घेतली. न्यू यॉर्कमधील हिप्पोड्रोम जलशांत व्हाइटमनच्या बँडपथकानें सेंट लुईस ब्ल्यूज वाजवलें आणि त्या वेळीं डिम्स टेलरनें तें गाऊन दाखवलें. विल्यमच्या ब्ल्यूजचा कार्यक्रम इंग्लंडचा राजा आठवा एडवर्ड याच्यापुढें झाला. संगीताच्या क्षेत्रांतील एका अधिकारी व्यक्तीचें असें मत आहे कीं, जाझ संगीताच्या आगमनाला विल्यमच्या मेंफिस आणि सेंट लुईस ब्ल्यूज यांचा वांटा इतर कुठल्याहि या प्रकारच्या लेखनापेक्षां अधिक आहे. सेंट लुईस ब्ल्यूज १९१४ सालीं लिहिलें गेलें. हळूहळू तें इतकें लोकप्रिय झालें

कीं, या एका ब्ल्यूजवर बेचाळीस वर्षांनंतर दर वर्षी पंचवीस हजार डॉलर्सची मिळकत होऊं लागली.

सत्तराव्या वर्षी विल्यमची दृष्टि हळूहळू अधू होऊं लागली तरीहि तो ब्रॉडवेवरील आपल्या ऑफिसांत नियमानें जात असे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं सैनिकांची करमणूक करण्यासाठीं तो अजूनहि कार्यक्रम करीत असे. पाणी आणणें, जोडे शिवण्याचें काम करणें, शेतमजुरी, लेखंडाच्या कारखान्यांत कामगार इत्यादि सर्व तऱ्हेचीं कामें करीत वर आलेला 'ब्ल्यूज' या यशस्वी संगीताचा हा लेखक आतां सत्तरी ओलांडून पुढें गेला होता. त्याला दिसत नव्हतें. परंतु तरीहि बिली रोझच्या डायमंड हॉर्सशूमध्यें, एखाद्या प्रसंगीं बोलावणें आलें म्हणजे, आपली सोन्यासारखी ट्रम्पेट वाजवण्यासाठीं अजूनहि जात होता. वॉल्डॉर्फ येथें त्याचा अठ्याहत्तरावा वाढदिवस साजरा झाला आणि त्या निमित्तानें मोठा रवाना दिला गेला. वयाच्या ऐंशीव्या वर्षी ब्ल्यूज संगीताच्या या जनकानें ब्रुकलिन हायस्कूलच्या शेंकडों मुलांसमोर एक कार्यक्रम केला. मुलांनीं हा कार्यक्रम अगदीं डोक्यावर घेतला. कार्यक्रमाच्या शेवटीं आपल्या हातांतली ट्रम्पेट थोपटल्यासारखी करून तो म्हणाला, "आयुष्य हें कांहींसं या ट्रम्पेटसारखं आहे. तुम्हीं आंत जर कसली भर घातली नाहीं तर तुम्हांला कांहीं निर्माणहि करतां यायचं नाहीं."

नेव्हिनच्या मायटी लॅक अ रोझ या गीताची निग्रो लोकांविषयीं सहानुभूतीची भावना निर्माण होण्यास फार मदत झाली असें हँडीला वाटत असे. या व्यक्तिचित्राच्या शिरोभागीं मॅकगफीच्या पांचव्या क्रमिक पुस्तकांतलें एक वाक्य दिलेलें आहे. आपल्या खडतर आयुष्याला तोंड देतांना या वाक्यांतलें सत्य विल्यम हँडीच्या सतत प्रत्ययाला येत गेलें.

विल्यम ख्रिस्टोफर हँडी
जन्म : हँडीज् हिल, फ्लॉरेन्स, आलाबामा येथें
१६ नोव्हेंबर १८७३
मृत्यु : न्यू यॉर्क येथें
२८ मार्च १९५८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ विः ..................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

## चार्ल्स् एडवर्ड इव्ह्ज्

"मला जें कांहीं येतें तें मी माझ्या वडिलांकडून शिकलों."

"पा" डॅनब्री—कनेक्टिकट येथें बँडमास्टर होते. तिथेंच चार्लस् इव्हज्चा जन्म १८७४ सालीं झाला. चार्ल्स् वडिलांना पा म्हणायचा. इतर लोक त्यांना जॉर्ज इव्ह्ज् या नांवानें ओळखत. शहरांत संगीताचे जे कांहीं कार्यक्रम होत त्यांचें नेतृत्व जॉर्ज इव्ह्ज्कडेच असे. बँडचा प्रमुख, चर्चमधल्या भक्तिगीतांचा निर्देशक, चांगल्या संगीताची तरुणांना ओळख करून देणारा शिक्षक अशीं जॉर्जच्या व्यक्तित्वाला अनेक अंगें होतीं. पण याशिवाय आणखी एक विशेष म्हणजे ध्वनिशास्त्र या विषयांत त्याला फार रस होता; त्याचा त्यानें अभ्यास केला होता आणि 'श्रुति' देणारें एक वाद्यहि त्यानें तयार केलें होतें.

वयाच्या सोळाव्या वर्षी जॉर्जनें 'सिव्हिल वॉर आर्मी बँड' हें पथक स्थापन केलें होतें. रिचमंडला जेव्हां वेढा दिला तेव्हां सैन्यतपासणीच्या वेळीं जॉर्जच्या नेतृत्वाखालीं वाजवलें गेलेलें 'फर्स्ट कनेक्टिकट हेवी आर्टिलरी बँड' राष्ट्राध्यक्ष लिंकननें ऐकलें आणि तो म्हणाला, "हें बँड चांगलं आहे." यावर जनरल ग्रॅन्ट म्हणाला, "सैन्यांतलें सगळ्यांत उत्तम बँड हेंच आहे असें आपण ऐकलें आहे—अर्थात् हें बॅन्ड चांगलें आहे हें ठरविणें कांहीं आपल्याला शक्य नाहीं. कारण 'यांकी डूडल' खेरीज दुसरे कसलेच सूर आपल्याला ओळखतां येत नाहींत."

पुढें न्यू यॉर्कमध्यें जॉर्ज इव्हज् आणि स्टिफन फॉस्टर यांची ओळख झाली होती. जॉर्जचा मुलगा चार्लस् पांच वर्षांचा झाला तेव्हांपासून जॉर्जनें त्याला संगीत शिकवायला सुरवात केली. त्यानें आपल्या सगळ्या मुलांना, आणि गांवांतल्याहि बऱ्याच मुलांना प्रथम बाक् आणि स्टिफन फॉस्टर यांनीं लिहिलेल्या संगीताचा परिचय करून द्यायला सुरवात केली. संगीताच्या क्षेत्रांतील नवनव्या शुक्यतांचा, वाटांचा शोध घेण्याच्या बाबतींत जॉर्जचा दृष्टिकोन अगदीं उदार होता. आपल्या मुलाला त्यानें संगीतांत सांकेतिक चाकोरी सोडून कुठलीहि नवी गोष्ट करायला भिण्याचें कारण नाहीं ही गोष्ट पहिल्यापासून शिकवली होती. चार्ल्स् दहा वर्षांचा असतांना जॉर्जनें त्याच्याकडून 'स्वानी रिव्हर' हें गीत (१९५) 'की इ फ्लॅट'मध्यें (काळीं दोन हा षड्ज मानून) गाऊन घेतलें होतें आणि त्याच वेळीं साथ 'सी'मध्यें (पांढरी एक षड्ज मानून) केली होती. आपलें स्वरज्ञान पक्कें व्हावें हा यामागचा हेतु आहे असें तो म्हणाला होता. कारण षड्जावर नेमकें बोट ठेवूं शकणारा जाणकारहि यामुळें बिचकला असता. यावरून असेंहि दिसतें कीं, चार्ल्सला षड्जाची सूक्ष्म जाणीव असली पाहिजे.

स्वतंत्र प्रतिभेचा संगीतकार म्हणून अमेरिकेंत चार्ल्स्चा गौरव झाला. त्यानें लिहिलेल्या चिजांचा अमेरिकेंत आणि बाहेरहि संगीतकारांनीं आणि टीकाकारांनीं मुक्तकंठानें गौरव केला. चार्ल्स्चे वडील जॉर्ज यांना जर आणखी पन्नास वर्षें आयुष्य लाभतें तर आपल्या मुलाचा झालेला हा सार्वत्रिक सन्मान त्यांना पाहतां आला असता.

चार्ल्स् आठ वर्षांचा होता तेव्हांची गोष्ट. बॅंडमधला ड्रम ऐकून तो भारून गेल्याचें त्याच्या वडिलांच्या लक्षांत आलें. सिव्हिल वॉरमधल्या जॉर्जच्या बॅंडपथकांत ड्रम वाजवण्याचें काम करणाऱ्या त्यांच्या जुन्या सहकाऱ्यानें केस कापण्याचें एक दुकान काढलें होतें. या आपल्या जुन्या ड्रम वाजवणाऱ्या सहकाऱ्याकडे जॉर्ज आपल्या मुलाला घेऊन गेला. सलूनमध्यें या केशकर्तनकारानें चार्ल्स्ला एक लहानसें रिकामें पिंप दिलें आणि हातांत दोन ड्रम वाजवण्याच्या काठ्या दिल्या. केसदाढी करतांना मधें जेवढा वेळ मिळेल त्या वेळांत तो चार्ल्स्ला ड्रमच्या जागीं ठेवलेल्या पिंपावर वाजवायला शिकवीत असे. बाराव्या वर्षीं चार्ल्स् बॅंडमध्यें ड्रम वाजवूं लागला.

तेराव्या वर्षी डॅनबरी येथील वेस्ट स्ट्रीट कॉंग्रेगेशनल चर्चमध्यें ऑर्गन वाजवण्याचें काम चार्ल्स्ला मिळूं शकलें यावरून त्यानें किती प्रगति केली असेल याची कल्पना येते. त्याच वर्षी त्यानें 'हॉलिडे क्विक स्टेप' ही बँडची धून लिहिली. परंतु त्याचा स्वभाव लाजरा असल्यामुळें त्याला ती इतरांबरोबर वाजवून दाखवण्याचा संकोच वाटूं लागला. जॉर्जला आपल्या मुलानें केलेल्या त्या लेखनाचा अतिशय अभिमान वाटला. आणि त्यानें स्वतः 'डेकोरेशन डे'च्या वेळीं ही धून बँडवर वाजवली. धून वाजवीत वाजवीत बँडचें पथक चार्ल्स्च्या घरावरून जाऊं लागलें तेव्हां छोटा चार्ल्स् लाजून पळून गेला. (१८७) आणि बेसबॉल घेऊन खोलीच्या दरवाजावर आपटून झेलत खेळत राहिला. एका स्थानिक टीकाकारानें ही धून ऐकली आणि त्यानें या मुलाचा संगीतलेखक म्हणून भविष्यकाळ उज्ज्वल असल्याचें भाकित केलें.

येल युनिव्हर्सिटींत प्रवेश करण्यापूर्वीं चार्ल्स् प्रथम डॅनबरी पब्लिक स्कूल आणि नंतर हॉपकिन्स ग्रामर स्कूल येथें शिकला. येल युनिव्हर्सिटींत त्यानें इतर अभ्यासाबरोबर संगीताचा अभ्यासक्रमहि घेतला होता. डडली बक्कडे ऑर्गन आणि होऱ्याशिओ पार्करकडे स्वरलेखन (composition) तो शिकत होता. १८९८ मध्यें ग्रॅज्युएट होईपर्यंत न्यू हॅवन येथल्या चर्चमध्यें तो ऑर्गन वाजवीत असे. इतकें सगळें करूनहि बेसबॉल आणि फूटबॉल खेळण्यापुरती सनदहि तो काढीत असे. ग्रॅज्युएट होण्यापूर्वीं चार्ल्स् ऑर्गनवर वाजवण्यासाठीं एक धून लिहीत होता. (१८८) ही धून त्यानें विसंवादी सुरांचा जाणीवपूर्वक संकर करून तयार केली होती. या सुरांचें संवादी मिश्रण अशक्य आहे असें तेव्हां मानलें जात असे. यानंतर कांहीं वर्षांनीं स्ट्रॉव्हिन्स्की आणि शॉनबर यांनीं संगीताच्या क्षेत्रांत अशा तऱ्हेचे धाडसी प्रयोग करून खळबळ उठवून दिली होती. परंतु कुणालाहि न कळतां चार्ल्स् शांतपणें हे कान विस्फारणाऱ्या स्वरांचे प्रयोग करीत होता. त्या वेळीं त्यानें स्ट्रॉव्हिन्स्की आणि शॉनबर यांचें संगीत ऐकलेलेंहि नव्हतें. पॉली हार्मनी वापरणारा षड्ज निश्चित न करतां रचना करणारा अमेरिकेंतला पहिला संगीतकार म्हणून आतां चार्ल्स्चा गौरव केला जात होता.

होऱ्याशिओ पार्कर हा उत्तम संगीतकार होता. एकोणिसाव्या शतकांतील युरोपियन संगीत योग्य तऱ्हेनें लिहूं शकणाऱ्यांपैकीं तो एक होता. आपला

विद्यार्थी चार्ल्स् याची संदर्भस्वर कायम न ठेवतां वाजवण्याची ही विक्षिप्त पद्धति त्याला पसंत नव्हती. सगळ्या स्वतकांची भेसळ करणें आवश्यक आहेच कीं काय असें तो त्याला विचारीत असे. चार्ल्स् आपण बांधलेल्या सगळ्याच रचना त्यामुळें आपल्या शिक्षकाला दाखवीत नसे. चार्ल्स्चें संगीत पहिल्याप्रथम ऐकणाऱ्या बहुतेकांना तें 'चमत्कारिक' लागत असे. अजून या संगीताची लोकांना संवय झालेली नव्हती. परंपरेनें चालत आलेलें युरोपिअन संगीत शिकवणारे त्याचे शिक्षक यामुळें त्रासून जात. चार्ल्स् लिहीत असलेल्या या तऱ्हेवाईक संगीतांतल्या सगळ्याच कल्पना तेवढ्या कांहीं नवीन नव्हत्या. त्यांतल्या कांहीं गोष्टी प्राचीन आदिवासी संगीतांत दाखवतां आल्या असत्या. परंतु आधुनिक युरोपिअन आणि अमेरिकन श्रोत्यांच्या कानांना त्यांची संवय नव्हती, त्या नवीन होत्या. इतरांनाच काय, पण हे प्रयोग करणाऱ्या चार्ल्स्लासुद्धां त्या नवीन होत्या. कांहीं माणसें अशीं असतात कीं, कुठल्याहि नव्या प्रयोगांच्या बाबतींत त्यांचीं मनें संवेदनाशील असतात, जागीं असतात. जे संगीतकार नव्या प्रयोगांकडे कांहीं अपेक्षेनें बघत होते त्यांना चार्ल्सचें संगीत विशेष लक्ष देण्याजोगें वाटत असे.

ग्रॅज्युएट झाल्यानंतर फावल्या वेळांत स्वतंत्र स्वररचना करणाऱ्या चार्ल्स्नें कांहीं वर्षें न्यू यॉर्क आणि न्यू जर्सी येथील चर्चमधून ऑर्गनवादकाचें आणि वृंदगीतांच्या निर्देशकाचें काम केलें, परंतु उपजीविकेचा व्यवसाय म्हणून त्यानें संगीताचा स्वीकार केला नव्हता. ग्रॅज्युएट झाल्यानंतर त्यानें विम्याच्या व्यवसायांत पडायचें ठरवलें आणि म्यूच्युअल लाइफ इन्शुरन्स कंपनींत तो क्लार्कचें काम करूं लागला. हें काम त्याला आवडत असे. आपल्याला ज्या तऱ्हेचें संगीत आवडतें तें लिहिण्याचें स्वातंत्र्यहि आपल्याला असलें पाहिजे असें तीव्रतेनें त्याला वाटत होतें. कांहीं वर्षांनंतर त्यानें आपली स्वतःची 'इव्हज् आणि कंपनी' काढली. आणि यानंतरहि कांहीं वर्षांनीं तो आणि बरोबरीचा आणखी एक क्लार्क म्यूच्युअल कंपनीचे मॅनेजर झाले. इव्हज् अँड मायरिक या त्यांच्या कंपनीनें एकवीस वर्षांत फार मोठें नांव कमावलें. देशांतल्या मोठ्या विमाकंपन्यांत तिची गणना होऊं लागली. एकवीस वर्षांनंतर प्रकृति बिघडल्यामुळें चार्ल्स्ला आपल्या या कंपनीचें काम करणें शक्य झालें नाहीं. म्हणून त्यानें ती बंद केली.

विमाव्यवसायाच्या क्षेत्रांत चार्ल्स्‌ला फार मान होता. संगीतक्षेत्राइतकीच त्यानें याहि क्षेत्रांत स्वतंत्र प्रज्ञा दाखवली होती. या व्यवसायांतल्या कांहीं नव्या कल्पना चार्ल्स्‌नेंच प्रथम काढल्या. एकतीस वर्षांच्या कालावधींत त्याच्या कंपनीनें म्यूच्युअल कंपनीला जवळजवळ पंचेचाळीस कोट डॉलर्सचा धंदा मिळवून दिला. चार्ल्स् म्हणत असे, "माझ्या या विमाव्यवसायामुळें मला मानवी जीवनाच्या विविध अंगांचं दर्शन झालं. मी जर या व्यवसायांत नसतों तर या जीवनदर्शनाला मी मुकलों असतों. या व्यवसायांत मानवी जीवनांतील शोकात्मिका, उदात्तता, नीचपणा, उच्च आदर्श आणि क्षुद्र स्वार्थ, भव्य आशा, आदर्शशून्यता या सगळ्यांचं दर्शन होतं. आणि यांतून आकार घेणाऱ्या अटळ अशा भवितव्याचंहि दर्शन घडतं."

कॉलेज सोडल्यानंतर दहा वर्षांनीं चार्ल्स्‌नें हार्मनी नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. हार्मनी म्हणजे सुसंवाद. आपल्या नांवाप्रमाणेंच खरोखरीच तिनें चार्ल्स्‌च्या जीवनांत सुसंवाद निर्माण केला. चार्ल्स् सबंध दिवस ऑफिसांत काम करी आणि घरीं आल्यानंतर, सुटीच्या दिवशीं संगीतांत बुडून जाई. परंतु हार्मनीनें याविषयीं कधींच तक्रार केली नाहीं. आपल्या नवऱ्याला अंतःकरणापासून जें संगीत जाणवतें, स्फुरतें तेंच त्यानें लिहिलें पाहिजे असें तिला वाटे. आणि म्हणूनच तिनें त्याला लोकप्रिय होईल असें 'छान छान' संगीत लिहिण्याचा कधींच आग्रह केला नाहीं. तीं दोघें मिळून कधीं कुठें फिरायला गेलीं नाहींत. पण तिनें याबद्दलहि कुरकुर केली नाहीं. आपल्या वडिलांइतकेच आपण आपल्या बायकोचे ऋणी आहोंत असें चार्ल्स् आपल्या मित्राला म्हणाला होता. हार्टफोर्ड येथल्या एका धर्मोपदेशकाची ती मुलगी होती. मार्क ट्वेन, व्हिटियर, हॅरीएट, बिचर स्टॉव हे आणि इतर लेखक तिच्या वडिलांचे स्नेही होते. मार्क ट्वेनच्या ए ट्रॅम्प अॅब्रॉडमधील सहप्रवासी म्हणजे तिचेच वडील होत.

इव्हज्‌च्या संगीतलेखनांत दिवसेंदिवस भर पडत होती. १९२० सालीं त्याच्या ११४ गीतांचा संग्रह त्यानें खाजगीरीत्या छापून तो वांटला. यानंतर एका वर्षानेंच त्यानें पिआनोसाठीं लिहिलेला 'कॉंकार्ड सोनाटा' प्रसिद्ध झाला. संगीताच्या क्षेत्रांतील नव्या प्रयोगांविषयीं आस्था असलेले संगीतकार, विशेषतः तरुण संगीतकार या कृतीकडे आकर्षित झाले. इव्हज्‌च्या या रचनांची संगीतकारांनीं आणि टीकाकारांनीं स्तुति केली तरी त्याचें संगीत सर्वसामान्य

लोकांत प्रसिद्ध व्हायला आणखी बरींच वर्षें जावीं लागलीं. आपलें संगीत सारखें लोकांच्या पुढें ठेवून त्याची प्रसिद्धि करण्याचा इव्ह्जनें कधींच प्रयत्न केला नाहीं. त्याच्या रचना वाजवायला अतिशय कठीण असत. तडकाफडकीं लोकप्रिय होणाऱ्या संगीतापैकीं हा बाज नव्हता. लोकांना चटकन् कळेल असें त्यांत सौंदर्य नव्हतें. त्याप्रमाणेंच तें समजणेंहि सोपें नव्हतें. इव्हज्च्या शब्दांत सांगायचें तर त्याचें हें संगीत 'मुष्कील' होतें.

जॉन कर्क पॅट्रिक या व्यासंगी पिआनोवादकानें इव्हज्च्या 'कॉंकार्ड सोनाटा'चा बारा वर्षें अभ्यास केला. (सुरवातीला त्याला तें कळतहि नव्हतें.) १९२९ सालीं त्यानें हा सोनाटा न्यू यॉर्क शहरांत जाहीरपणें वाजवून दाखवला. श्रोत्यांकडून फारच चांगली दाद मिळाली. या सोनाटांतली 'थोरो मुव्हमेंट' (१९१) वाजवतांना त्याला वन्स मोअर मिळाला. या रचनेच्या महत्त्वाविषयीं टीकाकारांचें एकमत झालें. अजूनपर्यंत अमेरिकन संगीतकारांनीं केलेल्या रचनेंत ही रचना सर्वश्रेष्ठ आहे असें मत एका टीकाकारानें दिलें. यानंतर कांहीं आठवड्यांनीं जॉन कर्क पॅट्रिकनें खास लोकाग्रहास्तव इव्हज्च्याच रचनांचा एक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचें एकहि तिकीट शिल्लक उरलें नाहीं. इव्हज्नें आपली 'थर्ड सिंफनी' (१९१) पुरी केल्यानंतर पस्तीस वर्षांनीं म्हणजे १९३९ सालीं तिचा पहिला प्रयोग करण्यांत आला. या रचनेला 'पुलित्झर प्राइज्' मिळालें.

आपण केलेल्या रचनेंत ती वाजवून दाखवली जात असतांना जराहि बदल कोणीं करतां कामा नये असेंच बहुतेक संगीतलेखकांना वाटत असतें. परंतु आपण सध्यां 'जुळणी'च्या युगांत राहातों. कोणत्याहि रचनेची ऑर्केस्ट्रासाठीं, बँडसाठीं, जाझसाठीं वेगवेगळ्या प्रकारें जुळणी या युगांत करण्यांत येते. आपल्या ११४ गीतांचें पुस्तक प्रसिद्ध होऊन तीस वर्षें झाल्यानंतरहि हीं गीतें कोणींहि वापरावीं आणि आपल्याला हवी असेल तशी त्याची जुळणी करावी असें इव्हज्ला वाटत असे. इतकेंच काय, या गीतांचा कॉपीराइटहि प्रकाशकानें आपल्याकडे ठेवायला त्याची हरकत होती—कोणालाहि या संगीताचा उपयोग करतां आला पाहिजे असें त्याला वाटत असे. अखेर त्यानें या पद्धतीला मान्यता दिली. पण एका अटीवर. तो म्हणाला कीं, कॉपीराइट मी एकाच अटीवर ठेवीन—या गीतांच्या विक्रींतून जो फायदा होईल त्याचा उपयोग

तरुण संगीतकारांच्या रचना प्रसिद्ध करण्यासाठीं केला पाहिजे. त्याचे शिक्षक म्हणत त्याप्रमाणें त्यानें पिॲनोच्या पट्ट्यांची भेसळ केली असेल. परंतु आपलें संगीत ही त्यानें खाजगी मालमत्ता केली नाहीं.

विम्याचा व्यवसाय करीत असतांना मिळालेल्या फावल्या वेळांत संगीत-रचना करूनहि इव्हज्नें विपुल लेखन केलें. सिंफनी, चेंबर म्यूझिक, भक्तिसंगीत, गीतें, पिॲनोसाठीं चिजा असें विविध प्रकारचें लेखन त्यानें केलें. त्याच्या कांहीं रचनांचें सौंदर्य अवर्णनीय आहे असें मानलें जातें. त्यानें निर्माण केलेल्या कलाकृति अत्यंत महत्त्वाच्या आणि खराखुऱ्या अर्थानें राष्ट्रीय आहेत असेंहि मानलें जातें. इव्हज्च्या संगीतलेखनांत त्याचें उत्कट देशप्रेम, ध्येयवाद, राष्ट्राच्या इतिहासांतल्या थोर घटनांविषयींचा आदर या गोष्टी व्यक्त झालेल्या दिसतात. याप्रमाणेंच त्यानें लहानपणीं ऐकलेल्या संगीताच्या अनेक खुणाहि त्याच्या लेखनांत आपल्याला उमटलेल्या जाणवतात. लहानपणीं त्याच्या वडिलांनीं त्याला जें संगीत शिकवलें होतें त्याप्रमाणेंच १८७० ते ८० या दशकांत त्यानें ऐकलेल्या अनेक संगीतरचना चार्ल्स्च्या लेखनांतून उमटल्या आहेत : पिकें कापण्याच्या वेळींचें नृत्य, मेमोरियल डे, परेडचें बँड, चर्चमधलें संगीत, गांवांतल्या म्हाताऱ्या फिड्लवादकाचें वरखालीं हेलकावे घेणारें वादन, प्रत्येकाला स्फूर्ति आल्यामुळें कुठलेंहि वाद्य एकसाथ न वाजणारें गांवांतले बँड, चर्चमधला बेसूर असणारा, भलत्याच जागीं अचानकपणें लहानमोठे सूर होणारा ऑर्गन, घाईच्या, फरफटणाऱ्या, तीव्र, सपाट अशा नाना तऱ्हेच्या आवाजांत पण आत्मविश्वासानें गायिलीं जाणारीं समूहगीतें आणि या सर्वांबरोबरच कान आश्चर्यानें विस्फारून टाकणारे घरचे संगीताचे धडे या सर्व गोष्टी त्याच्या रचनेंत आपल्याला दिसतात. चार्ल्स् इव्हज् हा स्वतंत्र प्रतिभेचा आणि राष्ट्रीय महत्त्व असलेला अमेरिकन संगीतकार होय.

चार्ल्स् एडवर्ड इव्हज्
जन्म : डॅनबरी, कनेक्टिकट येथें
२० ऑक्टोबर १८७४
मृत्यु: न्यू यॉर्क येथें
१९ मे १९५४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........................ वि: ...
क्रमांक ........................ नों. दि.

## चार्ल्स् टॉमलिन्सन ग्रिफेस

"चोखंदळ कारागीर, जागरूक कलावन्त"

*—लॉरेन्स गिल्मन*

बिल्बर ग्रिफेस हा एल्मिरा, न्यू यॉर्क येथें राहाणारा एक व्यापारी होता. त्याला आणि त्याच्या बायकोला वाङ्मय आणि संगीतकलेची अतिशय आवड होती. त्यांना पांच मुलें झालीं. या पांचहि मुलांना कुठलें ना कुठलें वाद्य वाजवतां येत असे. चार्ल्स् हा बिल्बरचा तिसरा मुलगा. तो संगीतलेखक झाला.

एखाद्या क्षेत्रांत लहानपणींच चमत्कार वाटावा अशी प्रगति दाखणारी व्यक्ति एखाद्या प्रतिभावंताइतकीच क्वचित् आढळते. आतांपर्यंत ज्या संगीतकारांचीं चरित्रें आपण वाचलीं त्यांच्यापैकीं लहानपणीं असा चमत्कार दाखवणारा कोणीहि नव्हता. असामान्य प्रतिभा नसतांनाहि एखादा मनुष्य त्याच्या मृत्यूनंतर कीर्तिरूपानें उरेल अशी कलाकृति निर्माण करूं शकतो. चार्ल्स् ग्रिफेस याला लहानपणापासून आपल्या हातून पुढें कांहींतरी असाधारण होणार आहे असें वाटत होतें.

त्याची एक बहीण व्हायोलिन वाजवी. त्याच्याहून मोठी बहीण पिॲनो वाजवीत असे आणि शिकवीतहि असे. लहानपणीं चार्ल्सनें या आपल्या बहिणींकडून संगीताचे पहिले धडे घेतले. लहानपणापासून चार्ल्स्चा संगीताकडचा कल दिसत होता. इतर संगीतकारांना ज्याप्रमाणें आईबापांच्या इच्छेविरुद्ध संगीत शिकण्याचा प्रसंग आला, तशी पाळी चार्ल्सवर आली नाहीं. साहित्य आणि

संगीत यांचेंच वातावरण घरांत असल्यामुळें लहानपणापासून चार्ल्सच्या या कलाप्रवृत्तीला उत्तेजन मिळालें, वाचनाची आवड त्याच्यांत निर्माण झाली— हें अगदीं स्वाभाविक होतें.

लहान असतांना प्रवासवर्णनें त्याला वाचायला फार आवडत. दूरदेशच्या कल्पनांत तो रंगून जाई. पूर्वेकडच्या देशांचें त्याला विशेष आकर्षण वाटे. त्याला काव्य आवडत असे आणि कांहीं काळ अमेरिकन कवि एडगर ॲलन पो हा त्याचा आवडता कवि होता. पुढें मोठा झाल्यानंतर त्याच्या या सगळ्या प्रवृत्ति त्यानें केलेल्या संगीतरचनेंतूनच मोहोरून आल्या.

त्याला चित्रें काढतां येत असत. जलरंगी चित्रें त्याला विशेष चांगलीं काढतां येत असत. चित्रकलेची ही देणगी इतरहि अनेक संगीतकारांना असल्याचें आपण पाहिलें आहे. मोठेपणीं चार्ल्स्नें ताम्रपटावर कांहीं चित्रें रेखाटलीं. तीं इतकीं चांगलीं होतीं कीं, चित्रकला हाच जीवनव्यवसाय चार्ल्सनें करावा असें कांहीं लोकांनीं त्याला आग्रहानें सांगितलें.

पब्लिक स्कूलमध्यें चार्ल्स्चें नांव घालण्यांत आलें. त्याला ती शाळा आवडली. तो अनेक खेळ खेळत असे, टेनिसची त्याला विशेष आवड होती. चार्ल्स्चा स्वभाव संकोची होता. भेटेल तो मित्र अशी त्याची वृत्ति नव्हती. त्याचे थोडेच मित्र होते, पण ते जिवलग होते. शाळकरी वयांतच त्यानें पिॲनोवर वाजवण्यासाठीं कांहीं रचना केल्या होत्या. एल्मिरा येथें त्यांचा कार्यक्रमहि झाला होता. या वयांत त्यानें कांहीं गीतेंहि लिहिलीं होतीं.

पिॲनोचे पहिले धडे चार्ल्स्नें आपल्या बहिणीकडून घेतले याचा उल्लेख आलाच आहे. यानंतर मेरी एस्. ब्राउटन या कुशल पिआनोवादिकेकडे तो शिकूं लागला. तिनें आपलें शिक्षण जर्मनीला घेतलें होतें. मोठमोठ्या संगीतकारांच्या कृतींचा परिचय मेरीकडे शिकतांना चार्ल्स्ला घडला आणि त्यामुळें त्याची अभिरुचि संपन्न झाली. कल्पनारम्य काव्य आणि गद्य वाचण्याकडे जेव्हां त्याचा विशेष ओढा होता तेव्हां त्यानें केलेल्या संगीतरचनांतून त्याची ही तरल वृत्ति उमटली होती. यानंतर त्याला रिचर्ड स्ट्रॉस, ह्यूगो वुल्फ आणि ब्रॅहम्स यांच्या संगीतानें आकर्षून घेतलें. शाळेंत असतांना चार्ल्स्ची पिॲनो वादनांत सारखी प्रगति होत होती. संगीताचें शिक्षण घेण्यासाठीं त्यानें बर्लिनला जावें असा सल्ला त्याच्या शिक्षिकेनें त्याला दिला.

एकोणिसाव्या वर्षीं चार्ल्स् जर्मनीला गेला. स्वतंत्र जलसा करतां येईल इतकी पिॲनोवादनांत प्रगति करून घ्यावी अशी त्याची इच्छा होती. जर्मनींत त्यानें संगीतलेखन आणि संगीतशास्त्र यांचा अभ्यास केला. हंपर्‌डिंक हा संगीतलेखक त्याच्या शिक्षकांपैकीं एक होता. चार्ल्स् जर्मनींत असतांना वॅगनरच्या संगीतानें लोक झपाटल्यासारखे झाले होते. चार्ल्सला वॅगनरचें संगीत आवडत असे, परंतु तें ऐकून तो तोल सुटण्याइतका भारला गेला नाहीं. विसाव्या वर्षीं त्यानें बर्लिनमध्यें पहिला जाहीर कार्यक्रम केला. या कार्यक्रमांत त्यानें स्वतः लिहिलेला एक 'सोनाटा' वाजवला.

जर्मनींत असतांना चार्ल्स्च्या आकांक्षेची दिशा बदलली. पिॲनोवादक होण्याऐवजीं संगीतलेखक व्हावें असें त्याला वाटूं लागलें. इतर अनेक भाषा त्याला येत होत्या; पण जर्मन भाषा स्वाभाविकच त्याला अधिक चांगली येत असे. पांच जर्मन कवितांना त्यानें संगीत दिलें. पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या या त्याच्या पहिल्या रचना. या स्वररचना प्रसिद्ध झाल्या तेव्हां त्याचें वय पंचवीस वर्षांचें होतें. जर्मनींत तो चार वर्षें राहिला. संगीत शिकवण्याचें कामहि त्यानें कांहीं काळ इथें केलें.

चार्ल्स् ग्रिफेस आतां अमेरिकेंत परत आला. गंभीर संगीतलेखन करणाऱ्याला पुरेसे पैसे मिळणें शक्य नसल्यामुळें इतर कांहींतरी काम शोधणें आवश्यक होतें. टॅरिटाउन येथल्या 'हॅकली स्कूल फॉर बॉयज्' या शाळेंत संगीतशिक्षक म्हणून तो राहिला. फावल्या वेळांत तो फ्रेंच आणि रशियन आधुनिक संगीताचा (या संगीताचा तसा उल्लेख होत असे.) अभ्यास करूं लागला. स्वतंत्र संगीतलेखनहि तो करीत असे. आपला सर्व वेळ संगीताच्या अभ्यासाला आणि लेखनाला द्यावा असें त्याला तीव्रतेनें वाटत असे आणि त्यामुळें शाळेंत शिकवण्याचें काम त्याला तापदायक होऊं लागलें. त्यांत त्याला रस वाटेना.

या शाळेंत तेरा वर्षें संगीतशिक्षकाचें काम त्यानें केलें. या काळांत त्यानें केलेल्या बऱ्याच रचना आजतागायत टिकून राहिल्या आहेत. 'रोमन स्केचेस्' या नांवानें त्यानें लिहिलेल्या पिआनोच्या चार चिजांपैकीं 'द व्हाइट पीकॉक' ही धून विशेष लोकप्रिय आहे. 'धी कैरन ऑफ कॉरिडवेन' (१९७) या नृत्य-नाट्याला त्यानें लिहिलेलें संगीत त्याला विशेष आवडत असे. नेबरहुड प्लेहाउसनें न्यू यॉर्कमध्यें या नृत्यनाटकाचा प्रयोग केला होता.

जपानमधल्या परंपरेनें चालत आलेल्या एका जुन्या कथानृत्यावर त्यानें लिहिलेला 'शो-जो' हें नृत्यनाट्य विशेष लोकप्रिय झालें. न्यू यॉर्क, बोस्टन येथेंहि त्याचे प्रयोग झाले. पूर्वेकडच्या देशांविषयीं त्याला आकर्षण असल्यामुळें प्राचीन जपान आणि चीनमधल्या पांच कवितांना त्यानें संगीत दिलें होतें. हीं गीतें 'फाइव्ह टोन' आणि 'सिक्स टोन' या स्केलवर लिहिलीं होतीं. (१९७)

नुसत्या स्केल्स्मध्येंच नव्हे तर फॉर्म्समध्येंहि चार्लस् प्रयोग करीत असे. त्यानें लिहिलेल्या एका मोठ्या सोनाटांत स्वतःच्या स्केलचा वापर केला होता. (१९७) हा सोनाटा वाजवायला अतिशय अवघड आहे. तो स्वतः चांगला पिॲनोवादक असल्यामुळें तो हा चांगला वाजवूं शकला. हा सोनाटा प्रथम त्यानें न्यू यॉर्कमधील मॅक्डुवेल क्लबमध्यें वाजवून दाखवला.

'द प्लेजर डोम ऑफ कुब्लाखान' ही त्यानें ऑर्केस्ट्रासाठीं लिहिलेली टोन पोअेम (१९७) बोस्टन सिंफनी ऑर्केस्ट्रानें आपल्या कार्यक्रमासाठीं स्वीकारली होती. ही फारच यशस्वी झाली. त्यामुळें चार्लस्चें नांव तर झालेंच, पण त्याच्या संगीतरचनेला अधिकाधिक मागण्याहि येऊं लागल्या. आपलें संगीत लोकांना हवें आहे हें एकदां कळलें कीं संगीतकार विशेष उत्सुकतेनें रचना करूं लागतात ही गोष्ट आपल्याला बहुतेक सर्व संगीतकारांच्या जीवनांत दिसते. आपल्या कृति लोकांना आवडतील काय, आपलें संगीत कुणी ऐकेल काय अशी भावना मनांत असतांना फारसें लिहून होत नाहीं. पण एकदां का उत्तेजन मिळूं लागलें कीं लेखनाला वेग येतो. ग्रिफेसनें लिहिलेली टोन पोएम जॉर्ज्स् बॅरीर—त्याच्यासाठींच ती लिहिली होती—फ्ल्यूटवर वाजवीत असे. तिला खूप लोकप्रियता मिळाली.

चार्लस् ग्रिफेसला प्रसन्न विनोदबुद्धि होती. कलेच्या क्षेत्रांत कर्तृत्व करून दाखवलेल्या कलावंत स्नेह्यांचा सहवास त्याला आवडत असे. चार्लस्च्या आयुष्यांतील शेवटचीं वर्षें सुखाचीं गेलीं नाहींत. शिक्षकाच्या व्यवसायासाठीं त्याला आपला फारच वेळ द्यावा लागे. तशांत त्याची प्रकृतिहि बिघडली होती.

छत्तिशींत असतांनाच त्याचा मृत्यु झाला—तेव्हां निश्चित असें यश त्याला मिळूं लागलें होतें. "चार्लस् ग्रिफेसच्या अकाल मृत्यूमुळें अमेरिकेच्चें संगीताच्या क्षेत्रांतलें फार मोठें नुकसान झालें आहे." असे उद्गार डीम्स

टेलरनें काढले होते. चार्ल्स् हा जगप्रसिद्ध संगीतकार झाला असता, पहिल्या दर्जाचा संगीतकार अमेरिकेंत त्याच्या रूपानें निर्माण झाल्याचें जगाला कळलें असतें, असें त्याच्याविषयीं डीम्स टेलरला वाटत असे.

चार्ल्स् ग्रिफेसनें केलेल्या रचना सगळ्या मिळून चाळिसाच्या आंतच आहेत. 'दीज थिंग्ज शॅल बी,' 'द लॅमेंट ऑफ इआन द प्राउड,' 'दाय डार्क आइज टु माइन्;' 'द रोझ ऑफ धी नाइट' या त्याच्या विशेष प्रसिद्ध रचना. रेड इंडियन स्वरांची मोडणी वापरून त्यानें एक 'स्ट्रिंग क्वॉर्टेट' लिहिला. परंतु केवळ रेड इंडियन स्वरमोडणी वापरली म्हणून आपण खास अमेरिकन संगीत निर्माण केलें असें त्याला वाटलें नाहीं. चार्ल्स् ग्रिफेसच्या रचना युरोपमध्यें वाजवल्या जातात. युरोपिअन श्रोत्यांना इतर अमेरिकन संगीतकारांचीं नांवें कदाचित् माहीत नसतील—पण चार्ल्स् ग्रिफेस हें नांव मात्र त्यांच्या परिचयाचें आहे असेंच दिसेल.

चार्लस् टॉम्‌लिन्‌सन ग्रिफेस्
जन्म : एल्मिरा, न्यू यॉर्क येथें
१७ सप्टेंबर १८८४
मृत्यु : न्यू यॉर्क येथें
८ एप्रिल १९२०

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

# जेरोम कर्न

"ही भेट तुझ्यासाठीं."

व्हिक्टर हर्बर्ट न्यू यॉर्कमध्यें ज्या वर्षीं आला (आणि पुढें जिथें त्यानें ऑपरेटांचा लेखक म्हणून नांव मिळवलें) त्या न्यू यॉर्क शहरांत हर्बर्टच्या आगमनाच्या आदल्या वर्षीं म्हणजे १८८५ सालीं जेरोम कर्नचा जन्म झाला. स्टिफन फॉस्टरच्या वडिलांप्रमाणेंच जेरोमचे वडील हेन्री कर्न हे व्यापारी होते. त्यांचे तिघे मुलगे संगीत शिकण्याएवढ्या वयाचे झाले तेव्हां मुलांच्या आईनें त्यांना पिॲनोचे धडे द्यायला सुरवात केली. जलशांत एका पिॲनोवर चौघे बसून वाजवण्यासाठीं कर्नच्या घरांत पुरेसे वादक होते.

जेरोम कर्न दहा वर्षांचा झाला तेव्हां त्यांचें कुटुंब नेवार्क इथें गेलें. तिथल्याच शाळेंत त्याचें नांव घालण्यांत आलें. शाळेंत तो ऑर्गन वाजवण्याचे कार्यक्रम करी. संगीताच्या एका कार्यक्रमाचें नेतृत्व त्यानेंच केलें होतें. सतराव्या वर्षीं तो ग्रॅज्युएट झाला. न्यू यॉर्क कॉलेज ऑफ म्यूझिक या संस्थेंत आणि इतरहि शिक्षकांकडे तो पिआनो शिकत होता. यानंतर त्यानें हार्मनीच्या अभ्यासाला सुरवात केली.

संगीताचें त्याला वेड असल्यामुळें पुढील अभ्यासासाठीं परदेशीं जाण्याची परवानगी वडिलांकडे त्यानें मागितली. त्याच्या वडिलांनीं संमति दिली. परंतु ते म्हणाले कीं, तसें करण्यापूर्वीं कांहीं काळ त्यानें घरच्या व्यापारव्यवसायांत काम करावें कारण व्यापार करणें हेंच त्याचें खरें क्षेत्र आहे असेंहि पुढें

ठरण्याचा संभव आहे. वडिलांच्या या सल्ल्याप्रमाणें त्या वर्षींचा उन्हाळा त्यानें व्यापारउदीम पाहाण्यांत घालवला.

कर्नची व्यापारी कंपनी वाद्यें विकत नसे. पण एकदां असें झालें कीं, दोन पिॲनोंची ऑर्डर त्यांना आली. या गिऱ्हाइकांना नाराज करूं नये म्हणून हेन्री कर्ननें ही ऑर्डर स्वीकारली. आपला अभ्यासक्रम संपवून नुकत्याच काम करणाऱ्या जेरोमला त्यांनीं हे दोन पिॲनो विकत घेण्यासाठीं न्यू यॉर्कला पाठवलें. न्यू यॉर्कमध्यें जेरोमला प्रसन्न अनुभव आला. पिआनोच्या कारखान्याच्या मालकांनीं त्याला अतिशय आतिथ्यानें वागवलें. त्याला ते जेवायला घेऊन गेले. त्यांची ती वागण्याबोलण्याची आर्जवी पद्धत जेरोमला अतिशय आवडली. तो त्यांच्यावर एवढा खूष झाला कीं, जेवण संपवून उठल्यानंतर आपण दोनाच्याऐवजीं दोनशें पिआनो विकत घेतल्याचें त्याच्या लक्षांत आलें.

घरीं येऊन जेरोमनें आपल्या या खरेदीची हकीगत वडिलांना सांगितल्या-नंतर त्यांना आपण मुलाला संगीताच्या शिक्षणासाठीं परदेशीं पाठवलें असतें तर बरें झालें असतें असेंच क्षणभर वाटलें असेल. दोनशें पिॲनो येऊन पडले होते. हेन्री कर्न इतक्या पिॲनोंचें करणार होता काय? बरेच दिवस चिंता केल्यानंतर, हा नवा व्यापार करण्याचा प्रयत्न केल्यानंतर मोठ्या कर्ननें अधिक आलेले हे १९८ पिॲनो एका माल साठवण्याच्या खोलींत ठेवून दिले. हप्त्यांच्या बोलीवर नेहमींपेक्षां कमी दरानें त्यानें या पिआनोंचा सेल जाहीर केला आणि कांहीं काळानंतर त्यानें ते सर्व पिॲनो विकले. लवकरच पिॲनो ही बाजारांतली एक महत्त्वाची वस्तु होऊन बसली. पण त्या वेळीं जेरोम या व्यवसायांत काम करीत नव्हता. त्याच्या वडिलांनीं त्याला मोठ्या आनंदानें संगीत शिकवण्यासाठीं परदेशीं पाठवलें.

त्याच वर्षीं, आतां जेरोम सतरा वर्षांचा झाला होता, तो जर्मनीला गेला आणि यानंतर एका वर्षानें संगीताच्या व्यवसायांतलें पहिलें काम त्याला मिळालें. कांहीं काळ त्यानें न्यू यॉर्क आणि लंडन येथें आलटून पालटून कामें केलीं. अभ्यासासाठीं तो जर्मनीचे दौरे करून येत असे. रॅग्टाइम् संगीत जेव्हां लोकप्रिय होऊं लागलें, या संगीतामुळें जेव्हां एक नवा व्यवसाय, नवा उद्योगधंदा निर्माण झाला, त्या वेळीं जेरोम एका प्रकाशनगृहांत संगीतप्रचारकाचें काम

करीत होता. त्या वेळीं या व्यवसायांत "हें तुमच्या पिआनोवर वाजवून पहाच" अशी घोषणा केली जात होती.

संगीत शिकवणाऱ्या शाळा न्यू इंग्लंडमध्यें निघाल्या आणि त्यामुळें छापील नोटेशन वाचायला शिकवणारा संगीतशिक्षक हा नवा व्यवसाय निर्माण झाला. या गोष्टीला अजून दोनशें वर्षें पुरीं झालेलीं नाहींत. यानंतरच्या काळांत अमेरिकेंतल्या सोन्यानें आकर्षित होऊन युरोपांतले कलावंत इथें येऊं लागले. या कलावंतांनीं सोन्याच्या मोबदल्यांत अमेरिकेला संगीताच्या अभिरुचीचा एक विशिष्ट दर्जा प्राप्त करून दिला. अमेरिकेंतली वसाहत नव्यानें स्थापली जात होती, ती नुकती वाढत होती. अशा या काळांत मनोरंजनप्रधान संगीतावर भर होता. या सुरुवातीच्या काळांत गंभीर संगीताप्रमाणेंच हें हलकेंफुलकें संगीतहि ओबडधोबडच होतें. अमेरिकेंतली समृद्धि जसजशी वाढूं लागली, तसतसें वाद्यांना महत्त्व येऊं लागलें. वाद्यसंगीतांतल्या कौशल्याचा विकास होत असलेल्या या काळांत जेरोमनें संगीताच्या व्यवसायांत पाऊल टाकलें. जेरोम कर्ननें मनोरंजनप्रधान संगीताला एक संस्कारिता प्राप्त करून दिली. हीं त्यानें या क्षेत्रांत घातलेली मोठी भर होय.

संगीतलेखक म्हणून जेरोम कर्ननें वयाच्या अठराव्या वर्षीं व्यवसायाला सुरुवात केली. संगीताचे मनोरंजक कार्यक्रम इंग्लंडमधून उचलून अमेरिकेंत आणणें हें ज्याचें वैशिष्ट्य होतें अशा एका प्रोड्यूसरकडे जेरोम नोकरीला राहिला. त्या काळांत संगीताच्या कार्यक्रमांना उशीरां जाणें ही लंडनमधली फॅशन होती. या फॅशनमुळें आपल्याला वर येण्याची संधि मिळाली असें जेरोम म्हणत असे. या फॅशनमुळेंच संगीताच्या कार्यक्रमाचें संयोजन एका विशिष्ट प्रकारें केलें जात असे. कार्यक्रमांतल्या पहिल्या भागांत किरकोळ कार्यक्रम असत. श्रोते आल्यानंतर बऱ्याच उशीरां महत्त्वाचे कार्यक्रम सुरू होत. परंतु अमेरिकेंत पद्धत वेगळी होती. न्यू यॉर्कमध्यें अशा तऱ्हेचा कार्यक्रम केला जाई तेव्हां पडदा वर गेल्याबरोबर कांहींतरी चांगलें ऐकायला मिळालें पाहिजे अशी अमेरिकन श्रोत्यांची अपेक्षा असे. लंडनमधून उचलून आणलेला असाच एक कार्यक्रम जेव्हां अमेरिकेंत केला गेला तेव्हां या कार्यक्रमाच्या प्रारंभींचा भाग लिहिण्याची जबाबदारी जेरोम कर्नवर आली.

पुढच्या वर्षी त्यानें हेंच काम केलें. अधूनमधून या कामानिमित्त त्याला


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम........................ दि: ........................

लंडनला जाऊन यावें लागे. हळूहळू अशा कार्यक्रमांत जेरोम कर्ननें लिहिलेला प्रारंभींचा भाग हाच विशेष चांगला असतो हें लोकांच्या लक्षांत आलें.

वयाच्या पंचविसाव्या वर्षी जेरोमनें आपल्या एका रचनेचा संपूर्ण सरगम लिहिला. त्याच वर्षीच्या उन्हाळ्यांत तो इंग्लंडमध्यें असतांना एका इंग्लिश मुलीशीं त्याचें लग्न झालें.

यानंतरच्या वर्षी त्यानें लिहिलेली पहिली संगीत सुखात्मिका 'धी रेड पेटीकोट' सादर करण्यांत आली. संगीतलेखक म्हणून केवळ ब्रॉडवे येथेंच नव्हे तर पिकॅडिली येथेंहि त्याला आतां मान्यता मिळाली होती. वर्षांतून एका तरी कार्यक्रमाचें संपूर्ण संगीतलेखन तो करीत असे. कांहीं वेळां तर दोनतीन कार्यक्रमांत संगीतलेखन त्यानें केलेलें असे, आणि पुष्कळ वेळां त्याचे हे कार्यक्रम एकाच वेळीं न्यू यॉर्क, लंडन आणि पॅरीस येथें सादर केले जात असत. त्याला खूप सुचत असे. डोक्यांत आलें रे आलें कीं तें कागदावर उतरून काढायचें—फक्त स्वतःच पूर्वी लिहिलेल्या सुरावटींची पुनरावृत्ति केली जात नाहीं एवढीच काळजी त्याला घ्यावी लागे.

यानंतरच्या दहा वर्षांत, यांत महायुद्धाचाहि काळ आला, ऑपरेटांनीं लोकप्रियतेचा कळस गांठला होता. विसाव्या शतकानें अजून विशी ओलांडली नव्हती. स्वप्नरम्य आणि विलक्षण अशा संगीताचे कार्यक्रम या काळांत केले जात होते. पुष्कळशा ऑपेरांचें कथानक ऐतिहासिक असे. या ऑपेरांना दिलेलें संगीत सुरेल असे. अशा तऱ्हेचे संगीत लिहिणारे चार संगीतकार विशेष लोकप्रिय होते. एक 'बेब्ज इन् टॉयलँड' लिहिणारा आयरिश-अमेरिकन व्हिक्टर हर्बर्ट, दुसरा 'कॅटिंका' (Katinka) लिहिणारा बव्हेरियन संगीतकार रूडॉल्फ फ्रिमूल, तिसरा 'इन् ब्लॉसम टाइम्' लिहिणारा हंगेरियन संगीतकार सिग्मंड रॉम्बर्ग आणि चवथा न्यू यॉर्कचा संगीतकार जेरोम डेव्हिड कर्न. त्यानें लिहिलेल्या अनेक ऑपेरांपैकीं 'व्हेरी गुड एडी'; 'हॅव अ हार्ट'; 'लीव्ह इट टु जेन'; 'द बंच अँड ज्युडी'; 'स्टेपिंग स्टोन्स' हे विशेष होत.

जुन्या काळांत डॅन् एमेट आपल्या चार साथीदारांसह श्रोत्यांची करमणूक करीत असे. डॅन एमेटच्या या छोट्या कार्यक्रमांतूनच पुढें 'मिन्स्ट्रेल शोज' निघाले. हळूहळू या तऱ्हेच्या कार्यक्रमांच्या 'भव्यतेंत' वाढ होत गेली.

जिथें डॅन एमेट चार माणसांचा कार्यक्रम करीत असे तिथें आतां साठ माणसांशिवाय भागेना. प्रोड्यूसर लोकांत अधिकाअधिक खर्च करण्याची स्पर्धा सुरू झाली. या खर्चाच्या वजनाखालींच हे कार्यक्रम जवळजवळ चेपले गेले. गुणवत्तेपेक्षां झगमगाटावर भर देऊं पाहाणाऱ्या या कार्यक्रमासाठीं पन्नास हजार डॉलर्सचा खर्च म्हणजे कांहींच नव्हे अशी परिस्थिति निर्माण झाली. गर्दी जमविण्यासाठीं पन्नासऐवजीं शंभर वृंदगायिका अधिक चांगल्या अशीच प्रथा पडूं लागली. दोघांच्या ऐवजीं जर आठ विनोदी नट घेतले तर गंमत चौपट वाढली असें गणित मांडलें जाऊं लागलें. मनोरंजनप्रधान संगीताच्या क्षेत्रांत १९२० च्या दशकांत हे असे बदल होत होते.

फारच थोड्या संगीत सुखात्मिकांना कथानक असे, आणि तेंहि ठिगळवजा. वीरनायकांच्या परंपरेबरोबरच अद्‌भुतरम्य कथानकेंहि नाहींशीं होत होतीं. स्वभावचित्रणांचा मागमूस नव्हता. या ऑपेरांसाठीं जें संगीत लिहिलें जाई तें आणि या ऑपेराचें नाममात्र कथानक महत्त्वाच्या गाण्यांभोंवतींच ठोकून बसवलेलें असे. सगळा भर या लोकप्रिय गाण्यांवरच. लोकांना या गोष्टीचें कांहींच वाटत नसे. सुसूत्र असें कथानक नसलें तरी त्यांना चालत असे. इथलें थोडें तिथलें थोडें असला प्रकार श्रोत्यांना चालत असे. डौलदार तंतुवाद्यें जाऊन त्यांची जागा जास्त संगीताच्या आगमनामुळें फुंकरीनें आणि तालवाद्यांनीं घेतली होती—कारण जाझमुळें अस्वस्थ करून टाकणारे ताल आले होते. ज्या कांहीं मेलडी उरल्या होत्या त्या अगदीं तुटक आणि घाईघाईनें उरकल्या जाणाऱ्या अशाच होत्या—आणि त्याहि आवाजापेक्षांसुद्धां ताल धरणाऱ्या पायांकडे बघून लिहिल्या जात. समाधान करणारी अशी मेलडी आतां लोकांना नको होती, ती विसरली जात होती. परंतु जेरोम कर्न मात्र हें संगीत विसरला नव्हता. हे सगळे बदल घडत असूनसुद्धां लोकप्रिय होईल असें गाणें लिहायचें असें म्हणून जेरोम कधींच स्वस्थ बसला नाहीं. स्वतःच्या समाधानाकरितां तो संगीत लिहीत असे. 'ओल्ड मॅन रिव्हर' मधली त्यानें लिहिलेली मेलडी त्या वेळीं लोकप्रिय झाली, अनेक वर्षें लोकप्रिय होती याचें कारण हेंच.

एडना फर्बर हिची 'शो बोट' ही कादंबरी प्रसिद्ध झाल्याची जाहिरात जेरोम कर्ननें वाचली आणि ती कादंबरी विकत घेतली. परंतु ती कादंबरी तो वाचूं शकला नाहीं. जेरोमनें ही गोष्ट जेव्हां कादंबरीच्या लेखिकेला सांगितली

तेव्हां ती अस्वस्थ झाली. त्यानें तिची अस्वस्थता पाहून स्पष्टीकरण केलें. तो म्हणाला कीं, मी कादंबरी वाचूं शकलों नाहीं याचें कारण असें कीं, कादंबरी वाचायला घेतली कीं वाचतां वाचतां माझ्या मनांत सूर नाचूं लागत. पुस्तक बंद करून मला पिआनोपुढें बसावें लागे. अशा परिस्थितींत कादंबरी कशी वाचून होणार ? या कादंबरीवर एक सुंदर 'लाइट ऑपेरा' करतां येईल असें त्यानें लेखिकेला सुचवलें.

ठरल्याप्रमाणें करारपत्रावर सह्या झाल्या. या ऑपेरांतलीं गाणीं ऑस्कर हॅमरस्टाइननें लिहिलीं. संगीतलेखन जेरोम कर्ननें केलें—किंवा त्याच्या शब्दांत म्हणायचें तर "संगीत आपोआप लिहिलें गेलें." दक्षिणेकडच्या जीवनाचा परिचय नसल्यामुळें त्यानें मार्क ट्वेनचें त्याला आवडणारें 'लाइफ ऑन द मिसिसिपी' हें पुस्तक वाचायला घेतलें. "मिसिसिपी रिव्हर निग्रोचा" आर्त उदास ताल त्यानें या पुस्तकांत पकडला. हें गाणें त्यानें पूर्वीं 'ओल्ड मॅन रिव्हर'मध्यें लिहिलें होतें. शो बोटमध्यें हें गाणें अतिशय लोकप्रिय झालें. शो बोट हा ऑपेरा क्लासिकल परंपरेच्या अर्थानें खराखुरा 'कॉमिक ऑपेरा' आहे; इतकेंच नव्हे तर त्याची लेखनशैली सर्वार्थानीं अमेरिकन आहे, असें कांहीं टीकाकारांनीं म्हटलें आहे.

जेरोमनें आपलें कांहीं ऑपेरा वृंदगायिकांचा संच घेतल्याशिवाय करायचें ठरवलें. वृंदगायिका हा प्रकार त्याला जुनाट वाटत होता. कथानकाशीं कांहींहि संबंध नसतांना या वृंदगायिकांना स्टेजवर कशासाठीं मिरवायचें ? शिवाय, त्या धड चांगल्या गातहि नाहींत असें तो म्हणे. एकहि गाणारी मुलगी न घेतां 'द कॅट अँड द फिड्ल' आणि 'म्यूझिक इन् द एअर' हें ऑपेरा जेरोमनें यशस्वी करून दाखविलें.

स्वभावचित्रण आणि विनोद यांची देणगी जेरोमला होती, त्याप्रमाणेंच अस्सल मेलडी लिहिण्याचें त्याचें सामर्थ्यहि अप्रतिम होतें. या गुणांमुळें जेरोमच्या संगीतलेखनाला एकप्रकारचा डौल येतो असें एका लेखकानें म्हटलें आहे. जर्मनीमध्यें शिक्षण घेत असतांना त्यानें संगीताच्या घडणीचा अभ्यास केला होता. त्यामुळें लोकप्रिय संगीताची फॅशन सतत बदलत असतांनाहि आपल्याला हवा असलेला वेगळा मार्ग तो काढूं शकला आणि स्वतःची अशी शैली निर्माण करूं शकला. असें म्हणतात कीं, कर्नला मेझार्टप्रमाणें लिहिण्याची

आवड होती आणि त्याला फ्यूजहि (२०७) लिहितां येत असत. मनोरंजनप्रधान संगीत लिहिणाऱ्या फारच थोड्या संगीतकारांपुढें असा थोर आदर्श असतो. जेरोम हा लोकप्रिय संगीताच्या क्षेत्रांतला व्युत्पन्न संगीतकार होता असें म्हटलें जातें तें यामुळेंच. इंग्लंडमध्यें जेरोमनें पी. जी. वुडहाउसच्या सहकार्यानें संगीत सुखात्मिका लिहिली. गिल्बर्ट आणि सलिव्हन यांनीं निर्माण केलेल्या उत्कृष्ट कलाकृतींच्या दर्जाची आठवण व्हावी अशी ही कलाकृति होती.

संगीत लिहून झालें कीं आपलें काम संपलें असें समजणाऱ्या कलावंतांपैकीं जेरोम नव्हता. तो अतिशय कष्टाळू होता. ऑपेराच्या सर्व तालमींना तो हजर रहात असे आणि बारीकसारीक तपशिलाकडेहि लक्ष पुरवीत असे. तालमींचें हें काम चालू असतांना मधेंच मेलडी सुचली कीं थिएटरमधल्या एखाद्या कामगाराला किंवा एखाद्या इलेक्ट्रिशिअनला तो बोलावून घेई आणि पिॲनोसमोर बसून त्यांना म्हणे, "ऐक, तुझ्यासाठीं मीं कांहींतरी आणलंय."

न्यू यॉर्कच्या बाहेर रहात असतांना त्यानें 'दे डिड नॉट बिलिव मी', 'यू आर हिअर अँड आय् ॲम् हिअर' या अतिशय लोकप्रिय मेलडी त्यानें लिहिल्या. या काळांत आपली राहणी उपनगरामध्यें आपल्या कुटुंबाबरोबर राहून कष्ट करणाऱ्या साध्या माणसासारखी होती, कलावंतांचा किंवा संगीतकारांचा कसलाहि तऱ्हेवाईकपणा आपण आपल्याजवळ येऊं दिला नव्हता असें तो म्हणत असे. तो म्हणे, "मीं चित्रविचित्र पोषाख विकत घेतले नाहींत." अर्थात् 'म्यूझिक इन् द एअरच्या' तालमी घेतांना एकदां तो बव्हेरियन कपडे घालून आला होता.

१९३० च्या दशकांत ध्वनिमुद्रण झपाट्यानें वाढल्यामुळें मनोरंजनप्रधान संगीत लिहिणारे बरेचसे संगीतकार हॉलिवुडकडे खेचले गेले. कर्न त्या वेळीं कॅलिफोर्निया येथें रहात असे. सिनेमासाठीं त्यानें लाइट ऑपेरा आणि संगीत सुखात्मिका लिहिल्या. ज्या प्रसिद्ध चित्रपट तारकांसाठीं त्यानें संगीत लिहिलें त्यांपैकीं लिली पॉन्स, इरिन डन, आणि ग्रेस मूर या प्रमुख होत.

जेरोम कर्नला खेळांची आवड नव्हती, पण त्याला एक दुसरा छंद होता—आणि तो म्हणजे दुर्मिळ पुस्तकें जमवण्याचा. कांहीं वेळां एका दुर्मिळ पुस्तकासाठीं तो पंधरा ते वीस हजार डॉलर्सची किंमत देई. हीं पुस्तकें तो नुसतीं जमवीत नसे, वाचीत असे. १९२९ सालीं आर्थिक परिस्थिति डळमळूं

लागली होती. त्याच्या आदल्याच वर्षी आपल्या दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह त्यानें विक्रीला काढला. ही विक्री बरेच दिवस चालली होती. कित्येक दुकानदार हीं पुस्तकें विकत घेण्यासाठीं आले होते. जेरोम पूर्वी जेव्हां या दुकानदारांकडे पुस्तकें घेण्यासाठीं जात असे तेव्हां ते त्याला हटकून गळाला लागणारें गिऱ्हाईक समजत असत. पिॲनो विकत घेण्यासाठीं तो पूर्वी जेव्हां गेला होता तेव्हां त्या कारखान्याच्या मालकांचे आणि खुद्द त्याच्या वडिलांचे जेरोमच्या व्यवहारकौशल्याविषयीं जें मत होतें तेंच या पुस्तकविक्रेत्यांचेंहि असावें. परंतु गंमत अशी कीं, ही सगळी विक्री संपल्यानंतर जेरोमनें यांतून दहा लक्ष डॉलर्सचा फायदा मिळवला. शिवाय हीं पुस्तकें यापूर्वी बराच काळ त्याच्याच मालकीचीं होतीं. त्यानें तीं वाचलीं होतीं. त्यानें जमवलेल्या पुस्तकांइतकाच दुर्मिळ असा शहाणपणा दाखवला होता हें उघड होतें.

जेरोम डेव्हिड कर्न
जन्म : न्यू यॉर्क शहरांत
२७ जानेवारी १८८५
मृत्यु : न्यू यॉर्क शहरांत
११ नोव्हेंबर १९४५.

✲

# जॉर्ज जर्श्विन

"गडबड–गलबल्यांतहि मला अनेकदां संगीत ऐकूं येतें."

नवे नवे शोध लागत होते, अमेरिकन समाजजीवनाला त्यामुळें गति येत चालली होती, आपल्या दूरच्या मित्रांबरोबर टेलिफोन नांवाचें एक यंत्र वापरून संभाषण करण्याची शक्यता निर्माण होत होती—असा तो काळ होता. याच काळांत रोश ब्रस्कीन नांवाची एक तरुण मुलगी सेंट पिटर्सबर्ग, रशिया येथून न्यू यॉर्कमध्यें राहण्यासाठीं आली. यानंतर जर्श्विन नांवाचा एक ज्यू तरुण याच रशियन शहरांतून न्यू यॉर्कमध्यें राहायला आला. न्यू यॉर्कमध्यें गॅसच्या दिव्यांची जागा लौकरच विजेच्या दिव्यांनीं घेतली जाणार होती. या तरुणाशीं रोझनें लग्न केलें. तेव्हां तिचें वय फक्त सोळा वर्षांचें होतें.

या जोडप्याला चार मुलें झालीं. सगळ्यांत मोठा मुलगा इसाडॉर. तो पुढें इरा या नांवानें ओळखला जाऊ लागला तो दोन वर्षांचा असतांना त्याचा भाऊ जेकब याचा जन्म झाला. हा पुढें जॉर्ज हें नांव लावूं लागला. मोठ्या जर्श्विननें अनेक उद्योग केल्यामुळें एका ठिकाणीं स्थायिक होणें त्यांना शक्यच नव्हतें. हें कुटुंब दहाबारा वेगवेगळ्या ठिकाणीं तरी राहिलें असेल. जॉर्ज कांहीं महिन्यांचा असतांना हें कुटुंब पुन्हां न्यू यॉर्कला आलें. न्यू यॉर्कमधल्या फूटपाथवर हे भाऊ खेळत असत. रोलर–स्केट या खेळांतला जॉर्ज आजूबाजूच्या मुलांत चॅंपियन होता. तो चांगला खेळाडू होता आणि नेहमीं आपला मजेंत असे. शहरांत राहणारा मुलगा असल्यामुळें गर्दीची त्याला संवय होती.

एकट्यानें आपला जीव रमवणें ही गोष्ट त्याला ठाऊक नव्हती. नेहमीं त्याच्या-बरोबर पोरांचा घोळका असे. पब्लिक स्कूलमध्यें जॉर्जचें नांव घालण्यांत आलें. परंतु अभ्यास ही गोष्ट त्याला त्रासदायक वाटूं लागली. कांहीं काळ परीकथा त्याला आवडत असत; पण हा अपवाद सोडल्यास वाचनाकडे त्याचा कल नव्हता. त्याचा मोठा भाऊ इरा याला साहसकथा वाचण्याचें वेड होतें. जॉर्जला संगीतांत मुळींच रस नव्हता. एक विशिष्ट घटना घडल्यामुळें पुढें तो निर्माण झाला. थोडक्यांत सांगायचें म्हणजे जॉर्ज हा उनाडटप्पू होणार असेंच त्याच्या वडिलांना वाटत होतें.

शाळेंत असतांना 'ॲनी लॉरी' आणि 'लॉच लॉमंड' यांसारखीं जुनीं गीतें शाळेंतलीं मुलें गात असत. जॉर्जला 'लॉच लॉमंड' आणि सर ऑर्थर सलिव्हनचें 'द लॉस्ट कॉर्ड' हीं गीतें आवडत असत. पण त्याला संगीताची फारशी माहिती नव्हती. एखादा मुलगा पिॲनो शिकायला लागला, तर तो अगदींच बायकी आहे असें जॉर्जला वाटत असे. अजूनपर्यंत संगीताला त्याच्या मनाचीं दारें उघडील असा एकहि संगीतकार जॉर्जला भेटला नव्हता. अशा तऱ्हेचे दोष पुष्कळ वेळां आपल्यांतच असतात ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. मोठे होईपर्यंत पुष्कळ वेळां आपल्याला या गोष्टींची जाणीव होत नाहीं. जितक्या विविध गोष्टींत रस घ्यावा तितका जीवनांतला आनंद वाढतो याची ज्यांना जाणीव होते त्यांना आयुष्यांत वेगवेगळ्या प्रकारची संधि मिळते. जॉर्ज जर्श्विन हा प्रारंभीं एक उनाडटप्पू मुलगा होता. परंतु पुढें तो शिकला.

त्या काळांत ज्याला संगीताची कांहीहि माहिती नाहीं असा मनुष्यदेखील आपल्या ओळखीच्या दुसऱ्या कोणीतरी पिॲनो घेतला म्हणून आपणहि घेत असे. अगदीं अलीकडेसुद्धां अशीं कांहीं मुलें आढळतातच कीं, जीं त्यांच्या मित्रमंडळींपैकीं कुणीतरी संगीत शिकतें म्हणून आपणहि शिकतात. आपण त्या बाबतींत मागें रहायला नको असें त्यांना वाटतें. माणसाला इतरांसारखें व्हावें, त्यांचें अनुकरण करावें असें वाटतें ही किती विचित्र गोष्ट आहे! स्वतंत्र विचार करून आपला वेगळेपणा जोपासणारीं माणसें फार थोडीं. जर्श्विन कुटुंबांत पिॲनो आणला गेला याचें कारण हेंच होतें कीं, त्यांच्या नातेवाइकांपैकीं कुणीतरी पिॲनो आणला होता. पिॲनो घरीं आणल्यानंतर इरानें तो वाजवायला शिकावें असें ठरलें.

इरानें शिकायला सुरवात केली, पण तो फार काळ पिॲनोजवळ बसूं शकला नाहीं. त्याला आवड होती साहसकथा वाचण्याची. ब्रूम स्ट्रीटवर एका लाँड्रीच्या मागें एक फिरतें वाचनालय होतें. इराला पंचवीस सेंटस् दर आठवड्याला घरून मिळत असत. या साप्ताहिक भत्त्यांतून त्याला या वाचनालयांतून साहसकथा आणणें शक्य होतें. तो या गोष्टी वाचण्यांत अगदीं गढून गेलेला असे. कधीं कधीं तर तो आठवड्याला सस्त्या साहसकथांचीं दहा दहा पुस्तकें वाचीत असे. त्यांपैकीं कांहीं पुस्तकें त्यानें त्या वयांत वाचूं नयेत अशींहि होतीं. असलें एखादें पुस्तक वाचीत असतांना जर आई-वडिलांपैकीं कुणाचीं तरी पावलें बाहेर वाजलीं तर तो तें पुस्तक चटकन् गालिच्याच्या खालीं किंवा भिंतीवरच्या तसबिरीमागें लपवून ठेवीत असे. पिॲनोसमोर बसण्यापेक्षां त्याला हाच उद्योग आवडत असे. कांहीं दिवसांनीं पिॲनो शिकण्यांतून आपली सुटका झाल्याचें इराला आढळून आलें. कारण त्याचा भाऊ जॉर्ज हा पिॲनोसमोर बसूं लागला होता.

जॉर्जला त्या पिॲनोचें आकर्षण वाटूं लागलें. जो जॉर्ज पिॲनो शिकणें ही गोष्ट बायकी समजत होता त्याच जॉर्जनें वयाच्या तेराव्या वर्षी मला पिआनोची शिकवणी ठेवाल किंवा काय असें विचारलें होतें. आतांपर्यंत वायां घालवलेला वेळ त्यानें जणुं भरून काढायचें ठरविलें होतें. तो खूप मेहनत करूं लागला. पिॲनोच्या सुरावटीचें पुस्तकहि खिळखिळें होऊन गेलें. हा सगळा अकस्मात् वाटणारा बदल जॉर्जच्या शाळेंत घडलेल्या एका घटनेमुळें झाला होता.

जॉर्जच्या शाळेंत एक रुमानियन मुलगा होता. त्यानें एकदां शाळेंतल्या करमणुकीच्या कार्यक्रमांत व्हायोलिन वाजवलें. जॉर्ज कार्यक्रम चालू असतांना सभागृहांत गेला नाहीं. तो बाहेरच राहिला. व्हायोलिन वाजवणाऱ्या मुलाचें नांव होतें मॅक्सी रोझेंझ्विग्. तो पुढें मॅक्स रोझेंझ या नांवानें व्हायोलिनवादक म्हणून प्रसिद्धीला आला. मॅक्स जॉर्जपेक्षां एका वर्षानें लहान होता. तो अतिशय सुंदर व्हायोलिन वाजवीत असे. मॅक्सचा कार्यक्रम चालू असतांना जॉर्ज खालीं जिन्याजवळ उभा होता. मॅक्स ड्व्होरॅकची ह्यूमरस्क ही धून वाजवीत होता. खालीं उभ्या असलेल्या जॉर्जच्या कानांवर ते स्वर पडले आणि बदक पाण्याकडे ओढलें जातें तसा तो त्या स्वरांकडे ओढला गेला.

आपला हा अनुभव सांगतांना जॉर्ज म्हणतो, "त्या क्षणीं मला सौंदर्याचा

साक्षात्कार घडला. व्हायोलिन वाजवणाऱ्या या मुलाची ओळख करून घेण्यासाठीं मी शाळेच्या बाहेर दुपारीं तीन वाजल्यापासून साडेचार वाजेपर्यंत त्याची वाट पहात उभा राहिलों. मुसळधार पाऊस होता. मी अगदीं चिंब भिजून गेलों होतों."

अशा तऱ्हेनें जॉर्ज वाट पहात उभा राहिला, पण मॅक्स येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां जॉर्ज शाळेंत गेला. मॅक्स अगोदरच निघून गेल्याचें त्याला कळलें. चिंब भिजलेल्या कपड्यांनीं जॉर्ज तसाच मॅक्सचें घर शोधीत गेला. पण मॅक्स घरीं नव्हता. चिंब भिजलेल्या या मुलाची मॅक्सला भेटण्याची उत्सुकता पाहून मॅक्सच्या आईवडिलांना मोठी गंमत वाटली आणि त्यांनीं लौकरच या दोघांची भेट घडवून आणली. मॅक्स आणि जॉर्ज उत्तम मित्र झाले. ते एकमेकांच्या हातांत हात घालून फिरत, शनिवार-रविवारीं एकमेकांना पत्रें लिहीत. जॉर्ज पुढें म्हणे, "संगीताच्या विश्वाचें दार मॅक्सनें मला उघडून दिलें. शाळेला दांडी मारून आम्ही भटकत असूं तेव्हां आमच्या बोलण्यांत संगीत हाच विषय असे. कुस्ती खेळत असतांनाचा वेळ सोडून आम्ही सारखे संगीतावरच बोलत असूं."

मॅक्सला मात्र जॉर्जला संगीतकलेची देणगी आहे असें वाटत नसे. तो जॉर्जला म्हणे, "जॉर्जी, मी तुला सांगतों, संगीत तुझ्या अंगांत नाहीं. ऐक तूं माझं."

पण आतां जॉर्जला संगीत आवडूं लागलें होतें. आणि एखादी गोष्ट आवडूं लागली कीं तो भान विसरत असे. आपली सगळी शक्ति एकवटून आतां तो संगीताच्या मागें लागला होता. थोडे थोडे दिवस वेगवेगळ्या शिक्षकांकडे तो शिकला. आणि शेवटीं एकदांचा त्याच्या दृष्टीनें योग्य असा शिक्षक त्याला भेटला. मॅक्सनंतर संगीताचा खोल संस्कार जॉर्जच्या मनावर करणारी ही दुसरी व्यक्ति.

एकच शिक्षक सगळ्याच मुलांना सारखाच योग्य ठरेल असें म्हणतां येणार नाहीं. याचें कारण सगळेच विद्यार्थी सारखे नसतात. प्रत्येक विद्यार्थ्यांतले गुण, त्याच्या स्वभावाचें वळण, त्याच्या गरजा या वेगवेगळ्या असल्यामुळें या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारचें शिक्षण हवें असतें इतकेंच नव्हे तर, हें वेगवेगळ्या पद्धतीनें दिलें जाणें आवश्यक असतें. मित्रांच्या बाबतींतसुद्धां

असेंच आहे. टॉमला डिक आणि हॅरी हे दोघेहि मित्र म्हणून आवडतील. पण असें असून डिक आणि हॅरी यांची मैत्री मात्र जमणारहि नाहीं.

जॉर्ज जर्श्विनच्या या नव्या शिक्षकाचें नांव होतें चार्ल्स हॅंबित्झर. जॉर्जच्या दृष्टीनें हा आदर्श शिक्षक होता. हॅंबित्झरलासुद्धां आपल्या या विद्यार्थ्याविषयीं तसेंच वाटत असे. आपला हा शिष्य प्रतिभावान् आहे अशी त्याची भावना होती. जॉर्जविषयीं तो म्हणाला होता, "या जॉर्जला संगीताचं इतकं वेड आहे कीं, शिकवणीची वेळ होईपर्यंतसुद्धां याला दम धरवत नाहीं. शिकतांना या पोराचं घड्याळाकडे अगदीं लक्ष नसतं. अलीकडे हें जाझचं जें नवीन संगीत आलंय तें त्याला शिकून घ्यायचं आहे. पण इतक्यांत मी तें त्याला शिकूं देणार नाहीं. आधीं परंपरेनें चालत आलेल्या अभिजात संगीताची त्याला ओळख करून देऊन मी त्याच्या अभिरुचीचा पाया मजबूत करीन."

जॉर्ज आपल्या या शिक्षकाविषयीं म्हणाला होता, "मला या माणसाचं वेड लागलं आहे. त्याच्यासाठीं मीं गांवांत फिरून दहा विद्यार्थी गोळा करून आणले. क्रॉपिन (२१४), लिझ्ट आणि डेबसी यांच्या संगीताशीं हॅंबित्झरनें माझा पहिला परिचय घडवला. हार्मनी या प्रकाराची जाणीव मला त्यानेंच करून दिली."

हॅंबित्झरनें जॉर्जला हार्मनी स्वतः शिकवली नाहीं. परंतु ज्या संगीताचा परिचय त्यानें जॉर्जला करून दिला त्यांतून जॉर्जला हार्मनीची जाण आली. हॅंबित्झर जॉर्जला पिॲनो शिकवीत होता. तो स्वतः एका ऑर्केस्ट्रांत पिॲनो-वादक म्हणूनच काम करीतच असे. हॅंबित्झरचें पणजोबा रशियाच्या झारच्या दरबारांत व्हायोलिनवादक होते. हॅंबित्झरचा तरुणपणींच मृत्यु झाला. त्याच्या मृत्यूनंतर असा शिक्षक पुन्हां मिळणार नाहीं असेंच जॉर्जला वाटलें. आणि तें खरेंहि होतें. हॅंबित्झरच्या मृत्यूनंतर इतर कांहीं पिॲनोवादकांकडे तो शिकला; रूबिन गोल्डमार्ककडे त्यानें हार्मनीचा अभ्यासहि केला. पण हें सगळें नाममात्र. हॅंबित्झरच्या मृत्यूनंतर जॉर्ज जें कांहीं शिकला तें स्वतःच्याच प्रयत्नानें. आपलें बरेंचसें शिक्षण त्यानें न्यू यॉर्कमध्यें होणारे संगीताचे जलसे ऐकूनच केलें.

लहान असतांना अर्हिंग बर्लीन आणि जेरोम कर्न हे दोघे संगीतकार जॉर्जच्या आदर्शस्थानीं होते. वयाच्या चवदाव्या वर्षीं त्यानें आपलें पहिलें

गीत लिहिलें. 'टँगो' या नृत्याबरोबर गाण्यासाठीं तें गीत लिहिलेलें होतें. या गीताला त्यानें नांव दिलें नव्हतें. त्यानें नांव दिलेलें पहिलें गीत 'सिन्स आय् फाउंड यू' हें होय. या दोन गीतांपैकीं कुठलेंहि प्रकाशित झालें नाहीं.

पंधरा वर्षांचा असतांना जॉर्ज कुठलाहि संगीताचा कार्यक्रम सहसा सोडीत नसे. त्याच्याच शब्दांत सांगायचें तर, "मी केवळ माझ्या कानांनींच नव्हे तर नसानसांनीं, माझ्या मनानें, काळजानें संगीत ऐकलें. हें संगीत ऐकून घरीं गेलों कीं माझ्या स्मरणांत मी तें सगळें पुन्हां उभें करीत असें. मग पिॲनोपुढें बसून त्यांतल्या महत्त्वाच्या सुरावटीचे तुकडे पुन्हां पुन्हां वाजवीत असें."

ग्रामर स्कूलमधलें प्रमाणपत्र मिळाल्यानंतर जर्श्विननें हायस्कूल ऑफ कॉमर्स येथें नांव घातलें. पण त्याचें मन अभ्यासांत नव्हतें. अभ्यास करणें, वाचन करणें या गोष्टी त्याला कधींच आवडल्या नव्हत्या. मोठेपणीं कधीं कधीं तो अभ्यासाला बसत असे, पण तें झटका आल्यासारखें. ज्या संगीतप्रकाराची त्याला कांहींच माहिती नसे त्या प्रकारचें संगीत रचून देण्याची मागणी आली कीं मग मात्र जॉर्ज बसून अभ्यासाला लागे. आणि या नव्या संगीतप्रकाराची माहिती करून घेई.

सोळाव्या वर्षीं जॉर्जनें एक नोकरी पत्करली. शाळेंत कधींहि पडलें नसतें इतकें काम त्याला इथें करावें लागत होतें. पण या कामाबद्दल त्याला आठवड्याला पंधरा डॉलर्स मिळत. आणि त्यामुळें आपण आतां मोठे झालों, आपण कुणीतरी महत्त्वाचे आहोंत असें त्याला वाटूं लागलें. यानंतर त्यानें 'टिन पॅन ॲली' या विभागांतल्या रेमिकच्या संगीत-पुस्तक-प्रकाशनगृहांत नोकरी पत्करली. या प्रकाशनगृहाचे जिने चढतांना संगीताच्या व्यवसायाकडे जायची वाट आतां आपल्याला सांपडली, त्या वाटेनें आपण आतां निघालों आहोंत अशी त्याला जाणीव झाली.

मोठमोठ्या संगीतकारांचीं चरित्रें वाचतांना आपल्याला एक गोष्ट अशी आढळते कीं, त्यांनीं निर्माण केलेल्या कृति त्यांच्या काळांतल्या समाजाला त्या वेगळ्या वाटल्यामुळें आवडल्या नाहींत, त्यांचें सौंदर्य समाजाला कळायला बरींच वर्षें जावीं लागलीं. महान् संगीतकृति त्यांचा जसजसा अधिक परिचय आपल्याला घडतो तसतशा त्या आपल्याला आवडूं लागतात. वारंवार त्या ऐकल्यामुळें त्यांचें सौंदर्य आपल्याला हळूहळू समजूं लागतें. मग हें संगीत

आपण स्वतःशीं गुणगुणूं लागतों, शीळ घालून वाजवूं लागतों—अशा रीतीनें हळूहळू या संगीताच्या आपण प्रेमांत पडतों. या महान् संगीतकृति ऑर्केस्ट्राला किंवा एखाद्या व्यक्तीला सहजासहजीं शिकतां येण्याजोग्या सोप्या नसतात. आणि म्हणून सुरुवातीसुरवातीला त्या फारशा वाजवल्या जात नाहींत. आज रेडिओ आणि ग्रामोफोन यांच्यामुळें हें संगीत पुन्हां पुन्हां ऐकण्याची संधि मिळाली आहे—पूर्वीच्या लोकांचें तसें नव्हतें. म्हणून या जुन्या काळांत पुष्कळदां आपल्याला असें आढळतें कीं, एखाद्या संगीतकाराच्या मृत्यूनंतर त्याचें संगीत लोकप्रिय झालें आणि लोकांना आवडूं लागलें.

ही गोष्ट कळणें फारसें कठीण नाहीं. कारण ज्यांना कलाकृतींचा अनुभव घेत असतांना विचार करण्याची तकलीफ जराहि घ्यायला नको असते अशींच बहुसंख्य माणसें दिसतात. एखाद्या कलावस्तुसंग्रहालयांत जाण्याऐवजीं अशीं हीं माणसें सिनेमाला जाणें पसंत करतात. याचें कारण हेंच. सिनेमा पाहात असतांना स्वतः जराहि विचार न करतां तीं आनंद मिळवूं शकतात. परंतु कलावस्तुसंग्रहालयांतल्या कलाकृतींचें सौंदर्य स्वतः विचार केल्याशिवाय कळणें शक्य नसतें.

लोकप्रिय गाणीं, आणि गंमतीदार असें रॅग्टाइम् संगीत लोकप्रिय करण्यासाठीं प्रचारकांची जरूर पडत होती या वस्तुस्थितीचा विचार करतांना आपल्याला गंमत वाटते. या कामासाठीं संगीताचीं पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशनगृहांत प्रचारक हा एक वर्ग निर्माण झाला. या प्रचारकांचें काम होतें प्रकाशनगृहानें प्रसिद्ध केलेलें संगीत लोकांना सारखें वाजवून दाखवून तें लोकप्रिय करणें. त्या प्रचारकाचें हें काम आज रेडिओ, सिनेसंगीत, जाहिरात-कंपन्या यांच्याकडून केलें जातें. परंतु जर्श्विनच्या लहानपणीं हा प्रचारक हाच संगीतविक्रेता होता. टिन पॅन ॲली या संगीतप्रकाशनगृहाच्या विभागांत प्रत्येक कचेरींत एक प्रचारविभाग असे. प्रचारविभागाच्या या छोट्या छोट्या खोल्यांत एक एक पिआनो आणि प्रचारक बसलेले असत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत हा प्रचारक पिॲनो बडवीत असे. रेमिकच्या प्रकाशनगृहांत जर्श्विननें नोकरी पत्करली होती. नट, गायक, गायिका आपल्याला हवें असलेलें गीत शोधण्यासाठीं या टिन पॅन ॲली विभागाला भेट देत. कुणाला विनोदी गाणें हवें असे, तर कुणाला भावनापूर्ण; कुणाला प्रेमगीत तर कुणाला

नृत्यगीत. संगीतविक्रेत्या प्रचारकाला हीं सगळ्या तऱ्हेचीं गाणीं अवगत असणें आवश्यक असे. पुष्कळशा गायकांना नोटेशन वाचतांहि येत नसे. त्यामुळें या प्रचारकाला त्या गायकाच्या कानांत तें गीत ठसण्यासाठीं पुन्हां पुन्हां वाजवून दाखवावें लागे. अशा रीतीनें तें गाणें बसलें कीं मग हे गायक सार्वजनिक कार्यक्रमांत तें म्हणून दाखवीत.

काय पण शिक्षण ! पुष्कळ वेळां एखादें गीत ज्या पट्टीसाठीं लिहिलेलें असे त्याहून गाणें बसविण्यासाठीं आलेल्या गायकाची पट्टी वेगळी असे. त्यामुळें वेगवेगळ्या पट्टींत एकच गाणें वाजवून दाखवण्याची कसरत या प्रचारकाला करावी लागे. आठ ते दहा तास या प्रचारकाला पिॲनो बडवावा लागे. संध्याकाळीं प्रचारकांची ही फौज न्यू यॉर्कमधल्या मोठमोठ्या हॉटेलांत पाठवली जाई. तिथें नाचणाऱ्या आणि गाणाऱ्या कलावंतांना ते साथ करीत. नृत्य चालू असतांना जॉर्ज इतका वेळ साथ करीत असे कीं, नंतर नंतर जणुं काय त्याच्या शर्टाच्या बाहींतून सूर ओघळूं लागत !

लोकांच्या अभिरुचीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीनें ही चांगली संधि होती. जुनीं प्रकाशनगृहें सहसा नवी चीज स्वीकारीत नसत. वेगळें असें संगीत आपण जर प्रकाशित केलें तर त्याच्यांतून पैसा मिळणार नाहीं अशी त्यांना भीति वाटे. त्यामुळें हीं प्रकाशनगृहें जुन्याच मेलडींचें, हार्मनींचें, भावनांचें दळण दळीत असत. हॉटेलांत येणाऱ्या माणसांना संध्याकाळच्या वेळीं चटकदार, चटपटीत संगीत हवें असतें हें जॉर्जच्या लक्षांत आलें. हळूहळू टिन पॅन ॲलीच्या तुरुंगाला जॉर्ज कंटाळला. या सगळ्या वातावरणांत तो नवी संधि शोधण्याचा प्रयत्न करीत होता. संवेदनाशील, प्रयोगशील माणसासाठीं टिन पॅन ॲलीचें जग नव्हतें. तिथें फक्त जुनवट झालेल्या माणसांनाच स्थान होतें. जॉर्ज गर्श्विनच्या डोळ्यांसमोर मोठें क्षितिज होतें.

जॉर्जनें नवी सुरावट रचून ती आपल्या प्रकाशनगृहाच्या मालकाला वाजवून दाखवली. पण त्याला ती पसंत पडली नाहीं. गर्श्विननें आपल्या या रचना भविष्यकाळासाठीं राखून ठेवल्या. या काळांत गर्श्विनची टीकादृष्टि चांगली विकसित होत होती. यशस्वी होण्यापूर्वीं त्यानें लिहिलेलीं कित्येक गाणीं स्वतःला पसंत न पडल्यामुळें त्यानें फेकून दिलीं होतीं. मनोरंजनप्रधान संगीतांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनेंहि त्याला या टीकादृष्टीचा उपयोग झाला.

चाल बांधणारे आणि त्यासाठीं गीताचे शब्द लिहिणारे हे दोघेहि खूप पैसे मिळवीत. चाल बांधणाऱ्या पुष्कळशा संगीतकारांना धड पिॲनोहि वाजवतां येत नसे आणि गाण्याचे शब्द लिहिणाऱ्या पुष्कळशा लेखकांना व्याकरण कशाशीं खातात हें ठाऊक नसे. जर्श्विनची धडपड मात्र सतत नवनवीन गोष्टी आत्मसात् करण्यासाठीं चाललेली असे. टिन पॅन ॲलीच्या जगांत त्याचें हें वेगळेपण उठून दिसत असे. पिॲनो तर त्याला आतां उत्तम वाजवतां येऊं लागला होता.

एकदां जर्श्विन एका हॉटेलांत लग्नसमारंभाला गेला होता. या प्रसंगीं त्यानें ऑर्केस्ट्रावर वाजवली जाणारी जेरोम कर्नची 'आय ॲम हिअर ॲंड यू आर हिअर' आणि 'दे विल नेव्हर बिलिव्ह मी' हीं दोन गीतें ऐकलीं. या सुरेल रचनांनीं जॉर्जचें मन जिंकून टाकलें. ऑर्केस्ट्राच्या प्रमुखाकडे तो गेला आणि त्यानें त्या दोन गीतांची माहिती विचारून घेतली. त्यानंतर जर्श्विननें कर्नच्या गीतांचा अभ्यास करायचा आणि त्यासारखी रचना करायची असें ठरवलें. यानंतर कांहीं काळ जॉर्ज जर्श्विन कर्नछाप रचना करूं लागला. तो धडपडत होता, वाढत होता.

अर्व्हिंग बर्लीन हा जर्श्विनचा एक आदर्श होता. शेवटीं एकदां जर्श्विनची अर्व्हिंग बर्लीनशीं भेट झाली. त्यानें बर्लीनला आपल्या कांहीं रचना वाजवून दाखवल्या. बर्लीननें त्या ऐकून स्तुतिपर उद्गार काढतांच जॉर्ज हवेंत तरंगूं लागला. एका बोटानें पिॲनो वाजवणारा प्रसिद्ध संगीतनियोजक लुईस म्युइर 'वेटिंग फॉर धी रॉबर्ट इ. ली' आणि 'प्ले दॅट बार्बर शॉप कॉर्ड' या गीतांचा तो लेखक–यानें सुद्धां जॉर्जच्या रचनांचें कौतुक केलें.

गाण्याच्या प्रचारकाचें हें काम करतांना जॉर्ज जर्श्विनच्या आकांक्षांची दिशा बदलली होती. पिॲनोवादक होण्याऐवजीं संगीतलेखक होण्याचें आतां त्याच्या मनानें घेतलें होतें. रेमिकच्या प्रकाशनगृहांत दोन वर्षें काम केल्यानंतर त्यानें तें सोडलें. वयाच्या अठराव्या वर्षी त्याचें 'व्हेन यू वॉंट देम, यू कांट गेट देम, व्हेन यू हॅव गॉट देम, यू डोंट वॉंट देम' हें पहिलें गीत प्रसिद्ध झालें. या गीतासाठीं जर्श्विनला फक्त पांच डॉलर्स मिळाले. त्यानें या गीताचें संगीतलेखन केलें होतें. ज्या माणसानें या गीताचे शब्द लिहिले होते त्याला अधिक पैसे मिळाले.

'मिस् १९१७' या खेळाचें संगीत व्हिक्टर हर्बर्ट आणि जेरोम कर्न यांनीं लिहिलें होतें. या खेळाच्या तालमीसाठीं पिॲनोवादक म्हणून जर्श्विनला काम मिळालें. यानंतर त्यानें चौदाव्या रस्त्यावरच्या व्हॉडव्हिल खेळ करणाऱ्या थिएटरांत पिॲनोवादकाच्या जागेसाठीं अर्ज केला.

इथें त्याला अतिशय चमत्कारिक अनुभव आला. प्रयोग चालू असलेल्या खेळासाठीं जें खास संगीत लिहिलें होतें त्याची परिभाषा जॉर्जला अपरिचित असल्यामुळें वाचतां येईना. सुरवातीला वाजवणें ठीक सुरू झालें. मग एका अंकाच्या सुरवातीचा वृंद वाजवतांना जर्श्विन गोंधळला. वृंदगायिका गात होत्या एक आणि जर्श्विन साथ करीत होता भलतीच. नोटेशन वाचतांना दुवा सोडून आपण भलतीकडे गेलों असें क्षणभर जर्श्विनला वाटलें. आपले स्नेही, नातेवाईक याच वेळीं श्रोतृवर्गांत बसले तर नसतील ना, असा विचार मनांत येऊन जर्श्विन अधिकच शरमला, गोंधळून गेला. त्याच वेळीं स्टेजवर काम करणाऱ्या विनोदी नटाला काय लहर आली कुणास ठाऊक! जर्श्विनची टर उडवून खसखस पिकवण्याचें त्यानें ठरवलें. पिॲनोसमोर वांकून तो मोठ्यानें ओरडला, "तूं पिॲनोवादक आहेस हें तुला कोणीं सांगितलं? तूं ढोल वाजव ढोल!"

कांहीं काळ जर्श्विन व्हॉडव्हिलचे खेळ करणाऱ्या एका कंपनीबरोबर पिॲनो-वादक म्हणून गेला, तो परत आला तेव्हां त्याच्यासमोर एक नवी संधि आली होती. हार्म्स म्यूझिक पब्लिशिंग हाउस या प्रकाशनसंस्थेचा प्रमुख ड्रेफस (जेरोम कर्नला त्यानेंच 'शोधून' काढलें होतें) जॉर्जला म्हणाला, "तुझ्यामध्यें कांहींतरी असाधारण आहे असं मला वाटतं. तें आज ना उद्यां बाहेर येणारच. कदाचित् कांहीं महिन्यांनीं, किंवा एका वर्षानें किंवा पांच वर्षांनीं त्याचा प्रकाश पडणारच. तुझ्या सामर्थ्याबद्दल माझी खात्री असल्यामुळें मीं काय ठरवलं आहे तें सांगतों. मी जुगार खेळणार आहें तुझ्यावर. म्हणजे असं कीं, मी तुला दर आठवड्याला पस्तीस डॉलर्स पगार देणार. याबद्दल ठरीव असं कांहींच काम तुला नाहीं. तूं फक्त सकाळीं एकदां मला भेटून जायचं. बाकीचं आपोआप होईल."

विशीसुद्धां न उलटलेल्या जर्श्विनला ही विलक्षण संधि होती. त्याच्या डोक्यांत नव्या नव्या कल्पना होत्या, त्या प्रत्यक्षांत आणण्यासाठीं कष्ट करण्या-चीहि त्याची तयारी होती; पण चाकोरीच्या रगाड्यांत त्याला वेळ मिळत

नव्हता. ड्रेफसनें दिलेल्या या संधीमुळें आतां हवा असलेला वेळ आणि निश्चितपणा त्याला मिळणार होता. आणि लौकरच अशी एक घटना घडली कीं, ज्यामुळें एका रात्रींत जॉर्ज कीर्तिमान आणि संपत्तिमान झाला. आतां अनेक खेळांवर "संगीत : जॉर्ज जर्श्विन" अशा पाट्या झळकूं लागल्या होत्या. 'ला ला ल्युसिली' चे प्रयोग बोस्टन आणि न्यू यॉर्क येथें झाले. या प्रयोगांना श्रोत्यांकडून चांगली दाद मिळाली. पण जॉर्जला जी अचानक कीर्ति मिळाली ती यामुळें नव्हे.

जर्श्विननें 'स्वानी' हें गीत लिहिलें आणि तें सार्वजनिक कार्यक्रमांतून गायिलेंहि गेलें. परंतु हें गीत कांहीं लोकप्रिय झालें नाहीं. अल जॉन्सन हा विनोदी नट आणि गायक निग्रोसारखें तोंड काळें रंगवून स्टेजवर येत असे. जॉन्सन हा मूळ रशियांतला. अमेरिकेंत तो प्रथम स्टेजवर आला तो गौरवर्णीय नट म्हणूनच. पण एकदां त्यानें निग्रो संगीत गातांना तोंड काळें रंगविलें. लोक त्याच्यावर बेहद्द खूष झाले. तेव्हांपासून अल जॉन्सन तोंड काळें रंगवूनच स्टेजवर येऊं लागला. या अल जॉन्सननें जर्श्विनचें 'स्वानी' हें गीत ऐकलें, त्याला तें आवडलें. आपल्या सिंदबाद या खेळांत त्यानें तें गाऊन दाखवलें. त्यानें तें गाणें म्हणतांच विलक्षण लोकप्रिय झालें—एखाद्या वणव्यासारखी या गाण्याची लोकप्रियता झपाट्यानें पसरूं लागली. लंडनमध्येंसुद्धां हें गाणें अतोनात लोकप्रिय झालें. जर्श्विनच्या यशाला सुरवात झाली.

पिॲनोसाठीं नव्या नव्या रचना करण्याची इच्छा जॉर्जच्या मनांत तीव्रतेनें वसत होती. संगीतांत अनेक प्रकार असतात. या प्रकारांपैकीं कित्येकांची जॉर्जला अजीबात माहिती नसे. परंतु माहीत नसलेल्या या प्रकारांत कांहींतरी वैशिष्ट्य असण्याची शक्यता आहे हें हेरण्याची कल्पनाशक्ति त्याच्यांत होती. आणि हे नवे प्रकार शिकण्यासाठीं लागणारी इच्छा आणि तडफ या दोन्ही गोष्टी त्याच्याकडे होत्या. मोठ्या प्रमाणांत पहिलें यश मिळल्यानंतरसुद्धां वेगवेगळ्या लोकांकडे नव्या नव्या गोष्टी शिकण्याची त्याची धडपड कमी झाली नाहीं. कुठलीहि नवी संधि आली कीं ती पकडण्याच्या तयारींत तो असे. आणि म्हणूनच पिॲनोसाठीं संगीत लिहिण्याचें निमंत्रण आलें कीं तो स्वीकारीत असे.

एकामागून एक नवीं नवीं गीतें तो लिहीत होता. संगीत कार्यक्रमांच्या

जगतांत "संगीतदिग्दर्शक जर्श्विन" हे शब्द परिचित झाले होते. मेलडी, भावपूर्ण गीतें, जोष असलेलीं जाझ नृत्यगीतें असे नाना प्रकार तो लिहीत असे. त्यांतलीं कांहीं गीतें तर त्यानें लिहिल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं प्रसिद्ध झालीं. 'आय् शॅल बिल्ड अ स्टेअर बे टु पॅरडाइज' हें त्याचें जाझ नृत्यगीत खूप लोकप्रिय झालें. या गीताचें त्याला तीन हजार डॉलर्स मिळाले. यापूर्वींच्या त्यानें लिहिलेल्या एका गाण्याला पांच डॉलर्स मोबदला मिळाला होता याचा उल्लेख मागें आला आहेच. म्हणजे पूर्वींच्या मानानें जर्श्विन कितीतरी पुढें चालला होता. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीला रॅग्टाइम् संगीताचें संक्रमण जाझ संगीतांत होत होतें. जर्श्विनचीं गाणीं अमेरिकेंत आणि लंडनमध्यें सतत ऐकलीं जात असल्यामुळें टिन पॅन ॲलीच्या जगापासूनहि हा कांहींतरी वेगळा आहे असेंच मत त्याच्याविषयीं होत होतें.

सर्वसामान्य माणसाला निरोगी असें कुतूहल, नव्याचा शोध घेण्यासाठीं धडपडणारें मन नसतें. त्यामुळें साधारणाच्या, सामान्याच्या पलीकडची असलेली गोष्ट त्यांना समजत नाहीं. परंतु ज्याचा दृष्टिकोन विशाल आहे, ज्याला कलेची उपजत देणगी आहे आणि ज्यानें ती कष्ट करून वाढवण्याचा प्रयत्न केला आहे असा मनुष्य सतत नावीन्याच्या शोधांत असतो. अशीं हीं माणसें सर्वसामान्यांना वाट दाखवतात. सर्वसामान्यांचें लक्ष केवळ कलाकृतींकडे आणि सांस्कृतिक फायद्यांकडेच नव्हे, तर जें नवीन आहे—मुद्दाम अनुभवण्याजोगें नवीन आहे—त्याच्याकडे वेधून घेतात.

जॉर्ज जर्श्विन पंचवीस वर्षांचा होता तेव्हांची गोष्ट. इव्हा गॉथिअर या अतिशय सुंदर गाणाऱ्या गायिकेनें न्यू यॉर्क येथील एओलियन हॉलमध्यें एक आगळाच संगीत जलसा जाहीर केला. आगळा अशासाठीं कीं, क्लासिकल संगीताच्याबरोबरच ती टिन पॅन ॲली येथून तयार होणारीं गाणीं आणि युरोपिअन नवसंगीतकारांच्या रचना गाऊन दाखवणार होती. रूपकाच्या भाषेंत सांगायचें तर बॉल डान्सच्या कार्यक्रमांत सिंड्रेलाला नृत्य करायला बोलवावें तसा हा प्रकार होता ! त्यामुळें प्रश्न असा निर्माण होत होता कीं, क्लासिकल संगीताबरोबरीनें नवसंगीताची ही सिंड्रेला वागेल कशी ? तिला लोकांकडून कशी वागणूक मिळेल ? या कार्यक्रमांत इव्हा गॉथिअरनें अर्व्हिंग बर्लीनचें एक, जेरोम कर्नचें एक आणि जॉर्ज जर्श्विनचीं तीन गाणीं म्हटलीं. या आगळ्या

कार्यक्रमाच्या जाहिरातीमुळें श्रोतृवर्गहि नेहमींपेक्षां वेगळाच होता. मध्यमवर्गीतले रसिक फारसे आले नव्हते. संगीताच्या उच्च वर्गीतले आणि संगीताच्या पिटांतले अशा दोन टोकांचे श्रोते एकत्र आले होते.

पण 'सिंड्रेला' या कार्यक्रमांत फार चांगली वागली. तिच्या सगळ्या वागण्यांतून प्रामाणिकपणा व्यक्त होत होता. जें आपल्यांत नाहीं तें दाखवण्याचा ती प्रयत्न करीत नव्हती. आपलें सगळें हृदय तिनें आपल्या कार्यक्रमांत ओतलें होतें. त्यामुळें सिंड्रेलावर राजपुत्र खूष झाला—या नव्या संगीताच्या कार्यक्रमाला पुन्हां आमंत्रण मिळालें. श्रोते जाझ संगीताच्या लयीवर खूष झाले. कांहीं वेळ मजेंत जावा असाच त्या गाण्यांचा घाट आहे हें त्यांना ठाऊक होतें. हा कार्यक्रम पुन्हां पुन्हां होऊं लागला. टिन पॅन ॲलीमधला आमचा जुना बिचारा प्रचारक जर्श्विन याला जाझ गीतें गातांना गॉथिअरला साथ करण्याचें निमंत्रण आलें. कारण जाझ संगीत जर्श्विनइतकें रंगून जाऊन कोण वाजवणार होतें? ज्या प्रेक्षागृहांतून आजपर्यंत क्लासिकल संगीताचे सूर उमटले होते त्या प्रेक्षागृहांत 'इनोसंट इन जेन्यू, बेबी' आणि 'डू इट अगेन' हीं गाणीं म्हटलीं गेलीं. उचभ्रू अभिरुचीच्या कांहीं लोकांना तीं आवडलीं, तर त्यांच्यापैकीं कांहींना तीं संतापजनक वाटलीं. परंतु संगीताच्या पिटांतला वर्ग मात्र या गाण्यांवर एकजात खूष झाला.

यानंतर तीन महिन्यांनीं जाझ संगीताचा बादशहा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पॉल व्हाइटमननें जाझचा एक जलसा करायचें ठरवलें. वर उल्लेखिलेल्या एओलियन हॉलमध्येंच मोठमोठ्या संगीतकारांना आणि टीकाकारांना बोलावून आपल्या जाझ बँडचा कार्यक्रम त्यांच्यासमोर सादर करावा अशी त्याची इच्छा होती. व्हाइटमनची जाझ संगीतावर श्रद्धा होती आणि म्हणूनच त्याला संगीताच्या क्षेत्रांतल्या या बड्यांचें मत अजमावून घ्यायचें होतें. या जलशासाठीं जाझ संगीताचा रचलेला खास कार्यक्रमसुद्धां त्याला सादर करायचा होता. असा कार्यक्रम कोणाकडून रचून घेणार? व्हाइटमननें जॉर्ज जर्श्विनला विचारलें.

जॉर्ज जर्श्विननें हें आमंत्रण नाकारलें. तो फार कामांत होता. इव्हा गॉथिअरचा कार्यक्रम यशस्वी झाल्यापासून वेगवेगळ्या खेळांसाठीं संगीतलेखनाचें काम जॉर्जनें घेतलें होतें. या उद्योगांत व्हाइमटननें जाझची नवी रचना

करण्यासाटीं केलेली विनंति तो विसरूनहि गेला. जानेवारी महिन्याच्या सुरवातीची गोष्ट. त्यानें सहज वर्तमानपत्र उघडलें. त्यांत जॉर्ज एक नवी सिंफनी लिहीत असल्याची बातमी होती! जॉर्ज तसें कांहीं लिहीत नसल्यामुळें त्याला या बातमीचें आश्चर्य वाटलें. इतक्यांत त्याला व्हाइटमनच्या निमंत्रणाची आठवण होऊन तें नाकारूं नये असें त्याला त्या क्षणीं वाटलें. कदाचित् ही चांगली संधि ठरण्याचीहि शक्यता आहे. या कार्यक्रमासाटीं जाझची एखादी रचना करणें त्याला सहज शक्य होतें.

तो जसजसा विचार करूं लागला तसतशा त्याच्या डोक्यांत कल्पना आकार घेऊं लागल्या. जाझ संगीताविषयीं लोकांत खूप चर्चा चालत असे. नृत्याच्या एका ठराविक तालांतच जाझ संगीत बसूं शकेल अशी लोकांची समजूत होती. ही समजूत खरी नव्हे हें सिद्ध करणारें संगीत आपल्याला लिहितां आलें तर पाहूं या असा विचार जॉर्जच्या मनांत आला. म्हणूनच तो पुढें एकदां म्हणाला कीं, "ऱ्हॅप्सडी" लिहिण्याची आखीव योजना माझ्यासमोर नव्हती. त्यामागें माझा एक हेतु होता."

जर्श्विननें एका खेळासाटीं संगीत लिहिलें होतें. या खेळाच्या बोस्टनमध्यें होणाऱ्या पहिल्या प्रयोगाचें निमंत्रण त्याला आलें होतें. आगगाडींत बसून तो बोस्टनला जायला निघाला. गाडींत त्याच्या डोक्यांत एका महिन्यानंतर होणाऱ्या एका जलशाचे विचार होते. या जलशासाटीं संगीत लिहिण्याचें काम त्यानें स्वीकारलें होतें. पण एक सूरहि त्यानें अजून लिहिला नव्हता. आगगाडीच्या तालाबरोबर तो या गोष्टीचा विचार करीत होता. या संदर्भात तो पुढें म्हणाला होता :

"कसल्याहि आवाजाच्या हृदयांतलं संगीत मला नेहमीं ऐकूं येतं. आगगाडींतून जातांना मला ती ऱ्हॅप्सडी मनांतल्या मनांत पहिल्यापासून शेवटपर्यंत ऐकूं आली...मला ऐकूं आलेली ही ऱ्हॅप्सडी म्हणजे जणुं कांहीं अमेरिकन संगीताचा एक प्रचंड कॅलिडोस्कोप होता. अमेरिकन संगीताची ती मूस होती. त्यांत अजोड असा आमचा राष्ट्रीय जोम, आमचे 'ब्ल्यूज', आमच्या शहरांतली पागल धुंदी यांचं मला दर्शन झालं. मी बोस्टनला पोंचेपर्यंत, तपशील जरी नसला, तरी या ऱ्हॅप्सडीची रूपरेषा माझ्या मनांत तयार झाली होती."

जर्श्विन जसजसा अधिक विचार करूं लागला तसतशी त्याला ती कल्पना अधिकाधिक आवडूं लागली. त्यानें कांहीं नृत्याच्या तालांचा उपयोग केला. परंतु तो ऱ्हॅप्सडी लिहीत असल्यामुळें मिन्युएट, वॉल्स किंवा रोंडो यांच्याप्रमाणें ती ठराविक तालांत बांधण्याची जरुरी नव्हती. आपल्याला आपला मुद्दा सिद्ध करतां येईल असें त्याला आतां वाटूं लागलें होतें.

वेळ कमी होता. त्याला सगळ्या संगीताचें हस्तलिखित इतक्या वेळांत लिहून काढणें शक्य नव्हतें. जर्श्विननें दोन पिॲनोंसाठीं 'ऱ्हॅप्सडी इन् ब्ल्यू' लिहून काढली. फर्ड ग्रॉफनें त्यासाठीं ऑर्केस्ट्राची जुळणी केली. पिॲनोच्या भागांचें नोटेशन मात्र लिहून काढायला वेळ नव्हता. जॉर्जनें व्हाइटमनसाठीं एकूण पिॲनोच्या स्वररचनेच्या किती ओळी आहेत हें दाखवून दिलें आणि स्वतः जलशाच्या वेळींच वाजवण्याचें ठरवलें. यावरून जर्श्विनची एकाग्रतेची शक्ति फार मोठी असली पाहिजे हें सिद्ध होतें. टिन पॅन ॲली विभागांतल्या आवाजांच्या गोंधळांत त्यानें काम केल्यामुळें कदाचित् त्याची ही एकाग्रतेची शक्ति वाढायला मदत झाली असेल. पिॲनोपुढें बसला कीं त्याला कांहींहि अडत नसे ही गोष्टहि यावरून दिसते.

एखादा जलसा सादर करायचा असला म्हणजे किती खर्च येतो याची पुष्कळशा लोकांना कल्पना नसते. पिॲनो शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वाटतें कीं, स्टेजवर जाऊन पिॲनो वाजवला म्हणजे लोकांनीं दिलेले तिकिटांचे सर्व पैसे आपल्याला मिळणार. पण वस्तुस्थिति मात्र याहून फारच वेगळी असते. जलसा करणाऱ्या कलावंताला कार्यक्रम तर करावा लागतोच, पण हॉलचें भाडें, तिकिटें छापण्याचें बिल, जाहिरातींचा खर्च या सगळ्यांची व्यवस्था पाहावी लागते. हीं सगळीं बिलें वाढत जातात. व्हाइटमननें हा जो जलसा केला त्यासाठीं त्याला सात हजार डॉलर्स खर्च आला. कार्यक्रमाच्या वेळीं हॉल सगळा भरला होता. पण त्यांत बरेचसे निमंत्रित होते. या कार्यक्रमांत व्हाइटमननें मार खाल्ला असेल असें वाटेल. परंतु तसें झालें नाहीं. हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला.

हा कार्यक्रम प्रत्यक्ष हॉलमध्यें होण्यापूर्वीं कार्यक्रमाच्या तालमीच्या वेळीं संगीताच्या तीन टीकाकारांना व्हाइटमननें मुद्दाम पाचारण केलें होतें. क्लासिकल संगीताच्या माहेरघरीं जाझ संगीत सादर करण्याचा आपला हा बेत

व्हाइटमननें त्या टीकाकारांना समजावून सांगितला होता. या कार्यक्रमासाठीं जाझची एक नवी रचना करणारा म्हणून व्हाइटमननें जर्श्विनची त्या टीकाकारांशीं ओळख करून दिली. स्टेजकडे जातांना त्या तिघांपैकीं दोघे पुटपुटले, "जर्श्विन? कोण हा जर्श्विन?" त्यांच्यापैकीं तिसऱ्याला जर्श्विनची थोडीशी माहिती होती. अलीकडे ब्रॉडवेला जर्श्विनचीं कांहीं गाणीं अतिशय लोकप्रिय झाल्याचें त्यानें त्यांना सांगितलें. खरें म्हणजे तीन महिन्यांपूर्वींच इव्हा गॉथिअरचा कार्यक्रम अतिशय यशस्वी झाला होता. त्या वेळीं जर्श्विन साथीला होता. त्याचीं गाणींहि तिनें म्हटलीं होतीं. पण त्या टीकाकारांना यांतलें कांहींच आठवलें नाहीं. इतकी कच्ची स्मरणशक्ति पाहिली कीं टिन पॅन ॲलीला प्रचारकांची कां जरूर पडे हें ध्यानांत येतें. लोक फार लवकर विसरतात हेंच खरें.

तालमीच्या वेळीं जर्श्विनची ऱ्हॅप्सडी त्या टीकाकारांनीं ऐकली. दोघांना ती अतिशय आवडली. तिसऱ्याला ती आवडली नाहीं. परंतु तिच्यांत एक प्रकारचा जोम असल्याचें त्यानें कबूल केलें.

प्रत्यक्ष कार्यक्रमाची वेळ आली. त्याच्याकरतां व्हाइटमननें इतकी धडपड केली होती. तेव्हां भीतीनें त्याची छाती धडधडूं लागली. जाझ बँडचें नेतृत्व करायचें होतें. म्हणून ही भीति नव्हती. आपला संगीताचा हा प्रयोग लोकांना कितपत आवडेल याविषयींची ही शंका होती. श्रोतृवर्गाची त्याला भीति वाटत होती. असल्या हॉलमध्यें पूर्वीं कधीं त्यानें वाजवलेलें नव्हतें. येणाऱ्या लोकांकडे तो पहात होता. खरें म्हणजे त्या दिवशीं हिमवादळ झालें असूनहि लोकांची गर्दी होती. पण तरीसुद्धां त्यांची भीति कमी झाली नाहीं. जाझ संगीत ऐकायला साहित्याच्या आणि संगीताच्या क्षेत्रांतले बडे बडे लोक आले होते. त्यांच्यासमोर सादर करण्याजोगा हा कार्यक्रम होईल ना? श्रोत्यांच्या गर्दींत व्हिक्टर हर्बर्टहि होता. या कार्यक्रमाची आठवण सांगतांना व्हाइटमन म्हणाला होता, "वाजवतां वाजवतां मध्येंच माझ्या डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहूं लागले. त्या तशा अवस्थेंत मीं अकरा पानें वाजवलीं. इतकं सगळं नोटेशन मी कसं वाजवूं शकलों हें मलाहि सांगतां येणार नाहीं. नंतर मीं जॉर्जला विचारलें तेव्हां आपल्यालाहि नक्की तोच अनुभव आल्याचें त्यानें मला सांगितलें. जॉर्जहि वाजवतांना रडत होता."

या ऱ्हॅप्सडीच्या सुरुवातीला 'ग्लिसँडो' हा क्लॅरिओनेटवरचा तुकडा जसा झरकन् वाजवला जातो तशीच ऱ्हॅप्सडीला चटकन् लोकप्रियता मिळाली. (२२८) जर्श्विनला जर कीर्ति हवी असली तर आतां ती त्याला मिळाली होती. एक संगीत सुखात्मिका लिहिण्यासाठीं त्याला इंग्लंडहून आमंत्रण आलें. लंडनच्या श्रोत्यांसाठीं आपला सद्भाव व्यक्त करण्याकरतां त्यानें त्यांचा आवडता कलाकार सर आर्थर सलिव्हन याच्या शैलींत ही सुखात्मिका लिहिली. या संगीताला एक प्रसन्न लय होती.

यानंतरच्या दोन वर्षांत जर्श्विननें चार सुखात्मिकांसाठीं संगीत लिहिलें. डॉक्टर वॉल्टर डॅमरॉशनें कार्नेजी हॉलमध्यें होणाऱ्या सिंफनी ऑर्केस्ट्रासाठीं संगीत लिहिण्याचें जॉर्जला निमंत्रण दिलें. टिन पॅन ॲलीचें जग आणि क्लासिकल संगीताचें जग या दोन्ही जगांतल्या प्रेक्षागृहांत जर्श्विनला प्रवेश होता. पुष्कळ वेळां बायका घरीं पार्ट्या देत तेव्हां समारंभ कंटाळवाणा होऊं नये म्हणून जर्श्विनला पिॲनो वाजवायला बोलावत. अशा ठिकाणीं तूं वाजवायला जात जाऊं नकोस असें त्याची आई त्याला सांगत असे. यावर तो म्हणे, "मी कांहींतरी वाजवीत असलों तरच मला बरें वाटतें." तो वाजवायला बसला कीं आपल्या उत्सुक श्रोत्यांइतकाच आपलें वाजवणें रंगून ऐकत असे.

फिलहार्मनी सिंफनी ऑर्केस्ट्रासाठीं एक जाझ कंचर्टो लिहिण्याचें आणि वाजवण्याचें काम त्यानें स्वीकारलें होतें. पण कंचर्टो म्हणजे काय याचीच त्याला कल्पना नव्हती. हा कंचर्टो वाजवण्याची आणखी सात जलशांचीं आमंत्रणें त्यानें घेऊन ठेवलीं होतीं. आणि तरीहि कंचर्टो हा काय प्रकार असतो याचा त्याला पत्ता नव्हता. मग त्यानें संगीताच्या प्रकारांची माहिती देणारें एक पुस्तक विकत घेतलें. तें पुस्तक पिॲनोशेजारीं ठेवून तो लिहायला बसला.

कांहीं बाबतींत जर्श्विनचें पकिनी या संगीतकाराशीं साम्य असल्याचें आपल्याला दिसतें. आजूबाजूला कितीहि गर्दी, गडबड असली तरी हे दोघे आपल्याला सुचलेल्या संगीताचें लेखन करूं शकत असत. हळूहळू जर्श्विनला लेखनासाठीं आपल्याला एकांत हवा याची जाणीव होऊं लागली. निवांतपणें बसून लेखन करण्यासाठीं त्यानें एक खोली भाड्यानें घेतली. परंतु इथेंहि त्याची मित्रमंडळी जमूं लागली. तेव्हां पुन्हां तो पूर्वीसारखाच काम करूं लागला.

एका बाबतींत जर्श्विनचें साम्य रिम्स्की-कॉरसेकॉफ याच्याशीं दिसतें.

कॉरसेकॉफला काउंटर पॉइंट आणि फ्यूज (२३०) या प्रकारांची अजीबात माहिती नव्हती. ते विद्यार्थ्यांना शिकवण्याचा प्रश्न आला तेव्हां त्यानें त्यांचा अभ्यास करायला सुरवात केली. ज्या विद्यार्थ्यांना शिकवायचें त्यांच्या थोडें पुढें असावें यासाठीं त्याला अभ्यास करावा लागे. आपल्या विद्यार्थ्यांनींच आपल्याला शिकवलें असें तो यामुळें गंमतीनें म्हणत असे. कॉरसेकॉफनें एखाद्या विषयाचा पुरेसा अभ्यास नसतांना त्यावर लेख लिहिल्याचें कबूल केलें आहे. नेव्हीमध्यें इन्स्पेक्टर ऑफ बँड्स म्हणून त्याची नेमणूक होईपर्यंत त्यानें फुंकरीनें वाजवायच्या वाद्यांचा अभ्यास केलेला नव्हता. यानंतर त्यानें हीं वाद्यें कशीं वाजवावीं यावर एक पुस्तकहि लिहिलें.

जर्श्विनचें कुतूहल आणि नवीं क्षेत्रें धुंडाळण्याची त्याची धडपड यांचीं एकत्र पावलें पडत होतीं. जर्श्विननें कॉन्सर्टो लिहिला. त्याचा ऑर्केस्ट्रा दुसऱ्या कोणींतरी लिहावा ही गोष्ट त्याला रुचेना. आणि म्हणून त्यानें ऑर्केस्ट्रा-लेखनाचा अभ्यास सुरू केला. या काळांत तो रूबेन गोल्डमार्ककडे शिकत होता. कॉन्सर्टो लिहून झाल्यानंतर त्यांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें तो एकदां ऐकणें भाग होतें. यासाठीं जर्श्विननें साठ वादकांचा एक वृंद पैसे देऊन आणला. आपल्या एका मित्राला या ऑर्केस्ट्राचें निर्देशन करण्याची विनंति केली. स्वतः तो पिॲनोवर बसला. जर्श्विननें तो सगळा कॉन्सर्टो ऐकला आणि त्यांत आवश्यक ते बदल केले.

कार्नेजी हॉलमधल्या या कार्यक्रमांत सिंफनी ऑर्केस्ट्राबरोबर जर्श्विननें पहिल्याप्रथम पिॲनो वाजवला. या ऑर्केस्ट्रांत एकहि रडका सॅक्सोफोन नव्हता. यानंतर तीन वर्षांनीं जर्श्विन पॅरीसमध्यें गेला असतांना त्याच्या सन्मानार्थ त्यानें लिहिलेली ही ऱ्हॅप्सडी आणि कॉन्सर्टो त्याला ऐकवण्यांत आला. युरोपमध्यें तो ज्या ज्या हॉटेलांत गेला तिथें तिथें त्यानें लिहिलेलें संगीत त्याला ऐकवण्यांत आलें. 'ॲन अमेरिकन इन् पॅरिस' या रचनेची कल्पना जर्श्विनला तो पॅरिसमध्यें असतांना सुचली. ही रचना न्यू यॉर्कमध्यें सादर केली गेली तेव्हां जर्श्विन तीस वर्षांचा होता. यांत जीं वाद्यें वापरलीं होतीं त्यांत जर्श्विननें टॅक्सीच्या हॉर्नचाहि अंतर्भाव केला होता !

यानंतर जर्श्विन हॉलिवुडकडे आणि ऑपेरालेखनाकडे वळणार होता. संगीताचे सर्व प्रकार हाताळण्याचा प्रयत्न करणारा जर्श्विन हा एकमेव जाझ-

लेखक होय. 'पॉर्जी अँड बेस' या ऑपेराचें संगीतलेखन करतांना तो अतिशय खुषींत होता. त्याला त्याचा हा ऑपेरा फार आवडत असे. डोळे मिटून तो पुन्हां पुन्हां तें संगीत वाजवायचा आणि आपणच आपली रचना ऐकतांना धुंद होऊन जायचा. हा ऑपेरा सादर झाला तेव्हां जर्श्विन सदतीस वर्षांचा होता. ल्युविसॉहन स्टेडियमवर जर्श्विननें केवळ आपल्याच रचनांचा एक स्वतंत्र कार्यक्रम केला. या कार्यक्रमाला सतरा हजार लोक आले होते. चार हजारांहून लोकांना तिकिटें न मिळाल्यानें परत जावें लागलें होतें. "बीथोवन आणि वॅगनरनंतर केवळ स्वतःच्या रचनांचा कार्यक्रम इतक्या यशस्वी रीतीनें सादर करणारा जॉर्ज जर्श्विन हाच होय." असें या कार्यक्रमानंतर दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत छापून आलें होतें.

पिॲनो वाजवणें हें बायकी आहे असें लहानपणीं मानणारा, व्हायोलिनचा कार्यक्रम शाळेंत चालू असतांना हॉलच्या बाहेर राहणारा जॉर्ज जर्श्विन संगीताच्या क्षेत्रांतील यशाच्या पायऱ्या एकामागून एक चढून जात होता. हा ऑपेरा लिहून तो अगदीं वरच्या पायरीला जाऊन पोंचला होता. ही वरची पायरी अखेरचीहि पायरी ठरली. कारण 'पॉर्जी अँड बेस' हा ऑपेरा लिहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तो हॉलिवुड येथें आजारी पडला आणि कांहीं आठवड्यांनीं त्याचा मृत्यु झाला.

आजूबाजूला मित्रमंडळी असली कीं जर्श्विन खुषींत असे. तो सगळ्यांची करमणूक करी अशी आठवण त्याचे स्नेही सांगतात. जर्श्विननें आपल्या मित्रमंडळींना वाजवून दाखवलेल्या कित्येक रचना प्रसिद्धहि केल्या नव्हत्या. त्या त्याच्या खाजगी चिजा असत. खास लोकांची करमणूक करण्यासाटीं तो त्या वाजवीत असे. हायफिज या व्हायोलिनवादकाच्या घरीं पार्टीच्या वेळीं जर्श्विननें 'मिशा, पाशा, येशा, साशा' हें गीत वाजवलें होतें. संगीत पुरेसें नव्हतें म्हणून कीं काय जर्श्विननें चित्रकलेचाहि अभ्यास करायला घेतला. तो चित्रांच्या प्रदर्शनाला जात असे आणि स्वतः त्यानें खूप पैसे मिळवल्यामुळें तो चांगली चांगली चित्रें विकतहि घेत असे. न्यू यॉर्कमध्यें त्यानें स्वतःच्या चित्रांचें एक प्रदर्शनहि भरवलें. जर्श्विनला खेळांची आवड होती. गोल्फ, टेनिस, कुस्ती हे खेळ त्याला आवडत असत. पुढें खूप पैसे मिळाले तेव्हां त्यानें आपल्या बंगल्यांतच एक व्यायामशाळा बांधून घेतली. इंग्लंडच्या प्रिन्स

जॉर्जनें आपली स्वाक्षरी करून दिलेला फोटो जर्श्विननें स्मृतिचिन्ह म्हणून अतिशय कौतुकानें जपून ठेवला होता. "जॉर्जकडून जॉर्जला" असें या फोटोवर लिहून प्रिन्स जॉर्जनें त्याखालीं सही केली होती.

स्टिफन फॉस्टरप्रमाणें जर्श्विन स्वतःच्या गाण्याचे शब्द स्वतः लिहीत नसे. शब्द दुसऱ्याचे असत, जर्श्विन सुरावट बांधीत असे. लहानपणीं साहसकथा वाचणारा जर्श्विनचा मोठा भाऊ इरा हा पुढें जॉर्जच्या गीतांसाठीं शब्दलेखन करूं लागला. पुष्कळशा खेळांच्या जाहिरातींत 'गीतें : इरा जर्श्विन, संगीत : जॉर्ज जर्श्विन' अशा पाट्या झळकूं लागल्या. या दोन्ही भावांना एकमेकांचा अभिमान वाटत असे. ते दोघेहि तासन् तास एकत्र बसून काम करीत असत. ते दोघेहि एकमेकांपासून स्वभावानें फार वेगळे असल्यामुळें एकत्र आल्यानंतर त्यांची एकमेकांपासून खूप करमणूक होई.

जर्श्विन बाईच्या प्रेमांत कधीं पडला नाहीं. एकदांच फक्त त्यानें प्रेम केलें. तें म्हणजे त्याच्या कुत्र्यावर. कामाच्या कितीहि गर्दींत असला तरी तो कुत्र्याला घेऊन खेळायला जात असे.

अदम्य आत्मविश्वास हें जॉर्ज जर्श्विनच्या व्यक्तित्वाचें वैशिष्टय असल्याची जाणीव त्याच्या मित्रांना झाली होती कुठलीहि गोष्ट त्यानें करायला घेतली कीं ती आपल्या हातून पार पडणारच असा त्याला विश्वास वाटत असे. पकिनी म्हणत असे, "स्वतःवर विश्वास ठेवा आणि कष्ट करा." जॉर्जचें जीवन पाहातांना पकिनीच्या या शब्दांची आठवण होते.

जॉर्ज जर्श्विन
जन्म : ब्रुकलिन, न्यू यॉर्क येथें
२६ सप्टेंबर १८९८
मृत्यु : हॉलिवुड येथें
११ जुलै १९३७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ..........
क्रमांक .................... नों: वि: ..........

# अर्व्हिंग बर्लिन

"मीं तें स्वतः शोधून काढलें"

मॅनहॅटन आयलंडच्या अगदीं खालच्या बाजूच्या टोकाला बॅटरी हा धक्का आहे. न्यू यॉर्क शहराचा प्रमुख भाग या धक्याला लागूनच आहे. 'बॅटरी' या धक्क्याला एक बोट लागलेली होती. ज्या काळांतली ही गोष्ट आहे त्या काळांत मोटारी नव्हत्या. कच्च्या खडीच्या सडकेवरून एक घोड्याची गाडी खडखड करीत चालली होती. धक्याला लागलेल्या बोटींतून उतरलेलें एक कुटुंब या घोड्याच्या गाडींत बसलें होतें. रशियांतून अमेरिकेंत आलेलें हें कुटुंब होतें. नवराबायको, त्यांचीं सहा मुलें, भांडींकुंडीं आणि इतर सामान. बरेच दिवस समुद्रांतून प्रवास केल्यानंतर जमिनीवर पाय टेकतांच घोड्याच्या गाडींत बसलेल्या त्या मुलांना अगदीं हायसें वाटलें असणार. हें कुटुंब आतां न्यू यॉर्कमध्यें राहाणार होतें. न्यू यॉर्कच्या सडकेवरून गाडी चाललेली असतांना हीं मुलें गाडींतून डोकावून रस्त्यावरचीं नवीं दृश्यें पहात होतीं. या मुलांत सगळ्यांत धाकट्याचें नांव होतें इस्रायल बलिन. तो चार वर्षांचा होता. त्याचेंच चरित्र इथें लिहायचें आहे. गरिबींतून स्वतःच्या पराक्रमानें वैभवाला चढलेल्या या मुलाला सिंड्रेलाची उपमा देतां येईल. सैबेरियाच्या सीमेवरील विभागांत त्याचा जन्म झाला होता.

इस्रायलला घरीं इसि म्हणत. तो लहानखोर आणि शरिरानें किरकोळ होता. त्याचे डोळे मोठे, गडद तपकिरी रंगाचे होते. त्याचे केस काळेकुरळे होते.

त्याचे वडील ज्यू लोकांचे धर्मोपदेशक होते. ज्यू लोकांचा छळ सुरू झाला तेव्हां हें कुटुंब प्रथम एका गांवाहून दुसऱ्या गांवाला पळून जाऊं लागलें. परंतु त्यांचा पिच्छा एवढ्यानें संपणार नव्हता. तो संपवण्यासाठीं समुद्र ओलांडून त्यांना न्यू यॉर्कमध्यें यावें लागलें. न्यू यॉर्कमधल्या एका दरिद्री वस्तींत ते येऊन राहिले.

न्यू यॉर्कमध्यें आल्यानंतर पोटापुरते पैसे मिळवण्यासाठीं या कुटुंबाची धडपड सुरू झाली. चार मुली मण्यांचीं कामें करीत होत्या. मधला मुलगा एका कारखान्यांत मजुरी करूं लागला—इथें मजुरी अगदीं कमी होती आणि कारखान्यांतलें वातावरणहि आरोग्यदृष्ट्या चांगलें नव्हतें. इझीचे वडील एका खाटकाच्या दुकानांत ज्यू धर्मनियमाप्रमाणें मांस कापलेलें आहे किंवा नाहीं याची देखरेख करणारे परीक्षक म्हणून काम करूं लागले.—हें काम अर्थात् अधूनमधून मिळे. ज्यू लोकांचे धार्मिक सण आले कीं त्यांच्या देवळांत ते समूहगीतांचें निर्देशन करण्याचें काम करीत. थोडेसे पैसे मिळूं लागल्यानंतर आपली तळघरवजा जागा सोडून हें कुटुंब चेरी स्ट्रीटवरच्या एका चाळवजा घरांत राहण्यास गेलें. त्यांतल्या त्यांत ही जागा अशा अर्थानें बरी होती कीं, ती वरच्या मजल्यावर असल्यानें हवा तरी मिळत असे.

इझि बर्लिन दोन वर्षें १४७ नंबरच्या पब्लिक स्कूलमध्यें गेला. चित्रें काढायला त्याला आवडत असत. पण त्याला गाणें अगदीं सहज येत असे. ज्यू देवळांतील धर्मोपासनेच्या वेळीं वडील त्याला हिब्रू भाषेंतलीं गाणीं गायला लावीत. त्यांच्या घराण्यांतलीं बरींचशीं माणसें धर्मोपदेशकाच्या व्यवसायांतलीं असल्यामुळें त्या सगळ्यांना गातां येत असे.

मोठेपणीं आपल्या मुलानें मिळवलेलें वैभव पाहण्याचें इझीच्या वडिलांच्या नशिबीं नव्हतें. इझि आठ वर्षांचा असतांनाच ते वारले. सगळी जबाबदारी आईवर येऊन पडली. इझि सर्वांत लहान असल्यामुळें कुटुंबाच्या मिळकतीला हातभार लावणें त्याला शक्य नव्हतें. पण त्या वयांतहि या गोष्टीचें त्याला दुःख होत असे, अपराधाची भावना त्याच्या मनांत निर्माण होत असे. न्यू यॉर्क शहर हें वाढतें शहर होतें. नाना देशांतून माणसें बोटी भरभरून इथें येत होतीं. छोटा इझि बारीकसारीक कामें करून कांहीं पेनी मिळवी आणि आईला आणून देई. परंतु आपण आपल्या भावंडांइतके पैसे कांहीं मिळवून आणूं शकत नाहीं या जाणिवेनें तो अतिशय व्यथित होई.

एकदां एका उन्हाळ्यांतल्या दिवशीं इझीनें एक नवें काम घ्यायचें ठरवलें. तापलेल्या रस्त्यावरून फिरत तो वर्तमानपत्रें विकणाऱ्या पोऱ्याचें काम करूं लागला. मळक्या कपड्यांचीं, वर्तमानपत्र विकण्यासाठीं अनवाणी वणवणारीं अनेक पोरें शहरांत होतीं त्यांत इझि या एका मुलाची भर पडली.

इझि लहान असतांना त्या एवढ्या मोठ्या शहरांत नाना तऱ्हांच्या आवाजांचा कल्लोळ उसळलेला असे. कळंजलेल्या, करकर आवाज करणाऱ्या धक्क्यावर आदळणारें पाणी, बोटीच्या शिट्या, मुंग्यांच्या वारुळासारख्या माणसांच्या गर्दीची गजबज, वाहनांचा खडखडाट, फेरीवाल्यांच्या आरोळ्या, देवळांतलीं भक्तिगीतें, चिनी वस्तीच्या विभागांतली आरडाओरड, बॉवरी विभागांतल्या गुत्त्यांत होणाऱ्या गडबडी आणि अधूनमधून मिसळणारे पिस्तुलांचे बार...हे सगळे आवाज लहानपणीं इझीच्या कानांवर पडत होते. इझीच्या रक्तांत सतत छळ सोसत आलेल्या ज्यू जमातीच्या आक्रंदनाचा सूर मिसळला होता.

न्यू यॉर्क हें तिथें जगांतल्या सर्व भागांतले लोक येऊन राहिले असल्यामुळें खास अमेरिकन शहर आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. न्यू यॉर्कच्या पूर्वेकडच्या बाजूला बॉवरी विभाग आहे. न्यू यॉर्कमधल्या चिनी लोकांची वस्ती याच विभागांत आहे. या विभागाच्या उत्तरेकडच्या रस्त्यावर 'घेटो' या नांवानें ओळखली जाणारी ज्यूंची वसाहत आहे. इझि बर्लिन जिथें लहानपणीं रहात होता तिथें ज्यू कुटुंबें अजूनहि राहातात. पण तीं आतां पार बदललेलीं आहेत. बॉवरी विभागांतले कायद्याचें बंधन सैल असतांनाचे ते रंगेल आणि उग्र दिवस आतां गेले. आतां या विभागांत बराचसा नीटनेटकेपणा, रेखीवपणा आला आहे. हा बॉवरी विभाग पुढें 'अमेरिकन लोकप्रिय गीतांची बाग' म्हणून ओळखला जाईल याची त्या वेळीं लोकांना कल्पना तरी आली असती काय?

इझीच्या घरांत नेहमीं खाण्यापुरतें अन्न असे; त्याची आई तेवढी व्यवस्था करीत असे. पण आपण कुटुंबाच्या मिळकतीला हातभार लावूं शकत नाहीं याची इझीला अतिशय खंत वाटे. तो दरवाजाच्या उंबरठ्यावर आपल्या कृश ढोंपरांना मिठी घालून रस्त्यावरची न संपणारी गर्दी पहात बसून राही. नाना तऱ्हेचे लोक दिसत : कांहीं उदास तर कांहीं आनंदी, कांहीं घाईत

असलेले तर कांहीं सुस्त. एकाच प्रकारचीं माणसें फक्त इझीला इथें दिसत नसत आणि तीं म्हणजे श्रीमंत माणसें. कारण श्रीमंत माणसें त्या विभागांत राहातच नसत. त्या विभागांत राहणाऱ्यांपैकीं पैसेवाले म्हणजे हॉटेलांचे आणि गुत्त्यांचे मालक. आणि हे तरी काय आज श्रीमंत आहेत म्हणून उद्यां असतीलच असें नाहीं.

उंबरठ्यावर बसून गर्दी न्याहाळणाऱ्या इझीला आपलें जीवन व्यर्थ आहे असें वाटूं लागलें होतें. त्याचा त्याच्या कुटुंबाला कांहीं उपयोग होत नव्हता. तो निरुपयोगी होता. अशा परिस्थितींत त्यानें घराबाहेर चालतें व्हावें हेंच बरें नाहीं का? घराबाहेर पडावें आणि स्वतःचें पोट स्वतः भरावें—निदान तसा प्रयत्न करावा. एके दिवशीं संध्याकाळीं खरोखरीच तो जेवण झाल्यानंतर घराच्या बाहेर पडला.

त्या काळांत आजूबाजूला नेहमींच अशा गोष्टी घडत असत. इझि घर सोडून बाहेर पडला तेव्हां त्याचें वय फक्त तेरा वर्षांचें होतें. त्याच्या गरीब बिचाऱ्या आईनें त्याची खूप वाट पाहिली. तिनें त्याला खूप शोधलें. कधीं तरी शेजारचा एखादा मुलगा तिला येऊन सांगे कीं, अमक्या अमक्या रस्त्यावर मीं इझीला पाहिलें. मग खांद्यावर शाल टाकून त्याची आई त्याला शोधण्यासाठीं वणवणूं लागे. तिचे हे सर्व प्रयत्न फुकट जात. रस्त्यावरच्या गर्दींत तिला इझि कांहीं दिसत नसे. हा प्रकार अनेक आठवडे चालला होता.

यानंतर बऱ्याच वर्षांनीं इझि पुन्हां आपल्या आईकडे आला. या वेळीं तो आईला अनेक भेटी घेऊन आला होता. कारण आतां तो श्रीमंत झाला होता. त्याचीं गाणीं आतां सगळी अमेरिका विकत घेत होती. त्याच्या म्हाताऱ्या आईला कांहीं नवी भाषा येत नव्हती. आपला मुलगा इंग्रजी भाषेंत अमेरिकनांना आवडणारीं गाणीं कशीं काय लिहूं शकला याचें तिला अतिशय आश्चर्य वाटलें. हें कोडें तिला कधीं सुटलें नाहीं. कसेंहि असो, ती आतां खूष झाली होती. घरांतून पळून जाऊन इझीनें पूर्वीं आपल्या जिवाला घोर लावल्याबद्दल एकाहि उण्या शब्दानें ती त्याला बोलली नाहीं. तिनें त्याला क्षमा केली.

पुढें मोठा संगीतकार झालेल्या अर्व्हिंगनें घरांतून पळून गेल्यानंतर कुठें आसरा घेतला असेल असा प्रश्न साहजिकच मनांत निर्माण होतो. ज्या

दिवशीं तो घरांतून निघाला त्या रात्रीं आपली झोपायची कांहींतरी व्यवस्था करणें त्याला भाग होतें. दहा सेंटस्‌च्या मोबदल्यांत ही सोय कुठल्या हॉटेलांत होईल हें त्याला माहीत होतें. बॉवरी विभागाच्या पूर्वेला 'गे व्हाइट वे' या ठिकाणीं तो गेला. या विभागांत रात्रभर नाचगाणीं रंगत. घर सोडून निघालेलीं पोरें पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठीं प्रथम इथें येत. एका चांगल्या दिसणाऱ्या हॉटेलांत इझीनें प्रवेश केला आणि त्या वेळीं लोकप्रिय असलेलें 'द् मॅन्शन ऑफ एकिंग हार्ट्स' हें भावनापूर्ण गाणें म्हणायला सुरवात केली.

आज जर एखाद्या भटक्या गायकानें हें गाणें म्हटलें तर कोणीहि त्याला पैसे देणार नाहीं. जुन्या काळीं लोकांना आवडणाऱ्या गाण्याचा नमुना म्हणून जर गंमतीनें आपण ऐकायचें ठरवलें तर एखादे वेळीं पैसे देऊं. परंतु इझीनें हें गाणें म्हटलें तेव्हांची परिस्थिति वेगळी होती. अशीं भावनापूर्ण गाणीं ऐकतांना लोक रडूं लागत. डोळ्यांत अश्रू भरलेले असतांना त्यांना अशीं गाणीं सुंदर वाटत. कपडे काय किंवा संगीत काय—त्यांच्या फॅशन्स वारंवार बदलत असतात याचें हें एक उदाहरण म्हणतां येईल. इझीनें गाणें म्हटल्यानंतर त्याला रात्रीच्या वस्तीपुरते पैसे मिळाले.

या विभागांतल्या गुत्त्यांत आणि नाचगाण्यांच्या सभागृहांत तो आतां अशीं गाणीं म्हणायचें काम करूं लागला. करमणुकीच्या या ठिकाणीं बरेचसे खलाशी येत. त्यांची वस्ती बोटीवरून उतरल्यानंतर इथें तात्पुरती असे. या थोड्या वेळांत ते अशा ठिकाणीं येत, खातपीत, नृत्य करीत; आणि आपला जीव रिझवीत. करमणुकीच्या अशा अधिक चांगल्या दर्जाच्या जागा शहरांतल्या वरच्या वस्तींत होत्या. आज ही करमणुकीचीं ठिकाणें 'नाइट क्लब्स' या नांवानें ओळखलीं जातात. तींच तीं लोकप्रिय गाणीं गाऊन त्याच त्या शब्दांना इझि किती कंटाळला होता कुणास ठाऊक. परंतु एक मात्र खरें कीं, त्याला ज्या चाली येत त्या चालींवर स्वतः शब्द रचून गाणें म्हणण्याचें कौशल्य त्याला या काळांत बरेंच अवगत झालें. हॉटेलांत येणाऱ्या गर्दीच्या आवडीनिवडीचा त्यानें बारकाईनें अभ्यास केला. एखादें गाणें लोकप्रिय कां होतें हें त्याला आतां समजलें. लोकांना काय हवें हें तो आतां शिकला. या ज्ञानाच्या जोरावरच पुढें तो वैभवसंपन्न होणार होता. अर्थात् त्या वेळीं हें त्याला ठाऊक

नव्हतें. तो हॉटेलांत गाणीं म्हणे, लोकप्रिय गाण्यांचीं विडंबनें करी आणि जमलेल्या लोकांसमोर पैशांसाठीं हॅट फिरवी.

वयाच्या सोळाव्या वर्षी चिनी वस्तींत '१२ पेल स्ट्रीट' इथें असलेल्या निगर माइकच्या हॉटेलांत त्याला गाणाऱ्या वेटरचें काम मिळालें.

या हॉटेलचें खरें नांव होतें 'पेल्हॅम कॅफे' परंतु सगळे लोक निगर माइकचें हॉटेल म्हणूनच तें ओळखीत असत. निगर माइक हा गौरवर्णीय, रशियन ज्यू होता. परंतु खुद्द त्याचा रंग काळा असल्यामुळें 'निगर माइक' हें टोपणनांव त्याला लोकांनीं दिलें होतें. चिनी वस्तीच्या विभागांत फिरायला, करमणुकीसाठीं आलेले बहुतेक लोक याच हॉटेलांत दिसत.

एकदां युरोपमधला एक राजपुत्र न्यू यॉर्क पाहण्यासाठीं आला. गरीब वस्तींतले लोक आपली करमणूक कशी करून घेतात हें त्याला दाखवण्यासाठीं बॉवरी वस्तींतल्या या चिनी विभागांत त्याला आणण्यांत आलें. तो राजपुत्र निगर माइकच्या हॉटेलांत आला. त्यामुळें निगर माइक अगदीं खूष झाला. त्या दिवशीं त्यानें मद्याच्या बाटल्या आज फुकट मिळतील असें जाहीर केलें. राजपुत्र परत जायला निघाला तेव्हां बाजूलाच उभ्या असलेल्या एका वेटरच्या हातांत बक्षिशी म्हणून तो पैसे देऊं लागला. परंतु या राजपुत्राकडून बक्षिशी घेणें म्हणजे अमेरिकेच्या आतिथ्याला बट्टा लावण्यासारखें आहे असें वाटूनच कीं काय त्या वेटरनें हात पुढें केला नाहीं, तो मागें झाला. या वेटरचें नांव होतें इझि. हा प्रसंग घडला त्या वेळीं हर्बर्ट स्वोप हा वार्ताहर तिथें हजर होता. त्यानें दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत ही गोष्ट प्रसिद्ध केली. इझि बर्लिनचें नांव वर्तमानपत्रांत पहिल्याप्रथम या वेळीं छापून आलें. यानंतर कांहीं वर्षांनीं इझि जेव्हां अर्विंग बर्लिन—लोकप्रिय गीतलेखक झाला तेव्हां न्यू यॉर्क किंवा लंडन इथल्या हॉटेलांत निगर माइकच्या कॅफेमध्यें तो पूर्वीं काम करीत असतांना दिसलेले चेहरे पुन्हां इथें दिसतात कीं काय हें पहात असे.

निगर माइकच्या हॉटेलांत रात्रभर गिऱ्हाइकें येत-जात असत. त्यामुळें रात्रीचें काम करायचें आणि दिवसां झोप घ्यायची संवय इझीला लागली. पहांटेच्या सुमाराला शेवटचीं गिऱ्हाइकें घरीं गेलीं कीं हॉटेलांतले वेटर खुर्च्या उचलून टेबलावर रचून ठेवीत. मग ते दुसऱ्या दिवसासाठीं जमिनी धुऊन पुसून स्वच्छ करीत. या वेळीं इझि हॉटेलच्या मागच्या बाजूला असलेल्या

एका खोलींत ठेवलेल्या एका पिॲनोवर एका बोटानें गाणीं वाजवण्याचा प्रयत्न करीत बसे. चिनी वस्तींतल्या रस्त्यावर फिरवल्या जाणाऱ्या बॅरल ऑर्गनवर ऐकलेल्या चाली तो या पिॲनोवर वाजवण्याचा प्रयत्न करी.

पहिलें गीत लिहिण्याविषयींची आठवण सांगतांना अर्व्हिंग बर्लिन आज म्हणतो कीं, मीं तें गाणें आंतून स्फुरल्यामुळें लिहिलें नाहीं. असूयेमुळें लिहिलें. बाजूच्या एका दुसऱ्या हॉटेलांत काम करणाऱ्या एका वेटरनें आणि दुसऱ्या एका तिथल्याच पिॲनोवादकानें एक गाणें लिहिलें. इतकेंच नव्हे, तर वरच्या वस्तींतल्या एका प्रकाशकानें तें प्रसिद्धहि केलें. ही गोष्ट इझि आणि माइकच्या हॉटेलांतला पिॲनोवादक निक यांना समजली. त्याबरोबर इझि आणि निक यांनीं आपणहि गाणें लिहिलें पाहिजे असें ठरवलें. इझीनें गाण्याचे शब्द लिहायचे आणि निकनें चाल बांधायची. याप्रमाणें त्यांनीं तें गाणें लिहिलेंहि. कधीं कधीं गिऱ्हाइकें चुकीच्या यमकांची आणि सुरांना भोसकणारीं गाणीं ऐकून त्यांच्या अंगावर रागानें वस्तूहि फेकीत. पण कांहीं दिवसांनीं हें संपलें. आपल्या लिहिलेल्या या गाण्याला त्यांनीं 'मेरी फ्रॉम सनी इटली' असें शीर्षक दिलें. आतां खरी पंचाईत निर्माण झाली होती. गाणें लिहिलें खरें पण तें कागदावर कसें उतरणार ? कारण नोटेशन कसें लिहावें हें त्या दोघांनाहि माहीत नव्हतें. आतां काय करणार ? कागदावर लिहिल्याशिवाय कांहीं तें गाणें प्रकाशकाला देतां येत नव्हतें.

बॉवरी विभागांत जॉन नांवाचा एक चांभार होता. तो फिड्ल वाजवीत असे. इझि आणि निक त्याच्याकडे गेले. पण जॉनला सुद्धां चालीचें नोटेशन लिहायचें कसें हें ठाऊक नव्हतें. शेवटीं या दोघांनीं एक तरुण व्हायोलिनवादक गांठला. त्याला नोटेशन लिहिण्याची पद्धत माहीत होती. त्याच्याकडून तें गाणें कागदावर लिहून घेऊन निक आणि इझि ही जोडी वरच्या वस्तींतल्या टिन पॅन ॲली विभागांत गाणें खपवण्यासाठीं निघाली. तिथल्या एका प्रकाशकानें हें गाणें विकत घेतलें, प्रसिद्ध केलें. याबद्दल इझि बर्लिनला बरोबर तेहतीस सेंट्स मोबदला मिळाला. कांहीं का असेना, बर्लिनच्या दृष्टीनें प्रसिद्ध झालेलें हें गाणें फार महत्त्वाचें होतें. पैसे जरी नाहींत तरी अत्यंत महत्त्वाची अशी गोष्ट त्याला या गाण्यानें दिली—या गाण्यानें त्याच्या नव्या आयुष्याची सुरवात झाली होती.

पण आतां इझि बलिन हें त्याचें नांव उरलें नव्हतें. गाणें प्रकाशकाकडे देतांना त्यानें बलिन हें नांव बर्लिन असें लिहिलें. त्याचें इस्राइल हें नांव फारच गंभीर वाटलें आणि इझि हें टोपणनांव अगदींच पोरकट वाटलें. म्हणून त्यानें त्याऐवजीं अर्व्हिग हें नांव घेतलें. अर्व्हिग बर्लिन हें नांव वाचून निगर माइकच्या हॉटेलांतील लोक आपल्याला हंसतील असें त्याला वाटलें. म्हणून त्यानें प्रकाशित झालेल्या पहिल्या गाण्यावर 'शब्द : आय्. बर्लिन; संगीत : एम्. निकल्सन' असें छापलें. आतां तो नव्या नव्या पदरचना करूं लागला होता. कधीं कधीं तो लिहिलेल्या पदाला मागच्या खोलींतल्या पिॲनोवर बसून एका बोटानें तो वाजवीत स्वतःच चाल बांधण्याचा प्रयत्न करीत असे.

एके दिवशीं सकाळीं निगर माइकनें त्याला चांगलाच दम दिला. या हॉटेलांत त्यानें तीन वर्षें काम केलें होतें. पहांटे सहा वाजतां इझि कामावर होता. सहा ते आठ हॉटेलांत जवळजवळ कुणी येत नसे. मागची खोली झाडणें आणि पहांटेच्या पाळीला जाणारा एखादा कोणी कामगार आलाच तर त्याला बिअरची बाटली देणें एवढेंच काम असे. गल्ल्यांत पंचवीस डॉलर्स ठेवलेले असत. तिकडेहि लक्ष द्यावें लागे. रात्रभरच्या जागरणामुळें इझीला कधीं झोप लागली हें त्याचें त्यालाहि कळलें नाहीं. निगर माइकनें त्याचा हात हलवून त्याला जागें केलें. मिचमिच्या डोळ्यांनीं त्यानें वर पाहिलें. उन्हें आलीं होतीं आणि गल्ल्यांतले पंचवीस डॉलर्स चोरल्याबद्दल निगर माइक त्याला ओरडत होता. माइकनें त्याला घालवून दिलें आणि पुन्हां या हॉटेलांत पाय ठेवूं नकोस असें सांगितलें. इझि निघून गेला. पुढें त्याला कळलें कीं, तो झोपलेला असतांना गल्ल्यांतले पंचवीस डॉलर्स खुद्द निगर माइकनेंच काढून घेतले होते. कामावर असतांना झोपणाऱ्या वेटरला शिक्षा करण्याची निगर माइकची हीच पद्धत होती.

इझि आतां एकोणीस वर्षांचा झाला होता. बॉवरी विभागांतल्या वाह्यात वातावरणांत पुन्हां परतण्याची त्याला आतां भीति वाटत होती. तो वरच्या वस्तींत चालत गेला आणि तिथल्या युनियन स्क्वेअरमधल्या जिमी केलीच्या हॉटेलांत त्यानें गाणाऱ्या वेटरची नोकरी मिळवली. केलीच्या हॉटेलांत येणारीं गिऱ्हाइकें माइकच्या हॉटेलांत येणाऱ्या गिऱ्हाइकांहून फार वेगळीं होतीं.

युनियन स्क्वेअर या विभागांत बरींचशीं थिएटरें असल्यामुळें केलीच्या या हॉटेलांत नट, गायक, वादक यांची गर्दी असे.

केलीच्या हॉटेलांतल्या पिआनोवादकाबरोबर बर्लिननें आणखी कांहीं गीतें लिहिलीं. त्या वेळीं त्या विभागांत धावण्याची स्पर्धा हा एक सनसनाटीचा विषय झाला होता. मॅरेथॉन स्पर्धेंत धावणारा एक डॉरंडो नांवाचा इटालियन आणि लाँगबोट नांवाचा एक रेड इंडियन यांची धावण्याची स्पर्धा होणार होती. मॅडिसन स्क्वेअर गार्डन इथें ती स्पर्धा झाली. लाँगबोट जिंकला. त्याच वेळीं एक विनोदी गायक नट बर्लिनकडे आला आणि इटालियन बोलींत आपल्याला गातां येईल असें एखादें गाणें लिहून दे असें म्हणाला. स्पर्धेच्या वेळीं जमलेले न्हावी बुटपॉलीशवाले, इटालियन, फळविके यांच्या माकडचेष्टा बघून अर्व्हिंग खूष झाला होता. या सगळ्या लोकांना डॉरंडोच शर्यत जिंकणार असें वाटत होतें. त्यांनीं त्यावर पैज लावली होती. अर्व्हिंगनें या सगळ्या प्रसंगांवर गाणें लिहिलें आणि त्या गायक नटाकडे नेलें. पण तो गायक नट ठरल्याप्रमाणें दहा डॉलर्स द्यायला कबूल होईना. तेव्हां बर्लिन टिन पॅन ॲली विभागांत गेला. तिथें त्यानें एका प्रकाशकाला गांठलें आणि त्याला हें गाणें म्हणून दाखवलें. प्रकाशकानें त्याला सांगितलें कीं, ही चाल तूं आमच्या कंपनींतल्या जुळाऱ्याला म्हणून दाखव आणि त्याच्याकडून कागदावर उतरवून घे. बर्लिन जुळाऱ्याला भेटला. त्यानें चाल गुणगुणून दाखवली, जुळाऱ्यानें नोटेशन कागदावर लिहिलें. तें एक नवीन गाणें निघालें आणि त्याबद्दल अर्व्हिंगला पंचवीस डॉलर्स मिळाले. तेहतीस सेंट्स त्याला पूर्वीं मिळाले होते त्याहून हा मोबदला कितीतरी पटीनें बरा होता. त्यानें लिहिलेलीं 'माय वाइफ हॅज गॉन टु द कंट्री' हें आणि इतर गाणीं लोकप्रिय झालीं. यानंतर कांहीं दिवसांनीं याच प्रकाशकाकडे तो भावगीत-लेखक म्हणून राहिला. गाण्याच्या खपलेल्या प्रत्येक प्रतीवर ठरलेली रॉयल्टी आणि गाणें लिहीत असतांनाच्या काळांत दर आठवड्याला पंचवीस डॉलर्स पगार असा करार झाला. गाणाऱ्या वेटरचें काम सोडून तो टिन पॅन ॲली इथें कामाला लागला तेव्हां त्याच्या वयाला एकोणीस वर्षें पुरीं झालेलीं नव्हतीं. बरींच वर्षें त्यानें हाल आणि निराशा सोसल्यानंतर आतां ही खरीखुरी संधि त्याला लाभली होती.

अर्व्हिंग बर्लिन कुणाकडेहि संगीत शिकला नाहीं. त्याच्याकडे स्वतःचा पिॲनोहि नव्हता. आपण केलेल्या गीतांच्या चाली आपणच बांधाव्या अशी त्याची इच्छा होती. त्यासाठीं मध्यरात्रीं तो ऑफिसांत जाई. त्या वेळीं तिथले पिॲनो मोकळे असत. आणि पहांटेपर्यंत पिॲनोपुढें बसून तो चाली बांधण्याची खटपट करी.

या नव्या नोकरींत आपण दर दिवशीं बरींच गाणीं लिहिलीं पाहिजेत असें त्याला वाटूं लागलें—आणि त्यानें तशीं गाणीं लिहिलींहि. इतकीं गाणीं लिहिलीं कीं, प्रकाशकाला तीं सगळीं एकाच नांवानें प्रसिद्ध होणें बरें वाटेना. म्हणून त्यानें त्यांतलीं कांहीं वेगळ्या नांवानें प्रसिद्ध केलीं. एखादें नवें गाणें लिहिल्यानंतर तें कुणाला तरी म्हणून दाखवल्याशिवाय अर्व्हिंगला चैन पडत नसे—जो कोणी पहिला भेटेल त्याला तें गाणें म्हणून दाखवलेंच पाहिजे. ब्रॉडवेच्या थिएटरमधून आपल्याला गायला मिळेल तर किती बरें होईल असें अर्व्हिंगला नेहमीं वाटत असे. कांहीं वर्षांनीं त्याचें हें स्वप्न खरें झालें. केवळ न्यू यॉर्कमध्येंच नव्हे, तर लंडनमधल्या थिएटरमधूनहि त्याचे कार्यक्रम झाले.

हें होण्याच्या बरेच दिवस आधीं अर्व्हिंग आपल्या आईकडे परत घरीं आला होता. तिनें अतिशय जिव्हाळ्यानें त्याचें स्वागत केलें. पळून गेल्याबद्दल त्याला ती एका शब्दानेंहि बोलली नाहीं. आपला छोटा इझि गाणीं कसा लिहूं शकला हें गूढ मात्र तिला शेवटपर्यंत उकललें नाहीं. पुढें अर्व्हिंगनें अलोट पैसा कमावला आणि उंची उंची वस्तू त्यानें आईला भेट आणून दिल्या तेव्हां ती खूष झाली—पण तरीहि तें गूढ तिला कांहीं उकललें नाहीं. अर्व्हिंगनें आईला पहिली भेट दिली होती एका झुलत्या आरामखुर्चीची. यानंतर तिच्यापेक्षां अधिक चांगली आणि नवीन खुर्ची घेऊन द्यायला तो तयार होता. पण अर्व्हिंगनें दिलेल्या या पहिल्या भेटीवर त्याच्या आईचा जीव होता—ती खुर्ची सोडायला त्याची आई कांहीं तयार नव्हती.

तेराव्या वर्षीं घरांतून पळून गेलेला इझि आतां टिन पॅन ॲली विभागांतला प्रसिद्ध गीतलेखक अर्व्हिंग बर्लिन झाला होता. ब्रॉडवे विभागांतल्या थिएटर्समधूनहि आतां त्याचा नांवलौकिक पसरला होता. ' द फ्रिअर्स ' या नांवाचा एक प्रसिद्ध क्लब होता. या क्लबनेंसुद्धां अर्व्हिंग बर्लिनला आपला सदस्य म्हणून निवडलें होतें.

नाइट क्लब विभागांतले पिॲनोवादक आतां हळूहळू आपल्या मेलडींचा ढंग बदलूं लागले होते. त्यांच्या संगीतांत आतां उचकी लागल्यासारखे ताल येऊं लागले होते. घुसळणाऱ्या खांद्यांना, तालांत पडणाऱ्या निग्रो नर्तकांच्या पायांना साथ करूं पाहणारें हें संगीत होतें. हें रॅग्‌टाइम् संगीत अमेरिकेंतली नवलाई म्हणून जगभर पसरलें.

फ्रिअर्स क्लबच्या सभासदांचा एक वार्षिक समारंभ असे. त्यांनीं या वार्षिक समारंभाचें नाव ठेवलें होतें 'मौजमजा.' या समारंभाच्या वेळीं प्रत्येक नव्या सदस्यानें कांहींतरी सनसनाटी प्रकार करून दाखवला पाहिजे असा प्रघात होता. अर्व्हिंग बर्लिन हा नव्यानें निवडलेला सदस्य होता. बर्लिननें या समारंभासाठीं एक नवी रचना केली. पार्टीच्या वेळीं खांदे हलवीत, पायानें ताल धरीत त्यानें ती गाऊन दाखवली. गीताचे शब्द असे होते: "कम् ऑन ॲंड हिअर, कम् ऑन ॲंड हिअर अलेक्झांडर्स रॅग्‌टाइम् बॅंड."

पुढें हें गाणें विलक्षण लोकप्रिय झालें. अलेक्झांडर रॅग्‌टाइमचे सूर ज्याच्यावर वाजले नाहींत असा एकहि पिॲनो अमेरिकेंत दाखवितां आला नसता. अर्व्हिंगच्या यशाचा पाया आतां घातला गेला होता. बॉवरी विभागांतले खडतर दिवस आतां संपले होते. रस्त्यावर वर्तमानपत्र विकणारा हा पोऱ्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी जगांतला लोकप्रिय गीतलेखक झाला होता. ज्या वाटेनें तो वर आला होता ती वाट केवळ बिकटच नव्हे, तर धोक्याचीहि होती. एखाद्या श्रीमंत चुलत्याच्या पुंजीचा आधार घेऊन अर्व्हिंग वर आला नव्हता. कठिण परिस्थितीला तोंड देत स्वतःच्या कर्तृत्वानें तो वर चढला होता. बॉवरी विभागांत आणि वरच्या वस्तींतल्या हॉटेलांत लहानपणीं गाणाऱ्या वेटरचें काम करीत असतांना त्यानें लोकांच्या आवडी-निवडीचा सूक्ष्म अभ्यास केला होता. गाण्यांत काय असलें म्हणजे तें लोकप्रिय होतें याची नाडी त्यानें बरोबर हेरली होती. यामुळेंच तो एखादी चाल ऐकल्यानंतर ती लोकप्रिय होईल किंवा नाहीं हें चटकन् सांगूं शकत असे.

अर्व्हिंग बर्लिन इंग्लंडलाहि गेला. दहा वर्षांपूर्वी निगर माइकच्या हॉटेलांत काम करणारा हा पोरगा लंडनमधल्या थिएटर आणि म्यूझिक सर्कलचा सदस्य म्हणून निवडला गेला. इतकेंच नव्हे, तर वरच्या वर्गांतहि त्याला प्रवेश मिळाला. लंडनमध्यें असतांना एके दिवशीं पहांटे चार वाजतां 'दी इंटरनॅशनल

रॅग' हें गीत त्याला सुचलें. पहांटेच त्यानें तें लिहून काढलें. त्याच दिवशीं दुपारीं एका थिएटरांतल्या कार्यक्रमांत गाऊनहि दाखवलें.

त्याचीं गाणीं सर्वत्र लोकप्रिय होत होतीं. जिथें जाईल तिथें त्याला यशाची पावती मिळत होती. पण सगळयांत त्याच्या मनाला यशाचा स्पर्श करणारा प्रसंग तो लंडनमध्यें असतांना घडला. लंडनमध्यें जातांना एके ठिकाणीं तो टॅक्सींतून उतरणार होता. वर्तमानपत्र विकणारा एक रस्त्यावरचा पोरगा कांहींतरी बक्षिसी मिळेल या आशेनें टॅक्सीचें दार उघडण्यासाठीं पुढें आला. टॅक्सींतून उतरल्यानंतर अर्व्हिंग बर्लिननें त्याच्या हातांत पांच डॉलर्स ठेवले. इतकी रक्कम बक्षीस मिळालेली पाहून तो पोरगा थक्कच झाला. या अमेरिकन माणसानें आपल्याला इतके पैसे कां दिले हेंच त्याला कळेना. अर्व्हिंगनें खूष होऊन ही बक्षिसी दिली. त्याचें कारण होतें : टॅक्सीचें दार उघडतांना त्या पोरानें शिळेवर 'अॅलेक्झांडर्स रॅग्टाइम् बँडचे' सूर वाजवले होते.

छापलेलें नोटेशन वाचायला बर्लिन कधींच शिकला नाहीं. त्याचें सगळें संगीत त्याच्या डोक्यांत असे. जें कांहीं संगीताचें शिक्षण त्याला मिळालें तें श्रवणभक्तीनेंच. गाण्याची चाल डोक्यांत पक्की झाल्यानंतर ते सूर अक्षरांकित करणाऱ्या जुळाऱ्याला तो गाऊन दाखवी. आपल्याला काय येतें आणि काय नाहीं हें अर्व्हिंग बर्लिनला पक्कें माहीत असे. त्यामुळें संगीतलेखक म्हणून, गीतलेखक म्हणून त्यानें रोवलेलें पाऊल कधींच ढळलें नाहीं. केवळ ब्रॉडवे येथेंच नव्हे तर सर्व जगांत त्याच्याइतकीं गाणीं कोणींच लिहिलेलीं नाहींत आणि त्याच्या गाण्यांइतकीं कुणाचींहि गाणीं लोकप्रिय झालेलीं नाहींत.

वेगवेगळ्या सप्तकांची माहिती त्याला संगीतशिक्षकांकडून कधींच मिळाली नाहीं. त्यामुळें त्यानें स्वतः एकदां सहज षड्ज बदलून पाहिला तेव्हां गाणें एका पट्टींतून दुसऱ्या पट्टींत जाऊं शकतें हें त्याला कळलें. याविषयीं तो म्हणतो, "मला हा शोध लागला तेव्हां मी खूष झालों. वेगवेगळ्या गाण्यांत मी ही पद्धत वापरून पाहूं लागलों—यांतून मीं हजारों डॉलर्स मिळवले."

अर्व्हिंग बर्लिनच्या आयुष्यांत अविस्मरणीय असे अनेक क्षण आले. परंतु तो पंचवीस वर्षांचा असतांना घडलेली पुढील घटना विशेष होती.

एके दिवशीं संध्याकाळीं सूर्यास्तानंतर त्याची आई ज्या जुन्या घरांत राहात होती तिथें तो आला. तो कांहींतरी विशेष गोष्ट आज तिला सांगणार होता.

त्यामुळें खुद्द आपल्या आईशेजारींहि त्याला बावरल्यासारखें झालें. आपल्या सगळ्या भावंडांना घेऊन तूं बाहेरच्या टॅक्सींत बस, आपण फिरून येऊं असें तो तिच्या कानाशीं पुटपुटला. त्याची आई म्हणाली कीं, हें कांहीं जमणार नाहीं. कारण एक तर रात्रीचा स्वयंपाक व्हायचा होता आणि दुसरें म्हणजे टॅक्सींत बसून फिरायला जाणें ही त्यांना परवडणारी गोष्ट नव्हती. पण अर्व्हिंगनें इतका जोरदार आग्रह केला कीं, आई आणि भावंडें एकदांचीं बाहेरच्या टॅक्सींत जाऊन बसलीं. टॅक्सी चालू झाली. गजबजलेले रस्ते आणि चौक मागें पडूं लागले. अखेरीस टॅक्सी वरच्या वस्तीच्या टोकाला असलेल्या एका अलीशान बंगल्यापुढें उभी राहिली. घरावर दिव्यांची रोषणाई केलेली होती. टॅक्सींतून सगळी मंडळी उतरली. आणि सुंदर अशा प्रवेशद्वारांतून त्यांनीं बंगल्यांत प्रवेश केला. उंची फर्निचरनें सजवलेल्या खोल्या ओलांडून जेवणाच्या खोलीकडे ही मंडळी गेली. जेवणाची सगळी तयारी केलेली होती, सेविका उभ्या राहून त्यांच्या बसण्याचीच वाट पहात होत्या.

सगळ्यांनीं बसून घेतलें. बिचारा इझि उभा राहिला आणि भाषण करण्याचा प्रयत्न करूं लागला. काय बोलायचें हें त्यानें मनाशीं योजून ठेवलें होतें. पण त्याच्या भावना इतक्या उचंबळून आल्या होत्या कीं, त्याला शब्द फुटेनात. मोठ्या प्रयत्नानें तो एवढेंच पुटपुटला कीं, "हें आपलें नवें घर...गाण्यावरतीं विकत घेतलं...आज रात्रीं आईला जेवण करण्याची जरुरी नाहीं!" असें म्हणून तो धांवत बाहेर रस्त्यावर गेला. त्यानें आपली हॅट डोळ्यांवर ओढली आणि तो चालत सुटला. पहांट होईपर्यंत तो सारखा चालत होता, स्वतः जेवला नव्हता. आज त्याचें हृदय तुडुंब भरलें होतें—जुने हालअपेष्टांचे दिवस त्याला आठवत होते. त्या काळांत तो जवळजवळ रस्त्यावरच राहिला होता म्हटलें तरी चालेल. पण त्याहि काळांत मन प्रसन्न ठेवून तो गात राहिला होता. आणि इतक्या वर्षांनंतर त्याच्या या गाण्यांनींच त्याला इथवर आणून सोडलें होतें.

'अॅलेक्झांडर रॅगटाइम् बॅंडचे' सूर आतां सर्व जगभर उमटत होते. अर्व्हिंग बर्लिन एका मुलीच्या प्रेमांत पडला. या मुलीशीं त्यानें लग्न केलें. लग्न करून मधुचंद्राला गेले असतांना त्याची बायको आजारी पडली आणि यानंतर कांहीं महिन्यांतच हें जग सोडून गेली. आतां अर्व्हिंगप्रमाणेंच त्याची गाणींहि

दुःखानें झाकोळून गेलीं. दुःखाचा असह्य ताण कमी व्हावा म्हणून तो युरोपच्या प्रवासाला निघाला. या काळांत तो लिहीत होता. पण त्याचें एकहि गाणें लोकांची पकड घेत नव्हतें. प्रवासाहून परतल्यानंतर त्यानें आपलें दुःख व्यक्त करणारें 'व्हेन आय् लॉस्ट यू' हें गीत लिहून प्रकाशकाला दिलें. हें गाणें तत्काळ लोकप्रिय झालें. या गाण्याच्या लक्षावधि प्रती खपल्या, अर्व्हिंगला खूप पैसा मिळाला, पण याहिपेक्षां एक महत्त्वाची गोष्ट त्याला यांतून मिळाली—त्याच्या मनावरचें दुःखाचें ओझें हलकें झालें. यानंतर तो पुन्हां लोकप्रिय गाणीं लिहूं शकला. कांहीं वर्षांनीं त्यानें दुसरें लग्न केलें.

महायुद्ध सुरू झालें तेव्हां अर्व्हिंग साधा सैनिक म्हणून सैन्यांत शिरला. आपलें सारें ऐश्वर्य मागें ठेवून यापहँक येथील 'कँप अप्टनमध्यें' तो बटाटे कापण्याचें काम करूं लागला. इतर नटनटींप्रमाणें बाहेर जाऊन अमेरिकन सैनिकांचें मनोरंजन करावें अशी त्याची फार इच्छा होती. परंतु त्याला परवानगी मिळाली नाहीं. अनेक हालअपेष्टा सोसून वर आलेला अर्व्हिंग परवानगी मिळाली नाहीं म्हणून निराश थोडाच होणार होता? सैनिकांना आणि त्यांच्या पाहुण्यांना कँपवर सुखसोई मिळाव्यात, कँप अधिक आकर्षक व्हावा अशी जनरलची इच्छा होती. पण यासाठीं हजारों डॉलर्सची जरूर होती. अर्व्हिंग बर्लिननें हे पैसे मिळवण्यासाठीं 'थिप–थिप–यापहँक' या खेळासाठीं गाणीं लिहिलीं. सैन्याच्या मदतीसाठीं हा कार्यक्रम न्यू यॉर्क येथें सादर केला गेला. बर्लिननें म्हटलेल्या गाण्यांवर श्रोते बेफाम खूष झाले. अर्व्हिंगची आई पहिल्याप्रथम आपल्या मुलाच्या कार्यक्रमाला इथें आली होती. खाकी गणवेषांत बादली घेऊन वाकलेला अर्हिंग बर्लिन स्टेजवर आला. सैनिकांचें जीवन एकूण कसें खडतर असतें याचें वर्णन करणारें गाणें त्यानें म्हणून दाखवलें. सगळे लोक थरारून गेले. या कार्यक्रमाचे एकूण ऐंशी हजार डॉलर्स मिळाले—गाणें म्हणणारा सोजीर अर्हिंग यानें यांतला एक सेंटहि घेतला नाहीं. या कार्यक्रमांतलें बर्लिनचे 'ओह, हाउ आय हिट हेट टु गेट अप इन् द मॉर्निंग' हें गाणें लोकांनीं उचलून धरलें. कँपमधल्या प्रत्येक सोजिराला हें गाणें आवडणें अगदीं स्वाभाविक होतें. पहांटे उठण्याचा त्या सगळ्यांनाच कंटाळा होता; पण पहांटे उठण्याचा सर्वांत अधिक ताप बर्लिनला होत असे. कारण निगर

माइकच्या हॉटेलांत त्यानें काम करायला सुरवात केल्यापासून रात्रभर काम करून पहांटे झोपणें अशीच त्याला संवय होती.

'द बेगर्स ऑपेरा' आर्व्हिंगनें ऐकल्यापासून अशा तऱ्हेच्या कार्यक्रमासाठीं आपण संगीत लिहावें असें त्याला फार वाटूं लागलें होतें. तो आणि याच व्यवसायांतला त्याचा मित्र सॅम हॅरिस यांनीं म्यूझिक बॉक्स या नांवाचें एक थिएटर बांधलें. थिएटरला हें नांव द्यायचें ही कल्पना बरेच दिवस त्याच्या मनांत होती, म्यूझिक बॉक्समध्यें होणाऱ्या कार्यक्रमांसाठीं त्याचें सतत संगीतलेखन चालू होतें. नवीं नवीं गाणीं लिहिलीं जात होतीं. त्याच्या स्फूर्तीचा झरा कधींच आटला नाहीं. अजूनहि तो नवीं नवीं गाणीं लिहितोच आहे. न्यू यॉर्कमधल्या थिएटरें असलेल्या विभागांत तुम्ही जर गेलांत तर कुठल्या ना कुठल्या कार्यक्रमाच्या जाहिरातींत 'संगीत : अर्हिंग बर्लिन' हें नांव झळकतांना तुम्हांला दिसेलच.

जगांतल्या कुठल्याहि गीतलेखकापेक्षां बर्लिनचीं गाणीं अधिक खपलीं आहेत. यासाठीं त्याला कष्टहि तसेच घ्यावे लागतात. आपण गाणीं कशीं लिहितों याविषयीं अर्हिंग बर्लिननें सांगितलें आहे तें असें : गाण्याची कल्पना सुचली कीं तो शीर्षक निश्चित करतो. गाण्याचें शीर्षक ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट त्याला वाटते. गाण्यांतल्या शब्दांबरोबरच स्वररचनेचा बंधहि उमलत जातो. पुष्कळ वेळां एखादें गाणें प्रत्यक्ष लिहिण्यापूर्वीं अनेक आठवडे त्याला त्यासाठीं खपावें लागतें. केवळ संगीताच्या बाबतींतच नव्हे, तर इतर बाबतींतहि असाधारण स्मरणशक्ति त्याला लाभलेली आहे.

अर्व्हिंग बर्लिनला संगीतलेखनाखेरीज दुसरा छंद नाहीं. आपल्या चालींचें आणि गाणीं लिहिण्याचें श्रेय तो आपल्या वडिलांना देतो. जेरोम कर्नच्या संगीताचा तो फार चाहता आहे. जॉर्ज एम् कोहान हा गाणारा आणि नृत्य करणारा कलाकार अर्हिंगचा संगीताचा पहिला आदर्श होता. आज जर अर्व्हिंगला विचारलें कीं, तुझें कोणतें गीत तुला सर्वांत हृदयस्पर्शी वाटतें तर तो 'गॉड ब्लेस अमेरिका' हें गीत असेंच उत्तर देईल.

जॉन ॲल्डन कार्पेंटर हा संगीतकार एकदा म्हणाला होता, "दोन हजार सालांतल्या संगीताच्या इतिहासकाराला अमेरिकन संगीताचा जन्मदिवस आणि अर्व्हिंग बर्लिनचा जन्मदिवस एकच होता असेंच लिहावें लागेल." जेरोम

कर्न म्हणाला होता, "अर्व्हिंग बर्लिनचें अमेरिकन संगीतांतलें स्थान कोणतें असा प्रश्नच निर्माण होत नाहीं. कारण अर्व्हिंग बर्लिन म्हणजेच अमेरिकन संगीत होय." 'ॲनी गेट युवर गन'चें संगीत जेरोम कर्ननें लिहायचें असेंच प्रथम ठरलें होतें. पण त्याचा मृत्यु झाला. तेव्हां 'ऑक्लाहोमा'—प्रसिद्ध रॉजर्स आणि हॅमर्स्टाइन त्यामुळें अर्व्हिंगकडे आले आणि त्यांनीं 'ॲनी गेट युवर गन'चें संगीत अर्व्हिंगनें लिहावें असें सुचविलें. असलें फालतू संगीत आपल्याला लिहितां येत नाहीं असें प्रथम अर्व्हिंगनें उत्तर दिलें. अशाच तऱ्हेचें संगीत तो सुरवातीला लिहीत होता ही गोष्ट अर्व्हिंग क्षणभर विसरून गेला. अशाच एका शुक्रवारीं रॉजर्स आणि बर्लिन एकदां भेटले. राजर्सनें गीतांचें पुस्तक बर्लिनकडे दिलें आणि सोमवारीं दुपारीं जेवायला येण्याचेंहि आमंत्रण दिलें. पुस्तक वाचल्यानंतर कदाचित् बर्लिनचें मन बदलेल आणि तो संगीत लिहिण्याचें काम स्वीकारील अशी रॉजर्सला आशा वाटत होती. सोमवारीं बर्लिन जेव्हां रॉजर्सला भेटला तेव्हां त्यानें पुस्तक वाचलें होतें, इतकेंच नव्हे, तर त्यांतल्या कांहीं भागांचें संगीतलेखनहि त्यानें केलें होतें. पुढें या व्यवसायांतले 'ॲनी गेट युवर गन' हें आपलें अत्यंत महत्त्वाचें काम आहे असें तो मानूं लागला. अमेरिकेंतील 'बॉय ॲंड गर्ल स्काउट्स' या संस्थेसाठीं बर्लिननें 'गॉड ब्लेस अमेरिका' या गीताचे हक्क देऊन टाकले आणि स्काउटसाठीं 'गॉड ब्लेस अमेरिका फंड' स्थापन केला. हें गाणें त्यानें पहिलें महायुद्ध चालू असतांना लिहिलें. परंतु लोकांची वृत्ति तेवढी सहानुभूतीची नाहीं असें वाटल्यावरून त्यानें तें १९३८ सालपर्यंत प्रसिद्ध केलें नाहीं. बर्लिननें अगदीं योग्य वेळीं तें गीत प्रसिद्ध केलें असेंच म्हणावें लागेल.

आर्मी इमर्जन्सी रिलिफ फंडासाठीं सरकारतर्फे करण्यांत आलेल्या 'धिस् इज् माय् आर्मी' या खेळाचें संगीत बर्लिननें लिहिलें होतें. बर्लिनला या गोष्टीचा फार अभिमान वाटला. अमेरिकेंत आणि बाहेर या कार्यक्रमासाठीं त्यानें तीन वर्षें खर्च केलीं. १९१७ सालच्या आपल्या सोजिराच्या गणवेशांत तो पुन्हां स्टेजवर आला आणि त्यानें वीस वर्षांपूर्वीच्या थिप-थिप-यापहँकमधलें लोकप्रिय गाणें म्हणून दाखवलें. श्रोत्यांनीं त्याला डोक्यावर घेतलें. १९४८ सालीं त्याचा साठावा वाढदिवस होता आणि याच वर्षी संगीताचा व्यवसाय त्यानें स्वीकारल्याला चाळीस वर्षें पुरीं होत होतीं. या लोकप्रिय गीतलेखकाचा हा

साठावा वाढदिवस साजरा करण्यासाठीं रॉजर्स आणि हॅमर्स्टाइन यांनीं ज्युलिअर्ड स्कूल ऑफ म्यूझिक येथें 'अर्व्हिंग बर्लिन स्कॉलरशिप' निर्माण केली.

अर्व्हिंग बर्लिन
जन्म : रशिया
११ मे १८८८
चवथ्या वर्षी अमेरिकेंत आला.
सध्यां (१९५८) वास्तव्य : न्यू यॉर्क येथें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ...... ..........
क्रमांक ........................ नों दि: ..............

## रॉय हॅरिस

**"आपल्या संगीताच्या अभिरुचींत चोखंदळपणापेक्षां संवयीचाच भाग अधिक"**

गेल्या शतकाच्या अखेरीस अमेरिकेच्या सरहद्द विभागांत नव्या भूमीसाठीं लोटणारी रीघ संपत आली होती. तीनशें वर्षांच्या आंतल्या काळांत तिथला प्रचंड भूभाग गोऱ्या लोकांनीं व्यापला होता. अरण्यें आणि गवताळ प्रदेश यांनीं व्यापलेला रेड इंडियन माणसांचा तिथला स्वर्ग नाहींसा होऊन त्याची जागा आधुनिक संस्कृतीच्या गुंतागुंतीनें घेतली होती. हें शतक संपायला येत होतें तेव्हांची गोष्ट. हॅरिस आणि त्याची बायको बैलगाडींत बसून ऑक्लाहोमा येथें पोंचलीं होतीं. शॅंडलर, लिंकनकाउंटी इथें त्यांनीं आपला तळ ठोकला. बैलगाडीखेरीज या जोडप्याकडे एक बंदूक, एक कुऱ्हाड आणि थोडी साखर व पीठ इतकें सामान होतें. कुऱ्हाडीनें झाडें तोडून त्यांनीं घर बांधलें. बंदुकीच्या साहाय्यानें त्यांनीं आपलें अन्न मिळविलें, त्यांनीं जमीन निवडली. भोंवतीं खुंटांचें कुंपण घातलें आणि त्या शेतावर सरकारी आदेशाप्रमाणें आपला हक्क लागू केला. सरहद्द विभागांतल्या किमेरॉन इथल्या या आपल्या जमिनींत त्यांनीं कांहीं वर्षें शेती केली.

इथें आल्यानंतर पहिल्याच वर्षीं त्यांना एक मुलगा झाला. हें जोडपें स्कॉच आणि आयरिश वंशांतलें होतें. त्यांनीं आपल्या मुलाचें नांव रॉय असें ठेवलें. अमेरिकेच्या अध्याक्षाप्रमाणेंच एका संगीतकारानेंहि लाकडाच्या ओंडक्यांच्या घरांत जन्म घ्यावा ही गोष्ट मोठी गंमतीची वाटते. रॉय

हॅरिस हा पुढें संगीतकार झाला. त्याचा आणि लिंकनचा जन्मदिवस एक होता.

लौकरच कांहीं वर्षांनीं रॉयच्या आईला तिथली हवा मानवत नाहीं असें आढळून आल्यामुळें हें कुटुंब आपलें सगळें सामानसुमान घेऊन कॅलिफोर्नियाला गेलें. रॉय त्या वेळीं पांच वर्षांचा होता. त्याच्याबरोबरच आजूबाजूचा विभागहि वाढत होता. छोट्या छोट्या वस्त्यांचीं रूपांतरें एका मोठ्या शहरांत होत होतीं. मोठमोठीं शेतें होतीं तीं आतां छोट्या तुकड्यांत विभागलीं गेलीं होतीं.

रॉयची आई ऐकून ऐकून पिॲनो वाजवी. तिनें रॉय लहान असल्यापासूनच त्याला पिॲनो शिकवायला सुरवात केली. त्यामुळें दहाव्या वर्षीच तिथल्या विभागांत चांगला पिॲनो वाजवणारा असें त्याचें नांव झालें. स्थानिक कार्यक्रमांतूनहि तो पिॲनो वाजवूं लागला. पब्लिक स्कूलमध्यें रॉयचें नांव घालण्यांत आलें. शाळेंतल्या मुलांना कसलेंच वाद्य वाजवतां येत नव्हतें. त्यामुळें रॉयचें कौतुक करण्याऐवजीं पोरांनीं त्याचें पिॲनोवादन चेष्टेचा विषय केला. लहान असोत किंवा मोठीं असोत, अडाणी माणसांची ही एक नेहमींची लकब आहे असें दिसतें. जी गोष्ट त्यांना समजत नाहीं ती हास्यास्पद आहे असें ठरवून तीं मोकळीं होतात. पिॲनो वाजवतो म्हणून रॉयला पोरांनीं बायकी ठरवलें. या वयांतली एक गंमत अशी असते कीं, आई जें सांगते त्याविरुद्ध शाळेंतलीं मुलें म्हणूं लागलीं तर त्यांचेंच म्हणणें खरें असें मुलाला वाटूं लागतें. पुढें मोठेपणीं अर्थातच आईचेंच म्हणणें खरें होतें हें मुलाला कळतें. मुलें चिडवायला लागल्यामुळें रॉयनें संगीताचा नाद सोडून दिला. संगीताऐवजीं त्यानें आपलें लक्ष बेसबॉल आणि टेनिस या खेळांकडे वळवलें. एकदां त्यानें आपलें नाक फोडून घेतलें, एकदां डावा हात मोडून घेतला आणि एकदां उजव्या हाताचें चवथें बोट मोडून घेतलें. हा पराक्रम केल्यानंतर शाळेंतल्या पोरांनीं त्याच्यावर पुरुषीपणाचा शिक्का मारला.

आतां आपल्याला कोणी बायकी म्हणणार नाहीं याची खात्री झाल्यानंतर रॉयनें क्लॅरिनेट शिकायला सुरवात केली. थोड्याच दिवसांत तो बॅंडपथकांतून वाजवूं लागला. आणि सिंफनी ऑर्केस्ट्रांतहि त्याला वाजविण्याचें काम मिळालें. अठराव्या वर्षीं त्यानें एक शेत घेतलें. या शेतांत तो बेरी आणि बटाटे यांचें पीक काढूं लागला.

रॉयचें मन शोधक होतें. नेहमींपेक्षां वेगळ्या विषयांत त्याला रस वाटे. एखादा प्रश्न पडला कीं त्याचें उत्तर शोधून काढण्यासाठीं तो खूप मेहनत करीत असे. शेती करीत असतांनाच तो ग्रीक तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत होता आणि क्लॅरिनेटहि वाजवीत होता.

पहिल्या महायुद्धांत साधा सैनिक म्हणून रॉय हॅरिस दाखल झाला. एका वर्षानंतर तो कॅलिफोर्नियाला परत आला. अंडीं आणि लोणी यांचें विक्रेत्यांना वांटप करणाऱ्या एका ट्रकचा ड्रायव्हर म्हणून तो काम करूं लागला. संगीताचा अभ्यास करायचा असा निर्णय त्यानें आतां घेतला होता. रात्रीं तो हार्मनीचा अभ्यास करीत असे. संध्याकाळीं कॅलिफोर्निया विश्वविद्यालयाच्या सदर्न ब्रँचमधल्या वर्गांना जात असे. हिंदु तत्त्वज्ञानाचाहि तो अभ्यास करीत असे. 'लॉस एंजल्स इलस्ट्रेटेड डेली न्यूज' या वृत्तपत्रासाठीं तो कांहीं दिवस संगीतावरचीं परीक्षणेंहि लिहीत होता. परंतु स्वतंत्र संगीतलेखनाला वेळ कमी पडूं लागल्यामुळें नंतर त्यानें परीक्षणलेखनाचें हें काम सोडून दिलें. पहिल्या दर्जाच्या सर्जनशील कलावंताइतकाच पहिल्या दर्जाचा टीकाकारहि दुर्मिळ असतो असें रॉय पुढें एकदां म्हणाला होता.

सॅन् फ्रॅन्सिस्को सिंफनी ऑर्केस्ट्राचें निर्देशन आल्फ्रेड फर्त्झ हा संगीतकार करीत असे. रॉयनें लिहिलेली एक सिंफनी आल्फ्रेडनें ऐकली. ही सिंफनी लिहिली तेव्हां रॉयनें संगीतलेखनाचा अभ्यासहि केलेला नव्हता. आल्फ्रेड फर्त्झला ही सिंफनी इतकी आवडली कीं, त्यानें रॉयला शेती सोडून देऊन संगीताला वाहून घे असा सल्ला दिला. रॉय हॅरिसनें आतां विशी ओलांडली होती. आतां त्यानें संगीत हाच व्यवसाय म्हणून स्वीकारण्याचें ठरवलें होतें. सुदैवानें याच वेळीं आर्थर फारवेल हा त्याला शिक्षक म्हणून लाभला. फारवेल-कडे रॉय दोन वर्षें संगीतलेखन शिकला. आपला हा विद्यार्थी आज ना उद्यां सगळ्या जगाचें लक्ष वेधून घेणार अशी फारवेलला खात्री वाटत असे. फारवेलकडे शिकतांना रॉयची झपाट्यानें प्रगति होत होती. याच वेळीं त्यानें चार तंतुवाद्यांसाठीं एक 'स्वीट' आणि ऑर्केस्ट्रासाठीं एक अँडाटे यांची रचना केली. न्यू यॉर्कच्या फिलहार्मनिक सिंफनी ऑर्केस्ट्रानें या रचना सादर केल्या. हा कार्यक्रम ऐकण्यासाठीं रॉय हॅरिस चालत गेला होता.

सरहद्द विभागांतून आलेल्या या तरुण संगीतकाराच्या रचनांकडे रसिकांचें

लक्ष वेधूं लागलें होतें. अशाच एका उदार रसिकानें परदेशीं जाऊन संगीताचें शिक्षण घेण्यासाठीं रॉय हॅरिसला मदत केली. यानंतर एका वर्षानेंच पॅरिसमध्यें रॉयनें चार तंतुवाद्यें, पिॲनो आणि क्लॅरिनेट यांच्यासाठीं लिहिलेला कंचर्टो सादर करण्यांत आला. या कंचर्टोनंतरच त्याच्या पिॲनो सोनाटाचाहि कार्यक्रम झाला. त्यानें या रचनांच्या बाबतींत दाखवलेल्या वैशिष्टयपूर्ण प्रगतीमुळें त्याला गगन्हाय्म फेलोशिप ही शिष्यवृत्ति दोन वर्षांसाठीं मिळाली. नॅडिआ बोलँजर हिच्याकडे तो शिकूं लागला. सध्यांचे बरेचसे संगीतकार तिच्याकडेच शिकले आहेत.

रॉय हॅरिस आतां एकतीस वर्षांचा झाला होता. परदेशांतल्या वास्तव्याचें त्याचें हें शेवटचें वर्ष होतें. याच वर्षीं त्याला एक अपघात झाला आणि पाठीचा कणा मोडल्यामुळें त्याला सहा महिने हॉस्पिटलांत पडावें लागलें. युरोपियन संगीताचा अभ्यास अर्थातच थांबला. ऑपरेशन करून घेण्यासाठीं तो अमेरिकेंत आला. यांतून बरें व्हायला त्याला बरेच दिवस लागले. या आजारपणाच्या काळांत पाठीवर झोंपल्याझोपल्याच त्यानें एक 'स्ट्रिंग क्वार्टेट' रचना केली.

पिॲनोसमोर न बसतां त्यानें केलेली ही पहिलीच रचना होय. रॉय कुठेंहि असला तरी आतां संगीतलेखन करणें त्याला शक्य होत होतें. बरा झाल्यानंतर तो पाठीवर पिशवी टाकून रानांत जात असे. आणि तिथल्या शांततेंत तो संगीतलेखन करीत असे. पूर्वीपेक्षां दहा पट जलद आपण लेखन करूं शकतों असा आपला अनुभव त्यानें एकदां सांगितला होता. या अपघातामुळें आपण एकदम दहा वर्षांची प्रगति करूं शकलों असें त्याला वाटलें.

चार तंतुवाद्यें, पिॲनो आणि क्लॅरिनेट या वाद्यमेळासाठीं त्यानें लिहिलेला कॉन्सर्टो ऐकल्यावर पॉल रोझेम्फिल्ड या संगीत टीकाकारानें म्हटलें होतें कीं, ही रचना ऐकतांना मला गुराख्याच्या चमत्कारिक तिरप्या चालीची आठवण होते. हा कॉन्सर्टो कांहीं वर्षांनंतर जेव्हां रेडिओवरून ध्वनिक्षेपित झाला तेव्हां संगीतप्रेमी श्रोत्यांचीं अनेक पत्रें आलीं. एखादी रचना केल्यानंतर तिची व्यावहारिक बाजू संभाळण्याच्या बाबतींत हॅरिस कधींच मागें राहिला नाहीं. श्रोत्यांच्या पत्रांचा आलेला हा गठ्ठा त्यानें कोलंबिया फोनोग्राफ कंपनीच्या

चालकांना दाखविला. आणि या रचनेची ध्वनिमुद्रिका काढावी असें त्यांना सुचवलें. कंपनीनेंहि मान्यता दिली. ध्वनिमुद्रिका तयार झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत त्या सर्व विकल्या गेल्या.

ध्वनिमुद्रिकांसाठीं मागणी आल्यामुळें संगीतलेखन करणारा रॉय हॅरिस हा पहिला अमेरिकन संगीतलेखक होय. आर. सी. ए. व्हिक्टर कंपनीनें ध्वनिमुद्रणासाठीं त्याची रचना घेतली तेव्हां ही ध्वनिमुद्रिका बाजारांत येईपर्यंत कुठल्याहि ऑर्केस्ट्रानें ही रचना वाजवायची नाहीं अशी अट घातली होती. परंतु शिर्मरच्या प्रकाशनगृहाला छापण्यासाठीं ही रचना विकण्याची रॉयला परवानगी देण्यांत आली होती. या रचनेचें नांव 'अमेरिकन ओव्हर्चर' असें होतें. 'व्हेन जॉनी कम्स मार्चिंग होम' ही या रचनेची मध्यवर्ती कल्पना. ही रचना आपल्याला कशी स्फुरली हें सांगतांना रॉय हॅरिस म्हणाला होता:

"माझ्या वडिलांची ही फार आवडती चाल होती. आम्ही सगळे सकाळीं शेतावर कामावर जायला निघालों कीं माझे वडील मोठ्या उत्साहानें ही चाल शीळ घालून वाजवीत असत. आणि संध्याकाळीं कामावरून आम्ही परत निघालों म्हणजे माती तुडवीत संथपणें, थकून चालणाऱ्या घोड्यांच्या मागून जातांना माझे वडील पुन्हां हीच चाल शीळ घालून उदास, मलूलपणें वाजवीत असत."

प्रिन्स्टनमधील वेस्टमिनिस्टर क्वायर स्कूलमध्यें रॉय हॅरिस पांच वर्षें शिक्षक म्हणून राहिला. संगीतलेखन आणि संगीताची उपपत्ति हे दोन विषय तो शिकवीत असे. याच शाळेच्या भक्तिगीत-वृंदासाठीं रॉयनें 'सिंफनी फॉर व्हॉय्सेस्' ही रचना केली. याच गायकवृंदानें त्याची 'सॉंग फॉर ऑक्युपेशन्स' ही रचना सादर केली. ही रचना रॉयकडून लीग ऑफ कॉंपोझर्सनें लिहून घेतली होती.

बक्षिसें, शिष्यवृत्त्या आणि संगीत संस्थांकडून आलेली मागणी यांमुळें रॉयनें बहुतेक संगीतांतल्या 'मोठ्या प्रकारांचेंच' लेखन केलें. बोस्टन सिंफनी ऑर्केस्ट्राच्या उद्घाटनप्रसंगीं रॉय हॅरिसची थर्ड सिंफनी ही रचना सादर करायला कॉसेव्हित्झकी अतिशय उत्सुक होता. "अमेरिकेंत लिहिलेली ही पहिली महान् म्हणतां येईल अशी सिंफनी आहे" असें कॉसेव्हित्झकीचें मत होतें. टॉस्कॅनिनी या संगीतनिर्देशकानें अमेरिकन संगीतकारांच्या रचना फारच

क्वचित् सादर केल्या होत्या. परंतु त्यानें एन्. बी. सी. ऑर्केस्ट्रासाठीं रॉयची ‘थर्ड सिंफनी’ ही रचना मुद्दाम घेतली आणि आर. सी. ए. व्हिक्टर कंपनीनें ती ध्वनिमुद्रितहि केली. ही रचना ऐकल्यावर संगीताचे टीकाकार म्हणाले, “सरहद्द विभागांत राहाणाऱ्या माणसांचा ओबडधोबडपणा आणि जोम या दोन्ही गोष्टी रचनेंत जाणवतात. गवताळ प्रदेशांतली सकाळ ही जशी युरोपियन माणसाच्या अनुभवाबाहेरची गोष्ट आहे त्याप्रमाणेंच वर उल्लेखिलेले हे खास अमेरिकन गुणसुद्धां युरोपियन संगीतरचनांच्या कक्षेबाहेरचे आहेत असें वाटतें.” डॉर्सेसच्या जाझ ऑर्केस्ट्रासाठीं रॉयनें ‘फोर्थ सिंफनी’ ही रचना केली. ‘फेअरवेल टु पायोनिअर्स’, ‘फोकसॉंग सिंफनी’ या रचना त्यानें वृंदगायक आणि ऑर्केस्ट्रा यांच्यासाठीं केल्या. याशिवाय त्याच्या अनेक रचना आहेत. चित्रपटांनाहि त्यानें संगीत दिलें.

देशांत सर्वत्र रॉय हॅरिसच्या रचना आतां वाजवल्या जात होत्या. सगळीकडे फिरत आपल्या या रचना नुसत्या ऐकायच्या असें जरी त्यानें ठरवलें असतें तरी त्याचा वेळ सहज निघून गेला असता. परंतु रॉयची एकाग्रता ढळलेली नव्हती. ‘फिफ्थ सिंफनी’ आणि सेलोसाठीं एक कॉन्सर्टो लिहिण्याचे विचार त्याचा मनांत घोळत होते. केवळ एकाच संगीतकाराच्या रचनांनाच वाहिलेला असा दोन दिवसांचा संगीतमहोत्सव ही क्वचित् होणारी गोष्ट आहे. डेट्रॉइट शहरांत असा रॉय हॅरिसच्या रचना वाजवण्यासाठीं दोन दिवसांचा संगीत महोत्सव केला गेला. ऑक्लाहोमा या त्याच्या गांवीं त्रि–राज्य बॅंडस्पर्धेंत रॉय हॅरिसची सिमॅरॉन ही ‘टोन पोएम’ वाजवली गेली.

जोहाना हॅरिस ही पियानोवादिका रॉय हॅरिसची बायको. तिनें वाजविलेल्या रॉयच्या रचनांच्या ध्वनिमुद्रिका निघतात. रॉय हॅरिस संगीतावर व्याख्यानें देतो तेव्हां व्याख्यानांत येणारीं उदाहरणें त्याची बायको वाजवून दाखविते. न्यू यॉर्कमधील ‘ज्युलिअर्ड स्कूल ऑफ म्यूझिक’च्या संगीत शाखेचे रॉय आणि जोहाना दोघेंहि सदस्य होतीं. पण १९४९ पासून हीं दोघें नॅशव्हिल येथील शिक्षकांसाठीं असलेल्या ‘जॉर्ज पी बॉडी कॉलेजांत’ शिकवूं लागलीं आहेत.

रॉय हॅरिसची विनोदबुद्धि तल्लख आहे आणि संगीत ‘ऐकण्याची कला’ त्याच्याजवळ आहे. टेनिस आणि बुद्धिबळें हे त्याचे आवडते खेळ. मध्ययुगीन संगीताचा त्यानें विशेष अभ्यास केला आहे. बीथोव्हननंतर संगीताला

उतरती कळा लागली आहे असें मत त्यानें एकदां व्यक्त केलें होतें. वॅगनर, बर्लिऑझ, लिझ्ट् आणि रिचर्ड स्ट्रॉस यांचें संगीत त्याला आवडत नाहीं. भविष्यकाळांत नव्या क्लासिकल संगीताचें एक युग येणार आहे अशी त्याची श्रद्धा आहे.

अमेरिकन समाजाच्या प्रारंभकाळीं चर्चमध्यें जीं गाणीं गायिलीं जात त्यांच्या चालींच्या मध्यवर्ती कल्पना घेऊन रॉय हॅरिसनें आपल्या कांहीं रचनांची बांधणी केली आहे. या चर्चमधील संगीताचा आपल्या पवाड्यांवर आणि नृत्यसंगीतावर फार मोठा परिणाम झाला आहे असें त्याचें मत आहे. या वसाहतकालांतच त्याचें कुटुंब सरहद्द विभागांत स्थायिक होण्यासाठीं आलेलें असल्यामुळें वसाहतकालीन जीवन आणि संगीत यांविषयींचे त्याचे पुढील विचार उद्बोधक ठरतील.

"सरहद्द विभागांतील सर्व वसाहतकालीन सामाजिक चळवळी चर्चभोंवतींच केंद्रित झाल्या होत्या. चर्चमध्यें समाज उपासनेसाठीं जमून एकत्र प्रार्थना करीत असे, एकत्र गात असे. त्यांच्या प्रार्थना, त्यांचं संगीत यांत तळमळ होती, साधेपणा होता. सूर्याच्या तापानें पिकं सुकूं लागलीं कीं ते सगळे पाऊस पडावा म्हणून प्रार्थना करीत. कडक हिंवाळ्याच्या निःस्तब्धतेंत अन्न आणि आसरा दिल्याबद्दल ईश्वराचे आभार मानीत. घोड्यावरून आणि घोड्यांच्या गाड्यांतून दूरदूरच्या अंतरावरून ते एकत्र येत. हीं सगळीं माणसं स्थलांतर करून आलेलीं होतीं, मूळ वस्तीच्या ठिकाणापासून दीर्घकाळ वेगळीं झालीं होतीं, त्यामुळें त्यांच्यांत एकप्रकारचा अवघडलेपणा, बुजरेपणा आला होता. असा हा समाज एकत्र येऊन गाऊं लागला कीं त्यांच्या हृदयांची दबलेली भूक त्यांच्या गाण्यांतून उचंबळून व्यक्त होई. शेतावर ते मेहनत करीत असतांना त्यांच्या स्मरणांत हीं गाणीं ताजीं असत, त्यांतून त्यांच्या मनाला एकमेकांविषयींच्या जिव्हाळ्याची ऊब मिळे. अमेरिकनांच्या रक्तांत या गाण्यांची लय भिनलेली असल्यास आश्चर्य नाहीं. ओल्ड ब्लॅक ज्यो, स्वानी रिव्हर, आय् हॅव बीन वर्किंग ऑन धी रेलरोड, देअर इज अ लाँग, लाँग ट्रेल या अमेरिकेंत लोकप्रिय झालेल्या गीतांतहि चर्चमधल्या त्या जुन्या गाण्यांची लय आणि भावना उमटलेल्या असल्याचं दिसून येतं. आजहि समारंभाच्या शेवटीं या चाली सांघिकरीत्या गायिल्या जातात."

आरॉन कॉपलॅंड म्हणतो कीं, रॉय हॅरिस हा उपजत स्वतंत्र शैली घेऊन जन्माला आलेला कलावंत आहे. रॉय हॅरिस आणि कॉपलॅंड यांचें संगीत ऐकतांना मॅक्डुवेलनें अमेरिकन संगीतांत जे गुण हवे होते असें म्हटलें होतें ते गुण उमटूं लागल्याचें आपल्याला दिसतें.

नॅशव्हिल येथील संगीताच्या सर्व प्रकारच्या चळवळींत आणि कार्यक्रमांत रॉय हॅरिस उत्साहानें भाग घेत असतो. तो संगीत तर शिकवतोच, रेडिओ साठीं लिहितो, वृत्तपत्रांतून संगीतावर लेख लिहितो, संगीत कसें चांगलें ऐकावें हें लोकांना समजावें यासाटीं व्याख्यानें देतो, त्यानें लिहिलेली 'सिक्सथ् सिंफनी' प्रथम १९४४ मध्यें सादर केली गेली. रॉय हॅरिसच्या संगीतांतून कसली तरी एखादी वैचारिक जाणीव व्यक्त होते असें अनेकांना वाटतें. उदाहरणार्थ, त्याच्या रचनेंतील स्वरांचीं चक्रावर्तनें समाजाची वाढ प्रतीकानें सुचवतात. त्याचप्रमाणें रॉयचें संगीत हें 'दृश्य संगीत' असतें. लोकांना समजेल असें सौंदर्य निर्माण करण्यापेक्षां गुंतागुंतीची बंदीश साधण्यावर त्याचा भर असतो. त्यामुळें उत्तम शिक्षण घेतलेल्या संगीतकारांनाच या रचना आवडूं शकतात. सामान्य श्रोत्याला त्या समजणें, त्यांचें सौंदर्य जाणवणें कठीण होऊन बसतें. पिॲनोसमोर न बसतां तो आपलें लेखन करीत असल्याचा हा कदाचित् परिणाम असेल. पण असें म्हणतांना संपूर्णपणें बहिरा झाला असतांहि बीथोव्हन सौंदर्यानें ओथंबलेल्या रचना करूं शकत असे ही गोष्ट इथें ध्यानांत घेतली पाहिजे.

रॉय हॅरिस

जन्म : लिंकन काउंटी, ऑक्लाहोमा

१२ फेब्रुवारी १८९८.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ..........
क्रमांक .................... नों दि ..........

## आरॉन कॉपलँड

**“कुठलीहि कला हें मानवजातीचें एक वैभव असतें. उत्कटतेनें, चोखंदळपणें आपली सर्व बुद्धि एकवटून आपण या कलेचा आस्वाद घेतला पाहिजे. कलेच्या विकासासाठीं कमींत कमी एवढी गोष्ट आपण केली पाहिजे.”**

*—आरॉन कॉपलँड*

विसाव्या शतकाच्या सुरवातीला कॉपलँड नांवाचें रशियन ज्यू जोडपें न्यू यॉर्क राज्यांतील ब्रुकलिन येथें येऊन स्थायिक झालें. ब्रुकलिन येथेंच त्यांचा मुलगा आरॉन याचा जन्म झाला. तो पुढें संगीतकार झाला.

आरॉन कॉपलँड जेव्हां जन्माला आला तेव्हां जॉर्ज जर्श्विन आणि रॉय हॅरिस हे दोन वर्षांचे होते. अर्व्हिंग बर्लिन त्या वेळीं बारा वर्षांचा होता, आणि रस्त्यांतून वर्तमानपत्रें विकीत शाळेंत तुटपुंजें शिक्षण घेत होता. जेरोम कर्न आणि डीम्स टेलर तेव्हां पंधरा वर्षांचे होते. यांच्यापैकीं कुठल्याहि मुलाला आपण पुढें संगीतकार होणार आहोंत या गोष्टीची कल्पनाहि नव्हती.

आरॉन पब्लिक स्कूलमध्यें जाऊं लागला. तेरावें वर्ष लागण्याच्या आंतच त्यानें पिॲनो शिकायला सुरवात केली. लौकरच त्याला आपण नवीन स्वर-रचना कराव्या असें वाटूं लागलें. शाळेंतून बाहेर पडल्यानंतर हार्मनी आणि काउंटर पॉइंट यांचा अभ्यास करायला सुरवात केली. रूबिन गोल्डमार्ककडे तो शिकत होता. याच शिक्षकाकडे जर्श्विन पुढें बऱ्याच वर्षांनंतर हार्मनी

आणि ऑर्केस्ट्रेशन शिकण्यासाठीं राहिला होता. ज्या वर्षी आरॉन कॉपलँडनें हार्मनीचे धडे घ्यायला सुरवात केली त्याच वर्षापासून जाझ संगीत लोकप्रिय व्हायला सुरवात झाली होती.

चार वर्षांनंतर फ्रान्समध्यें फॉंटेनब्ल्यू येथील अमेरिकन कॉंझरवेटरींत शिक्षण घेण्यासाठीं अमेरिकेंतील विद्यार्थ्यांचा जो पहिला गट गेला त्यांत आरॉन होता. त्या काळांत फ्रान्समध्यें जाणारा संगीताचा विद्यार्थी नाडिया बॉलॉंजर हिच्याकडे शिकला नाहीं असें सहसा होत नसे. आरॉन तिच्याकडे शिकूं लागला. यानंतर कांहीं वर्षांनीं रॉय हॅरिसहि तिच्याकडे शिकूं लागला.

फ्रान्समध्यें शिकत असतांनाच पिॲनोसाठीं आरॉननें 'द कॅट अँड द माउस्' ही रचना केली होती. फॉंटेनब्ल्यू येथें ती सादर केली गेली आणि फ्रान्समध्यें ती प्रकाशितहि झाली.

शिक्षणासाठीं म्हणून आरॉन तीन वर्षें फ्रान्समध्यें राहिला. या काळांत त्यानें खूपच प्रगति केली असणार. कारण तीन वर्षांच्या शेवटीं 'सिंफनी फॉर ऑर्गन अँड ऑर्केस्ट्रा' ही मोठी रचना त्याच्या मनांत घोळत होती. वयाच्या चोविसाव्या वर्षी, जून महिन्यांत कॉपलँड अमेरिकेला परत आला. पेनसिल्व्हानियांतील मिलफोर्ड येथील एका हॉटेलांत पिॲनोवादकाची नोकरी त्यानें पत्करली. या हॉटेलांत येणाऱ्या गिऱ्हाइकांचें मनरंजन करण्यासाठीं तीन वादक ठेवलेले होते. कॉपलँड त्यांच्याबरोबर वाजवूं लागला. परंतु या कामांत खूप वेळ जाऊं लागल्यामुळें त्याच्या स्वतंत्र लेखनांत अडथळे येऊं लागले. त्याच्या डोक्यांत घोळत असलेली सिंफनी त्याला शक्य तितक्या लौकर लिहायची होती. कारण त्याची शिक्षिका नाडिया बॉलॉंजर ही अमेरिकेंत येणार होती. ती स्वतः उत्तम ऑर्गन वाजवणारी असल्यामुळें या रचनेचा ती आपल्या कार्यक्रमांत अंतर्भाव करूं शकेल असें आरॉनला वाटत होतें. ही संधि चुकवण्यासारखी नव्हती. हॉटेलांत पिॲनो वाजवण्याची नोकरी आरॉननें सोडून दिली आणि तो सिंफनी लिहायला एकाग्रतेनें बसला.

बोस्टन येथें झालेल्या कार्यक्रमांत मादाम बॉलॉंजर हिनें जेव्हां ही रचना वाजवून दाखवली तेव्हां एक गंमतीदार घटना घडली—ही घटना अर्थातच श्रोत्यांच्या दृष्टीनें गंमतीदार होती, कलावंताच्या दृष्टीनें नव्हे ! स्टेजवर बोस्टन सिंफनी ऑर्केस्ट्रा दिसत होता. या ऑर्केस्ट्राचें निर्देशन कॉसेव्हित्झकी करीत

होता. ऑर्गनसमोर मादाम बॉलाँजर बसली होती. या नव्या तरुण संगीतकाराविषयीं प्रेक्षागृहांत वाटलेल्या पत्रिकांत माहिती वाचल्यामुळें श्रोते आदरपूर्ण उत्सुकतेनें कार्यक्रम ऐकत होते. इतक्यांत एक चमत्कारिक क्षण आला. ऑर्गनचा एक लागलेला सूर बदलेचना. तो सारखा पुन्हां पुन्हां वाजूं लागला. बाकीचीं सगळीं वाद्यें दुसऱ्या हार्मनीकडे वळलीं होतीं. ऑर्गनचा हा सूर मात्र मोठ्यानें तसाच वाजत राहिला. मग ऑर्केस्ट्रा थांबला. ऑर्गनचा फक्त सूरच वाजत राहिला. मादाम बॉलाँजरनें कॉसेव्हित्झकीला खूण केली—आतां काय करायचें? कांहीं तरी केलेंच पाहिजे—अगदीं तातडतोब. कारण मोठ्यानें वाजत राहणारा तो एकच सूर आतां असह्य होऊं लागला होता. ऑर्गनमध्यें कांहीं बिघाड होता हें उघड होतें. क्षणार्धांत मादाम बॉलाँजर ऑर्गनपुढून उठली आणि स्टेजवरून दिसेनाशी झाली. कॉसेव्हित्झकी शांतपणें उभा होता. कांहीं क्षणांतच ऑर्गनचा तो सूर थांबला. त्या स्वराइतकीच तीव्र शांतता क्षणभर पसरली. मादाम बॉलाँजर स्टेजवर परत आली आणि ऑर्गन वाजवायला बसली. टाळयांचा कडकडाट व्हावा असा तो प्रसंग होता. सिंफनी सुरू झाली. हा प्रकार चालू असतांना आरॉननें ते क्षण कसे घालवले असतील हें परमेश्वरालाच ठाऊक! सिंफनीचा हा कार्यक्रम संपल्यावर मात्र त्याचें खूपच कौतुक झालें.

यानंतर लौकरच आरॉनला असेकाड गगनहाय्म फेलोशिप ही शिष्यवृत्ति दोन वर्षांसाठीं मिळाली. ही शिष्यवृत्ति मिळणारा तो पहिला अमेरिकन संगीतकार. यानंतर अनेक संस्थांकडून त्याला संगीत लिहिण्यासाठीं मागणी येऊं लागली. एकामागून एक नव्या रचना तो करूं लागला.

आरॉनच्या संगीतावर आतां जाझचा परिणाम दिसूं लागला होता. वुईमेन्स युनिव्हर्सिटी ग्ली क्लबच्या मागणीवरून त्यानें केलेल्या रचनेंत आरॉननें जाझचा पहिला जाणीवपूर्वक उपयोग केल्याचें दिसून येतें. यानंतर त्यानें लीग ऑफ कंपोझर्सकडून मागणी आल्यामुळें 'म्यूझिक फॉर द थिएटर' या 'स्वीट'ची छोट्या ऑर्केस्ट्रासाठीं रचना केली. यानंतर त्यानें पिआनोसाठीं 'जाझ कॉन्सर्टो' लिहिला. हा कॉन्सर्टो बोस्टन सिंफनी ऑर्केस्टानें सादर केला तेव्हां आरॉन स्वतः पिॲनो वाजवायला बसला होता.

या सगळया रचनांमुळें कॉपलँडला आतां अधिकाधिक मान्यता मिळूं लागली होती. उत्साही टीकाकारांनीं 'खराखुरा अमेरिकेचा संगीतकार' असें त्याचें

वर्णन केलें होतें. "स्ट्रॉव्हिन्स्कीनें 'नोसेस' मध्यें रशियन लोकसंगीताच्या बाबतींत, चॉपिननें 'माझुरका'च्या बाबतींत, बाकनें गव्होटेस आणि मिन्युएट्-सच्या बाबतींत जी कामगिरी केली तीच कामगिरी कॉपलँडनें जाझ संगीताचा उपयोग करतांना केली" असें एका टीकाकारानें म्हटलें आहे. कॉपलँडनें जाझ संगीताची मोडणी वरच्या पातळीवर नेली.

आर. सी. ए. व्हिक्टर कंपनीनें सिंफनीसाठीं पंचवीस डॉलर्सचें बक्षीस जाहीर केलें होतें. अनेक अमेरिकन संगीतकारांनीं यांत भाग घेतला होता. आरॉन कॉपलँड 'सिंफनिक ओड' ही रचना या स्पर्धेसाठीं करीत होता. परंतु ठरलेल्या मुदतीच्या आंत ही रचना पुरी होईलसें त्याला दिसेना. तेव्हां त्यानें फ्रान्समध्यें असतांना केलेल्या रचनांची एक बंदीश साधून तिला 'डान्स सिंफनी' असें शीर्षक दिलें. स्पर्धेत या डान्स सिंफनीला एक-पंचमांश बक्षीस मिळालें. उरलेलें बक्षीस अर्न्स्ट ब्लॉक, लुइस ग्रुएनबर्ग आणि रसेल बेनेट यांना मिळालें. पैकीं बक्षिसाचा दोन–पंचमांश भाग रसेल बेनेटला मिळाला. यानंतर त्यानें कांहीं दिवसांनीं 'सिंफनिक ओड' ही आपली रचना पूर्ण केली. ती लिहायला त्याला एकूण दोन वर्षें लागलीं. बोस्टन सिंफनी ऑर्केस्ट्रानें त्याची ही रचना सादर केली. जर्मनी, न्यू मेक्झिको, फ्रान्स इत्यादि ठिकाणीं फिरत असतांनाच सिंफनिक ओडवरहि तो काम करीत होता.

'एल् सॅलोन मेक्सिको' ही रचना त्याला तो मेक्सिकोच्या प्रवासाला गेला असतांनाच स्फुरली. तिथलीं नृत्यें त्यानें पाहिलीं, गाणीं ऐकलीं आणि प्रवा-शाच्या दृष्टिकोनांतून जन्मलेला मेक्सिको 'एल. सॅलोन मेक्सिको' या रचनेंतून उभा केला. मेक्सिकोमधलें संगीत ऐकत असतांना त्यानें आपल्या वहींत कसलीहि नोंद करून घेतली नव्हती. याचें कारण त्याच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे, "मीं तिथें संगीत ऐकलं नव्हतं. तिथल्या लोकांचा आत्मा मला जाणवला. त्यानेंच मी आकृष्ट झालों."

भविष्यकाळांत टिकायचें असेल तर कुठल्याहि संगीतकारानें पुढच्या पिढीला आवडेल असें संगीत निर्माण केलें पाहिजे असें त्याला वाटलें आणि म्हणून त्यानें 'द सेकंड हरिकेन' हा ऑपरेटा मुलांसाठीं लिहिला. आठपासून एकोणीस वर्षांपर्यंतच्या मुलांनीं शाळेंतल्या समारंभांत करण्यासाठीं त्यानें तो लिहिला होता. या ऑपरेटाचा पहिला प्रयोग न्यू यॉर्कमध्यें सादर केला गेला आणि

तो यशस्वीहि झाला. आपल्या समकालीन कलावंतांच्या रचना लोकांसमोर याव्यात असा प्रयत्न करणारा, त्यासाठीं आपला वेळ आणि शक्ति खर्च करणारा आरॉन कॉपलँड हा संगीतकार आहे. श्रमांची पराकाष्ठा करून एखाद्या संगीतकारानें कलाकृति निर्माण केली—पण ती जर लोकांपुढें आलीच नाहीं तर तिचा काय उपयोग ? कॉपलँडनें 'रॉजर सेशन्स' या दुसऱ्या संगीतकाराचें सहकार्य मागितलें आणि इतर कलावंतांच्या संगीताच्या नव्या रचना लोकांना ऐकवण्यासाठीं तो जलसे करूं लागला. गंभीर संगीत लिहिणाऱ्या कलावंतांनीं काय काय निर्माण केलें आहे, या क्षेत्रांत नवें काय चाललें आहे हें लोकांना या योगानें कळेल असें आरॉन कॉपलँड म्हणत असे.

अलीकडे रेडिओ आणि सिनेमा यांच्याच कक्षेंत बहुतेक श्रोते येतात. एल्. सॅलोन मेक्सिको ही कॉपलँडची रचना एन्. बी. सी. ऑर्केस्ट्रानें रेडिओवर सादर केली. 'बिली, द किड' ही कॉपलँडची नृत्यनाट्य संगीताची रचनाहि प्रथम याच ऑर्केस्ट्रानें रेडिओवरून सादर केली. द सिटी, अवर टाउन, आणि ऑफ माइस अँड मेन या सिनेमांना कॉपलँडनें संगीत दिलें आहे.

सध्यां रेडिओ आणि सिनेसृष्टि यांनीं देशांतल्या संगीतकारांना आश्रय दिला आहे. अमेरिकेंत संगीताला आश्रय नसल्यामुळें तिथल्या संगीताची व्हावी तशी प्रगति होत नाहीं असें व्हिक्टर हर्बर्ट आणि कांहीं संगीताच्या इतिहासकारांना वाटत असे.

कॉसेव्हित्झकीनें कॉपलँडची 'थर्ड सिंफनी' १९४६ सालीं प्रथम सादर केली. तो म्हणाला, "मला शंका नाहीं. अमेरिकेंत लिहिली गेलेली ही सर्वश्रेष्ठ सिंफनी आहे." व्हर्जिल थॉमसन या दुसऱ्या एका अमेरिकन संगीतकारानेंहि थर्ड सिंफनी ही एक श्रेष्ठ रचना असल्याचें म्हटलें होतें. कॉसेव्हित्झकीनें कॉपलँडचा जाझ कॉन्सर्टो जेव्हां प्रथम सादर केला तेव्हां याच्या अगदीं उलट प्रतिक्रिया झाली. ही रचना ऐकतांना बोस्टनमधले बरेच श्रोते चिडले. अशा तऱ्हेचे कर्कश आवाज ऐकवून आमचा अपमान केला गेला असाहि कांहीं श्रोत्यांनीं आरोप केला. विसंवादी मानल्या गेलेल्या स्वरांच्या संघटनेंतून साधलेली बंदीश ऐकायची लोकांच्या कानांना संवय नाहीं. त्यामुळें असें संगीत त्यांना चमत्कारिक लागणार याची कॉपलँडला जाणीव आहे. परंतु कॉपलँडला स्वरांची अशी बंदीश नैसर्गिक वाटते. हे स्वर ऐकून मोझार्टनें कदाचित् संतापानें आपले केस

उपटले असते—पण आतां लोकांना ते स्वर ऐकण्याची संवय होऊं लागली आहे. विसंवादी स्वरांतून बंदीश साधण्याचा हा प्रयत्न आपल्या लोकप्रिय संगीताप्रमाणेंच गंभीर संगीतांतहि दिसूं लागला आहे.

'ॲपोलाशियन स्प्रिंग' या कॉपलँडच्या नृत्यनाट्याच्या संगीतरचनेबद्दल त्याला पुलित्झर पारितोषिक मिळालें. धी रेड पोनी या त्यानें मुलांसाठीं लिहिलेल्या 'स्वीट'मधून एका हॉलिवूड चित्रपटाला स्फूर्ति मिळाली.

कॉपलँड लहान असतांना त्याला संगीत शिकवण्यासाठीं पैसे खर्च करायला त्याची आई तयार नव्हती. कारण आरॉनच्या अगोदरच्या चार भावंडांसाठीं तिनें संगीत-शिक्षणावर पैसे खर्च केले होते, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नव्हता. यामुळें आरॉन तेरा वर्षांचा होईपर्यंत त्याला संगीताचें शिक्षण मिळूं शकलें नाहीं. आरॉनच्या संगीतशिक्षणावर आपण जे पैसे खर्च केले ते फुकट गेले नाहींत याचें प्रत्यंतर पुढें कांहीं वर्षांनीं त्या माउलीला आलें.

आरॉन कॅपलँड
जन्म : ब्रुकलिन, न्यू यार्क येथें
१४ नोव्हेंबर १९००

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों. वि: ........................

## जॉन ॲल्डन कार्पेंटर

जॉन ॲल्डन कार्पेंटर याचा जन्म पार्क रिन इलिनॉय येथें १८७६ सालीं झाला. एकोणिसाव्या शतकांतल्या पहिल्या तीस वर्षांत कार्पेंटरच्या रचना जेव्हां सर्वत्र ऐकूं येत असत, त्या काळांत तो आघाडीचा संगीतकार म्हणून ओळखला जाई. व्यवसायानें तो व्यापारी होता. १६२० च्या नोव्हेंबर महिन्यांत प्लायमाउथमध्यें येऊन स्थायिक झालेल्या जॉन ॲल्डनच्या वंशांतल्या या कलावंताला संगीताची अभिरुचि त्याच्या आईकडून लाभली. संगीत लेखनाचा अभ्यास करण्यापूर्वीच त्यानें स्वरांकन असलेलें पुस्तक पुढें न ठेवतां कल्पनेनेंच स्वतंत्रपणें वाजवण्याचा प्रयत्न केला होता.

शाळेंत असतांना त्याला संगीताचे चांगले शिक्षक लाभले. सतराव्या वर्षीं त्यानें हार्वर्ड कॉलेजांत प्रवेश केला. आणि संगीतांतले सर्व विषय अभ्यासासाठीं निवडले. तिथें तो जॉन नॉलेस पेन या संगीतकाराकडे संगीत-लेखन शिकूं लागला. इथल्या संगीताच्या पदवी-परीक्षेंत उच्च श्रेणींत प्रावीण्य मिळवून तो घरीं परत आला आणि वडिलांच्या व्यापारी कंपनींत काम करूं लागला. त्याच्या वडिलांची ही कंपनी गिरण्या, रेल्वे आणि जहाजें यांना माल पुरवीत असे.

आपल्या व्यवसायांतलें हें काम यशस्वी रीतीनें करीत असतांनाच जॉन कार्पेंटर संगीतलेखन आणि त्याचा अभ्यास करीतच होता. उपार्जनाचा

व्यवसाय आणि कलेची साधना या दोन्ही गोष्टींकडे तो लक्ष देत असे. एकदां रोमला गेला असतांना इंग्लंडमधला संगीतलेखक एडवर्ड एल्गर त्याला भेटला. एल्गरच्या संगीताचा तो मोठा चाहता होता. एल्गर आपण संगीताचे शिक्षक आहोंत असें मानीत नसे. जॉन कार्पेंटरनें त्याची मनधरणी केली. आणि कांहीं काळ तो त्याच्याकडे शिकला. कार्पेंटर बत्तीस वर्षांचा असतांना त्याची आणि बर्नहार्ड झायूहन याची भेट झाली. बर्नहार्ड हा स्वतः शिक्षक होता, त्याचप्रमाणें हार्मनी आणि संगीतशास्त्रांतील उपपत्ति यांचा लेखक म्हणूनहि प्रसिद्ध होता. "बर्नहार्डकडून मला जें शिक्षण आणि जी स्फूर्ति मिळाली तशी पूर्वीं कुणाकडूनच मिळाली नव्हती." असें त्याच्याविषयीं जॉन कार्पेंटरनें म्हटलें आहे.

कर्ट शिंडलर या व्हायोलिन-सेलोवादकानें कार्पेंटरनें केलेल्या कांहीं रचना शिर्मरच्या प्रकाशनगृहाकडे आणून दिल्या. इथून कार्पेंटरच्या यशाला सुरवात झाली असें म्हणायला हरकत नाहीं. रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजलींतील कवितांवर आधारलेलीं त्याचीं सहा गाणीं यानंतर प्रसिद्ध झालीं. या काळांत रवींद्रनाथांच्या प्रतिभेनें जगांतल्या रसिकांवर खोल परिणाम केला होता. या गीतांना कार्पेंटरनें दिलेल्या चालींचें खूप कौतुक झालें. याच्या पुढच्या वर्षीं त्याची पहिली आणि सर्वोत्कृष्ट अशी ऑर्केस्ट्रासाठीं केलेली रचना सादर केली गेली. 'अॅडव्हेंचर्स इन् अ पेरॅम्ब्युलेटर' या त्याच्या रचनेंतील विनोदानें श्रोते प्रसन्न झाले. या रचनेंतली मध्यवर्ती कल्पना मोठी गमतीची आहे. शहरांतल्या बागेंत एका लहान मुलाला त्याची दाई बाबागाडींत घालून फिरवते. बाबागाडींतून फिरणाऱ्या या मुलाला फिरतांना कोणकोणत्या संवेदना होत असतील याची स्वरांच्या द्वारें कार्पेंटरनें अभिव्यक्ति केली आहे. या रचनेनंतर कार्पेंटर सतत नवीन नवीन रचना करीत राहिला.

टिन पॅन अॅली विभागांतून आतां जाझ संगीत बाहेर पडूं लागलें होतें. कार्पेंटर हा रॅग्टाइम् संगीत लिहिणारा नव्हता. परंतु इतर संगीतकारांप्रमाणेंच या जोमदार आणि खऱ्याखुऱ्या अमेरिकन संगीतप्रकाराचा त्याच्यावरहि परिणाम झाला.

अमेरिकेंत वसाहत करण्यासाठीं म्हणून जीं पहिलीं माणसें आलीं तीं मेफ्लॉवर या नांवाच्या जहाजांतून आलीं होतीं. हें जहाज ज्या दिवशीं

किनाऱ्याला लागलें त्याच्या तीनशेंव्या वाढदिवसासाठीं कार्पेंटरकडे एका संगीतरचनेची मागणी लिओपोल्ड स्टॉकॉव्स्की या संगीतनिर्देशकानें केली. या मागणीनुसार कार्पेंटरनें केलेली 'ए पिलग्रिम व्हिजन' ही रचना १९२० सालीं फिलाडेल्फिआ सिंफनी ऑर्केस्ट्रानें सादर केली.

नृत्यनाट्यासाठीं संगीत लिहावें असें कार्पेंटरला आतां वाटूं लागलें होतें. यासाठीं विषय शोधावा म्हणून तो आतां विनोदी मासिकें चाळूं लागला होता. शेवटीं त्याला विषय सुचला आणि त्यानें 'क्रेझी कॅट' हें आपलें दुसरें नृत्यनाट्य लिहिलें. १९१७ च्या बोल्शेव्हिक क्रांतीनंतर अनेक रशियन नर्तक आणि कलावंत पळून अमेरिकेंत आले होते. त्या वेळीं हें नृत्यनाट्य सादर केलें गेलें. डायाघिलेफ या रशियन बॅलेंच्या प्रसिद्ध निर्मात्याला ॲडॉल्फ बॉंत्र या नर्तकानें सादर केलेला 'क्रेझी' फार आवडला. अमेरिकेच्या गजबजलेल्या, धावपळीच्या जीवनाचें दर्शन घडवणारें नृत्यनाट्य कार्पेंटरनें आपल्याला लिहून द्यावें अशी त्यानें मागणी केली. यानंतर दोन वर्षांनीं कार्पेंटरनें 'स्कायस्क्रेपर्स' हें नृत्यनाट्य लिहिलें. अमेरिकेंत आणि युरोपमध्येंहि त्याचे यशस्वी प्रयोग झाले.

मॅक्डुवेलला अमेरिकन समाजांतलें असीम चैतन्य अमेरिकन संगीतांतून पुढेंमागें व्यक्त होईल असें वाटत होतें. कार्पेंटरच्या संगीतांतून तें व्यक्त झालेलें दिसतें. कार्पेंटर एकदां म्हणाला होता, "सध्यां अमेरिकेंत निर्माण होणारें संगीत (त्याला जाझ हें लेबल लावण्याचें मी मुद्दाम टाळतों आहें) हें अतिशय उत्स्फूर्त, अत्यंत व्यक्तिगत आणि वैशिष्ट्यपूर्ण असें आहे. हे गुण लक्षांत घेतां संगीताच्या क्षेत्रांतली अत्यंत महत्त्वाची अशी अभिव्यक्ति अमेरिकेनें साधली आहे असें मला खात्रीपूर्वक म्हणावेंसें वाटतें.

१९५१ सालीं वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीं कार्पेंटरचा मृत्यु झाला. अलीकडे त्यानें केलेल्या रचना फारशा ऐकूं येत नाहींत असें जरी असलें तरी कार्पेंटरच्या काळांत त्या महत्त्वाच्या मानल्या जात. संगीताच्या इतिहासांत एखादी टिकून राहणारी अशी शैली निर्माण होण्याच्या आधीं वेगवेगळ्या शैलींचें अनेक बदलते प्रवाह निर्माण होतात असें दिसतें. काळ बदलला कीं हें संगीत फारसें वाजवलें जात नाहीं, ग्रंथालयांतल्या कपाटांतच तें पडून राहतें—पण म्हणून तें महत्त्वाचें नव्हतें किंवा त्या कालांतल्या संगीतांत त्यामुळें भर पडली नाहीं असें मानणें चुकीचें होईल.

आपल्या मृत्यूच्या आधीं कांहीं वर्षें कार्पेंटरनें अमेरिकन संगीताविषयीं पुढील उद्‌गार काढले होते, "अमेरिकन संगीत आतां आपल्या पायांवर उभें आहे. परदेशांतल्या किंवा परदेशांतून आश्रयासाठीं अमेरिकेंत आलेल्या संगीतकाराचा यापुढें या संगीतावर परिणाम होणार नाहीं अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत."

## डीम्स टेलर

डीम्स टेलरचा जन्म न्यू यॉर्कमध्यें झाला, तिथेंच तो वाढला. कॉलेजमध्येंच असतांना त्यानें चार विनोदी ऑपेरांसाठीं संगीत लिहिलें होतें. त्या वेळीं तो हार्मनी किंवा संगीतलेखन शिकलेलाहि नव्हता--पिआनोचे कांहीं धडे त्यानें घेतले होते एवढेंच. डीम्स टेलर वृत्तपत्रव्यवसायांत शिरला. त्यानें संगीतलेखनाचा आणि ऑर्केस्ट्रेशनचा अभ्यास केला. कॉलेजमधून बाहेर पडल्यानंतर दोन वर्षांनीं त्यानें फक्त दहा महिने हार्मनी आणि काउंटरपॉइंट यांचें शिक्षण घेतलें. चार वर्षांनंतर 'द सायरन् साँग' या त्यानें केलेल्या सिंफनी गीतानें त्याला लोकमान्यता मिळवून दिली.

त्या काळांत अमेरिकन संगीतकारांना आपल्या रचनांना लोकांपुढें येण्यास वाव मिळत नाहीं असें वाटे. कारण ऑर्केस्ट्रांचे संयोजक नवें अमेरिकन संगीत स्वीकारण्यापेक्षां परदेशीय संगीत सादर करणेंच पसंत करीत. परंतु अशा काळांतहि डीम्स टेलरच्या नव्या रचना सादर केल्या गेल्या आणि त्या यशस्वीहि झाल्या. ऑर्केस्ट्रांचे निर्देशक युरोपियन संगीत पसंत करीत असत याबद्दल केवळ त्यांनाच दोष देतां येणार नाहीं. असें होण्याचीं दोन कारणें होतीं: एक म्हणजे अमेरिकन संगीताची परंपरा युरोपियन होती आणि दुसरें म्हणजे अमेरिकन कलावंतांनीं निर्माण केलेल्या कलाकृतींबद्दल समाजाला फारसा विश्वास वाटत नसे. पहिलीं दोन शतकें अमेरिकन समाज आपलें हें नवराष्ट्र मोठ्या प्रमाणावर उभारण्यांत-

या पृथ्वीवर ज्याला तोड नाहीं अशा मोठ्या प्रमाणावर उभारण्यांत—मग्न होता. बाकीचें जग हें राष्ट्र अजून तरुण आहे असें अमेरिकेला सतत सांगत असल्यामुळें आपली कलांच्या बाबतींतली अभिरुचि विश्वसनीय आहे असें स्वाभाविकच अमेरिकनांना वाटत नव्हतें. परंतु विसाव्या शतकाबरोबरच अमेरिकेंत एक नवी जागृति आली. कलेच्या क्षेत्रांत नवी भर घालण्याजोगें आपल्याला खूप कांहींतरी आहे याची जाणीव अमेरिकेंतल्या संगीतकारांना, चित्रकारांना आणि लेखकांना झाली. एकोणिसाव्या शतकांत अनेक अमेरिकन लेखक चांगलें नांवाजले आणि विसाव्या शतकांत अमेरिकेंतले संगीतकार भराभर प्रगति करूं लागले, अमेरिकन संगीताचें महत्त्व प्रस्थापित होऊं लागलें.

'थ्रू द लुकिंग ग्लास' हा टेलरनें ऑर्केस्ट्रासाठीं लिहिलेला 'स्वीट' लंडन आणि पॅरीस इथेंहि सादर केला गेला. सिंफनी ऑर्केस्ट्रांच्या संग्रहांतली ही एक महत्त्वाची चीज होऊन बसली. थिएटर, सिनेमा, ग्रँड ऑपेरा यांच्यासाठींहि टेलरनें संगीत लिहिलें. मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउस येथें १९२७ सालीं टेलरची 'द किंग्ज हेंचमन' ही कलाकृति सादर केली गेली. हा ऑपेरा अतिशय यशस्वी झाला. हा ऑपेरा टेलरनें लिहिला तेव्हां अमेरिकन समाजांत अमेरिकन ऑपेरांविषयीं आस्था निर्माण झालेली होती. मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउसच्या संचालकमंडळानें टेलरला ऑपेराचें संगीत लिहिण्याची विनंति केली. सुप्रसिद्ध कवयित्री एडना सेंट व्हिल्सेंट मिले हिनें एक मध्ययुगीन कथा घेऊन टेलरच्या विनंतीनुसार हा ऑपेरा लिहून दिला. त्याचें संगीतनियोजन टेरलनें केलें.

मासिकांचें संपादन, संगीताचीं वृत्तपत्रांतून परीक्षणें लिहिणें, रेडिओसाठीं निवेदक म्हणून काम करणें, गद्य आणि पद्य साहित्य यांचें भाषांतर करणें इत्यादि अनेक प्रकारचीं कामें संगीतलेखनाबरोबरच टेलरनें केलेलीं आहेत. तो एके ठिकाणीं म्हणाला होता, "अमेरिकेंत जसे कांहीं श्रेष्ठ संगीतकार निर्माण होतील त्याचप्रमाणें अत्यंत सामान्य दर्जाचे संगीतकार इथें दिसतील. अमेरिकेंत लोकप्रिय होणें अतिशय सोपें झाल्यामुळें या सामान्य दर्जाच्या संगीतकारांना वाव मिळेल. फारसे गुण नसतांनाहि सामान्य प्रतीचें संगीत लिहून गर्दीला खूष करणें अमेरिकेंत शक्य झालें आहे."

संगीत, कला, साहित्य यांच्या क्षेत्रांतील अमेरिकन अभिरुचीला विकासासाठीं अजून बरीच वाटचाल करायची आहे.

## वॉल्टर पिस्टन

वॉल्टर पिस्टनचा जन्म रॉकलँड, मेन येथें १८९४ सालीं झाला. तो अकरा वर्षांचा असतांना त्यांचें कुटुंब बोस्टनला गेलें. बोस्टनमधल्या हायस्कूलमध्यें त्यानें तांत्रिक शिक्षण घेतलें. शाळेंत असतांना त्याचा ओढा संगीताकडे नसून चित्रकलेकडे होता. मॅसच्युसेट्स् नॉर्मल आर्ट स्कूलमधून १९१६ सालीं ड्रॉइंग आणि पेंटिंगची पदवी मिळवून तो बाहेर पडला. लहान असतांना त्याला संगीताचें पद्धतशीर शिक्षण मिळालेंच नव्हतें. पण ऐकून ऐकून तो पिॲनो आणि व्हायोलिन वाजवायला शिकला होता. हॉटेलांतून आणि नृत्यगृहांतून वाजवण्याचें काम करून पोटापुरते पैसे मिळवण्याइतकीं हीं दोन वाद्यें त्याला वाजवतां येत असत. मग त्यानें या दोन्ही वाद्यांचा अभ्यास सुरू केला. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं त्यानें नेव्हींत नोकरी केली, बँडच्या पथकांत सॅक्सोफोन वाजवण्याचें कामहि केलें. युद्ध संपल्यानंतर संगीताचा अभ्यास करण्यासाठीं त्यानें हार्वर्ड कॉलेजांत नांव घातलें. १९२४ सालीं त्यानें संगीताची पदवी मिळवली. यानंतर एक शिष्यवृत्ति घेऊन तो पॅरीसला गेला. तिथें त्यानें नाडिया बॉलाँजरकडे संगीतलेखनाचा अभ्यास केला. मग तो अमेरिकेंत परत आला आणि हार्वर्ड विश्वविद्यालयांत संगीत शिकवूं लागला. स्वतंत्र संगीतलेखनहि आतां तो करूं लागला होता. १९२८ सालीं कॉसेरित्झकीनें वॉल्टर पिस्टननें लिहिलेली 'सिंफनिक पीस' ही रचना सादर केली. त्यानें लिहिलेल्या सेकंड

सिंफनी या रचनेबद्दल म्यूझिक क्रिटिक्स सर्कलचें पारितोषिक त्याला मिळालें. कॉसेव्हित्झकी म्यूझिक फौंडेशनच्या मागणीसाठीं त्यानें 'थर्ड सिंफनी' लिहिली, १९४८ सालीं ती सादर केली गेली. या रचनेबदल त्याला पुलित्झर पारितोषिक मिळालें.

हार्मनी. काउंटर पॉइंट आणि हार्मनीचें पृथक्करण या विषयांवर पिस्टननें महत्त्वाचीं पुस्तकें लिहिलीं आहेत. अमेरिकन संगीतकारांत पिस्टनला मानाचें स्थान आहे. पिस्टनच्या संगीतांत खास अमेरिकन असें कांहीं नाहीं, युरोपियन संगीतांतूनच त्यानें स्फूर्ति घेतली आहे, अशा आशयाचे उद्‌गार आरॉन कॉपलँडनें एकदां काढले होते. परंतु पिस्टनच्या रचनेंतून खऱ्याखुऱ्या अमेरिकन संगीताची म्हणजेच जाझ संगीताची उत्तम जाण व्यक्त झाली आहे हें इथें नमूद करावेंसें वाटतें.

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत
अनुक्रम ...
क्रमांक ... दि ...

## रिचर्ड रॉजर्स

रिचर्ड रॉजर्सचा जन्म १९०२ सालीं न्यू यॉर्क शहरांत झाला. त्याचे वडील डॉक्टर होते आणि आई पिॲनोवादिका होती. त्याला संगीताचें उपजतच देणें होतें. वयाच्या चौथ्या वर्षीच तो ऐकून ऐकून पिॲनो वाजवूं लागला. बोलायला येण्याअगोदरच तो स्वतःची अशी सुरावट गुणगुणूं लागला होता. त्याच्या आईनें त्याला प्रथम पिॲनोवादनाचे धडे दिले. पिआनोवर साथ करणें त्याला आवडत असे. त्यानें आपलें पाहिलें गीत वयाच्या चवदाव्या वर्षीं लिहिलें.

कोलंबिआ विद्यालयांत तो दोन वर्षें शिकला. या विश्वविद्यालयाच्या एका वार्षिक कार्यक्रमासाठीं त्याचा मित्र लॉरेंझ हार्ट यानें गाणीं लिहिलीं आणि रिचर्डनें चाली लिहिल्या. हा कार्यक्रम खूप यशस्वी झाला. कॉलेज सोडल्यानंतर रिचर्डनें गाणीं लिहायला सुरवात केली. हीं गाणीं खपवण्यासाठीं तो टिन पॅन अॅली विभागांत प्रकाशक धुंडूं लागला. परंतु त्याला यश आलें नाहीं.

यानंतर तो इन्स्टिटयूट ऑफ म्यूझिकल आर्टमध्यें संगीताचें शिक्षण घेण्यासाठीं दाखल झाला. त्या काळांत न्यू यॉर्कमधील संगीताच्या जगांत नांवाजलेल्या फ्रँक डॅमरॉश, एच्. इ. क्रेह्‌विएल आणि जॉर्ज वेज यांच्याकडे तो शिकला. संगीताचें तंत्र, हार्मनी यांचें शिक्षण त्याला मिळालें—-आणि यांच्याइतकीच महत्त्वाची आणखी एक गोष्ट त्यानें मिळवली ती म्हणजे आत्मविश्वास. या संस्थेच्या वार्षिक उत्सवाच्या वेळीं एका कार्यक्रमाचें संगीत-

लेखनाचें काम त्याच्याकडे सोंपवण्यांत आलें. या काळांत त्यानें एकांकी, ऑपेरा, एक नृत्यनाट्य आणि एक सिंफनिक पोएम इतकें लेखन केलें. आपलें खरें स्थान ब्रॉडवे विभागांतल्या लोकप्रिय संगीत सादर करणाऱ्या थिएटरांत आहे हें त्यानें ओळखलें. तीन वर्षांनंतर तो पुन्हा लोकप्रिय संगीताकडे वळला. त्याचा मित्र हार्ट गीतांचे शब्द लिही आणि रिचर्ड चाली बांधी. हे त्यांचे कार्यक्रम हौशी कलावंतांचे प्रयोग म्हणून सादर केले जात.

गिल्ड थिएटरच्या मदतीसाठीं एक 'रिव्हू'चा खेळ व्हायचा होता. या खेळासाठीं रिचर्ड रॉजर्सनें संगीत लिहावें अशी विनंति त्याला करण्यांत आली. त्यानें आणि हार्टनें एका रविवारच्या रात्रीच्या खेळासाठीं 'गॅरिक गेइटिज' ही रचना केली. यासाठीं त्यांनीं पैसे घेतले नाहींत. हे दोघेहि अजून हौशी कलावंतांतच जमा होते. त्यामुळें आपल्याकडे लोकांचें लक्ष वेधून घेणें त्यांना महत्त्वाचें वाटत होतें. गॅरिक गेइटिजच्या प्रयोगानें त्यांना हवी असलेली गोष्ट साध्य झाली. श्रोत्यांनीं आणि संगीताच्या टीकाकारांनीं या रचनेची वाखाणणी केली. पहिल्या दोनचार प्रयोगांनंतर हा खेळ लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झाला आणि सतत दीड वर्ष त्याचे प्रयोग होत राहिले. या दोघांहि कलावंतांचें नशिब इथून उघडलें.

आतां नवीं कामें त्यांना सारखीं मिळूं लागलीं; १९२६ सालीं रॉजर्स आणि हार्ट यांनीं लिहिलेले तीन खेळ एकाच वेळीं ब्रॉडवेच्या वेगवेगळ्या तीन थिएटरांत चालू होते. १९२७ सालीं लंडनमध्यें त्यांच्या अनेक खेळांचे प्रयोग झाले. रॉजर्स आणि हार्ट यांनीं लिहिलेला खेळ यशस्वी होणार हें लोक धरूनच चालत. १९३० सालीं रॉजर्स हॉलिवुडसाठीं संगीत लिहूं लागला. १९४३ सालीं ऑक्लाहोमा या संगीत नाटकाचें स्वरनियोजन रिचर्डनें केलें. या वेळीं हार्ट जिवंत नव्हता. त्यामुळें नाटकांतलीं गाणीं ऑस्कर हॅमरस्टाइन (दुसरा) यानें लिहिलीं. या संगीतरचनेबद्दल त्याला खास पुलित्झर पारितोषिक मिळालें. यानंतर त्यानें खूप लेखन केलें. ब्रॉडवेच्या थिएटरांत रिचर्ड रॉजर्सनें संगीत लिहिलेला कार्यक्रम कुठें ना कुठें चालू असतोच—तें खास अमेरिकन संगीत असतें हें त्याचें वैशिष्टय.

## सॅम्युएल बार्बर

सॅम्युएल बार्बरचा जन्म वेस्ट चेस्टर, पेन्‌सिल्व्हानिआ येथें १९१० सालीं झाला. त्याचेहि वडील डॉक्टर होते आणि आई पिॲनोवादिका होती. त्याची मावशी तिच्या काळांतली एक प्रसिद्ध गायिका होती—तिचें नांव लुइसे होमर. मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउस येथें कारुसो, सेंब्रिक, स्कॉटी इत्यादि जगप्रसिद्ध गायकांबरोबर ती गायिली होती. सॅम्युएल सहा वर्षांचा असतांनाच पिॲनो शिकूं लागला आणि सातव्या वर्षी तो स्वतंत्र संगीतलेखन करूं लागला. बाराव्या वर्षी तो चर्चमध्यें ऑर्गन वाजवत असे. वयाच्या तेराव्या वर्षी तो कर्टिस इन्स्टिटयूटमध्यें संगीताचें सर्वांगीण शिक्षण घेण्यासाठीं दाखल झाला. इथला शिक्षणक्रम पुरा केल्यानंतर 'प्रिक्स द रोम' ही अनेकांना हवीहवीशी वाटणारी शिष्यवृत्ति त्याला १९३१ सालीं मिळाली आणि संगीताचें पुढील शिक्षण घेण्यासाठीं तो परदेशीं गेला. पस्तीस सालीं आणि छत्तीस सालीं म्हणजे लागोपाठ दोन वर्षें त्यानें केलेल्या रचनांबद्दल त्याला पुलित्झर पारितोषिक मिळालें. लागोपाठ दोन वर्षें हें पारितोषिक मिळवणारा तो पहिलाच संगीतकार—आणि हा मान त्यानें मिळवला तेव्हां तो फक्त सव्वीस वर्षांचा होता. त्याची 'सिंफनी इन् वन् मूव्हमेंट' ही रचना सॅलझ्बर्ग येथील संगीत-महोत्सवांत वाजवली गेली. सॅलझ्बर्गच्या महोत्सवांत वाजवली गेलेली ही पहिली अमेरिकन रचना होय. बत्तिसाव्या वर्षी सॅम्युएल बार्बर सैन्यांत दाखल

झाला. तो हवाई दलांत काम करीत असे. याच काळांत त्यानें सेकंड सिंफनी ही रचना केली. ही रचना त्यानें हवाईदलाला अर्पण केली आहे. सेकंड सिंफनी १९४४ सालीं सादर केली गेली तेव्हां तिनें रसिकांचें लक्ष वेधून घेतलें. सॅम्युएल बार्बरला आतां अनेक बक्षिसें मिळत होतीं, त्याच्या संगीताला बरीच मागणीहि येत होती.

स्वतः लिहिलेलीं गीतें स्वतः गाऊन दाखवायला सॅम्युएल बार्बरला आवडतें. रेडिओवरून आणि अनेक जलशांतून त्यानें गाणीं म्हटलेलीं आहेत. इंग्लंडमध्यें असतांना जेव्हां त्याच्या कांहीं रचना सादर केल्या गेल्या तेव्हां सॅम्युएल बार्बरनें निर्देशनाचें काम स्वतःच केलें. इंग्लंडमध्यें त्याची 'अडेजिओ फॉर स्ट्रिंग्स' ही रचना लोकप्रिय झाली होती. पॅरीस रेडिओ स्टेशनवर अत्तरांची जाहिरात करतांना या आपल्या रचनेचा उपयोग केला जातो हें जेव्हां त्याच्या आढळांत आलें तेव्हां त्याला फारच आश्चर्य वाटलें. घंटांचा नाद संगीतांत कितपत वापरतां येईल हा विचार कांहीं काळ सॅम्युएल बार्बरच्या मनांत घोळत होता. ही शक्यता अजमावून बघण्यासाठीं त्यानें अँटन ब्रीसबरोबर फ्लॉरिडामधील 'बर्ड सँच्युअरी' येथें हा अभ्यास केला. वृंदगायनाचें नेतृत्व त्यानें प्रथम व्हिएन्ना येथील कार्यक्रमांत केलें. कर्टिस इन्स्टिटयूट इथेंहि त्यानें कांहीं काळ शिकविलें. वयाच्या वीस आणि बत्तीस या काळांत सॅम्युएल बार्बरला विलक्षण मान्यता मिळाली—कित्येक संगीतकारांना आयुष्यभर इतकी मान्यता मिळत नाहीं.

१९५८ च्या जानेवारी महिन्यांत सॅम्युएल बार्बरनें लिहिलेला 'व्हॅनेसा' हा ऑपेरा न्यू यॉर्कमधील मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउस येथें सादर केला गेला.

## विल्यम शुमान

विल्यम शुमान याचा जन्म न्यू यॉर्क येथें १९१० सालीं झाला. सॅम्युएल बार्बरप्रमाणें त्याच्या घरांत कांहीं संगीताचें वातावरण नव्हतें. वयाच्या अकराव्या वर्षी शाळेंतल्या ऑर्केस्ट्रांत बीथोवनचें 'मिन्युएट इन् जी' वाजवण्यासाठीं त्याला व्हायोलिन शिकण्याची इच्छा झाली होती. शाळेंत त्यानें एक जाझ बँडचें पथक संघटित केलें होतें. हार्मनी म्हणजे काय हें त्याला तेव्हां माहीत नव्हतें. तरीहि तो गाणीं लिहिण्याचा प्रयत्न करीत होता. वयाच्या सोळाव्या वर्षी आपण बॉल संगीत वाजवण्याचा व्यवसाय करावा असें त्याला वाटूं लागलें. हायस्कूलमध्यें असतांना जेव्हां त्यानें पहिला जलसा ऐकला तेव्हां त्याचे विचार फार बद्लले. हा जलसा ऐकतांना त्याला आजवर अज्ञात असलेल्या नव्या जगाचा जणुं कांहीं परिचय घडला होता. यानंतर तो कुठेंहि संगीताचा जलसा असला कीं ऐकायला जाऊं लागला. आतां बारीक-सारीक नोकऱ्या करीत असतांना तो फावल्या वेळांत हार्मनीचा अभ्यास करीत होता. रॉय हॅरिसकडे काउंटर पॉइंटचा अभ्यास करीत असतांनाच त्याला आपला मार्ग सांपडला.

शुमाननें यानंतर आपण शिक्षक व्हायचें ठरवून कोलंबिया युनिव्हर्सिटींत प्रवेश केला. १९३५ सालीं तो संगीतमहोत्सवासाठीं सॅलझ्बर्ग येथें गेला. आणि त्याला मोझार्टियम येथें संगीतनिर्देशन शिकण्यासाठीं शिष्यवृत्ति मिळाली.

आपली पहिली सिंफनी लिहायला त्यानें तिथें सुरवात केली. स्वतःच्या कलाकृतींच्या बाबतींत शुमानची वृत्ति अतिशय चिकित्सक असल्यामुळें एखाद्या रचनेनें मनाचें पूर्ण समाधान होईपर्यंत तो ती सादर करीत नाहीं—अशा आपल्या कित्येक रचना त्यानें मागें ठेवल्या आहेत. कॉसेहित्झकीनें १९४१ सालीं त्याची थर्ड सिंफनी ही रचना सादर केली. तेव्हांपासून संगीताच्या जगतांत त्याची कीर्ति पसरूं लागली. आतांपर्यंत त्याला अनेक बक्षिसें मिळालीं आहेत. १९४५ सालीं न्यू यॉर्क येथील ज्युलिअर्ड स्कूल ऑफ म्यूझिकचा त्याला अध्यक्ष निवडण्यांत आलें.

अनुक्रम
वि: ..........


# परिशिष्ट

**ऑपेरा :** या संगीतप्रकाराला समानार्थक ‘ संगीतिका ’ हा शब्द आपण वापरतों. ऑपेरांतले कांहीं भाग वाद्यमेळाच्या—ऑर्केस्ट्राच्या साथीवर गायिले जातात. या ‘ ऑपरां ’त ग्रँड ऑपेरा, लाइट ऑपेरा, कॉमिक ऑपेरा, ऑपरेटा असे कमीअधिक फरक असलेले प्रकार आहेत (Grand opera, Light opera, Comic opera, operetta).

**ग्रँड ऑपेरा :** यांत गद्य संवाद नसतात. याचा विषय सहसा शोकात्म असतो.

**लाइट ऑपेरा :** याचा विषय ग्रँड ऑपेरासारखा गंभीर नसतो.

**कॉमिक ऑपेरा :** यांत गद्य संवादांचाहि अंतर्भाव असतो. कथानक आणि पात्रें विनोदी असतात.

**ऑपरेटा :** हा लाइट ऑपेराच, पण लहान असतो.

**कंचर्टो (Concerto) :** एक किंवा अधिक प्रमुख वाद्यें आणि त्यांच्या साथीला ऑर्केस्ट्रा यांच्यासाठीं केलेली संगीतरचना. समजा, प्रमुख वाद्य जर पिॲनो असेल, तर ही रचना ‘ पिॲनो कंचर्टो ’ या नांवानें संबोधिली जाईल. त्याचप्रमाणें दोन व्हायोलिन्स प्रमुख वाद्यें योजून जर ही संगीतरचना केली असेल, तर ‘ दोन व्हायोलिन्सचा कंचर्टो ’ असें म्हटलें जाईल.

**सिंकोपेशन (Syncopation) :** अनागती मात्रेनें समेशीं क्रीडा करणें.

**मार्च (March) :** प्रारंभीं ही संगीतरचना सैनिकांच्या कवायती संचलना-

रोबर वाजवण्यासाठीं म्हणूनच केली गेली. मार्च या शब्दांत संचलन हा अर्थ आहेच. परंतु ही संगीतरचना एवढ्यापुरतीच मर्यादित राहिली नाहीं. ऑपेरांत आणि थिएटरांत होणाऱ्या इतर संगीताच्या कार्यक्रमांतहि 'मार्च'चा अंतर्भाव केला जातो—'मिरवणुकीचा' संदर्भ मात्र प्रत्येक ठिकाणीं असतो. प्रेतयात्रेच्या वेळीं वाजवण्यासाठीं 'फ्युनरल मार्च' लिहिला जातो; त्याची लय अतिशय संथ असते. कांहीं संगीतकार एखाद्या रचनेचा विभाग (मुव्हमेंट) म्हणूनहि कांहीं वेळां 'मार्च'चा उपयोग करतात.

**हार्मनी** (Harmony) : एकाच वेळीं अनेक स्वरांचें गुंजन.

**मेलडी** (Melody) : मेलडींत एका वेळीं एकच स्वर येतो, आणि हे स्वर एकामागून दुसरा असे येतात. मेलडी ही अशा स्वरांची बंदीश.

**ऱ्हॅप्सडी** (Rhapsody) : फ्यूज, सोनाटा, मार्च...इ० कुठल्याहि प्रकारांत 'ऱ्हॅप्सडी' ही संगीतरचना बसत नाही. त्यामुळें जिचें वर्गीकरण करतां येत नाहीं अशा कुठल्याहि स्वैर रचनेला 'ऱ्हॅप्सडी' असें म्हणण्याचा स्थूल संकेत निर्माण झाला. परंतु दर्जेदार संगीतरचनाकारांनीं लिहिलेली 'ऱ्हॅप्सडी' जरी इतर कुठल्याहि प्रकारांत बसत नसली, तरी तिला स्वतःचा असा कलात्मक घाट असतो.

**काउंटरपॉइंट्** (Counterpoint) : दोन किंवा अधिक मेलडींचें कलात्मक मिश्रण करून केलेली एकसंध रचना. यांतल्या एका मेलडीला दुसऱ्या मेलडीची कांउंटरपॉइंट मेलडी असेंहि म्हणतात. पॉलिफोनी (Polyphony) आणि काउंटरपॉइंट हीं दोन्ही वास्तविक एकाच रचनापद्धतीचीं नांवें. पण पॉलिफोनीचें शास्त्रीय पद्धतीनें लेखन आणि तसाच संगीतरचनेंत उपयोग केला कीं तिला काउंटरपॉइंट असें म्हण्याचा प्रघात आहे.

**स्वीट** (Suite) : प्रारंभीं ही नृत्यधून होती. नंतर संगीतनिर्देशक वेगवेगळ्या संगीतप्रकारांतले आकर्षक तुकडे निवडून त्यांची संकलित आकृति 'स्वीट' म्हणून सादर करूं लागले. ओव्हर्चर (Overture) हाहि 'स्वीट'चाच एक प्रकार. ऑपेरा सुरू होण्यापूर्वीं त्यांतल्या भाववृत्तीची झलक दाखवण्याकरितां त्यांतलेच तुकडे घेऊन या प्रकारचा स्वीट सादर केला जातो. स्वरांच्या माध्यमांतली ही 'नांदी' असें म्हणायला हरकत नाहीं.

**सिंफनी** (Symphony) : तीन किंवा चार विकासी विभाग (Movements) असलेली ऑर्केस्ट्रासाठीं लिहिलेली संगीतरचा. बीथोवन या

संगीतकारानें सिंफनींत विशिष्ट परिणाम साधण्यासाठीं मनुष्यस्वराचाहि उपयोग प्रयोग म्हणून केला होता.

**मुव्हमेंट** (Movement) : मोठ्या संगीतरचनेंतील विभाग, किंवा टप्पे. अस्थायी, अंतरा, संचारी, आभोग या हिंदुस्थानी संगीतांतील 'मुव्हमेंट्स' असे पर्याय सुचवण्यासाठीं म्हणतां येईल. एखादी 'मुव्हमेंट' कार्यक्रमांत स्वतंत्र रचना म्हणूनहि वाजवली जाते.

**सोनाटा** (Sonata) : वाद्यावर वाजविण्यासाठीं केलेली, तीन किंवा चार विभाग (Movements) असलेली रचना.

**टोन पोएम्** (Tone poem) : ही रचना सिंफनिक पोएम् (Symphonic poem) या नांवानेंच विशेष ओळखली जाते. 'सिंफनिक पोएम' (स्वरकाव्य) हा शब्द लिस्टी (Listy) या संगीतरचनाकारानें प्रथम वापरला, 'स्वरकाव्या'ची रचना ऑर्केस्ट्रासाठीं केली जाते. केवळ स्वरांच्या रचनेंतून स्वयंपूर्ण आकार घेणारी ही कलाकृति नव्हे : कारण या रचनेला साहित्याचा, चित्राचा, एखाद्या ऐतिहासिक घटनेचा आधार असतो. यांतूनच स्फुरलेली ही स्वररचना असते. जाहीर कार्यक्रमांत अशा स्वरकाव्यामागील आशयाच्या संदर्भाचा उल्लेख कार्यक्रमपत्रिकांतून श्रोत्यांच्या सोयीसाठीं केला जातो. गाजलेल्या स्वरकाव्यांमागचा संदर्भ जाणकार श्रोते सरावानें ओळखतात.

**फाइव्ह टोन अॅण्ड सिक्स टोन स्केल्स** (Five tone and six tone scales) : ओडव आणि षाडव या सप्तकांत.

**स्केल** : (Scale) : सप्तक.

**फॉर्म** : (Form) : संगीतप्रकार. उदा., सिंफनी, मार्च, फ्यूज इ. संगीतांतील रचनेचे विविध प्रकार.

**स्ट्रिंग क्वॉर्टेट** : (String quartet) : चार तंतुवाद्यांसाठीं केलेली संगीतरचना. दोन व्हायोलिन्स, एक व्हायोला आणि एक व्हायोलिनसेलो अशीं व्हायोलिन 'कुटुंबांतलीं' चार वाद्यें या रचनेसाठीं वापरलीं जातात.

**पॉलीहार्मनी** (Polyharmony) : एकाच वेळीं एकाहून अधिक स्वरांच्या पट्ट्यांच्या (Key) रचनेंत उपयोग करणें. संगीतरचनेंतली ही पद्धति विसाव्या शतकांतली. या पद्धतीला पॉलिटोनॅलिटी (Polytonality) हा शब्द विशेष वापरला जातो.

मराठा ... ठाणे. स
अनुक्रम वि: ........
क्रमांक ... नो: दि: ......

# परिशिष्ट

**ऑपेरा :** या संगीतप्रकाराला समानार्थक 'संगीतिका' हा शब्द आपण वापरतों. ऑपेरांतले कांहीं भाग वाद्यमेळाच्या—ऑर्केस्ट्राच्या साथीवर गायिले जातात. या 'ऑपरां'त ग्रँड ऑपेरा, लाइट ऑपेरा, कॉमिक ऑपेरा, ऑपरेटा असे कमीअधिक फरक असलेले प्रकार आहेत (Grand opera, Light opera, Comic opera, operetta).

**ग्रँड ऑपेरा :** यांत गद्य संवाद नसतात. याचा विषय सहसा शोकात्म असतो.

**लाइट ऑपेरा :** याचा विषय ग्रँड ऑपेरासारखा गंभीर नसतो.

**कॉमिक ऑपेरा :** यांत गद्य संवादांचाहि अंतर्भाव असतो. कथानक आणि पात्रें विनोदी असतात.

**ऑपरेटा :** हा लाइट ऑपेराच, पण लहान असतो.

**कंचर्टो** (Concerto) : एक किंवा अधिक प्रमुख वाद्यें आणि त्यांच्या साथीला ऑर्केस्ट्रा यांच्यासाठीं केलेली संगीतरचना. समजा, प्रमुख वाद्य जर पिॲनो असेल, तर ही रचना 'पिॲनो कंचर्टो' या नांवानें संबोधिली जाईल. त्याचप्रमाणें दोन व्हायोलिन्स प्रमुख वाद्यें योजून जर ही संगीतरचना केली असेल, तर 'दोन व्हायोलिन्सचा कंचर्टो' असें म्हटलें जाईल.

**सिंकोपेशन** (Syncopation) : अनागती मात्रेनें समेशीं क्रीडा करणें.

**मार्च** (March) : प्रारंभीं ही संगीतरचना सैनिकांच्या कवायती संचलना-

रोबर वाजवण्यासाठीं म्हणूनच केली गेली. मार्च या शब्दांत संचलन हा अर्थ आहेच. परंतु ही संगीतरचना एवढ्यापुरतीच मर्यादित राहिली नाहीं. ऑपेरांत आणि थिएटरांत होणाऱ्या इतर संगीताच्या कार्यक्रमांतहि 'मार्च'चा अंतर्भाव केला जातो—'मिरवणुकीचा' संदर्भ मात्र प्रत्येक ठिकाणीं असतो. प्रेतयात्रेच्या वेळीं वाजवण्यासाठीं 'फ्युनरल मार्च' लिहिला जातो; त्याची लय अतिशय संथ असते. कांहीं संगीतकार एखाद्या रचनेचा विभाग (मुव्हमेंट) म्हणूनहि कांहीं वेळां 'मार्च'चा उपयोग करतात.

**हार्मनी** (Harmony) : एकाच वेळीं अनेक स्वरांचें गुंजन.

**मेलडी** (Melody) : मेलडींत एका वेळीं एकच स्वर येतो, आणि हे स्वर एकामागून दुसरा असे येतात. मेलडी ही अशा स्वरांची बंदीश.

**ऱ्हॅप्सडी** (Rhapsody) : फ्यूज, सोनाटा, मार्च...इ० कुठल्याहि प्रकारांत 'ऱ्हॅप्सडी' ही संगीतरचना बसत नाही. त्यामुळें जिचें वर्गीकरण करतां येत नाहीं अशा कुठल्याहि स्वैर रचनेला 'ऱ्हॅप्सडी' असें म्हणण्याचा स्थूल संकेत निर्माण झाला. परंतु दर्जेदार संगीतरचनाकारांनीं लिहिलेली 'ऱ्हॅप्सडी' जरी इतर कुठल्याहि प्रकारांत बसत नसली, तरी तिला स्वतःचा असा कलात्मक घाट असतो.

**काउंटरपॉइंट्** (Counterpoint) : दोन किंवा अधिक मेलडींचें कलात्मक मिश्रण करून केलेली एकसंध रचना. यांतल्या एका मेलडीला दुसऱ्या मेलडीची कांउंटरपॉइंट मेलडी असेंहि म्हणतात. पॉलिफोनी (Polyphony) आणि काउंटरपॉइंट हीं दोन्ही वास्तविक एकाच रचनापद्धतीचीं नांवें. पण पॉलिफोनीचें शास्त्रीय पद्धतीनें लेखन आणि तसाच संगीतरचनेंत उपयोग केला कीं तिला काउंटरपॉइंट असें म्हण्याचा प्रघात आहे.

**स्वीट** (Suite) : प्रारंभीं ही नृत्यधून होती. नंतर संगीतनिर्देशक वेगवेगळ्या संगीतप्रकारांतले आकर्षक तुकडे निवडून त्यांची संकलित आकृति 'स्वीट' म्हणून सादर करूं लागले. ओव्हर्चर (Overture) हाहि 'स्वीट'चाच एक प्रकार. ऑपेरा सुरू होण्यापूर्वी त्यांतल्या भाववृत्तीची झलक दाखवण्याकरितां त्यांतलेच तुकडे घेऊन या प्रकारचा स्वीट सादर केला जातो. स्वरांच्या माध्यमांतली ही 'नांदी' असें म्हणायला हरकत नाहीं.

**सिंफनी** (Symphony) : तीन किंवा चार विकासी विभाग (Movements) असलेली ऑर्केस्ट्रासाठीं लिहिलेली संगीतरचा. बीथोवन या

संगीतकारानें सिंफनींत विशिष्ट परिणाम साधण्यासाठीं मनुष्यस्वराचाहि उपयोग प्रयोग म्हणून केला होता.

**मुव्हमेंट** (Movement) : मोठ्या संगीतरचनेंतील विभाग, किंवा टप्पे. अस्थायी, अंतरा, संचारी, आभोग या हिंदुस्थानी संगीतांतील 'मुव्हमेंट्स' असे पर्याय सुचवण्यासाठीं म्हणतां येईल. एखादी 'मुव्हमेंट' कार्यक्रमांत स्वतंत्र रचना म्हणूनहि वाजवली जाते.

**सोनाटा** (Sonata) : वाद्यावर वाजविण्यासाठीं केलेली, तीन किंवा चार विभाग (Movements) असलेली रचना.

**टोन पोएम्** (Tone poem) : ही रचना सिंफनिक पोएम् (Symphonic poem) या नांवानेंच विशेष ओळखली जाते. 'सिंफनिक पोएम' (स्वरकाव्य) हा शब्द लिस्टी (Listy) या संगीतरचनाकारानें प्रथम वापरला, 'स्वरकाव्या'ची रचना ऑर्केस्ट्रासाठीं केली जाते. केवळ स्वरांच्या रचनेंतून स्वयंपूर्ण आकार घेणारी ही कलाकृति नव्हे : कारण या रचनेला साहित्याचा, चित्राचा, एखाद्या ऐतिहासिक घटनेचा आधार असतो. यांतूनच स्फुरलेली ही स्वररचना असते. जाहीर कार्यक्रमांत अशा स्वरकाव्यामागील आशयाच्या संदर्भाचा उल्लेख कार्यक्रमपत्रिकांतून श्रोत्यांच्या सोयीसाठीं केला जातो. गाजलेल्या स्वरकाव्यांमागचा संदर्भ जाणकार श्रोते सरावानें ओळखतात.

**फाइव्ह टोन ॲण्ड सिक्स टोन स्केल्स** (Five tone and six tone scales) : ओडव आणि षाडव या सप्तकांत.

**स्केल** : (Scale) : सप्तक.

**फॉर्म** : (Form) : संगीतप्रकार. उदा., सिंफनी, मार्च, फ्यूज इ. संगीतांतील रचनेचे विविध प्रकार.

**स्ट्रिंग क्वॉर्टेट** : (String quartet) : चार तंतुवाद्यांसाठीं केलेली संगीतरचना. दोन व्हायोलिन्स, एक व्हायोला आणि एक व्हायोलिनसेलो अशीं व्हायोलिन 'कुटुंबांतलीं' चार वाद्यें या रचनेसाठीं वापरलीं जातात.

**पॉलीहार्मनी** (Polyharmony) : एकाच वेळीं एकाहून अधिक स्वरांच्या पट्ट्यांच्या (Key) रचनेंत उपयोग करणें. संगीतरचनेंतली ही पद्धति विसाव्या शतकांतली. या पद्धतीला पॉलिटोनॅलिटी (Polytonality) हा शब्द विशेष वापरला जातो.

स्कोअर (Score) : संगीतरचनेचा लिहिलेला सरगम.

चेंबर म्यूझिक (Chamber Music) : छोट्या दिवाणखान्यांत निवडक लोकांसमोर वाजवलें जाणारें वाद्यसंगीत. दरबारी, श्रीमन्त लोक संगीताकारांना बोलावून स्वतःच्या आवडीनुसार रचना लिहून घेऊन त्या घरीं दिवाणखान्यांत वाजवून घेत. चेंबर म्यूझिकचा प्रारंभ असा झाला. आज चेंबर म्यूझिक बरेंचसें हौशी कलावंतांपुरतेंच मर्यादित झालें आहे. रेडिओसाठीं निवडक श्रोत्यां-समोर व्यावसायिक कलावंतहि तें वाजवतात.

ॲन्डान्टे (Andante) : लयीचा प्रकारः मध्यविलंबित.

फ्यूज (Fugue) : लहान लहान विषय घेऊन त्यांवर ऑर्केस्ट्रासाठीं केलेली रचना.

ग्लिसँडो (Glissando) : मींड.

सोप्रॅनो (Soprano) : तारतम सप्तक (स्त्रीचा स्वर)

बॅरिटोन (Baritone) : मंद्रतर सप्तक (पुरुषस्वर)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ...
क्रमांक ...
REFBK-0013828
REFBK-0013828
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73828
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

